च ५०४५

भगवान श्रीकृष्ण

व इतर चरित्रे

साने गुरुजी

श्रीकृष्ण | शबरी | महात्मा गौतम बुद्ध | माझी दैवते | श्री शिवराय | देशबंधू दास | लोकमान्य टिळक

भगवान श्रीकृष्ण व इतर चरित्रे

SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA.
115438

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

भगवान श्रीकृष्ण व इतर चरित्रे : साने गुरुजी

प्रकाशक
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी
रावजी देसाई

मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती
१५ ऑगस्ट, २०११

किंमत
रुपये २४०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

अनुक्रमणिका

- भगवान श्रीकृष्ण /५
- शबरी /२९
- महात्मा गौतम बुद्ध /४९
- माझी दैवते /१११
- श्री शिवराय /१५५
- देशबंधू दास /१७३
- लोकमान्य टिळक /२२७

✦✦

भगवान श्रीकृष्ण

भगवान श्रीकृष्ण

कृष्णाचे चरित्र अनंत आहे, अपार आहे. तो परमात्माच मानला आहे. जसे पाहावे तसे त्याचे रूप आहे. जे पाहाल ते त्याच्यात आहे. श्रीकृष्णाकडे अनेकांनी अनेक रीतींनी आजपावेतो पाहिले आहे व पुढेही पाहतील. प्रत्येकाचे पाहणे यथार्थ आहे. जो तो आपल्या अनुभवाच्या उंचीवर उभा राहून आपल्या श्रद्धेच्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहील व त्याला त्याला ते दर्शन सत्यरूपच आहे. श्रीमत् शंकराचार्यांनी कृष्णाकडे पाहिले; ज्ञानेश्वरांनी पाहिले; लोकमान्य टिळकांनी पाहिले; अरविंदांनी पाहिले; महात्माजींनी पाहिले. प्रत्येकाला श्रीकृष्णाची मूर्ती नवनवीनच दिसली. श्रीकृष्ण खरोखर सुंदर आहे. ज्याचे रूप क्षणाक्षणास नवीन दिसते, अभिनव दिसते तोच खरा सुंदर.

क्षणे क्षणे यन्नवतामुपैति ।
तदेव रूपं रमणीयतायाः ।।

कृष्णाच्या चरित्राची रमणीयता ही अशी आहे.

विश्वरूप श्रीकृष्ण

मी कृष्णचरित्रासंबंधी काही वाचले आहे, काही ऐकले आहे. कधी कधी मनात थोडाफार माझ्या शक्तीप्रमाणे विचार करतो, निरनिराळे कृष्ण माझ्या डोळ्यांसमोर उभे राहतात. कोणी मोह पाडतात, कोणी गंभीर करतात, कोणी भिववितात, कोणी हसवितात, कोणी रडवतात, सद्गदित करतात. मोराच्या पिसाचा मुकुट घालणारा,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

बासरी वाजवणारा, सर्वांना मोहून टाकणारा, गोपाळबाळांबरोबर खेळणारा, मातलेल्या असुरांचा बालपणीच समाचार घेणारा, कंस आणि शिशुपाल यांचा वध करणारा, गुरे राखणारा, कालियामर्दन करणारा, कौरव-पांडवांचे सख्य व्हावे म्हणून धडपडणारा, अर्जुनाचे घोडे हाकणारा, गीतेचा उद्गाता-एक ना दोन हजारो प्रसंग डोळ्यांसमोर येतात व मन भांबावते-घाबरते, असा हा विश्वरूप कृष्ण माझ्यासारख्याला कसा पचणार? विदुराच्या कण्या खाणारा, राजसूय यज्ञाच्या वेळेस उष्टी काढणारा, पार्थाचे घोडे हाकणारा, गायी चारणारा, लोणी लुटणारा हा श्रीकृष्ण मला समजतो; परंतु शिखंडीस पुढे करून भीष्मास मारवणारा; 'नरो वा कुंजरो वा' असे म्हणायला लावून धर्माला असत्यवादी करून द्रोणाचार्यास मारवणारा; रथचक्र उद्धरणाऱ्या दिलदार कर्णाला अर्जुनाकडून मारवणारा; गदायुद्धाचा नियम भीमाला मोडायला लावून दुर्योधनाची मांडी मोडवणारा असा हा श्रीकृष्ण मी पचवू शकत नाही. परमेश्वराचे वर्णन करताना 'शांताकारं भुजगशयनं' असे केले आहे. सर्पावर निजलेला असून पुन्हा शांत असा भगवान आहे. अशी जी प्रखर कर्मे त्यांच्यावर निजणारा हा श्रीकृष्ण पुन्हा शांत, गंभीर, अविचल आहे! हा श्रीकृष्ण मला भिववितो, मला दीपवितो. श्रीकृष्णाकडे पाहावयास मी असमर्थ आहे. मी हात जोडून म्हणतो, 'तू परमात्मा आहेस, सर्व रचणारा तू, सर्व पाडणारा तू. देवा, तुला सारे साजूनच दिसते.'

गोड बालपण

गोकुळातील वाढणारा जो श्रीकृष्ण त्याचे चरित्र काही अद्भुतरम्य आहे. कवींना या गोकुळातील गोपाळांचे-मुरलीधराचे, बन्सीधराचे वर्णन करताना कधी कंटाळा येत नाही. शुक्राचार्यासारख्यांस ते चरित्र वेडे करते झाले. मीराबाईला ते पागल करते झाले. चैतन्यरामकृष्ण यांस ते वेडे करते झाले.

'गोकुळीच्या सुखा । अंतपार नाही देखा ।।'

असे तुकारामासारख्यांनी सद्गदित व रोमांचित होऊन म्हटले. हे कृष्णाचे बालपण फार गोड आहे.

श्रीकृष्णाने गोकुळाला प्रेमस्वर्ग बनवले. स्वतः अंगावर घोंगडी टाकून, हातात काठी घेऊन, तोंडात बासरी धरून याने धेनू चारावयास जावे. इतर सर्व गोपाळबाळांत मिसळावे. गोकुळातील सर्व तरुण मुले त्याच्याभोवती यमुनातीरी जमत. तेथे तो खेळ

मांडी. दुबळ्यांची बाजू कृष्ण घ्यायचा व त्यांचा पक्ष खेळात विजयी करायचा. लहानपणापासून तो पडलेल्यांची, दुबळ्यांची बाजू घेणारा; त्यांना हात देऊन, हाक मारून, हिंमत देऊन उठवणारा; विजयी करणारा तो आहे. पेंद्या वगैरे रोडकी पोरे. त्यांचा सवंगडी म्हणजे कृष्ण. यमुनेच्या तीरावर तो सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करावयाचा. कोणाचे जास्त लोणी, कोणाचे कमी ते सर्व एकत्र करून सर्वांना वाटून द्यावयाचे. अशक्ताला जरा जास्तच वाटा द्यावयाचा. हा बाळकृष्ण गोकुळातील तरुण पिढीला प्रेम शिकवत होता. समानता शिकवत होता. बंधुभाव शिकवत होता. प्रत्यक्ष रोजच्या आचरणात ही तत्त्वे कशी आणावी ते शिकवत होता. या सर्व गोपाळांनी एकत्र केला आहे काला; एकत्र केले आहे भोजन आणि मग यमुनेत त्यांनी हात धुतले. यमुनेच्या प्रवाहात जे भाकरीचे तुकडे, जे भाताचे कण मिसळले ते खायला देव मत्स्यरूपाने अवतरले, असे भागवतात म्हटले आहे. कारण ते कण प्रेमाने भरलेले होते. देवांना त्या प्रेमाचा हेवा वाटे. अमृत पिणारे देव, पाणी या प्रेममय गुराख्यांच्या जेवणातील शेष कण मिळण्यासाठी अधीर होत !

वणवे विझवणारा श्रीकृष्ण

मुले सर्व एक झाली तर आईबापही परस्परांची भांडणे विसरणार. दोन शेजाऱ्यांचे परस्परांशी भांडण असेल; परंतु दोघांची मुले जर हे वडिलोपार्जित भांडण उडवून देऊन; एकत्र खाऊपिऊ लागली. बसूउठू लागली, खेळूखिदळू लागली, हिंडूफिरू लागली, तर आईबापाच्या शेजाऱ्यांजवळ असणाऱ्या वैराचे काय चिन्ह उरणार? आईबापही मग मुलांच्या पाठोपाठ जातात व वैरवन्ही विझतो. गोकुळाला लागलेले वणवे श्रीकृष्णाने गिळले असे वर्णन आहे. मला तर हेच वणवे वाटतात. आपण लहान खेड्यात जावे तर तेथे दहा पक्ष आपणास दिसतील, शेकडो क्षुद्र व क्षुल्लक भांडणे दिसतील. तीच द्वेषबीजे मुलांच्या हृदयांतही लहानपणापासून पेरली जातात असे दिसेल. असे हे कलहाग्नी घरादारांची, गावांची कशी राखरांगोळी करतात, गावातील शांतीचा कसा भंग करतात, कशाचीही सुरक्षितता कशी वाटत नाही ते आपण पाहतो. श्रीकृष्णाच्या खोल दृष्टीला दिसले की, गोकुळ सुखधाम जर करावयाचे असेल तर हे कलहाग्नी, हे द्वेषाचे वणवे विझवले पाहिजेत आणि सर्व तरुणांना एकत्र करून त्यांना आपल्या मधुर वाणीच्या वेणूने मोहून, त्यांच्यात मिळून मिसळून, त्यांची हृदये काबीज करून, द्वेषाग्नी गिळून टाकण्याचे काम त्याने केले.

गोकुळात अशक्त अशी मुले असताना गोकुळातील गोपी मथुरेला जाऊन लोणी विकतात. मग त्या पैशातून मिरच्या, मसाले, सुंदर वस्त्रे व दागदागिने आणतात. हे श्रीकृष्णाला वेडेपणाचे वाटले. माझ्या घरचे लोणी विकून माझ्या मुलाला सोन्याने मढवण्यापेक्षा किंवा माझ्या अंगावर दागदागिने घालण्यापेक्षा हे लोणी त्या दुबळ्या मुलांना खायला देऊ दे, त्यांना धष्टपुष्ट, आरोग्यवान करू दे, असे वाटले पाहिजे. श्रीकृष्णाच्या मनात हा विचार येई. कोणाच्या घरी खूप लोणी साठले आहे याची तो बातमी काढी. घरचा मुलगाच ती बातमी देई. मग हा सावळा श्रीकृष्ण आपल्या चलाख गड्यांसह हे लोणी लुटून आणी व सर्वांना वाटून देई. मथुरेच्या रस्त्यावर उभा राहून लोणी विकायला जाणाऱ्या गोपींना तो अडवी, त्यांच्याजवळ लोणी मागे. कधी लोणी पळवी व हसत हसत दूर जाऊन इतर मुलांबरोबर भक्षण करी! आपल्या गावातील सर्व मुले निरोगी, धष्टपुष्ट, हृष्ट दिसावीत तेच खरे गावाचे वैभव व धन. घरातील सोने, रुपे हे धन नाही, असे हा श्रीकृष्ण दाखवीत होता.

तरुणांचा पुढारी

हा लहानगा श्रीकृष्ण तरुणांचा पुढारी झाला. सर्व तरुणांना बलवान, कसरत करणारे, चपळ, तेजस्वी, बंधुभावाने भरलेले असे त्याने बनवले. त्यांचा पाठिंबा मिळवून तो गावातील जुन्या रूढी मोडू लागला. कृष्णाचे सांगणे ऐकायला सर्व तरुण एका पायावर तयार असत. त्यामुळे म्हाताऱ्यांचे काही चालेना. इंद्र पर्जन्य पाठवतो. त्याच्यासाठी मोठा यज्ञ वगैरे गोकुळात करण्यात येत असे. श्रीकृष्णाने या यज्ञाला चाट दिली. हे यज्ञ कशाला ? यात अर्थ नाही, असे तो म्हणे. तुम्हाला कोणाची पूजाच करावयाची असेल, तर या गोवर्धन पर्वताची करा. या पर्वतातून झरे वाहतात. याच्यावर आपल्या गायी चरतात. हा गायींना वाढवणारा पर्वत आहे. यालाच प्रदक्षिणा घाला, असे श्रीकृष्ण सांगू लागला. यज्ञाची ही नवीन कल्पना बालपणीच त्याच्या हृदयात उद्भूत झाली. आपल्या रोजच्या सेवेची साधने, रोजच्या कर्माची साधने, तीच पवित्र आहेत. त्यांचीच पूजा करू. त्यांचीच झीज भरून काढू. त्यांना स्वच्छ ठेवू. हाच यज्ञ असे हा लहानगा कृष्ण सांगू लागला व सारे गोपाळ त्याच्या पाठोपाठ गेले. यज्ञात हविर्भाग खाणारे इंद्र, वरुण यांना त्याने दूर केले. ही एक मोठीच गोष्ट त्याने केली. त्याबरोबरच गोकुळच्या आजूबाजूला गोकुळच्या वाढीस विरोध करणारे जे होते त्यांना त्याने वठणीवर आणणे सुरू केले. कालिया हा एक यमुनेच्या

तीरावर गोकुळाजवळच वसाहत वसवणारा कोणी नाग-जातीचा पुरुष असेल. गोकुळातील पोरांच्या गायी तो चारावयास येऊ देईना. तो मुलांना मारी. त्यांच्या गायी मारी. त्याचा त्रास होऊ लागला. आपले बळ वाढेपर्यंत कृष्ण थांबला होता; परंतु या कालियाला दूर करण्याचे त्याने निश्चित केले. एक दिवस धैर्याने त्याच्या घरात शिरून, त्याला पाडून त्याच्या शिरावर पाय ठेवून तो बालमल्ल उभा राहिला. शेवटी त्याच्या स्त्रिया अनुनय करू लागल्या तेव्हा त्याने त्या कालियाला जीवदान दिले व सांगितले, 'तू येथून जा. या मध्य देशातून दूर समुद्रकाठी जा. तिकडे वसाहत कर. राज्य कर, तेथे तुला कोणाचा त्रास होणार नाही.'

गोकुळातील प्रेमाचा, ऐक्याचा, शांतीचा भंग करणारे असे हे आसुर त्याने दूर केले व गोकुळ आनंदवनभुवन केले, अशा या कृष्णाकडे पाहिले म्हणजे तो मला मोठा क्रांतिकारक दिसतो, तो समाजवादी दिसतो, समानतेचा झेंडा हातात घेणारा दिसतो.

सांदिपनी गुरुजींकडे

कृष्णाने स्वतःच्या मातापित्यांस बंदिशाळेत ठेवणाऱ्या, उग्रसेनाचे राज्य हिरावून घेणाऱ्या जुलमी कंसाचा वध केला. आई-बापांस मुक्त केले आणि तो सांदिपनींकडे अध्ययनार्थ गेला. त्याचे खरे शिक्षण झालेच होते. लहानपणापासून जी कामगिरी त्याने केली, जे प्रयोग केले त्यातून एक प्रकारचे ज्ञान, एक प्रकारची विचाराची दिशा त्याची स्थिर होतच होती; परंतु या सर्वांची नीट सुसंगती लावण्यासाठी तो नवचक्षू देणाऱ्या गुरुंकडे गेला. आपल्या विचारांना परिपूर्णता आणण्यासाठी, झिलई आणण्यासाठी तो गेला. शिष्टसंमत आचार अंगी असावा, सभ्यता जगाची समजावी, जगातील दुसरे विचारप्रवाह समजावेत म्हणून तो गेला. तेथेही सर्वांची हृदये त्याने वश केली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्यादिकांची हृदये आपलीशी केली. तेथेही सुदाम्यासारखी जी अशक्त मुले त्यांचा तो मित्र झाला व त्यांना तो कधी विसरला नाही. अनेक राजे-महाराजे पुढे श्रीकृष्णाने सिंहासनावरून खाली ओढले व नवीन बसविले. पण स्वतः राज्यपद कधी घेतले नाही; परंतु खरा सुदामा ! त्याला सुदामपुरी- एक नगरी दिली. तिथला त्याचा राजा केले ! श्रीकृष्णाला एकच सिंहासन पाहिजे होते आर्तांच्या, पतितांच्या हृदयांतील सिंहासन ! सकल दीन जनतेच्या हृदयांतील तो अनभिषिक्त राजा होता व हेच त्याचे खरे भाग्य होते.

अन्यायाचा काळ

कृष्ण हा मुक्ती देणारा आहे. बद्धांची बाजू घेणारा आहे. जरासंधाने ९६ राजे तुरुंगात घातले होते व एका दावणीने त्यांना बांधले होते ते सारे कृष्णाने मुक्त करवले. जरासंधाचा वध करवला. शिशुपालाचा उच्छेद केला. साम्राज्यमदाने चढलेल्यांचा नक्षा उतरवला. कौरवांनी पांडवांस लुबाडले; हे पाहून तो पांडवांचा सखा झाला व त्यांना धीर देता झाला. त्यांची बाजू उचलून धरता झाला व कौरवांचा नाश करता झाला. दुसऱ्यास तो अन्यायाने लुबाडील, नाडील, पायाखाली चिरडील त्यांचा कृष्ण हा काळ होता. जे पददलित, वंचित त्यांचा तो वाली होता. उठा, मीही तुमच्याबरोबर येतो. रडू नका. हातपाय गाळू नका, असे अभयवचन देणारा, आश्वासन देणारा, प्रोत्साहन देणारा तो होता.

जो जो संकटात असे त्याला श्रीकृष्णाचे स्मरण होई. तो कृष्णाला हाक मारी. मारली जाणारी गाय असो, छळली जाणारी पांचाली असो, त्यांना आता एक श्रीकृष्ण दिसे आणि निरपेक्ष साहाय्य तो करी. त्याचा मोबदला मागत नसे. द्रौपदीने एक पान दिले तरी त्याला ढेकर येई व म्हणे, "तू मला सारे दिलेस !" बिंदू घेऊन तो सिंधू देणारा होता. पोहे खाऊन सुदामपुरी देणारा होता. असा निःस्वार्थी, फलेच्छारहित परंतु लोकसंग्रहाचे, अति त्रासाचे काम करणारा हा महापुरुष युगपुरुष होता. जिवंत, त्यागमयी, यज्ञमयी मूर्ती होती.

जीवनाचे सार–गीता

अशा या परमज्ञानी कर्मवीराने आपल्या जीवनाचे सारही आपणास दिले आहे. जीवनाची सफलता कशाने आहे हे त्याने सर्व मानवजातीला सांगून ठेवले आहे. आपल्याला संदेश देऊन ठेवला आहे, हा संदेश म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीता. हा लहानसा ग्रंथ; परंतु याला तुलना नाही. वामनाच्या तीन पावलांत सर्व ब्रह्मांड मावले त्याप्रमाणे या सातशे श्लोकांत सर्व तत्त्वज्ञान आले आहे. सर्व थोर विचार आले आहेत. येथे भक्ती आहे, कर्म आहे, ज्ञान आहे, योग आहे, सर्वांना येथे स्थान आहे. सर्व तत्त्वज्ञानांचे सूर येथे एकत्र आणून परमेश्वराने – या श्रीकृष्णाने मधुर संगीत निर्माण केले आहे. गीता म्हणजे धर्मविचारांचा लहान कोश आहे. येथे सर्व आहे. गीता ही श्रीकृष्णाची मुमुक्षुला, पुरुषार्थ प्राप्त करू इच्छिणाऱ्याला देणगी आहे.

नवधर्म

आपले सर्व विचार या गीतेत श्रीकृष्णाने सांगितले आहेत. एक नवधर्मच जणू त्याने दिला. या धर्माचा अधिकार यच्चयावत सर्वांना आहे. या धर्माचे आचरण करून सर्व मुक्त होतील. वेदांचा रस्ता, ज्ञानाचा रस्ता 'स्त्री-वैश्य-शूद्रहि' (९ । ३२) यांना बंद केला गेला होता, तो श्रीकृष्णांनी मोकळा केला. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत शेवटी म्हटले आहे की, "वेद श्रीमंत आहे; परंतु जो कंजूष आहे. तो त्रैवर्णिकांसाठी आहे. त्याचे दार इतरांना खुले नाही; परंतु गीता ही सर्वांसाठी उभी आहे. हे पाहून वेद लाजला, भ्याला व तो चोरून गीतेत येऊन बसला व आपली अब्रू सांभाळता झाला." बालपणीच्या यज्ञाच्या कल्पना या गीतेत श्रीकृष्णांनी अधिक स्पष्ट केल्या. वेदांमध्ये सांगितलेले यज्ञ, हे हविर्भाग, त्या आहुती यांना अर्थ नाही; स्वर्गभोगाच्या आसक्तीने केलेली ही कर्मे ! ही तुच्छ आहेत.

अविवेकी वृथा वाणी बोलती फुलवूनिया ।
वेदाचे घालिती वाद म्हणती दुसरे नसे ।। २ । ४२
जन्मूनिया करा कर्मे मिळवा भोग वैभव ।
भोगा कर्म-फळे गोड सांगती स्वर्गकामुक ।।२ ।४३

अशा प्रकारचे जे यज्ञ, त्यांचा श्रीकृष्णाने धुव्वा उडवला. "तिन्ही गुण वेद वेद त्यात राहे अलिप्त तू ।" (२ । ४५) "क्षीणे पुण्ये मृत्यू लोकास येती" (९ । २१) वगैरे वचनांनी या कर्मांची हीनता व विफलता दाखवली आहे. "द्रव्ययज्ञाहुनी थोर ज्ञानयज्ञचि होय तो ।" (४ । ३३) असे त्याने स्वच्छ सांगितले आणि हा ज्ञानयज्ञ काय, त्याचे अनेक ठिकाणी गीतेत वर्णन केले.

गीता कर्म करायला सांगत आहे. "नेमिले तू करी कर्म, करणे हेचि चांगले ।" (३ । ८) असे गीता पुकारीत आहे; परंतु गीता जे कर्म करायला सांगते, ते योगयुक्त कर्म होय. त्यात भक्ती व ज्ञान ही ओतली आहेत. भक्तिज्ञान ज्याच्यात ओतलेले आहेत, असे कर्म म्हणजे ज्ञानयज्ञच तो. अशा कर्माने शांती मिळते, श्रेय मिळते, मोक्ष मिळतो.

हृदयात श्रीकृष्ण

श्रीकृष्णाकडे आता मी निराळ्याच दृष्टीने पाहू लागतो. गोकुळात व्यवस्था करणारा, प्रेम निर्माण करणारा, मुरली वाजविणारा यांचे निराळेच आता मला दर्शन

होऊ लागते. हा कृष्ण माझ्या हृदयातच मला दिसायला लागतो. गोकुळात कृष्ण वाढला. हे कोठले गोकुळ ! 'गो' या शब्दाचा अर्थ गाय आहे, तसाच इंद्रिय असाही अर्थ आहे. गायी जशा हिरवे हिरवे रान पाहून दूरवर चरत जातात, त्याप्रमाणे मोहक, आकर्षक वस्तू दिसली की, इंद्रियेही पतंगाप्रमाणे त्याकडे धावत जातात ! गोकुळ म्हणजे इंद्रियांचे कूळ, इंद्रियांचा समुदाय. या इंद्रियांच्या शेकडो प्रवृत्ती असतात. त्यात एकवाक्यता नसते. अंतःकरणात गोंधळ असतो, वणवे असतात. अंतःकरणाच्या शुद्ध भावनेच्या यमुनेत अहंकाराचे कालिये ठाणी देतात. अघासुर, दंभासुर निर्माण होतात. अंतःकरणाची तगमग होते. आरडाओरड, गदारोळ, धांगडधिंगा माझ्या हृदयांगणात मला ऐकू येतो. माझे हृदयमंथन चालू असते. आपण समुद्र-मंथनाची गोष्ट वाचतो. हे समुद्रमंथन म्हणजे रूपक आहे. हे समुद्रमंथन म्हणजे आपल्या प्रत्येकाच्या हृदयात रात्रंदिन चालणारे हृदयमंथन होय. या हृदयसागरावर अनेक वासनांच्या, विकारांच्या, मनोरथांच्या ऊर्मी उसळत असतात आणि या मंथनातून या सागरतीरावर नाना प्रकारच्या वस्तू येऊन पडतात. आपल्या या हृदयात काय नाही? यातून लक्ष्मी निर्माण होते, चंद्र निर्माण होतो, यातून दारू निर्माण होते, अप्सरा निर्माण होतात, विष निर्माण होते ! काय निर्माण होत नाही ? ज्या वेळेस विषयवासना हृदयात उंचावतात तेव्हा आपण अप्सरा निर्माण करतो. ज्या वेळेस प्रेमसागर उचंबळतो तेव्हा चंद्र निर्माण होतो. जेव्हा आपण लोकांना वाक्ताडन करतो, त्यांच्यावर जुलूम करतो तेव्हा चाबूक आपल्या हृदयातून निर्माण होतो. जगाला बोंबा मारायला लावतो, हाय हाय करायला लावतो, तेव्हा शंख निर्माण होतो, असे हृदयमंथन सुरू असते. त्यामुळे आपणास शांती नसते. अमृत मिळाल्याशिवाय दैवी वृत्तींना शांती नाही. आसुरी वृत्तींना सुरा मिळाल्याने, अप्सरा मिळाल्याने, लक्ष्मी मिळाल्याने आनंद होईल; परंतु सद्वृत्तींना अमृत पाहिजे असते.

रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग

श्रीकृष्णाला सोळा हजार नारी होत्या असे आपण ऐकतो. माझ्या मनात असे येते की, या सोळा हजार नारी म्हणजे आपल्या मनोवृत्तीच होत. जोपर्यंत आपले ध्येय ठरत नाही, मार्ग ठरत नाही, कोठे जावयाचे ते ठरत नाही, तोपर्यंत आपली स्थिती अशीच असते. वाङ्मयसेवक व्हावे, इतिहाससंशोधक व्हावे, धर्मवीर व्हावे, संत व्हावे, खादीसेवक व्हावे, अस्पृश्योद्धाराला वाहून घ्यावे, मल्ल व्हावे, उत्कृष्ट खेळाडू व्हावे,

ग्रामसंघटना करणारा व्हावे, ज्योतिषशास्त्रज्ञ व्हावे, क्रांतिकारक व्हावे, सत्याग्रही व्हावे - व्हावे तरी काय ? या शेकडो प्रवृत्ती अंतःकरणाला ओढतात व आपण एक प्रकारे निष्क्रिय होतो. ''माझ्याकडे चल, माझ्याकडे ये'' अशा आरोळ्या, असा आग्रह या सर्व प्रवृत्ती करीत असतात. याशिवाय, अन्य प्रवृत्ती असतातच. सुखभोगाच्या, विलासाच्या, ऐषआरामाच्या, द्वेष-मत्सराच्या. जसजसा मनुष्य वाढत जातो, सुसंस्कृत होतो तसतशा त्याच्या प्रवृत्ती वाढतात. रानटी माणसाला खाणे-पिणे, झोपणे अशा थोड्याच प्रवृत्ती असतील. त्याच्यापेक्षा सुधारलेल्या माणसाला जास्त असणार. कृष्णाच्या काळात सोळा हजार प्रवृत्ती असतील. आज विसाव्या शतकातील माणसास वीस हजार असतील व तिसाव्या शतकातील माणसास तीस हजार असतील ! जीवन जसजसे विकसित होत जाईल, गुंतागुंतीचे होत जाईल तसतशा या प्रवृत्ती वाढत जाणार. अंतःकरणात अशा प्रकारे प्रवृत्तींचा धुमाकूळ चाललेला असतो. परस्परविरोधी असे हे झगडे चाललेले असतात. तुकारामांनी म्हटले आहे, ''रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग ! अंतर्बाह्य जग आणि मन'' रात्रंदिवस ब्राह्य आचार आणि अंतर्विचार यांत सारखा झगडा आहे.

कृष्णजन्म केव्हा होतो?

द्वेष-मत्सरांनी त्रस्त झालेल्या अशा या गोकुळात शेवटी कृष्ण जन्माला येतो; नंद-यशोदेच्या पोटी तो जन्माला येतो. यशोदा म्हणजे यश देणाऱ्या, कल्याण करणाऱ्या वृत्ती. नंद म्हणजे आनंददायी वृत्ती. याचा अर्थ, अंतःकरणातील सत्प्रवृत्तींना जेव्हा तळमळ लागते, या झगड्यातून शांती मिळावी असे वाटते तेव्हा श्रीकृष्णाचा जन्म होतो ! ही उत्कंठा म्हणजे निम्मे काम संपले. रोगाची चिकित्सा सुरू झाली की रोग पळतो ! स्वातंत्र्याचा ध्यास लागताच गुलामगिरी पळते. अंतःकरणातील गोंधळाचा, बजबजपुरीचा वीट आला, श्रावणातील कृष्णपक्षातील भेसूर काळोखाचा तिरस्कार वाटू लागला, श्रावणातील रात्रीचे वादळ, मुसळधार पाऊस, मेघांचा गडगडाट, विजांचा चमचमाट हे जाऊन वातावरण शांत व्हावे, ही अविकासाची वादळी भेसूर हवा जाऊन वातावरण प्रसन्न व्हावे अशी तळमळ लागते, नेत्रांतून पाणी येते, मन अस्वस्थ होते, अधीर होते, तेव्हा श्रीकृष्ण जन्मतो. या सर्व अव्यवस्थेत मला व्यवस्था लावता येऊ दे, या अंधारात मला ध्येयसूर्य, ध्येयध्रुव दिसू दे, असे कळकळीचे वाटणे म्हणजेच कृष्णजन्म होय.

रवींद्रनाथांनी गीतांजलीत म्हटले आहे, ''सारा दिवस माझा सतारीच्या तारा लावण्यात व त्या पिरगळण्यातच गेला, अजून सतार लागत नाही. तुला मी कसे बोलावू, काय गाऊन दाखवू?'' अशीच आपली स्थिती असते. सारे जीवन बेसूर असते. निरनिराळ्या इंद्रियांच्या, प्रवृत्तींच्या, मनोरथांच्या तारा नीट लावता येत नाहीत. ही हृदयतंत्री सातच तारांची नसून अनंत तारांची आहे. या तारा नीट लावून त्यांच्यात मेळ निर्माण करून संगीत निर्माण करणे हे श्रीकृष्णाचे काम आहे. मुरली वाजवणारा श्रीकृष्ण तो हाच होय. या आपल्या इंद्रिय-गोकुळात ध्येय श्रीकृष्ण या सर्व वासनामय, कल्पनामय तारांना कह्यात आणून, त्यांना खुंट्यांना बांधून सर्वांना योग्य ते स्थान देऊन त्यातून दिव्य संगीत निर्माण करतो. अंतःकरणातील माझ्या कामक्रोधांचाही हा श्रीकृष्ण उपयोग करून घेतो. 'क्रोधो हि निर्मलधियां रमणीय एव।' ज्या ज्या अंतःकरणात हा मेळ घालणारा योगरूप कृष्ण जन्मास आला त्याचा क्रोधही किती सुंदर असेल !

अव्यवस्थेतून व्यवस्था निर्माण करणारा, गोंधळातून संगीत निर्माण करणारा म्हणजे श्रीकृष्ण होय. ॲमील या थोर विचारकर्त्याने स्वतःबद्दल म्हटले आहे, ''माझ्या विरोधी संशयात्मक निराश अंतःकरणात खाली खोल दबून राहिलेले, अगदी जीवनाच्या आतील गाभाऱ्यात असलेले एक लहान मूल आहे. ते मूल अदृश्य आहे. ते ध्येयावर श्रद्धा ठेवणारे, प्रेमावर, पावित्र्यावर, मंगलावर विश्वास ठेवणारे, सर्व दैवी गोष्टींवर, दिव्यतेवर श्रद्धा ठेवणारे असे आहे.''

आपल्या सर्वांच्या हृदयगाभाऱ्यात हे बालक हा शंभू, हा मृत्यूंजय, हा सदाशिव. हा श्रीकृष्ण असतो. तो दिसत नाही; परंतु असतो. कधी एखाद्या वेळेस त्याचा मंद सूर येतो. हे संगीत निर्माण करणारे लहान बालक म्हणजेच श्रीकृष्ण होय.

या बालकाला वाढवले पाहिजे. या बालकाची आपण आई झाले पाहिजे. देव भक्ताची आई होतो; परंतु भक्तही देवाची आई होतो ! भक्त ध्येयबाळाला जन्म देतो व त्या ध्येयाचीच पुढे पूजा करतो. तुलसीदासांनी म्हटले आहे, ''देवा, तुझी-माझी नाती अनेक आहेत. मला ज्या वेळेस जे नाते योग्य वाटले ते मी मानतो.'' या ध्येयदेवाजवळ भक्त असाच वागतो. आधी ध्येयावर रुसतो, रागावतो, कधी त्याची पूजा करतो, कधी त्याला वाढवतो. आपण आपल्या ध्येयवादाचे आईबाप झाले पाहिजे, त्याला वाढवले पाहिजे. म्हणजे तो दिव्य मुरलीने हृदय शांत करील.

प्रमाणबद्धता हवी

संगीत निर्माण करणे म्हणजे प्रमाण साधणे; कोठल्या तारा किती पिळाव्या, कोणते पडदे दाबावे हे सारे कळणे. प्रमाणबद्धता म्हणजे कलेचा आत्मा आहे. प्रमाणबद्धतेत सौंदर्य आहे. आपले नाक दोन हात लांब असले किंवा कानच फार लांब असले तर आपण सुंदर दिसणार नाही. प्रमाणबद्धता पाहिजे. जीवनात संगीत निर्माण करणे, व्यवस्था निर्माण करणे, सुसंवाद निर्माण करणे, विसंवाद दूर करून सुसंवाद उत्पन्न करणे म्हणजेच सर्व प्रवृत्तींचा नीट मेळ घालणे. अंतःकरणातील वासना-विकार-मनोवृत्ती यांना प्रमाणात राखणे यालाच गीता 'योग' म्हणते. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत फार सुंदर रीतीने लिहिले आहे :-

''आहार तरी सेविजे । परी युक्तीचेनि मापे मळिजे ।
क्रियाजात आचरिजे । तयाचि स्थिति ।।
मापितला बोल बोलिजे । मितलिया पाउली चालिजे ।
निद्रेही मान दीजे । अवसरे एके ।।
जागणे जरी जाहले । तरी व्हावे ते मितले ।
येतुलेनि धातुसाम्य संचले । असेल सुख ।।
ऐसे युक्तीचेनि हाते । जै इंद्रिया वोपिजे भाते ।।
तै संतोषासी वाढते । मनचि करी ।।'' (अ. ६ । ३४९-५२)

याला संयम म्हणतात; परंतु हे कठीण आहे. हे साधावयाचे कसे ? प्रयत्नाने. रवींद्रनाथांनी एका कवितेत म्हटले आहे, ''देवा, तू कोकिळेला जेवढा आवाज दिला आहेस तेवढाच तिच्याजवळ मागतोस. कोकिळा फक्त कुहू कुहू करते. ते तुला पुरे होते. तू फुलाला जेवढा वास दिला आहेस, तेवढाच त्याच्याजवळ मागतोस; परंतु मनुष्याच्या बाबतीत तू निराळा वागतोस. तू आम्हांला माती देतोस व तिच्यातून अमरावती निर्माण करा असे सांगतोस. कोळसे देऊन हिरे करा असे सांगतोस. मृत्यू देऊन अमृतत्व निर्माण करा, अंधार देऊन प्रकाश निर्माण करा, असं सांगतोस.'' असेच आहे. ईश्वराने कठीण काम आपल्यावर सोपवले आहे. याचाच अर्थ त्याचे आपणावर प्रेम आहे. तो आपणास तुच्छ मानीत नाही. माझी मानवबाळे महनीय गोष्टी करतील अशी त्या थोर पित्याची अपेक्षा आहे.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तुकारामांनी म्हटले आहे, ''इंद्रियांची दीने । आम्ही केली नारायणे ।।'' नारायणाने आम्हांला इंद्रियांचे गुलाम करून ठेवले आहे व त्यांचे आम्ही धनी व्हावे असे तो इच्छितो. आमच्या हृदयांत गोंधळ आहे, तेथून तो संगीताची आम्ही निर्मिती करावी अशी अपेक्षा करतो. हे कठीण आहे; परंतु म्हणूनच करण्यासारखे आहे. हे करणे म्हणजेच कृष्ण जन्माला घालणे होय.

असा हा कृष्ण वाढत कसा जाईल ? कर्म करीत गेल्याने. कर्म कसे करावे ? कोणते कर्म करावे ?

समाजहिताचे प्रत्येक कर्म पवित्रच

समाजाच्या हिताचे प्रत्येक कर्म पवित्र आहे. त्या त्या परिस्थितीत जे जे करता येईल तसेच कर्म उत्कृष्टपणे करणे, त्या वेळेस इतर वासना-विकार-मनोरथ शांत ठेवणे व सर्व जीवन त्या कर्मात ओतणे म्हणजेच धर्म होय. 'स्वकर्मणा तमभ्यर्च सिद्धिं विंदति मानवः' आपल्या कर्मरूप पुष्पाने त्याची पूजा करून मनुष्य सिद्धी मिळवतो. माझे कर्म परमेश्वराच्या पायांवर पुष्प म्हणून घालण्याला मला लाज वाटली न पाहिजे, असे ते कर्म व्हावे. मग माझे चटई विणण्याचे काम असो, झाडण्याचे काम असो वा महान ग्रंथ लिहिण्याचे काम असो. कबीर शेला विणी. तो कोणत्या दृष्टीने विणी ? गिऱ्हाईकाला फसवण्याच्या दृष्टीने ? नाही. माझा हा शेला भगवंताच्या पायांवर, त्याच्या अंगावर घालावयाचा आहे, या दृष्टीने कबीर शेले विणी. त्याचे ते शेला विणण्याचे कर्म, भगवंताची पूजा करण्याचे पुष्प होते. त्या कर्मात जीवनाचा सारा सुगंध, सारे सौंदर्य व रस त्याने ओतलेला होता. यामुळे कबिराच्या शेल्यात दिव्यता झळके. गिऱ्हाईकाची दृष्टी त्यावर ठरत नसे ! तो शेला अमोल आहे, असे सर्वांना वाटे. ज्या कर्मात जीवन ओतलेले आहे, हृदयाने जे रंगवलेले आहे त्याचे मोल कोण करणार?

वेरूळचे मुख्य जे कैलास लेणे ते ज्या प्रमुख शिल्पकाराने खोदून तयार केले, त्याला ते तयार झाल्यावर स्वतःलाच आश्चर्य वाटले ! तो त्या लेण्याकडे पाहात विस्मयाने म्हणाला, ''काय? हे माझ्या या पार्थिव हातांनी मी लेणे निर्माण केले ? हे शक्य झाले ?'' तेव्हा आकाशवाणी झाली, ''नाही, हे देवांनी निर्माण केले.'' ही जी दंतकथा आहे, त्यात काय भावार्थ आहे? ती हृदयाकाशातील वाणी म्हणाली, ''तू स्वतःला विसरला होतास, परमेश्वरच जणू तुझ्या हातात येऊन बसला होता.

विश्वंभराच्या पायांवर अर्पण करण्यासाठी, त्याच्या अंगावर घालण्यासाठी तू ही लेखणी निर्माण करीत होतास. त्यात तू इतका दंग झालास की, स्वतः विश्वंभरच जणू तुझ्या हातात, तुझ्या दृष्टीत येऊन बसला!'' ''देवा भूत्वा देवं यजेत'' – ईश्वराची पूजा या कर्माने मला करावयाची आहे, या भावनेच्या उत्कटत्वाने जणू माझा देवच येऊन ते कर्म करतो व ती दिव्यता त्या कर्मात प्रगट होते.

माझे कर्म हे ईश्वराला द्यावयाचे आहे. या भावनेने जर होईल तर ते किती उत्कृष्ट होईल? साधा कोणी जेलर, सुपरिंटेंडेंट रागावेल, तो खूश होणार नाही म्हणून आपण किती जपून काम करतो? जेलरला आनंद व्हावा म्हणून मी जपतो. त्याच्यापेक्षा किती पटींनी परमेश्वराला आनंद व्हावा म्हणून मी जपेन? मग जेलमध्ये जी मी सतरंजी तयार करीत असेन, ती किती काळजीपूर्वक मी करीन? ही सतरंजी कोण तरी बाहेरचा मनुष्य म्हणजे ईश्वरच आहे, तो नारायण आहे. तो परमेश्वर, नारायण माझ्या या सतरंजीवर बसणार आहे, ही भावना, हा विचार माझ्या सतरंजी विणण्याच्या कर्मात केवढी दिव्यता ओतील?

भिशीमधील स्वयंपाक करणाऱ्यांनी भाकर नीट भाजली नाही तर आपण रागावतो, भाकरीला पापुद्रा सुटला नाही म्हणून संतापतो. पंधराशे लोकांचा त्यांना स्वयंपाक करावयाचा असतो. ते कठीण काम आहे. जर त्या स्वयंपाक करणाऱ्यांची अशी वृत्ती झालेली असेल की, ही भाकर माझे देव खाणार आहेत, माझे नारायण खाणार आहेत. तरी किती सुंदर भाकर ते भाजतील? भिशीमधील कैद्यांची अशी वृत्ती व्हावी ही आपण स्वराज्यवाले अपेक्षा करतो. त्या कैद्यांनी संत नामदेवाच्या दर्जाचे व्हावे अशी आपण अपेक्षा करतो; परंतु अशी अपेक्षा करण्याचा माझा अधिकार आहे का? मी जे काम करीत आहे ते त्याच दृष्टीने मी करीत आहे का? रस्सी तयार करण्याचे, सतरंजी विणण्याचे, गालिचा तयार करण्याचे – कोणतेही कर्म जे आपण करतो ते याच भावनेने. हे कर्म ईश्वरासाठी आहे या भावनेने करतो का? ही भावना होणे म्हणजेच योग. म्हणजेच ते कर्मपुष्प देवाच्या पायांवर वाहावयाच्या लायकीचे झाले. मग ते कर्म कोणतेही असो, ते प्रभूला प्रिय आहे.

हृदय ओतले असेल ते काव्य

देवाच्या दृष्टीने उच्चनीच काही नाही. लघु–गुरू, श्रेष्ठ–कनिष्ठ काही नाही. एखाद्या झाडणाऱ्याने झाडण्याच्या कामात सर्व हृदय गोवले असेल, हे देवाचे अंगण

मी झाडतो आहे, माझ्या राजराजेश्वराचे अंगण झाडतो आहे या भावनेने घर झाडले असेल, त्या वेळेस इतर सर्व गोष्टींची विस्मृती जर त्याला पडली असेल, तर ते झाडण्याचे-सडासंमार्जनाचे कर्म किती थोर आहे ! एखाद्या महान कवीने लिहिलेले काव्य व हे संमार्जन ही कामे देवाला सारखीच पूज्य व पवित्र वाटतील.

बुकर टी. वॉशिंग्टनची गोष्ट आहे ना? तो गरीब होता. एका श्रीमंताकडे काही काम मागावयास गेला. त्याने त्याला खोली झाडण्याचे स्टडी-रूम झाडण्याचे काम दिले. बुकर टी. वॉशिंग्टनने ती खोली किती स्वच्छ झाडली ! पुन:पुन्हा हाताने पुसून मळ आहे का पाही व पुन्हा पुशी. आरशासारखी त्याने ती खोली केली. तो धनी प्रसन्न झाला. बुकर टी. वॉशिंग्टनचे ते झाडण्याचे काम का तुच्छ होते? हलके होते? कोण म्हणेल? त्यात सारा जिव्हाळा ओतला आहे, त्यात हृदय आहे. ते काव्य निर्माण करीत होता.

कार्लाईल म्हणतो ना, ''आपण सारे कवीच आहोत.'' मग ते काव्य कोणत्याही रूपाचे असो. चित्र काढण्याचे असो, गाण्याचे असो, खादी विणण्याचे असो, भाकर भाजण्याचे असो, महाग्रंथ लिहिण्याचे असो, मुलांना शिकवण्याचे असो- ही सारे कर्मे काव्ये होत. शेतकरी भूमी नांगरून तिला सस्य-श्यामल व सुंदर करतो. माळी भूमीला फळाफुलांनी नटवतो. ती महाकाव्येच आहेत ! कोठलेही कर्म अव्यंग करणे, निर्दोष, परिपूर्ण करणे; त्यात कुचराई, ढिलेपणा न करणे; त्या कार्याला मनात तुच्छ न लेखून ते करणे, म्हणजे ते काव्य आहे. ते थोर आहे. ती ईश्वराची पूजा आहे. कर्म म्हणजे पूजा, असे कार्लाईल म्हणे. तेच गीतेनेही सांगितले आहे.

शिवाजी महाराज गडावर सुरक्षित पोचल्याची खूण म्हणून अजून पाच तोफा कशा ऐकू येत नाहीत, म्हणून चिंतेने खिन्न झालेला थोर वीर बाजी-त्याचे प्राण, कंठागत प्राण घुटमळत राहिले होते. बार ऐकताच, ''आता मी सुखाने मरतो, माझं काम झालं.'' असे तो म्हणाला. त्याचे ते कर्म किती परिपूर्ण होते !

भूमितीचा जनक जो युक्लिड तो समुद्रकिनाऱ्यावर वाळूमध्ये भूमितीचे सिद्धांत व प्रमेये सोडवण्यात तल्लीन झाला होता आणि शत्रूंनी त्याचे शिर कापून नेले ! तो स्वत:च्या कर्मात किती एकरूप झाला होता! ती पूजा होती.

भगवान पाणिनी वनामध्ये शिष्यांना व्याकरणाचा पाठ देत होते. इतक्यात समोरून विशाल व्याघ्र आला. व्याघ्र पाहताच शब्दब्रह्माची उपासना करणारा हा ऋषी

न घाबरता आनंदला. त्या महान आचार्याला वस्तुपाठ शिकवण्याला वस्तू मिळाली. व्याघ्र शब्दाची व्युत्पत्ती त्यांनी जी सांगितली होती ती समोर व्याघ्राला पाहून ते प्रत्यक्ष सांगू लागले. 'अय व्याघ्रः-व्याजिघ्रतिं स व्याघ्रः (ज्याचे घाणेंद्रिय विलक्षण तीक्ष्ण आहे तो व्याघ्र)' अशी वाघाकडे बोट करून ते शांतपणे, आनंदाने व्युत्पत्ती प्रतिपादू लागले; परंतु शिष्य केव्हाच पळून गेले होते आणि व्याघ्रानेही झडप घालून पाणिनीस गिळंकृत केले ! स्वकर्मातील केवढी ही तल्लीनता! जी जी वस्तू भेटेल, मिळेल ती ती माझ्या कर्मातील साधन करीन, तिला पवित्र मानीन अशी ही वृत्ती आहे. पाणिनींची व्याकरणविद्या म्हणजे त्यात सारे जीवन होते. ती ईश्वराची पूजा होती.

आणि महाराष्ट्राची आवडती जनाबाई ! नामदेवांकडे संतमंडळी बसून भजन करीत आहेत, चर्चा करीत आहेत, आनंदरस लुटीत आहेत; परंतु जनाबाई दळणच दळीत बसे. दळणाचे काम सोडून ती चर्चा ऐकायला गेली नाही. जात्याचा खुंटा हाच भगवंताचा पाय. तो धरून आलेल्या संतमंडळींना सुंदर भाकर पाहिजे म्हणून दळण. सुंदर दळण ती दळत होती. ते दळण म्हणजे काव्य होते. परमेश्वराची पूजा होती.

भूमितीशास्त्रज्ञ युक्लीड, व्याकरणकार पाणिनी, दळणारी जनाबाई, मरणारा शूर बाजी-ह्या साऱ्यांनी परमेश्वराची पूजा केली व परमेश्वराला ती संग्राह्य वाटली.

तेव्हाच उत्कृष्ट कर्म हातून होते, जेव्हा आपण त्या कर्माच्या आनंदातच बुडून गेलेले असतो, जेव्हा आपण स्वतःला, कीर्तीला, मानाला, फळाला विसरून गेलेले असतो. योगवासिष्ठात म्हटले आहे, "अनहवेदनं सिद्धि अहंवेदनमापदः।" अहंकाराची विस्मृती म्हणजेच सिद्धी. अहंकाराची जाणीव असणे म्हणजेच आपत्ती व अपयश. वेरूळची लेणी खोदणारे, अजिंठ्याची चित्रे चितारणारे, दक्षिण हिंदुस्थानातील ती पाषाणमय महाकाव्ये-महागोपुरे बांधणारे-या सर्वांना स्वतःची विस्मृती पडली होती. म्हणूनच त्यांच्या हातात मूर्तिकला सिद्धी घेऊन बसली होती. स्वातंत्र्याच्या झगड्यात पडलेले जे आपण ते आपणही जर घरदार, आप्तइष्ट सर्व विसरू तर सिद्धी लवकर प्राप्त होईल. अजून आपण स्वीकृत कर्मात वेडे नाही म्हणून अपयश येत आहे.

पीतांबराचा तोबरा करी

अशा रीतीने कर्ममात्र पवित्र आहे. पतीला परमेश्वर मानून त्याचे धोतर नीट धुऊन ठेवणारी, त्याला आवडेल अशी भाजी-भाकरी करणारी- अशा पत्नीच्या चेहऱ्यावर

केवढी प्रसन्नता असते ती पाहा ! ती खरोखर मुक्तच असते. कारण पतीच्या सेवेत, समाधानात ती स्वतःचे सुख विसरते. तिला दुसरे सुखच नाही. समोर बसणाऱ्या मुलांना देवाच्या बालमूर्ती समजून आदराने-भक्तीने वागणारा गुरू ! तोही मुक्त आहे. ही समोरची मुले रद्दी, धोंडे, दगड, फत्तर नसून प्रताप, शिवाजी, भास्कराचार्य, रवींद्रनाथ यांच्यात आहेत, या दृष्टीने पाहणारा गुरू व त्याचे अध्ययनकर्म कशा तऱ्हेचे असेल ! विवेकानंद कलकत्त्याला असणाऱ्या एका महाराष्ट्रीय ब्राह्मण तपस्विनीकडे गेले होते. ती काही मुलामुलींना शिकवत होती. ती विवेकानंदांना सद्‌गदित होऊन म्हणाली, ''हीच माझी पूजा. ही मुले, यांची सेवा, हाच माझा धर्म. या माझ्या भगवंताच्या मूर्ती आहेत.'' थोर शब्द, अर्थगंभीर शब्द ! एका शिक्षणशास्त्रज्ञाने म्हटले आहे, ''एक घटकाभर मुलांची सात्त्विक करमणूक करणे म्हणजे देवाशी सहकार्य करणे होय.'' देवाशी सहकार्य करणारा असा गुरू मुक्तच आहे. तोच त्याचा धर्म. तेच जप-तप. तेच संध्यास्नान. भारतीय युद्धाच्या वेळेस सूर्यास्त होताच सर्व क्षत्रिय संध्यावंदनाला जात. परंतु श्रीकृष्ण कोठे जाई? तो आपले घोडे पाण्यावर नेई. त्यांच्या अंगांत रुतलेली शल्ये काढी. त्यांना थोपटी. त्यांचा खरारा करी. त्यांना घासदाणा देई. भगवान त्यात रमून जात. त्या कार्यात दिव्य आनंद त्यांना वाटे. आपल्या पीतांबराचाच तोबरा करून तो त्या घोड्यास दाणा चारी. कृष्णाची स्नान-संध्या तीच. ते कर्म त्याने उचलले होते. रामशास्त्री प्रभुणे यांनी पहिल्या माधवराव पेशव्यांना सांगितले ना, ''तुम्ही राज्याचा भार शिरावर घेतला आहे. आता त्याची अखंड चिंता वाहणे हीच तुमची स्नान-संध्या.'' तुकारामांनी म्हटले आहे, ''माझ्या विठोबाचे गान ! हेचि माझे संध्या-स्नान.'' जे कर्म करत असाल त्यातच रमा. तोच सकल धर्म असे माना. त्या वेळेस त्या कर्माहून दुसरे काही पवित्रतम तुम्हाला नाही.

कर्माची साधने सारी पवित्र

अशा प्रकारे मी जे कर्म करतो, भगवंताला अर्पण करायच्या दृष्टीने जे कर्म करतो, ते पवित्र आहे आणि म्हणूनच त्या कर्माची सकल साधने तीही मला पवित्र आहेत, वंद्य आहेत. ज्या यंत्राने मी सतरंजी विणतो, तो पंजा मला पूज्य आहे. तो मी फेकणार नाही. त्याला जपून वापरीन, त्याला तेल लावीन. स्वच्छ, निर्मळ राखीन. ज्या मागावर मी विणतो, तो माग मला पूज्य आहे. ज्या चरख्यावर ती सूत कातते तो चरखा मला पूज्य आहे. त्याची हेळसांड करणार नाही. त्याची माळ नीट ठेवीन, चाक नीट ठेवीन. त्याला

तेल घालीन.ज्या टकळीवर मी सूत कातती मी मला पूज्य आहे. तिला माझा पाय मी लावणार नाही. ज्या झाडणीने मी केर काढतो, त्या झाडणीला मी केर काढल्यावर नीट ठेवीन. तिला पाय लावणार नाही. केरसुणीला जर कोणी पाय लावला तर बायका किती रागावतात ! तिला नमस्कार कर, असे सांगतात. समईला, दिव्याला पाय लागला तर भारतीय माता मुलाला नमस्कार करायला लावतात. अर्जुनाच्या गांडीवाला जर कोणी नाव ठेवले तर अर्जुन त्यास मारावयास उठे. त्याला ते गांडीव इतके पूज्य वाटे ! क्षत्रिय लोक धनुष्याच्या नावाने शपथ घेत असत. यातील अर्थ हाच. माझ्या शेतीचे साधन बैल, तोही मला पूज्य; गाय तीही पूज्य; एवढेच नव्हे तर पहाटेच्या वेळेस कुहू कुहू करणारी कोकिळा, प्रभात काळी त्या उत्कट आवाजाने माझे हृदय सद्‌गदित करणारी कोकिळा, तीही मला पूज्य. कोकिळाव्रत मी तिच्यासाठी करीन. माझ्या शेतीची राखण करणारे नाग, उंदरांना दूर ठेवणारे नाग, त्यांनाही मी नागपंचमीला पुजीन. माझ्या कर्मात, परमेश्वराच्या पूजाकर्मात असणारी, सर्व साधने– ती मला पूज्य आहेत. सेवेसाठी माझे शरीर थंडी–वाऱ्यात सांभाळून ठेवणारा अंगावरचा हा सदरा, हा मला पूज्य आहे. हा मळला तर धुईन, फाटला तर शिवीन. ज्या भांड्यात मी जेवतो, स्वयंपाक करतो ती माझ्यासाठी मलीन झाली, तर त्यांना मी उजळून स्वच्छ करून ठेवीन. एका जपानी शेतकऱ्याने एकदा एक लेख लिहिला होता. त्यात तो म्हणतो, ''मला उद्या स्वयंपाक करावयाचा नसला म्हणून मी आजही भांडी तशीच खरकटी, धुराने काळी झालेली, माझ्या सुखासाठी मलीन झालेली अशी राखू का? उद्या मला वाचावयाचे नसले तरी ज्या कंदिलाजवळ मी आज रात्री वाचले, जो कंदील धुराने काळा झाला, तो तसाच ठेवू का? नाही. मी ती भांडी कृतज्ञतेने घाशीन. मी तो कंदील कृतज्ञ राहून पुशीन.'' केवढी ही थोर भावना आहे ! भारतीय संस्कृतीत ही भावना खेळवण्याचा मोठा प्रयत्न करण्यात आलेला आहे. आपण विजयादशमीच्या वेळेस किंवा नवरात्रात आयुधांची पूजा करतो. वीर तलवारीची पूजा करतो. वाणी तराजू, वजने यांची पूजा करतो. ब्राह्मण ग्रंथांची पूजा करतो. प्रत्येकाच्या कर्माची– ईश्वराची पूजा करण्याची–समाजदेवाची सेवा करण्याची– जी साधने, तीही आपण पूज्य मानली आहेत. प्रातःकाळच्या प्रार्थनेच्या वेळेस 'पादस्पर्श क्षमस्व मे' असे भूमातेला आपण म्हणतो, तिच्यावरून आपण चालतो, थुंकतो, तिला मलिन करतो म्हणून तिची क्षमा. ती देवता आहे. माता आहे. तिला सारवले पाहिजे, धुतले पाहिजे.

माझ्या राहण्याने मलिन होणारी खोली मी स्वच्छ केली पाहिजे, तिला वंदन केले पाहिजे. शिळासप्तमीच्या दिवशी आपणासाठी तीनशेसाठ दिवस तापणारी, काळी होणारी चूलमाई तिला विश्रांती देतो. आदल्या दिवशी रसोई तयार करून ठेवतो. ते शिळे आपण खातो. त्या दिवशी चूल म्हणजे देवता ! तिला सारवतो. तिच्यात आंब्याचा लहान रोपा तिला सावली देण्यासाठी लावतो. आज तिची पूजा असते. अशा रीतीने माझ्या कामात साहाय्यभूत होणारी जी सजीव-निर्जीव साधने, ती मला पूज्य व पवित्र आहेत. ज्या भगवंताची मला पूजा करावयाची आहे, तो भगवंत या साधनांतही मी पाहतो. तुकाराम म्हणतात, ''विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी'' - माझी भजन करण्याची झांज, माझ्या खांद्यावरची पताका-आणि हा भजन करणाऱ्यांचा मेळावा सर्व विठ्ठलच आहे. कारण ही साधने विठ्ठलाकडे नेणारी आहेत. अशा तऱ्हेने ही क्षरसृष्टी, ही माझ्या समोरची बदलणारी सृष्टी, जी मला सेवासाधने नित्य नवी देते, ती क्षरसृष्टी म्हणजेही पुरुष. मी पूजा करणारा, कर्म करणारा, जन्मोजन्मी सेवा करून न थकणारा मी-मीही पुरुष आणि आम्हा दोघांना व्यापून असणारा परमात्मा तो परम पुरुष, तिन्ही पुरुष मिळून पुरुषोत्तमयोग होतो. कर्म, कर्माची साधने, कर्म करणारा व ज्याला कर्म अर्पावयाचे तो समाज, ते विश्व-सर्वत्र मंगल परमात्माच पाहावयाचा, म्हणजेच प्रत्येक कामात कर्म, ज्ञान, भक्ती ओतावयाची. कोणतेही कर्म असो-ते या तिन्ही मिळून पूर्ण आहे. नाही तर ते साङ्ग नाही. संपूर्ण नाही. कर्म, ज्ञान, भक्ती ही निरनिराळी नाहीत. एकाच घराचे हे तीन मजले आहेत. तीन पदरांचे हे एकच जानवे, एकच यज्ञोपवीत आहे. यज्ञोपविताचे तीन पदर निरनिराळे अलग नसतात, तर त्यांची न सुटणारी, न तुटणारी अभेद्य गाठ बांधलेली असते. त्या गाठीला आपण ब्रह्मगाठ म्हणतो. कर्म, ज्ञान आणि भक्ती एकत्र कराल, प्रत्येक कर्मात या तिन्ही गोष्टी ओताल, तेव्हा ब्रह्मगाठ लाभेल, ब्रह्माची भेट घडेल, आनंदाची प्राप्ती होईल. तोपर्यंत नाही. साधनांसहित वाढणारे पवित्र कर्म; ते ज्याला अर्पावयाचे तो परमेश्वर आहे ही भावना, हे ज्ञान आणि कर्म या भगवंताला अर्पण करावयाचे आहे. हा जो जिव्हाळा, ते कर्म करण्यापासून तो अर्पीपर्यंत, हृदयात असते ती भक्ती-अशा रीतीने कर्म, ज्ञान, भक्ती यांचा मिलाफ करायला गीता सांगत आहे. गंगा, यमुना, सरस्वतीचा महापावन त्रिवेणी संगम करायला सांगत आहे. कर्म व ज्ञान यांच्यामधला दुवा म्हणजे भक्ती. कर्माला ज्ञानाशी जोडणारा जिव्हाळा म्हणजे भक्ती.

मुक्तीचा संदेश

अशा तऱ्हेने कर्म करावयास योगेश्वर कृष्ण सांगत आहे. त्या श्रीकृष्णालाच हा उपदेश करावयाचा अधिकार होता. त्याला कोणतेही कार्य पवित्र वाटे. राजसूय यज्ञाच्या वेळेस धर्मराजाने सर्वांना कामे वाटून दिली. श्रीकृष्णाला काम उरलेच नाही. श्रीकृष्ण धर्माला म्हणाला, ''मला योग्य असे काम राहिले आहे. सर्व मंडळी जसजशी उठतील, तसतशी मी उष्टी उचलून शेण लावीन. मी गवळ्याचा मुलगा. शेणाची घाण मला वाटत नाही. शेण पवित्र आहे, मला ते आवडते. मी आनंदाने शेणगोळा फिरवीन.'' राजसूय यज्ञात अग्रपूजा कोणाची करावी याची चर्चा तिकडे शिशुपाल, भीष्म, दुर्योधन यांच्यामध्ये चालली असता हा श्रीकृष्ण, शेण लावण्यात दंग होता ! त्याचा आनंद त्या कर्मात होता. दुसऱ्या मानपानाची कल्पनाही त्याच्या मनात नव्हती. असा श्रीकृष्ण, गायी चारणारा, घोडे हाकणारा, शेण लावणारा. तो सांगत आहे की, कर्म पवित्र आहे; ते उत्कृष्टपणे करा म्हणजे तुम्ही मुक्त आहात.

अंतःकरणातील वेणू

परंतु असे कर्म हातून होणे कठीण आहे. त्याच्यासाठी संयम हवा, अभ्यास हवा, निश्चय हवा, प्रयत्न हवा. अंतःकरणात व्यवस्था लावण्याचा, संगीत निर्माण करण्याचा प्रयत्न करायला हवा. मागील उपवासाच्या वेळी-अग्निदिव्याच्या वेळी महात्माजींनी म्हटले होते, ''आज पन्नास वर्षांच्या सेवेने मी माझ्या अंतःकरणात व्यवस्था निर्माण केली आहे. संयमाने, तपस्येने तेथे असणारा बेसूरपणा दूर केला आहे. म्हणून मला तो आतील मंजुळ आवाज ऐकू येत आहे. ती आतील कृष्णाची मुरली ऐकू येत आहे. मी मनात सांगत आहे. कचरू नको, नीट पुढे जा.'' आपल्या अंतःकरणातही अशी व्यवस्था लावण्यास, असे संगीत निर्माण व्हावयास, कृष्णाची ही हृदयंगम वेणू हृदयवृंदावनात ऐकू येण्यास त्याग, तपस्या, सेवा यांचे मार्ग अवलंबले पाहिजेत. आपण धडपड करू या. उत्कंठेने झगडू या. हेच जीवन आहे. एक दिवस, आज ना उद्या शतजन्मांनी, सुंदर मुरली आपल्या हृदयात ऐकू येईल. मग मोह आड येणार नाहीत. मुरलीचा सूर नेईल तिकडे साऱ्या इंद्रिय-गायी निमूटपणे आनंदाने येतील. एक दिवस तो येईल !

परंतु तो दिवस येईपर्यंत माझ्या हृदयात ऊर्मी उठत राहणार. माझ्या हृदय-यमुनेवर कधी क्रोधाच्या, कधी प्रेमाच्या, कधी उत्साहाच्या, कधी निराशेच्या लाटा उसळत

राहणार. वसुदेव श्रीकृष्णाला घेऊन गोकुळात जात होता. यमुनेच्या प्रवाहातून जात होता. श्रीकृष्णाच्या परम पवित्र पायाचा स्पर्श होऊन आपण पवित्र व्हावे, असे यमुनेला वाटत होते. ती वर वर उचंबळून येत होती तो तो वसुदेव त्या बाळकृष्णाला वर वर उचली. शेवटी कृष्णाने वस्त्रातून पदांगुली लांबवून यमुनेला स्पर्श केला. यमुना शांत झाली. त्याचप्रमाणे माझी जीवन- यमुना त्या ध्येय भगवानाच्या पायांवर, त्या ध्येयरूप श्रीकृष्णाच्या पायांवर स्वतःला ओतण्यासाठी अधीर आहे. शांत होण्यासाठीच वादळ उठते. परमेश्वराच्या विश्वरूपाच्या पायांवर पडून शांत होण्यासाठीच माझी जीवन-यमुना उचंबळत आहे. तिच्या लाटा उसळत आहेत. संगीत निर्माण करणाऱ्या भगवंताच्या पायाला स्पर्श करण्यासाठी मी धडपडत आहे. येईल, एक दिवस येईल ! ज्या ठिकाणी गोकुळात प्रेमराज्य स्थापणाऱ्या, अव्यवस्था, गोंधळ दूर करून मुरली वाजवणाऱ्या त्या कन्हैयाच्या पायाचा स्पर्श या जीवन-यमुनेस होईल व ती शांत, स्थिर, गंभीर होईल.

अंतःकरणातील शेकडो प्रवृत्तींना आकर्षून घेणारा, त्यांना ओढणारा, त्यांचे यथार्थ स्वरूप कळण्यासाठी त्या त्या प्रवृत्तींच्या आत काय काय हेतू आहेत हे नीट पाहण्यासाठी त्या प्रवृत्तींना उघड्या करणारा, त्या प्रवृत्तींच्या अंगावरची खोटी, दांभिक, लाक्षणिक, लपवा-लपवीची वस्त्रे दूर करणारा व त्या त्या प्रवृत्तींना त्यांचे यथार्थ रूप उघडे करून लाजवणारा, मग नमवणारा, त्याची योग्य किंमत त्यास पटवणारा, त्यांना शोभेसी वस्त्रे त्यांना देणारा व त्या सर्वांना एका ध्येयाचे संगीत गायला लावणारा-असा जो अंतःकरणातील जोम, ही जी स्फूर्ती, ही जी दीप्तिज्ञप्ती ती श्रीकृष्णाची मूर्ती होय.

देवाला पत्रीच प्रिय

देवाला फुलांपेक्षा, हारांपेक्षा पत्रीच जास्त आवडते. विष्णूला तुळशीपत्र, शिवाला बिल्वपत्र, मंगलमूर्तीला दूर्वादल यांचीच अत्यंत आवड आहे. यातही अर्थ आहे. आपण बहुजन समाज शेकडा ९९ लोक बारीकसारीक कर्मे, लहान लहान कर्मेच करीत राहणार. महात्मा गांधी, रवींद्रनाथ यांच्या कर्मपुष्पांप्रमाणे माझ्या कर्मपुष्पाला सौंदर्य, रंग, सुगंध नसेल, माझी कर्मे ही वासहीन पाने आहेत; परंतु तीच देवाला जास्त प्रिय आहेत. ही पाने मात्र टवटवीत, सतेज, हिरवीगार असू देत म्हणजे झाले आणि फुले तरी झाडाला नेहमी कोठे असतात? नेहमी पानेच आहेत, एखादे

वेळेस फुले. आपण सत्कर्माची, रोजच्या बारीक-सारीक कर्माची पानेच सुंदर, तजेलदार जर अर्पण करीत गेलो, तर एक दिवस पुष्पांप्रमाणे त्याहूनही सुंदर कर्मे आपल्या जीवनतरूवर फुलतील व ती वाहता येतील. ती पुष्पे केव्हा मिळतील ती मिळोत. भगवंताला पत्रीही प्रिय आहे. खरे पाहिले तर पत्र व पुष्प दोन्ही त्याला समानच आहेत.

श्रीकृष्णाने प्रथम गोकुळातील वणवे विझवले. तेथे व्यवस्था निर्माण करून दिली. तेथले आसुर नाहीसे केले. तेथे प्रेम निर्माण केले. गायीची भक्ती शिकवली. मग यज्ञधर्म दिला. गोकुळात विजय मिळवून मग तो बाहेरच्या जगात क्रांती स्थापावयास, बाहेरच्या जगातील आसुर-संहार करावयास, बाहेरच्या जगातील पददलितांस वर उठावयास, बाहेरच्या बजबजपुरीत व्यवस्था निर्माण करण्यास, बाहेरच्या जनतेस नवधर्म शिकवण्यास, गोपाळांना शिकवण्यास, स्त्रिया, वैश्य, शूद्रांस उद्धरण्यास गेला. मनुष्य स्वतःच्या गोकुळात, स्वतःच्या अंतरंगात जेव्हा स्वराज्य स्थापील, तेथे संगीत, सुसंवाद निर्माण करील, तेथले आसुर दूर करील, वणवे विझवील-थोडक्यात, स्वतःचा स्वामी होईल, तेव्हाच त्याला जगातही काही करता येईल. ज्याने घर सुधारले नाही, त्याला बाह्य जग काय सुधारता येणार? ज्याने स्वतःला जिंकले नाही, तो दुसऱ्यांना काय जिंकणार? ज्याला स्वतःला शांती नाही, तो दुसऱ्यास काय देणार? जो स्वतः पडलेला, तो दुसऱ्यास कसा उठवणार? स्वतःला शिकवल्यावर मग जगाला शिकवता येईल. स्वतःच्या गोकुळाचे स्वर्गभुवन केल्यावर इतर सारे जगतही आपणास सुखमय करता येणे शक्य आहे.

+++

शबरी

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

शबरी

तो काळ आर्यांच्या विजयाचा व विस्ताराचा होता. आर्य प्रथम पंजाबात आले, तेथे नीट पाय रोवून ते आणखी पुढे सरकले. गंगा व यमुना या सुंदर विशाल नद्यांच्या गहिऱ्या पाण्याने समृद्ध व सुपीक झालेल्या रमणीय प्रदेशांत आर्य राज्य करून राहू लागले. सृष्टिसुंदरीने वरदहस्त ठेवलेल्या याच प्रदेशात, जनकासारखे राजर्षी जन्मले. धर्म, तत्त्वज्ञान, कला यांचा विकास येथेच प्रथम झाला व संस्कृतीसूर्याचे हे येथील किरण हळूहळू अखिल भारतवर्षावर पसरू लागले.

उत्तर हिंदुस्थानात आर्यांच्या वसाहती सर्वत्र होण्यापूर्वीच ओढ्या प्रांतातून समुद्रकिनाऱ्यापर्यंत येऊन तेथे गलबतात बसून काही धाडसी आर्य खाली सिलोन ऊर्फ लंका बेटात गेले. या बेटाजवळ मोत्यांच्या खाणी होत्या. सोन्याच्या खाणी होत्या. हे राज्य समृद्ध झाले. लंकाधीश रावणासारखा महत्त्वाकांक्षी राजा उत्तरेकडे दिग्विजय करण्यास निघाला व नाशिकपर्यंत आला. तेथे त्याने आपले अधिकारी ठेवले. रावणासारखे राजे दक्षिणेकडून उत्तरेकडे येत होते, तर दुसरे संस्कृती प्रसार करणारे धाडसी ऋषी विंध्य पर्वत ओलांडून खाली दक्षिणेकडे येत होते.

दंतकथांमधून इतिहास निर्माण करावा लागतो. अगस्ती हा विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेकडे आलेला पहिला संस्कृती प्रसारक होय. ही गोष्ट त्याने विंध्य पर्वतास वाढू नकोस, असे सांगितले त्यात दिसून येते. अगस्तीने फार प्रवास केलेला असावा. तीन आचमने करून त्याने सात समुद्र पाशन केले, यातील अर्थ हा असेल की, तीनदा तो

सात समुद्र ओलांडून आला. दंडकारण्यात प्रवेश करणारा पहिला ऋषी. आपापले आश्रम रमणीय अशा ठिकाणी अगस्तीच होय. त्यांच्यापाठोपाठ भारद्वाज, मतंग, अत्रि प्रभृती ऋषी स्थापू लागले. चित्रकूट हे पर्वताचे नावच त्या पर्वताची सुंदरता पटवून देते. तेथे भारद्वाज ऋषी राहिले. ज्याप्रमाणे ख्रिस्ती मिशनरी रानटी लोकांत जाऊन तेथे आपले बंगले बांधतात व त्यांना आपल्या धर्माची दीक्षा देतात, त्याप्रमाणे आमचे हे प्राचीन आर्य धर्मप्रचारक रानटी लोकांत जाऊन आश्रम स्थापून त्यांना संस्कृती ज्ञान देऊ लागले.

हळूहळू या वैराग्यशील, ध्यानधारणासंपन्न, निष्पाप अशा ऋषींच्या साध्या राहणीचा व सुंदर आचरणाचा परिणाम या दंडकारण्यातील कातकारी, भिल्ल, कोळी इत्यादी लोकांवर होऊ लागला. या लोकांचा व ऋषींचा संबंध येऊ लागला. भिल्ल वगैरे जातींची लहान लहान राज्ये होती. हे राजे आपली मुलेबाळे या ऋषींच्या आश्रमात शिकण्यासाठी कधीकधी ठेवीत. प्रेमाने व निर्लोभतेने येथील लोकांची हृदये वश करून घेऊन सुंदर ज्ञान व पवित्र आचार हे ऋषी त्यांस शिकवू लागले. रानटी लोकांच्या हृदयमंदिरात ज्ञानाचा दिवा प्रकाशू लागला.

अशाच थोर ऋषींपैकी मतंग ऋषी हे एक होते. पंपा सरोवराच्या जवळ त्यांचा आश्रम होता. आजूबाजूला रमणीय व विशाल वनराजी होती. मतंग ऋषींची पत्नी ही अत्यंत साध्वी व पतिपरायण होती. आश्रमाच्या आसमंतातले वातावरण अतिशय प्रसन्न व पावन असे ती ठेवीत असे. आश्रमात हरिणमयुरादी सुंदर पशुपक्षी पाळलेले होते. सकाळच्या वेळी पाखरांना अंगणात धान्य टाकताना व हरिणांना हिरवा चारा घालताना ऋषिपत्नीस मोठा आनंद होत असे, कारण तीच तिची लडिवाळ मुलेबाळे होती.

मतंग ऋषी फार थोर मनाचे होते. प्रातःकाळी नदीवर स्नान करून नंतर ते संध्या, ईश्वरपूजा व ध्यानधारणा करीत. तद्नंतर आश्रमाच्या भोवती जे कोणी रहिवासी येतील, त्यांना खुणांनी मोडक्या तोडक्या भाषेत सुरेख गोष्टी सांगत. हळूहळू ते त्यांची भाषा शिकू लागले आणि आपले उन्नत व उदात्त विचार त्यांना सांगू लागले. जरी त्या रानटी लोकांना प्रथम प्रथम विशेष समज नसे, तरी त्या पावन वातावरणाचा, ऋषींच्या व्यक्तिमाहात्म्याचा त्यांच्या मनावर संस्कार झाल्याशिवाय राहत नसे. पावित्र्य हे न बोलता बोलते, न शिकविता शिकविते. दिव्याची ज्योत निःस्तब्धपणे अंधार हरिण

करीत असते. थोर लोकांचे नामोच्चारणही जर मनास उन्नत करे, तर त्यांचे प्रत्यक्ष दर्शन किती प्रभावशाली असेल बरे!

मतंग ऋषींच्या आश्रमापासून काही कोसांच्या अंतरावर एका भिल्ल राजाचे राज्य होते. राज्य लहानसेच होते. भिल्लांचा राजा जरी रानटी होता, तरी तोही ऋषींच्या आचरणाने व उपदेशाने थोडा सुधारला होता. या भिल्ल राजास एक पाच-सहा वर्षांची मुलगी होती. मुलगी काळीसावळीच होती; पण तिचा चेहरा तरतरीत होता. रानातील हरिणीच्या डोळ्यांसारखेच तिचे डोळे खेळकर व पाणीदार असून ती हरिणीप्रमाणेच चपळही होती. घरात बसून राहणे तिला कधीच आवडत नसे; घडीची म्हणून तिला उसंत माहीत नसे. भिल्ल राजाचीच ती मुलगी. लहानपणी तीही लहानसे धनुष्य घेऊन हरिणांच्या पाठीमागे लागे. आपल्या मुलीचे कोडकौतुक राजा-राणी कितीतरी करीत. मनुष्य रानटी असो वा सुधारलेला असो; मनुष्यस्वभाव हा सर्वत्र सारखाच आहे. रानटी मनुष्यालाही प्रेम समजते, त्याला मुलेबाळे आवडतात. रानटी मनुष्यही आनंदाने हसतो व दुःखाने रडतो.

आईबापांच्या प्रेमळ सहवासात लहानगी शबरी वाढत होती. एक दिवस भिल्ल राजा आपल्या राणीला म्हणाला, ''आपल्या या मुलीला मतंग ऋषींच्या आश्रमात ठेवले तर? मी याविषयी त्यांना विचारले, तेव्हा त्यांच्या पत्नीने मोठ्या आनंदाने संमती दिली. ऋषिपत्नीलाही मूलबाळ नाही. ऋषिपत्नी मला म्हणाली, 'खरंच, तुमची मुलगी आश्रमात ठेवा; मी तिला शिकवीन-सवरीन; पोटच्या मुलीप्रमाणे तिच्यावर प्रेम करीन.' मग बोल, तुझे म्हणणे काय आहे ते. मुलीस तिथे पाठविण्यास तुझी संमती आहे ना? ती तुझ्यासारखीच अडाणी राहावी, असे तुला वाटते का?''

राणी म्हणाली, ''मी आपल्या इच्छेविरुद्ध नाही. मनाला कसेसेच वाटते हे खरे; तरी पण मुलीचे कल्याण होईल, तेच केले पाहिजे. आपल्या लहानपणी आपणांस नाही असे ऋषी भेटले; परंतु आपल्या मुलीच्या भाग्याने भेटले आहेत, तर ती तरी चांगली होवो.''

उभयता मातापितरांनी मुलीला आश्रमात पाठविण्याचा निश्चय केला. शुभ दिवशी त्या भिल्ल राजाने शबरीस बरोबर घेतले, तिला पालखीत बसविले आणि मतंग ऋषींच्या आश्रमात आणून सोडिले.

कन्येस ऋषींच्या स्वाधीन करून राजा म्हणाला, ''महाराज, ही माझी मुलगी आपल्या स्वाधीन करीत आहे. ही सर्वस्वी आपलीच समजा व तिला नीट वळण लावा.''

ऋषिपत्नी म्हणाली, ''राजा, निश्चिंत ऐस. ही माझीच मुलगी मी समजते. मी तिला मजजवळ घेऊन निजेन, तिची वेणीफणी करीन. ती येथील हरिणांमोरांबरोबर खेळेल-खिदळेल व त्यांच्याजवळ शिकेल. काही काळजी करू नकोस बरं!''

राजाने मुलीसाठी तांबड्या रंगाची वल्कले केली होती, ती तिला दिली. मुलीला पोटाशी धरून नंतर राजा निघून गेला.

शबरी आश्रमात वाढू लागली. ऋषिपत्नी तिचे कितीतरी कोडकौतुक करी. आश्रमात गाई होत्या. गाईच्या वासरांबरोबर शबरी खेळे, उड्या मारी. तिने गाईंना नदीवर न्यावे, त्यांस पाणी पाजावे. गाईचे धारोष्ण दूध शबरीला फार आवडे. प्राचीन कालीन आर्यांचे गाय हेच धन असे. 'गोधन' हा शब्द प्रसिद्ध आहे.

शबरी सकाळी लवकर उठे. ऋषिपत्नीने तिचे दात आधी नीट घासावेत, मग तिची वेणीफणी करावी. शबरीचे केस नीट विंचरून कोणीही आजपर्यंत बांधले नव्हते. ऋषिपत्नी शबरीच्या केसांत सुंदर फुले घाली, शबरी म्हणजे राणीच शोभे. मग शबरीने स्नान करावे, देवपूजेसाठी सुरेख फुले गोळा करून आणावीत. दूर्वांकुरांनी गुंफून तिने हार करावेत व आश्रमाच्या दारांवर त्यांची तोरणे करून लावावींत.

ऋषींची पूजा वगैरे झाली म्हणजे शबरीला जवळ घेऊन ते तिला सुंदर स्तोत्रे शिकवीत, सूर्याच्या उपासनेचे मंत्र अर्थासह तिला म्हणावयास सांगत. उषादेवीची सुंदर गाणी ते तिजकडून म्हणवीत. उषादेवीचे एक गाणे मतंग ऋषींना फार आवडे. त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे होता-

'ती पाहा, अमृताची जणू काय ध्वजाच, अमर जीवनाची जणू पताकाच अशी उषा येत आहे. ही उषा लवकर उठणाऱ्याला संपत्ती देते. ही आकाशदेवतेची मुलगी आहे. सुंदर दवबिंदूंचे हार घालून आपल्या झगझगीत रथात बसून ती येते, ती आपल्या भक्तांना काही उणे पडू देत नाही. ही उषादेवी किती सुंदर, पवित्र व धन्यतम अशी आहे!'

अशा प्रकारच्या गोड कविता शबरीला मतंग ऋषी शिकवीत असत. ऋषींच्या तोंडून त्या सुंदर कवितांचे विवरण ऐकताना लहानग्या शबरीचे हृदय भरून येई.

एक दिवस रात्रीची वेळ झाली होती. मतंग ऋषींची सायंसंध्या केव्हाच आटोपली होती. गाईगुरे बांधली होती. हरिणपाडसे शिंगे अंगात खुपसून निजली होती. ऋषी व त्यांची पत्नी बाहेर अंगणात बसली होती. फलाहार झाला होता. नभोमंडलात दंडकारण्याची शोभा पाहण्यासाठी एकेक तारका येत होती.

शबरी आकाशाकडे पाहून म्हणाली, ''तात, हे तारे कोठून येतात? काय करतात? रोज रोज आकाशात येण्याचा व थंडीत कुडकुडण्याचा त्यांना त्रास नसेल का होत?''

ऋषी म्हणाले, ''बाळ, तू अजून लहान आहेस. मनुष्य कसा वागतो, शबरी कशी वागते, हे सारे पाहण्यासाठी हे वरुणदेवाचे हेर आहेत, हे तारे वरुणदेवतेचे दूत आहेत. डोळ्यांत तेल घालून मनुष्याची कृत्ये ते पाहात असतात व माणसांची वाईट कृत्ये पाहून ते तारे रडतात. त्यांचे जे अश्रू त्यांनाच तू दवबिंदू म्हणतेस. झाडामाडांच्या पानांवर ते दवबिंदू टपटप पडताना तू नाही का ऐकलेस? सकाळी पानांफुलांवर, दूर्वांकुरांवर ते अश्रू कसे मोत्यांसारखे चमकतात!''

शबरी म्हणाली, ''तात, मी आज त्या हरिणपाडसांस बाणाने टोचले, ते त्यांना दिसले असेल का?''

ऋषी म्हणाले, ''होय. दिवसा लोकांकडे लक्ष ठेवण्याचे काम सूर्य करतो; रात्री ते काम चंद्र व तारे करतात.''

शबरीचे ते प्रेमळ व निष्कपट डोळे पाण्याने डबडबून आले व ती म्हणाली, ''तात, मघा त्या मोराच्या पिसाऱ्यातील पीस उपटण्यास मी गेले, ते पाहून तारे आज रडतील का? मोर असा निजला होता!''

ऋषी म्हणाले, ''होय. परंतु हे काय? वत्से शबरी, अशी रडू नकोस. पूस, डोळे पूस आधी. तू त्या ताऱ्यांची प्रार्थना कर व म्हण, आजपासून हरणांना मोरांना मी दुखविणार नाही.'

शबरीने हात जोडले व आकाशाकडे तोंड करून ती म्हणाली, ''हे देवदूतांनो, हे तारकांनो, या मुलीला क्षमा करा. माझ्यासाठी तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. मी आजपासून बाणाच्या टोकाने हरिणांस टोचणार नाही, पक्ष्यांची पिसे उपटणार नाही. मला क्षमा करा.'

ऋषीने शबरीचे वात्सल्याने अवघ्राण केले व ऋषिपत्नीने तिला प्रेमभराने हृदयाशी धरले.

ऋषिपत्नी म्हणाली, ''शबरी, तू फार गुणी आहेस.''

शबरीच्या गंगायमुना थांबल्या व ऋषिपत्नीच्या मांडीवर डोके ठेवून ती झोपी गेली.

शबरी हळूहळू वयाने वाढत होती, मनाने वाढत होती. सत्य, दया, परोपकार यांचे ती धडे घेत होती. तिचे मन आता फुलासारखे हळुवार झाले होते. झाडांच्या फांदीलासुद्धा धक्का लावताना तिला आता वाईट वाटे.

एक दिवस मतंग ऋषी तिला म्हणाले, ''शबरी, परमेश्वरास वाहण्यासाठी दोन चार फुले फार तर आणावीत. फुले हे वृक्षांचे सौंदर्य आहे. वृक्षांचे सौंदर्य आपण नष्ट करू नये. फुल घरी आणले तर किती लवकर कोमेजते; परंतु झाडावर ते बराच वेळ टवटवीत दिसते. आपण त्या फुलाला त्याच्या आईच्या मांडीवरून ओढून लवकर मारतो. सकाळच्या वेळी फुलांचे हृदय शबरी, भीतीने कापत असते. आपली मान मुरगळण्यास कोण खाटीक येतो, इकडे त्यांचे लक्ष असते. शबरी, आपण दुष्ट आहोत. मनुष्यप्राण्याला आपल्या प्रियजनांच्या संगतीत मरणे आवडते, या फुलांनाही तसेच नसेल का वाटत? शबरी, हे फूल तुझ्यासारखेच आहे. तेही हसते व कोमजते, त्यालाही जीव आहे. झाडामाडाकडे, फुलपाखरांकडेसुद्धा प्रेमाने पाहावयास शिकणे म्हणजे परमेश्वराच्या जवळ जाणे होय.''

शबरी म्हणाली, ''तात, लहानपणी मी तर शिकार करीत असे. माझे बाबा हरिणे मारून आणीत, शेळ्या, मेंढ्या आमच्याकडे मारल्या जायच्या.''

ऋषी म्हणाले, ''शबरी, ते तू आता विसरून जा. आता निराळे आचरण ठेवावयास तू शिक. उगीच कोणाला दुखवू नकोस, कोणाची हिंसा करू नकोस. शेतीभाती करावी, वृक्षांची फळे खावीत, कंदमुळे भक्षावीत, अशी राहणी चांगली नाही का? शबरी, तुला चिमटा घेतला तर कसे वाटेल?'

इतक्यात ऋषिपत्नी बाहेर आली व म्हणाली, ''मी तुम्हाला सांगू का कालची गंमत? त्या अशोकाच्या झाडावरील फुलांचा तुरा तोडून घेण्याची शबरीला अतिशय इच्छा झाली होती. तिने तीनतीनदा हात पुढे करावेत व आखडते घ्यावेत. शेवटी तिच्या डोळ्यांत पाणी आले व तिने त्या फुलांना चुंबून त्यांच्याकडे कारुण्याने पाहिले आणि ती निघून गेली. शबरी, मी सारे पाहत होते बरं का.''

शबरी लाजली व ऋषींना कृतार्थता वाटली. हे रानफूल सात्त्विक सौंदर्याने, गुणगंधाने नटताना पाहून त्यांना का धन्य वाटणार नाही?

शबरी आता वयात आली, ती यौवनपूर्ण झाली. एक दिवस मतंग ऋषी तिला म्हणाले, ''शबरी, तू शिकलील सावरलीस, सद्‌गुणी झालीस. आता तू मोठी झालीस आहेस. घरी जा. ब्रह्मचर्याश्रम सोडून गृहस्थाश्रमात तू आता प्रवेश कर, विवाह करून सुखाने नांद.''

शबरी म्हणाली, ''तात, मला हे पाय सोडून दूर जाववत नाही, मी इथेच तुमची सेवा करून राहीन.'

त्या वेळेस ऋषी आणखी काही बोलले नाहीत. त्यांनी परभारे भिल्ल राजाला निरोप पाठविला, 'तुझी मुलगी आता उपवर झाली आहे, तरी तिला घेऊन घरी जा व तिचा विवाह कर.'

निरोपाप्रमाणे राजाने दुसऱ्या एक भिल्ल राजाच्या मुलाची वर म्हणून योजना केली व शबरीला नेण्यासाठी तो आश्रमात आला.

ऋषींनी राजाचे स्वागत केले व त्याला फलाहार दिला. शबरीला पित्याच्या स्वाधीन करताना त्यांनी तिला शेवटचा उपदेश केला. 'शबरी, सुखाने नांद प्राणिमात्रांवर प्रेम करा. सत्याने वाग. रवी, शशी, तारे आपल्या वर्तमानकडे पाहात आहेत, हे लक्षात धर. वत्से, जा. देव तुझे मंगल करो व तुला सत्पथावर ठेवो.'

शबरी सद्‌गदित झाली होती. ऋषिपत्नीने तिला पोटाशी धरिले व म्हटले, 'बाळे शबरी, अधूनमधून येत जा हो आश्रमात. आम्हाला आता हे घर खायला येईल. चुकल्याचुकल्यासारखे होईल. पूस हो डोळे. जाताना डोळ्यांस अश्रू आणू नयेत. आता तुझा विवाह होईल. पती हाच देव मान. नीट जपून पावले टाक. तू शहाणी आहेस.'

मोठ्या कष्टाने शबरी निघाली. ऋषी व ऋषिपत्नी काही अंतरापर्यंत–गोदेच्या प्रवाहापर्यंत पोचवीत गेली. एक हरिणशावक शबरीने बरोबर नेलेच. शबरी गेली व जड पावलाने ऋषी व ऋषिपत्नी आश्रमात परत आली. त्या दिवशी त्यास चैन पडले नाही. शबरीची पदोपदी त्यांना आठवण येई.

आज दहा वर्षांनी शबरी राजवाड्यात परत आली होती. ती गेली व त्या वेळी लहान होती, आज ती नवयौवनसंपन्न झाली होती. गेली तेव्हा अविकसित मनाने

गेली, आज विकसित मनाने सत्य, दया, अहिंसा, परोपकार, प्रेम इत्यादी सद्गुणांनी फुललेल्या मनाने ती आली होती. शबरी लगेच आईला भेटली. सर्वांना आनंद झाला.

दुपारची वेळ झाली होती व शबरी माडीवर दरवाजात उभी राहून आजूबाजूस पाहात होती. तो तिच्या दृष्टीस कोणते दृश्य पडले? एका आवारात चारपाचशे शेळ्यामेंढ्या बांधलेल्या होत्या. बाहेर कडक ऊन पडले होते. त्या मुक्या प्राण्यांना पाणी पाजले नव्हते, खाण्यास घातले नव्हते व त्यांच्यावर छाया नव्हती. उन्हात ते प्राणी तडफडत होते. शबरीचे कोमल मन कळवळले आणि ती तीरासारखी खाली गेली व आईला म्हणाली, 'आई, ती मेंढरे कोकरे तिकडे का गं डांबून ठेविली आहेत? ना तेथे छाया, ना जल, ना चारा, जलाविणे कशी माशाप्रमाणे तडफडत आहेत. आई, का गं असे?''

आई म्हणाली, 'बाळ, त्यांची पीडा, त्यांचे क्लेश उद्या संपतील. उद्या तुझा योजलेला पती येईल. तो श्रीमंत आहे. शेकडो लोक त्यांचेबरोबर येतील. त्यांना मेजवानी देण्यासाठी उद्या या साऱ्यांची चटणी होईल. जा, तिकडे खेळ मला काम आहे.''

शबरीच्या पोटात धस्स झाले. ती कावरीबावरी झाली. भिल्लांच्या हिंसामय जीवनाचा आजवर तिला विसर पडला होता. तिच्या मनात शेकडो विचार आले. उद्या माझ्या विवाहाचा मंगल दिवस. सुख दुःखाचा वाटेकरी, जन्माचा सहकारी उद्या मला लाभणार. माझ्या आयुष्यात उद्याचा केवढा भाग्याचा दिवस. उद्या आईबाप, आप्तेष्ट आनंदित होतील; परंतु या मुक्या प्राण्यांना तो मरण्याचा दिवस होणार. माझ्या विवाहसमारंभासाठी यांना मरावे लागणार आणि मला पती मिळणार तोही असाच हिंसामय वृत्तीचा असणार. मी पुनःश्च त्या हिंसामय जीवनात पडणार. छे, कसे माझे मन कासावीस होत आहे. माझे विचार मी कोणास सांगू? माझे कोण ऐकणार येथे! नको, हा विवाहच नको. हा मंगल प्रसंग नसून अमंगल आहे. माझ्या जीवनाच्या सोन्याची पुन्हा राख होणार अं? आपण येथून तत्काळ निघून जावे. रानावनात तपश्चर्येत काळ घालवावा.'

शबरीचे डोळे भरून आले. ती आता रात्रीची वाट पाहत बसली. वाड्यात सर्वत्र लग्नघाई चाललीच होती. शबरी फाटकी वल्कले अंगावर घालून विरक्तपणे रात्री निघून गेली. कोणालाही ते माहीत नव्हते, फक्त अंधकाराला माहीत होते.

मतंग ऋषी आश्रमात ब्रह्मध्यानात मग्न होते. सकाळचे काम करण्यात ऋषिपत्नी गढून गेली होती. इतक्यात शबरी तेथे आली. शबरीला पाहताच मोर नाचू लागले, हरिणे उड्या मारू लागली, गाईंची वासरे हंबरू लागली. ऋषींनी डोळे उघडले. मुखकळा म्लान झालेली, दृष्टी अश्रूंनी डवरलेली अशी शबरी पाहून, ते आश्चर्यचकित झाले. शबरीच्या मुखेंदूवरील अश्रूंचे पटल पाहून ऋषींचे अंत:करण विरघळले. शबरीने येऊन वंदन केले व एखाद्या अपराधिनीप्रमाणे ती जरा दूर उभी राहिली.

मतंग ऋषी म्हणाले, 'शबरी, आज तर तुझ्या विवाहाचा मंगल दिवस. तू आज येथे रडत परत का आलीस? तुला कोणी रागे का भरले? आईबापांशी भांडण का झाले? शबरी, आईबापांसारखे अन्य दैवत नाही.बोल, अशी मुकी का तू?'

ऋषी कोणाजवळ बोलत आहेत, हे पाहण्यासाठी ऋषिपत्नी बाहेर आली व पाहते, तो काल परत गेलेली शबरी.

तो उद्‌गारली, 'शबरी, अगं इकडे ये ना अशी. तू का कोणी परकी आहेस? अशी रडू नकोस. रडूनरडून डोळे लाल झाले. प्रेमळ पोर! ये अशी इकडे व सांग काय झाले ते.''

ते प्रेमळ शब्द ऐकून शबरी जवळ आली. सहानुभूतीच्या व प्रेमाच्या शब्दांनी बंद ओठ उघडतात, बंद हृदये उघडी होतात. ऋषिपत्नीच्या खांद्यावर मान ठेवून शबरी ओक्साबोक्शी रडू लागली.

ऋषिपत्नी म्हणाली, 'शबरी, अशी किती वेळ रडत बसणार तू? उगी नाही का राहात? काय झाले ते सारे सांग तर. या रडण्याने आम्ही काय बरे समजावे?''

शबरीने डोळे पुसले आणि ती हात जोडून म्हणाली, 'आई, तात, मला येथेच आश्रमात राहू द्या. मला आजपर्यंत आपण आधार दिलात, तसाच यापुढे द्या. मला नाही म्हणू नका.मी माझे आयुष्य आनंदाने येथे कंठीन, आश्रमाची झाडलोट करीन, गाईगुरे सांभाळीन, सडासंमार्जन करीन, आपले चरण चुरीन, तुमचे अमोल बोल ऐकेन.'

ऋषी म्हणाले, 'शबरी, तू तर विवाहासाठी गेली होतीस. तू आता यौवनसंपन्न झाली आहेस. आश्रमात तरुण मुलीला ठेवणे आम्हालाही जरा संकटच वाटते. शिवाय, येथे दक्षिणेकडील राक्षसांचा कधीमधी हल्ला येईल. तू पतीसह संसार

करावास, हे योग्य. वेल ही वृक्षावर चढल्यानेच शोभते. शबरी, असा वेडेपणा करू नकोस. जा, घरी माघारी जा. सुखाचा नेटका संसार करा.

शबरीला हुंदका आला, तो तिला आवरेना. ती स्फुंदूस्फुंदू झाली. पुनरपि धीर करून सद्गदित स्वराने ती म्हणाली, 'तात, असे कठोर नका होऊ. मला मग आजपर्यंत शिकवलेत तरी कशासाठी? सत्य, दया, अहिंसा, परोपकार, प्रेम इत्यादी गुण आपण शिकवलेत. मी घरी गेले तर माझ्या विवाहासाठी शेकडो मुक्या प्राण्यांचा संहार होणार. ती मेंढरे कशी तफडफत होती! भिल्लांचे जीवन हिंसामय आहे. मला मिळेल तो पती व सारी सासरची मंडळी हिंसामय जीवनात आनंद मानणार, तेथे मी कशी सुखाने राहू? मला इकडे आड, तिकडे विहीर असे झाले आहे. 'बाप खाऊ घालीना, आई भीक मागू देईना' अशी स्थिती माझी झाली. गंगा आसऱ्यासाठी समुद्राकडे गेली व समुद्राने तिला झिडकारले, तर तिने जावे कोठे? नदी जलचरांवर रागावली तर त्यांनी कोठे जावे? महाराज, माझ्याबद्दल आपल्या मनात संशय येऊ देऊ नका. मी तरुण असले, तरी आपल्या पवित्र सान्निध्यात असल्यावर माझे पाऊल वेडेवाकडे पडणार नाही. आपले संरक्षण असले, आपली कृपादृष्टी असली, आपला आशीर्वाद असला, म्हणजे माझ्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची दुष्टाची छाती नाही. मला नाही म्हणू नका. मी तुमची मुलगी. तुम्ही वाढविलीत, तुम्ही पदरात घ्या. नका पायाने लोटू तात, कृपा करा. आई, कृपा करा!''

ते करुणरसाने थबथबलेले शब्द ऐकून ऋषींचे दयामय अंतःकरण वितळले. ऋषी शबरीला म्हणाले, 'मुली, तू मनाने फार थोर झाली आहेस. राहा, माझ्या आश्रमात तू राहा.''

शबरीच्या अंगावर एकदम मूठभर मांस चढल्यासारखे झाले. रडणारे डोळे हसू लागले, प्रेममय व शांत झाले. लगेच शबरी घरच्याप्रमाणे वागू लागली. कामधंदा करू लागली, पंपासरोवराचे पाणी भरून घट आणू लागली. शबरीच्या जीवनात पावित्र्य, समाधान, आनंद, सरलता यांचे झरे वाहू लागले.

शबरी आता तपस्विनी झाली, योगिनी झाली. तिच्या चर्येत, चालचलणुकीत पंपासरोवराची गंभीरता व पवित्रता होती. तेथील वनराजीची भव्यता व स्निग्धता, सुरभिता व सौम्यता तिच्या हृदयात होती. मतंग ऋषींजवळ सुखसंवाद करण्यात तिचे दिवस आनंदाने निघून जात.

एक दिवस मतंग ऋषी म्हणाले, ‘शबरी, परमेश्वर जरी सर्व चराचरांत भरून राहिला असला, तरी काही वस्तूंत परमेश्वराचे वैभव जास्त स्पष्टपणे प्रतीत होते व आपले मन तेथे विनम्र होते. उदाहरणार्थ, हा वटवृक्ष पाहा. सर्व वृक्ष-वनस्पतींत ईश्वरी अंश भरलेला आहेच; परंतु गगनाला आपल्या फांद्यांनी उचलून धरणारा, आजूबाजूस आपले प्रेमळ पल्लवीत हात पसरून विश्वाला कवटाळू पाहणारा, हजारो पाखरांस आश्रय देणारा, पांथस्थास शीतल व घनदाट छाया वितरणारा हा वटवृक्ष पाहिला, म्हणजे याच्या ठिकाणी असलेले परमेश्वरी वैभव जास्त स्पष्टपणे प्रकट झालेले दिसते आणि आपले मन वटवृक्षाबद्दल भक्तिभावाने भरून येते. आपण त्याची पूजा करतो. शबरी, सर्व प्रवाहांच्या ठिकाणी परमेश्वर आहेच; परंतु हजारो कोस जमीन सुपीक करणारी, शेकडो शहरांना वाढवून त्यांना वैभवाने नटविणारी एखादी मोठी नदी, तिला आपण अधिक पवित्र मानतो. शबरी, सर्व फुलांच्या ठायी सौंदर्य, सुगंध, कोमलता आहे, पण कमलपुष्पाच्या ठायी हे गुण विशेष प्रतीत होतात; म्हणून त्याला आपण जास्त मान देतो. सर्वत्र असेच आहे. जे जे थोर आहेत, उदात्त आहे, रमणीय आहे, विशाल आहे, त्याबद्दल साहजिकच आदर, भक्ती, प्रेम ही आपल्या हृदयात उत्पन्न होतात. शबरी, मुनष्यजातीतही असलेच आहे. आपणा सर्वांच्या ठायी परमेश्वरी तत्त्व आहे; परंतु तुझ्या जातीतील लोकांपेक्षा तुझ्यामधील ईश्वरी तत्त्व जास्त स्पष्टपणे दिसून येते. म्हणून तुझ्याबद्दल आदर वाटतो. आकाशाचे प्रतिबिंब सर्वत्र पाण्यात पडलेले असते; परंतु निर्मळ पाण्यात ते स्पष्ट दिसते. त्याप्रमाणे परमेश्वराचे प्रतिबिंब निर्मळ हृदयात स्वच्छ पडलेले दिसून येते. शबरी, आपले मन आपण घासून घासून इतके स्वच्छ करावे की, परमेश्वराच पवित्र प्रतिबिंब येथे पडावे व त्याचे तेज आपल्या डोळ्यांवाटे, वाणीवाटे, आपल्या प्रत्येक हालचालीत बाहेर पडावे. आपण आपले मन व बुद्धी ही घासून स्वच्छ करीत असतानाच इतरांच्याही हृदयाला स्वच्छ करण्याचा आपण प्रयत्न करावा. शबरी, तू तपस्विनी आहेस, तू आपले हृदय पवित्र केले आहेस. तू तुझ्या जातीतील स्त्री-पुरुषांची मनेही निर्मळ व प्रेमळ व्हावीत म्हणून प्रयत्न केले पाहिजेस. स्वतःचे खरे हित साधून परहितार्थ म्हणून सततोद्योग करीत राहणे, हे विचारशील मानवाचे जीवितकार्य आहे.’’

मुनींची ती गंगौघाप्रमाणे वाहणारी पवित्र वाणी शबरी ऐकत होती. ते शब्द आपल्या हृदयात ती साठवीत होती. हात जोडून खाली ऋषींच्या पदकमलांकडे

पाहात शबरी म्हणाली, ''गुरुराया, ही शबरी अजून वेडीबावरी आहे. ती दुसऱ्याला काय शिकविणार? महाराज, सदैव मला तुमच्या चरणांजवळ ठेवा म्हणजे झाले.''

अशा प्रकारचे प्रसंग, असे विचारसंलाप कितीदा तरी होत असत. शबरी आनंदाने जीवन कंठीत होती. वर्षांमागून वर्षे चालली. शबरी प्रेममय व भक्तिमय बनत चालली. तिला पाहून पशुपक्षी जवळ येत. तिच्या डोळ्यांतील प्रेममंदाकिनीने क्रूर पशूही आपले क्रौर्य विसरून जात. तिच्या हातातून पाखरांनी दाणे घ्यावेत, तिच्या मांडीवर बसून भक्तिभावाने सद्‌गदित झाल्यामुळे तिच्या डोळ्यांतून घळघळ गळणारे अश्रू मोत्यांप्रमाणे पाखरांनी गिळावेत! शबरी–भिल्लाची पोर शबरी–प्रेमस्नेहाची देवता बनली होती.

कधी कधी मतंग ऋषींच्या बरोबर शबरी इतर थोर ऋषींच्या आश्रमातही जात असे. शबरीची जीवनकथा, तिचे वैराग्य, तिचे ज्ञान व तिची शांत मुद्रा, हे पाहून ऋषी विस्मित होत व ते तिच्याबद्दल पूज्य भाव व्यक्त करीत. ऋषिपत्नींजवळ शबरी चराचरात भरलेल्या प्रेममय परमेश्वरांसंबंधी बोलू लागली म्हणजे ऋषिपत्नी चकित होत व शबरीच्या पायाला त्यांचे हात जोडले जात!

मतंग ऋषी आता वृद्ध झाले व त्यांची पत्नीही वृद्ध झाली; दोघेही पिकली पाने झाली होती. आता सर्व कामधाम शबरीच करी. सेवा हाच तिचा आनंद होता. रात्रीच्या वेळी ऋषींचे सुरकुतलेले अस्थिचर्ममय पाय चेपताना, कधीकधी तिच्या पोटात धस्स होईल. 'हे पाय लवकरच आपणास अंतरणार का?' असा विचार तिच्या मनात येऊन डोळ्यांत अश्रू जमत. झोप न लागणाऱ्या गुरूलाही झोप लागावी; परंतु मृत्यू लवकरच गुरूला नेणार का, या विचाराने शबरीस मात्र झोप लागू नये!

ऋषींच्या उपदेशाच्या गोष्टी ऐकताना तिच्या मनात विचार येई की, 'असे अमोल बोल आता किती दिवस ऐकावयास मिळणार? ही पवित्र गंगोत्री लवकरच बंद होईल का?' ऋषींचे शब्द सतत ऐकत बसावेत असेच तिला वाटे.

एक दिवस मतंग ऋषी तिला म्हणाले, ''शबरी, मरण हे कोणाला टळले आहे? केलेली वस्तू मोडते, गुंफलेला हार कोमेजतो. जे जन्मले ते मरणार, उगवले ते सुकणार, सृष्टीचा हा नियमच आहे. शबरी, एक दिवस तुला, मला हा मृण्मय देह सोडून जावे लागणार, फूल कोमेजले तरी त्याचा रंग, त्याचा सुगंध आपल्या लक्षात राहतो. त्याप्रमाणे माणूस गेले तरी त्याचा चांगुलपणा विसरला जात नाही.''

मतंग ऋषी असे बोलू लागले की शबरीला वाटे, ही निरवानिरवीची भाषा गुरुदेव का बोलत आहेत? हे शेवटचे का सांगणे आहे?

आज मतंग ऋषी स्नानसंध्या करीत होते. एकाएकी त्यांना भोवळ आली. शबरी तीराप्रमाणे तेथे धावत आली आणि पल्लवांनी वारा घालू लागली. ऋषिपत्नीही आली व तिने पतीचे मस्तक मांडीवर घेतले. ऋषींनी डोळे उघडले. ते म्हणाले, ''आता हा देह राहत नाही. तुळशीपत्र आणा, पंपासरोवराचे पाणी आणून मला दोन थेंब द्या. शबरी, जीवन अनंत आहे. मरण म्हणजे आनंद आहे.''

शबरीने पाणी देऊन तुळशीपत्र तोंडावर ठेविले. 'ॐ ॐ' म्हणत मतंग ऋषी परब्रह्मात विलीन झाले! ऋषींचे प्राणोत्क्रमण होताच जिच्या मांडीवर त्यांचे मस्तक होते, ती त्यांची प्रेमळ पत्नीही एकाएकी प्राण सोडती झाली व तीही तेथे निश्चेष्ट पडली.

पतिपत्नी ऐहिक जीवन सोडून चिरंतन जीवनात समरस झाली; परंतु शबरी-बिचारी शबरी-पोरकी झाली. तिला आता कोण पुसणार? तिला ज्ञान कोण देणार? रोज नवीन विचारांची नूतन सृष्टी तिला कोण दाखविणार? ''शबरी, आज तू काहीच खाल्ले नाहीस. ही दोन फळे तरी खाच.'' असे तिला प्रेमाग्रहाने आता कोण म्हणणार? शबरीचा आधार तुटला. मूळ तुटलेल्या वेलीप्रमाणे तीही पडली; परंतु सावध झाली. तिने चिता रचली आणि गुरूचा व गुरुपत्नीचा देह तिने अग्निस्वाधीन केला.

मृत्युदेव आला व शबरीची ज्ञान देणारी मातापितरे तो घेऊन गेला. मृत्यू ही प्राणी मात्राची आई आहे. मृत्यू हा तरी कठोर नाही. मृत्यू नसता तर या जगात प्रेम व स्नेहही दिसतो ना! मृत्यूमुळे जगाला रमणीयता आहे. हे मृत्यो, तुला कठोर म्हणतात ते वेडे आहेत. तू जगाची जननी आहेस. सायंकाळ झाली म्हणजे अंगणात खेळणारी मुलेबाळे दमली असतील, त्यांना आता निजवावे, म्हणजे पुन्हा ती सकाळी ताजीतवानी होऊन उठतील, या विचाराने आई त्यांना हळूच मागून जाऊन घरात घेऊन येते; त्याप्रमाणे या जगदंगणात मुले खेळून दमली असे पाहून आयुष्याच्या सायंकाळी, ही मृत्युमाता हळूच मागून येते व आपल्या बाळांना निजविते आणि पुन्हा नवीन जीवनाचा रस देऊन त्यांना खेळण्यासाठी पाठवून देते. अमरजीवनाच्या सागरात नेऊन सोडणारी मृत्युगंगा पवित्र आहे.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

शबरीच्या मनात मृत्यूसंबंधी असेच विचार येत होते का? त्या आश्रमात ती आता एकटीच बसे; परंतु मनुष्य कितीही विचारी असला तरी त्याला पूर्वीच्या अनेक प्रेमळ स्मृती, शेकडो सुखदुःखाचे प्रसंग आठवतात आणि त्याचे हृदय भरून येते, नव्हे, येणारच. शबरीचे असेच होई. ती सकाळी गोदावरीचे पाणी आणी. तथापि गोदेच्या तीरावर पाणी भरण्याऐवजी तिचा भरलेला हृदयकलश नयनद्वारा गोदेच्या पात्रात रिता होई; परंतु मोरांच्या केकांना ती सावध होई व जड पावलांनी आश्रमात परत येई.

शबरीचे लक्ष आता कशातही लागेना. आश्रमातील हरिणे, मोर यांना तिने इतर आश्रमांत पाठवून दिले व आपण एकटीच रानावनात आता ती विचरत राही. झाडेमाडे हे तिचे मित्र, पशु-पक्षी हेच सखे-सवंगडी. ती कधी सुंदर गाणी गाई, स्तोत्रे म्हणे. कधी आकाशाकडे पाहत बसे, कधी हसे, तर कधी रडे. शबरी एक प्रकारे शून्यमस्तक झाली होती.

एक दिवस शबरी भारद्वाज ऋषींच्या आश्रमात गेली होती. तेथे पुष्कळ ऋषिमंडळी जमली होती. बोलता बोलता भारद्वाज ऋषी म्हणाले, ''ऐकलेत का ? अयोध्येच्या दशरथाचा प्रतापी पुत्र रामचंद्र, पित्याच्या वचनपालनार्थ राज्यवैभव सोडून बारा वर्षे वनवासात घालविण्यासाठी निघाला आहे. त्याची पत्नी सीता व बंधू लक्ष्मण हीही त्याच्याबरोबर आहेत. केवढे हे धीरोदात्त व त्यागमय वर्तन!''

दुसरे ऋषी म्हणाले, ''हेच परमेश्वराचे अवतार होत. परमेश्वराचे स्वरूप अशाच थोर विभूतींच्या द्वारा प्रकट होत असते. केवढी सत्यभक्ती! केवढा त्याग!''

शबरी ऐकत होती ती म्हणाली, ''खरेच, पूर्वी गुरुदेवांनी मला असेच सांगितले होते, 'जेथे जेथे विभूतिमत्व दिसेल तेथे तेथे परमेश्वर आहे, असे समज.' असे ते म्हणत. हा प्रभू रामचंद्र. त्याची पत्नी व त्याचा भाऊ सर्व वनवास पत्करतात, खरोखरच देवांचेच हे अवतार! मला केव्हा बरे त्यांचे दर्शन होईल? खरेच केव्हा बरे दर्शन होईल?''

शबरीचे डोळे तेजाने चमकत होते. तपश्चर्येने, शोकाने व वयाने ती आता वृद्ध दिसू लागली होती. तिथे शब्द ऐकून ऋषी मोहित झाले; परंतु एकाएकी शबरी तेथून, 'कधी बरे रामचंद्र पाहीन? कधी ती मूर्ती पाहीन?' असे म्हणत वेड्यासारखी पळत सुटली व बावरलेल्या हरिणीप्रमाणे रानात निघून गेली!

''राम, राम. केव्हा बरे तो नयनाभिराम राम मी डोळ्यांनी पाहीन व त्याचे पाय माझ्या आसवांनी भिजवीन? काय रे वृक्षांनो, श्रीरामचंद्रांच्या येण्याची वार्ता तुमचा मित्र जो वायू, त्याने तुम्हास कानात सांगितली आहे का? सांगा ना! केव्हा येईल तो रामचंद्र? केव्हा दिसेल ती सीतादेवी?''

शबरी वेडी झाली होती. तिने रोज ताजी फुले जमवावीत, त्यांचे सुंदर हार दिवसभर करावेत आणि मग आज रामचंद्र आला नाही, नाही आला, असे म्हणून ते हार नदीच्या पाण्यावर सोडून द्यावेत. रोज तिने गोड गोड फळे रामचंद्रासाठी गोळा करून आणावीत आणि–

''नाही आला माझा राम, नाही पुरले माझे काम,
नाही आला मेघश्याम, नाही संपले माझे काम.''

असे म्हणत ती फळे वानरांपुढे टाकावीत.

कधी कधी पाखरांचे शब्द ऐकून शबरी म्हणे, 'ही पाखरे माझ्या रामाला साद घालीत आहेत का? पाखरांनो, तुम्हाला उडता येते; मग तुम्हालाही जर अजून रामचंद्र आलेला दिसत नाही तर मला कसा दिसणार?'

वाऱ्याचे सळसळणे ऐकून, 'राम येत नाही म्हणून का वारा रडतो आहे,' असे तिने म्हणावे. रात्री काळवंडलेला चंद्र पाहून 'राम दिसत नाही म्हणून का चंद्र काळवंडलेला आहे?' असे तिने उद्गारावे.

शबरीला एकच ध्यास, एकच भास, एकच तिला वेड, एकच तिला विचार. शबरी रामचंद्रासाठी अधीर झाली होती!

रामचंद्र, सीतादेवी, लक्ष्मण दंडकारण्यात आली. एकच दिवस भारद्वाज ऋषींकडे ती राहिली. तेथे अनेक ऋषी आले होते. रामचंद्रांचा विनय, धीरोदात्तता, तेज, पावित्र्य हे पाहून ऋषिजनांचे हृदय भरून आले. वैराग्यमूर्ती, त्यागदेवता सीता पाहून त्यांचे हृदय विरघळले. सीता म्हणाली, ''इकडील प्रेमळ सहवासात मला काटे फुलांसारखे वाटतात व दगडांची कोवळी पाने होतात. प्रभूंच्या संगतीत मला सर्व स्वर्गच आहे.'' रामचंद्रांना शबरीची गोष्ट ऋषींकडून कळली व हे वेडी शबरी कोठे भेटेल, असे त्यांनाही झाले.

तिघे जण वनवासार्थ पुढे निघाली. ऋषींच्या आश्रमात स्वागत–सत्कार घेत ती फार दिवस राहत नसत. कारण ती सुखोपयोगासाठी आली नव्हती, वनात वैराग्यवृत्तीने

व स्वावलंबनाने राहण्यास ती आली होती. त्रिवर्ग पुढे चालले व शबरीच्याच कथा त्यांच्या चालल्या होत्या. एक साधी भिल्लकन्या; परंतु सत्संगतीने संस्काराने ती किती उदात्त विचारांची व थोर आचाराची झाली होती, ते ऐकून त्यांना विस्मय वाटला.

खरेच, पडीक जमिनीत खते घालून, तिची नीट मशागत करून जसे उत्कृष्ट पीक काढता येते; ज़ेथे दगडधोंडे काटेकुटे आहेत, तेथेही प्रयत्न केले, तर फुलाफलांनी, सस्यांकुरांनी नटलेली सुंदर सृष्टी जशी शोभू लागते, तसेच मानवी मनाचेही आहे. या जगात 'प्रयत्न हा परीस आहे', प्रयत्नाने नरकाचे नंदनवन होते, कोळशाची माणके होतात. आपण शेताभातांची निगा राखून पीक काढतो; परंतु मानवी मनाची अमोल शेती आपण करीत नाही! या जगात, आपल्या हिंदुस्थानात कितीतरी ओसाड मनोभूमिका पडल्या ओहत. कोट्यवधी लोकांच्या मनोभूमिका आपणावर सद्विचारांचा, सत्संस्कारांचा पाऊस कधी कोसळेल म्हणून वाट पाहत आहेत; आपला उद्धार कधी होईल, अशी रात्रंदिवस त्या ओसाड मनोभागांची चिंता लागली आहे. फ्रेंच इंजिनियर सहारा वाळवंटात पाणी सोडून त्याचा समुद्र बनविणार होते. हिंदुस्थानातील लाखो मानवी हृदयांची वाळवंटे! तेथे ज्ञानमेघ आणून कोण ओली करणार? तेथे सद्‌गुणांचे पीक कोण घेणार! धैर्य, साहस, स्वार्थत्याग, सद्धर्म, दया, प्रेम, परोपकार, सदाचार, सहानुभूती, सहकार्य, माणुसकी, बंधुभाव, स्वच्छता या सद्‌गुणांचे पीक या शेकडो पडीक मनोभूमीतून कुण काढणार? देवाघरच्या या दैवी शेतीवर काम करणारे कष्टाळू मजूर आपणास किती आहेत? भिल्ल, कातकरी, गोंड, अस्पृश्य अशा जाती या सर्वांना ज्ञानाची शिदोरी कोण नेऊन देणार? ही भगवंताची मानसशेती करावयास, तिच्यावर खपण्यासाठी हजारो प्रामाणिक मजूर पाहिजे आहेत, हजारो मतंग मुनी हवे आहेत! शबरीलाही सत्संकारांनी पुण्यतमा करणारे मतंग मुनी कोठे आणि 'तुम्ही अस्पृश्य, शिवू नका, तुम्हाला वेदाचा अधिकार नाही!' असली वाक्ये तोंडाने उच्चारणारे हल्लीचे हे शाब्दिक धर्ममार्तंड कोठे? पुनरपि या श्रीरामचंद्रांच्या भूमीत हजारो मतंग ऋषी झाल्याशिवाय देशोद्धार कसा होणार?

रामचंद्र, सीता, लक्ष्मण हा त्रिवर्ग वनमार्ग आक्रमित होता, तो एका वृक्षाच्या खाली 'ही फळे रामचंद्राला आवडतील का? किती गोड आहेत! माझ्या दातांनी त्याची चव मी घेतली आहे; पण केव्हा येणार रामचंद्र? केव्हा येणार? केव्हा भेटणार?

आजही हे गुंफलेले हार कोमेजून जाणार का?' असे शबरी स्वतःशी खिन्नपणे, प्रेमळपणे म्हणत होती.

एकाएकी रामचंद्र, सीता, लक्ष्मण ही तिच्यासमोर उभी राहिली. शबरी चकली. तिचे डोळे अश्रूंनी चमकले. ती उठून म्हणाली, ''तुम्हीच ते; मला जरी माहीत नाही, तरी तुम्हीच ते. तुम्हीच रामचंद्र, होय ना? तुमचे प्रसन्न मुखच सांगत आहे. सीतामाई व प्रेमळ बंधू लक्ष्मण. तुम्हीच ते. किती तुमची वाट पाहत होते! तुमच्यासाठी दररोज फळे गोळा करावीत, हार गुंफावेत! लबाड वारा सांगेना, पाखरे सांगेनात, तुम्ही कधी येणार ते. बरे झाले, आलात तुम्ही! मला दर्शन दिलेत. मी कृतार्थ झाले. माझे गुरुदेव म्हणत, 'ज्याच्या ठिकाणी अनंत सद्गुण दिसतील, तो परमेश्वर समजावा.' तुम्ही निर्दोष, निष्कलंक आहात. तुम्हीच माझे परमेश्वर आहात. या, बसा. मी तुमची पूजा करते हां.'' असे म्हणून तिने तिघांना पल्लवांवर बसविले. तिने त्यांचे पाय धुतले व अश्रूंचे कढत पाणीही मधूनमधून त्यावर घातले. नंतर तिने त्यांच्या गळ्यांत घवघवीत हार घातले व ती मधुर फळे त्यांच्या पुढे ठेविली. रामचंद्र, सीता व लक्ष्मण या सर्वांचे अंतःकरण भरून आले! त्यांना ती फळे खाववेत ना!

शबरी म्हणाली, ''देवा, मी मूळची भिल्लीण म्हणून का फळे खात नाही? परंतु मी निर्मळ व प्रेमळ आहे. प्रेमाला, भक्तीला विटाळ नसतो. ही बोरे मुद्दाम मी चाखून पाहिली. चांगली गोड फळे पाहिजेत नाही माझ्या रामाला? हं, रामा, घ्या ना ! सीतामाई, घ्या ना!'' सर्वांनी फळे घेतली. पलाशद्रोणातील पाणी तिने त्यांच्या हातांवर घालले.

नंतर शबरी उभी राहिली व हात जोडून म्हणाली, ''देवा रामचंद्रा,

जलदश्यामा रामा, सार्थ झाले ।
तुजला बघुनी देवा, मम डोळे धाले ।
उत्कंठा जी धरूनी हे होते प्राण,
झाली देवा तृप्त आता नुरला काम ।
हे भगवंता, गुणसागरा, हे रघुनाथा,
चरणी तुझिया ठेवितसे माथा ।
झाले दैवा, झाले मम जीवन धन्य,
मागायचे नाही रे तुजला अन्य।

जन्मोजन्मी देई भक्ती,
मज सीतापती म्हणजे झाले.
दुसरे मनि काही नुरलें ।। जलश्यामा ।।

शबरीने गाणे म्हटले ते 'मला पदरात घ्या' असे म्हणून रामचंद्रांच्या पायांवर तिने मस्तक ठेविले; परंतु रामचंद्रांच्या पायी शबरी पडली, ती पुन्हा उठलीच नाही! विश्वव्यापी परमात्म्यात तिचे चित्तत्त्व मिळून गेले! ते देहपुष्प मात्र रामचरणी कोमेजून पडले!

तिघांना गहिवर आला. शबरीला त्यांनी अग्नी दिला व तिचे गुणवर्णन करीत ती तिघे गेली. शबरी देहाने गेली, परंतु कीर्तिरूपाने सदैव अमर आहे. जोपर्यंत भारतवर्ष आहे, रामायण आहे, राम-सीता यांची आठवण आहे, जोपर्यंत जगात भक्ती आहे, हृदय आहे, तोपर्यंत शबरीही आहे.

शबरी अमर आहे!

+++

महात्मा गौतम बुद्ध

महात्मा गौतम बुद्ध

या व्यासपीठावरून कला व विज्ञान, तत्त्वज्ञान व साहित्य यांच्या इतिहासात ज्यांची नावे अजरामर आहेत, अशा अनेक पाश्चिमात्य विभूतींविषयीची गौरवपर व्याख्याने आजपर्यंत झाली आहेत; परंतु आज पूर्वेकडील एका महात्म्याविषयी आपण विचार करणार आहोत. मानवजातीच्या विचारावर व जीवनावर गौतम बुद्धांनी केलेल्या परिणामास तुलना नाही. असा परिणाम करणाऱ्या विभूतींत ते अग्रगण्य आहेत. थोर धार्मिक परंपरेचे एक संस्थापक या दृष्टीने त्यांचे नाव पवित्र झाले आहे. त्या धार्मिक परंपरेने मानवी मनाची घेतलेली पकड इतर धार्मिक परंपरांपेक्षा किंचितही कमी नाही. इतर धर्मपरंपरांप्रमाणेच बौद्धधर्माच्या परंपरेनेही मानवी मनावर खोल परिणाम केलेला आहे. जगाच्या वैचारिक इतिहासात बुद्धांचे उच्च स्थान आहे. सर्व सुधारलेल्या मानवजातीचे ते वारसा झालेले आहेत. बौद्धिक प्रामाणिकपणा, नैतिक उत्कटता, खोल आध्यात्मिक दृष्टी, यांच्या कसोट्या लावून पाहू, तर निःशंकपणे असे कबूल करावे लागेल, की गौतम बुद्ध हे इतिहासातील अत्यंत थोर विभूतींपैकी एक आहेत.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

१

बुद्धांच्या ऐतिहासिकपणाविषयी जरी क्वचित कोठे शंका घेतली जात असली, तरी आजकाल त्यांचे ऐतिहासिकत्व न मानणारा असा एकही महान पंडित सहसा आढळत नाही. बुद्धांचा काळ आता निश्चित करता येण्यासारखा आहे. त्यांच्या जीवनाची सर्वसाधारण रूपरेषा काढता येण्यासारखी आहे. धार्मिक तत्त्वज्ञानातील काही महत्त्वाच्या प्रश्नावरील त्यांचे विचार व त्यांची शिकवण ही काहीशा निश्चितपणे शिकता येण्यासारखी आहेत. ज्यांनी गौतम बुद्धास पाहिले होतं, त्यांची वाणी ऐकली होती, अशांच्या स्मृती बौद्धधर्माच्या पहिल्या धार्मिक वाङ्मयात बऱ्याच आहेत. तो काळ असा होता, की ज्या वेळेस लेखनाचा फारसा प्रघात नव्हता आणि म्हणून आजच्यापेक्षा त्या काळात स्मरणशक्तीच अधिक तीव्र असे. आठवणीच अधिक बिनचूक व चिवट असत. बौद्धधर्मीय वाङ्मयाच्या आधीच ऋग्वेद स्मृतीच्या बळावरच जसाच्या तसा राखून ठेवण्यात आला. नंतरच्या वाङ्मयापेक्षा ऋग्वेदात कितीतरी कमी पाठभेद आहेत. या गोष्टींवरूनही त्या काळात स्मरणशक्ती किती केळवली गेली होती ते दिसून येते. उत्तरकाळात मूळच्या बौद्धधर्मीय ग्रंथांचे संपादन करताना जरी बरेचसे फेरफार केलेले असले, तरीही या थोर धर्मस्थापकाची सुप्रसिद्ध वचने, नाना कृत्ये यांचा पुष्कळच निश्चितपणे अभ्यास करता येणे शक्य आहे. बुद्धांच्या जन्माच्या वेळेस अनेक चमत्कार घडले, अनेक अद्‌भुत प्रकार घडले अशी अनैतिहासिक वर्णने आहेत; परंतु त्यावरून बुद्धांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी त्यांच्या

पहिल्या अनुयायांना किती दिव्यता व अपूर्वता वाटत होती एवढे दिसून येते. ते प्राचीन काळातील पहिले अनुयायी भक्त होते, चिकित्सक नव्हते. पाली ग्रंथ, सिलोनमधील जुने ऐतिहासिक ग्रंथ व संस्कृत ग्रंथ या सर्वांची गौतम बुद्धांच्या जीवनांतील महत्त्वाच्या घटनांच्या बाबतीत एकवाक्यता आहे. ज्या जगात बुद्ध हिंडले-फिरले, वावरले-वागले, त्यांच्या शिकवणीचे मूळचे स्वरूप, यासंबंधीही या सर्व ग्रंथांची एकवाक्यता आहे. गौतम बुद्धांचे बाल्य व तारुण्य यासंबंधींच्या अनेक दंतकथा आहेत यात संशय नाही; परंतु अशा काही अवास्तव कथा जरी त्यांच्या चरित्राभोवती गोळा झालेल्या असल्या, तरी त्यांच्या जन्माविषयी, त्यांच्या वंशपरंपरेविषयी शंका घेण्यास मुळीच जगा नाही.

ख्रिस्तपूर्व ५६३ मध्ये बुद्ध जन्मले. शाक्य नावाच्या क्षत्रिय कुळात ते जन्मले. त्यांच्या पित्याचे नाव शुद्धोदन. काशीच्या उत्तरेस सुमारे शंभर मैलांवर नेपाळच्या सीमेवर कपिलवस्तू नामक शहरी हे क्षत्रिय घराणे राज्य करीत होते. सम्राट अशोकाने पुढे ही जागा शोधून तेथे एक स्तंभ उभारला व तो अद्याप उभा आहे. बुद्धांचे मूळचे नाव सिद्धार्थ असे होते. गौतम हे कुलनाम होते. बुद्धांच्या जन्म वेळेस जे उपाध्याय उपस्थित होते, त्यांनी भविष्य केले, की हे बालक जर राज्य करू इच्छील तर चक्रवर्ती होईल; परंतु जर पारिव्राजिक यतिजीवन कंठू पाहील तर बुद्ध होईल. एकच व्यक्ती एकाच वेळी चक्रवर्ती व बुद्ध होणे अर्थातच अशक्य होते. कारण ज्याला धर्ममय जीवन उत्कटपणे कंठावयाचे आहे, त्याने संसारत्याग केलाच पाहिजे. सांसारिक जीवनाचा त्याग ही तर पारमार्थिक जीवनाची पहिली पायरी. सूत्तनिपातात एक गोष्ट आहे, की एकदा असित नावाचा एक वृद्ध मुनी या लहान मुलाला बघायला आला. मुलाला पाहून त्याने भविष्य केले, की हे मूल अलौकिक विभूति होईल आणि हे बालक महात्मा होऊन जेव्हा जगाला नवधर्म देईल, त्या वेळेस आपण जिवंत नसू, असे मनात येऊन असित मुनींच्या डोळ्यांतून अश्रू घळघळले.

हे अलौकिक मूल जन्माला आले आणि सातच दिवसांनी त्याची जन्मदात्री माता मरण पावली. तिचीच बहीण शुद्धोदनाची दुसरी पत्नी होती. तिचे नाव महाप्रजापती. तिने या अर्भकाला वाढविले. योग्य वेळी पुढे गौतमांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नाव यशोधरा. पुढे त्यांना मुलगा झाला. त्यांचे नाव राहुल. उद्वेगजनक

व दु:खद प्रसंग गौतमांच्या दृष्टीस पडू नयेत म्हणून पित्याने पुष्कळ दक्षता घेतली होती; परंतु शेवटी व्हायचे ते झाले. असे सांगतात, की दैववशात किंवा देवाच्या इच्छेने त्यांना रस्त्यात चार दृश्ये दिसली : एक अगदी गळून गेलेला असा जराजर्जर मनुष्य; एक रोगी; एक मृत मनुष्य आणि एक परिव्राजक संन्यासी. ही दृश्ये पाहून गौतम विचार करू लागले. धर्ममय जीवनांतच खरी शांती व गंभीरता लाभेल असे मनात येऊन त्यांना एक नवीन प्रेरणा मिळाली. ही दृश्ये दिसल्याची गोष्ट खरी असो वा काल्पनिक असो, गोष्टींचें तात्पर्य इतकेच, की गौतम धार्मिक वृत्तीचे पुरुष होते. या जगातील सुखांनी, आशा-आकांक्षांनी त्यांचे समाधान होऊ शकत नव्हते. यति-जीवनाच्या आदर्शाकडे त्यांचे मन खेचले गेले. ''पवित्र जीवनाच्या ध्येयासाठी घरादाराचा त्याग करून विश्वात परिव्राजकाप्रमाणे गृहहीन होऊन विचारतात.'' असे शब्द बुद्धांच्या प्रवचनांतून अनेकदा येतात. आजचा आपला काळ फार व्यावहारिक आहे. या आजच्यां काळात, भारतीय मनाला धर्माची केवढी ओढ असे, धर्ममय ध्येयासाठी भारतीय मन किती आपत्ती व कष्ट सोसावयास सिद्ध असे त्याची कल्पना येणार नाही. गौतम सत्याचा शोध करू लागले. नवप्रकाशाच्या शोधात असता दोन ब्राह्मण यतींशी त्यांची गाठ पडली. बुद्ध त्यांचे शिष्य झाले. त्या यतींची नावे अलार कालम व उद्दक रामपुत्र अशी होती. त्या दोघांनी स्वत:चे धर्मज्ञान बुद्धास दिले. त्यांनी आपल्या 'विनयां'तही बुद्धास पारंगत केले. श्रद्धेची आवश्यकता, सदाचार, ध्यानधारणा, चिंतन, इत्यादी गोष्टी ह्या यतींपासूनच बुद्ध शिकले असावेत; परंतु त्यांच्या शिकवणीतील मथितार्थ बुद्धांना ग्राह्य वाटला नाही. जगातील दु:खांवरचा उपाय कधी न संपणाऱ्या वाग्युद्धात सापडणे शक्य नाही; म्हणून तपश्चर्येने ज्ञानप्रकाश प्राप्त करून घेण्याच्या निश्चयाने गौतम निघाले. पाच शिष्यांसमवेत ते उरुवेला येथे गेले. उरुवेला हे मोठे रमणीय स्थान होते. सुंदर असे ते तपोवन होते. हिंदुस्थानात अशी एक सर्वसामान्य समजूत आहे, की ज्याला पवित्र जीवन कंठावयाचे असेल त्याने निसर्गरम्य स्थानी राहावे. प्रशात व मनोहर अशा निसर्गस्थानी असे जीवन कंठणे अधिक सुकर असते. अशा ठिकाणी इंद्रिये प्रक्षुब्ध होत नाहीत. तेथे एक प्रकारची स्थिरता, शांती इंद्रियांना मिळते. मनालाही अशा ठिकाणी प्रेरणा मिळते, स्फूर्ती मिळते. हिंदुस्थानातील धार्मिक मठ, मंदिरे बहुधा नदीतटाकी किंवा पर्वतशिखरांवर असतात. पावित्र्यावर व धार्मिक श्रद्धेवर भर देत असताना, त्यांच्या

प्राप्तीसाठी वातावरण अनुकूल हवे. सभोवती निसर्गरमणीयता असायला हवी, ही गोष्ट हिंदुस्थान विसरला नाही.

गौतम बुद्ध त्या स्थानी जाऊन तप करू लागले. अत्यंत उग्र अशी तपश्चर्या यांनी आरंमिली. ज्याप्रमाणे ओल्या काष्ठांच्या घर्षणांतून अग्नी प्रकट होत नाही, त्यासाठी वाळलेल्या काष्ठांची आवश्यकता असते, त्याप्रमाणे ज्ञानाचा उदय होण्यासाठीही वासनाविकास शांत झालेले असले पाहिजेत, असे मनात येऊन बुद्धांनी कठीण असे अनशन व्रत आरंभिले. योगमार्ग, ध्यानधारणा यांचेही ते आचरण करू लागले. अति निष्ठूर देहदंडना त्यांनी आरंभिली. त्यांचे शरीर दुबळे झाले. मनोबुद्धीला ग्लानी आली. कधी कधी तर आपण मरणार असेही त्यांना वाटे; परंतु इतके झाले तरीही जीवनाच्या प्रश्नावर थोडासाही प्रकाश पडलेला त्यांना दिसला नाही. शेवटी उपासतापास हा ज्ञानप्रकाशाचा मार्ग नव्हे, अशी मनाशी पक्की खूणगाठ त्यांनी बांधिली. दुसरा मार्ग शोधण्याचा ते विचार करू लागले. पूर्वी तरुण असताना आध्यात्मिक चिंतनाचा त्यांना एक अनुभव आला होता. त्याच दिशेने जाण्याचे त्यांनी ठरविले. मनाच्या अशा अस्थिर व अशांत स्थितीत असतानाच मार वगैरे षड्रिपूंनी बुद्धांवर हल्ला चढविला अशी दंतकथा आहे. मोह पाडणाऱ्या या माराने बुद्धांनी निश्चयापासून परावृत्त व्हावे म्हणून नाना प्रयत्न केले. कधी आक्राळविक्राळ स्वरूपे त्यांच्याभोवती दाखविली, तर कधी मनाला भूल पाडणारी, उल्लू करणारी अशी मोहक दृश्ये दाखविली. या दंतकथांचा अर्थ इतकाच, की या काळात बुद्धांचे मन शांत नव्हते. एक अखंड अशी ध्यानधारा स्रवत नव्हती. ध्यानात मनोव्यत्यय येत होते. या वेळेस त्यांच्या हृदयात एक प्रकारचा झगडा चालू होता आणि अशा झगड्यांनीच त्यांनी शेवटी जुन्या कल्पना भिरकावून दिल्या. जुने मार्ग व जुन्या पद्धती सोडून ते नवीन मार्ग शोधू लागले. जुनी श्रद्धा जाऊन ते नवीन श्रद्धा पाहू लागले. ते मननात मग्न झाले. ध्यानात रंगले. ध्यानाच्या चार स्थितींतून गेल्यावर विशुद्ध अशी आत्मप्राप्त त्यांना झाली. मनाची समता त्यांना लाभली. हे सारे विश्व ऋतसत्यांच्या काही शाश्वत नियमांनुसार चालले आहे असे त्यांना स्पष्टपणे दिसून आले. या जगात सर्वत्र धडपड आहे, धावपळ आहे; कोणी सुखी, कोणी दुःखी; कोणी उच्च, तर कोणी नीच; हे कोट्यवधी प्राणी जीवनाच्या अनेक अवस्थांतून सारखे जात आहेत, सारखे स्थित्यंतर, सारखा बदल, असे विराट विश्वदर्शन त्यांना झाले आणि एके

दिवशीची ती शेवटची ध्यानरात्र ! पहाटेची वेळ होत आली आणि ''सारे अज्ञान नष्ट झाले. ज्ञानप्रभा फाकली.... ''मी तेथे निश्चयाने, उत्कट वृत्तीने, अखंड प्रयत्नशील असा बसलो होतो.'' असे त्यांचे धन्योद्गार आहेत. गौतमांना बोधि प्राप्त झाली. ज्ञान प्राप्त झाले. गौतम आता ''बुद्ध'' म्हणजे त्यांना सारे समजले आहे, ज्यांच्या सर्व आशंका फिटल्या आहेत, असे म्हणाले.

स्वत:ला जे ज्ञान मिळाले ते जगासमोर मांडावे की न मांडावे, याचा निश्चय बुद्धांच्या मनात होईना. धर्मग्रंथ सांगतात, की ब्रह्मदेवाने सत्यप्रसार करण्याची त्यांना प्रार्थना केली. याचा अर्थ इतकाच, की जगत्संन्यास का जगत्संचार यांविषयी त्यांच्या मनात झगडा चालला होता. शेवटी 'जग सोडून न जाता जगातच वावर' असा त्यांच्या अंतरात्म्याने निर्णय दिला. ''अमरत्वाची द्वारे उघडी आहेत; ऐकायला ज्यांना कान आहेत त्यांनी श्रद्धा दाखवावी'' असे उद्घोषून जगत्संचारार्थ ते निघाले. दु:खी दुनियेला नवप्रकाश देण्यासाठी ते बाहेर पडले. उपदेश करणे सोपे असते; परंतु तेवढे करूनच बुद्ध थांबले नाहीत. मनुष्याने जसे जगावे असे त्यांना वाटत होते, तसे ते स्वत: जगत होते. जी शिकवण ते देत होते, जीवनाचे जे तत्त्वज्ञान ते देत होते, तद्नुरूप त्यांचे वर्तन होते. त्यांचा उपदेश व त्यांचा प्रत्यक्ष आचार यांत विसंगती नव्हती. ते स्वत: भिक्षू बनले. द्रारिद्र्य, अप्रियता, विरोध, इत्यादी गोष्टींना त्यांनी स्वीकारले. सर्व संकटे सहन करीत ते सर्वत्र संचार करू लागले. आपला संदेश देऊ लागले. तपश्चर्येच्या काळी जे त्यांचे पाच अनुयायी होते, त्यांना त्यांनी प्रथम हे नवज्ञान दिले. हे पाचही जण नवीन मताचे झाले आणि नंतर जेथे अर्वाचीन सारनाथ आहे तेथे बुद्ध गेले. सारनाथ येथे तपोवन होते. प्राण्यांची हत्या करण्यास तेथे बंदी होती. त्या तपोवनात तपोसाधनास राहायची परवानगी होती. अशा या पवित्र स्थानी गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रकट प्रवचन केले. शिष्य वाढू लागले. तीन महिन्यांत ६० शिष्य मिळाले. बुद्धांचा आवडता शिष्य आनंद या साठ शिष्यांतच होता. बुद्धांच्या सर्व परिभ्रमणात हा आनंद सदैव त्यांच्याबरोबर असे. एके दिवशी बुद्ध आपल्या शिष्यांना म्हणाले, ''आता तुम्ही सर्वत्र बहुजनसमाजाच्या कल्याणासाठी हिंडा. येथून बाहेर पडा. जगाविषयी मनात सहानुभूती व करुणा बाळगून देवांच्या व मानवांच्या हितार्थ, कल्याणार्थ प्रयत्न करा. एकाच दिशेने सारे नका जाऊ. प्रत्येकाने निरनिराळ्या दिशेस जावे. जी शिकवण आरंभी, मध्ये व अंती सारखीच भव्य व दिव्य आहे, ती

शिकवण जगाला द्या. जी शिकवण वाच्यार्थाने व लक्ष्यार्थाने केवळ कल्याणमय अशी आहे, खरोखर उदात्त अशी आहे, ती तुम्ही जगाला द्या. पावित्र्याने पूरित अशा विशुद्ध व निर्दोष जीवनाची घोषणा करा; सुफलित अशा कृतार्थ जीवनाची घोषणा करा. जा.''

स्वत: बुद्ध ही शिकवण देत ४५ वर्षे हिंडत होते. दूरवर त्यांनी प्रवास केला. त्यांच्याभोवती अनेक अनुयायी गोळा झाले. ब्राह्मण व यतिसंन्यासी, तपस्वी व साधू, परित्यक्त व अनुतप्त, थोर कुळांतील स्त्रिया, असे नानाविध लोक त्यांच्या संघात सामील झाले. या आपल्या शिष्यांना योग्य अशी शिकवण देणे, या संघाची नीट व्यवस्था करणे हे बुद्धांचे मुख्य काम होते. या कामांत त्यांचा पुष्कळ वेळ जाई. आजच्या काळात गौतम बुद्धास आपण बुद्धिवादी म्हणू. त्यांची प्रवचने वाचीत असता ते सारासार बुद्धीवर, विचारशक्तीवर किती भर देत असत, ते दिसून येते. बुद्धांनी जो नीतिमार्ग दाखविला त्याची पहिली पायरी म्हणजे योग्य विचार करणे, अचूक दृष्टी घेणे. बुद्धिप्रधान अशी चिकित्सक दृष्टी घ्यावयास बुद्ध सांगतात. मानवजातीचें ध्येय, मानव्याची दृष्टी, यांना पदोपदी अडथळे आणणारी सारी भ्रमजाळे झडझडून दूर करणे हे बुद्धांचे पहिले काम होते. यासाठी त्यांची किती धडपड, किती यातायात !

कळत नसून उगीच सर्वज्ञत्वाचा आव आणणाऱ्यांना ते स्पष्ट प्रश्न विचारतात. गूढ व संदिग्ध धर्मवचने बोलणाऱ्यांना ''या शब्दजालांतील स्पष्ट अर्थ काय'' असे ते विचारतात. बुद्धांना पोकळ, शाब्दिक धर्मवल्गना नको असत. ह्यांतील अर्थ सांगा, असे ते आव्हानपूर्वक विचारीत. त्या काळी आपणास ईश्वराचे प्रत्यक्ष ज्ञान आहे असे अनेक जण म्हणत. ईश्वर आहे की नाही याविषयीचेच केवळ मत ते सांगत असे नाही, तर ईश्वराचे विचार काय आहेत, तो काय करतो, कसा वागतो याचेही ज्ञान आपणास आहे असे लोक म्हणत. तुम्ही उगीच ही आध्यात्मिकतेची सोंगे-ढोंगे माजविता असे बुद्ध त्यांना स्वच्छ सांगत. तेविज्जसूत्तात बुद्ध स्पष्टपणे सांगतात, ''धर्मोपदेशक ब्रह्मादिकांविषयी बोलतात, त्यांनी त्या ब्रह्मादिकांना कधीही प्रत्यक्ष पाहिलेले नसते. राजवाडा कोठे बांधावयाचा हे माहीत नसताच एखाद्याने जिना बांधावा, कोणती स्त्री हे सांगता येत नसूनही एखाद्याने प्रेमात पडावे, नदीच्या परतीरास पोचू इच्छिणाऱ्याने त्या तीरालाच स्वत:कडे येण्यास सांगावे, त्याप्रमाणे हे सारे आहे.'' आपणांपैकी पुष्कळांची धार्मिक वृत्ती असते; परंतु ही वृत्ती कोठे वळवावयाची याची

आपणास स्पष्ट कल्पना नसते. भक्ती डोळस व बुद्धिग्राह्य असावी म्हणून ती सत्यावर आधारलेली असली पाहिजे. बुद्ध धर्ममय लोकांना ब्रह्मविहाराचे महत्त्व नेहमी विशद करून सांगत असत. ब्रह्मविहार म्हणजे ब्रह्मात राहणे; ब्रह्मविहार म्हणजे एक प्रकारचे चिंतन; ज्या स्थितीत आपणास चराचराविषयी प्रेम वाटते अशी ती एक मनाची स्थिती असते. त्या वेळेस कोणाविषयीही मनात द्वेषभाव नसतो; परंतु ब्रह्मविहार म्हणजे निर्वाण नव्हे. निर्वाणाकडे अष्टविध मार्गांनी जावयाचे असते.

जगात नाना प्रकारची मतमतांतरे असतात. कोणी काही सांगतो, कोणी काही. नाना प्रकारची दर्शने, नाना तत्त्वज्ञाने, बुद्ध आपल्या शिष्यांना उपदेशितात, "तुमच्यासमोर जे जे विचार मांडले जातील, जे निरनिराळे कार्यक्रम ठेवले जातील, त्यांना तर्काची कसोटी लावून पाहात जा. जीवनाची कसोटीही त्यांना लावून पाहा. केवळ एखाद्याविषयी आपणास आदर वाटतो, एवढ्यावरून त्याचे म्हणणे स्वीकारू नये." बुद्धांनी या नियमाला स्वतःचाही अपवाद ठेवला नाही. ते म्हणतात, "केवळ ऐकीव गोष्टीवर विश्वसून ती स्वीकारू नका; परंपराप्राप्त म्हणूनही स्वीकारू नका; 'असे असलेच पाहिजे' असे अधीर होऊन म्हणू नका; अमुक एखादे वचन आपल्या पुस्तकात आहे, एवढ्यावरून ते स्वीकारू नका; 'हे स्वीकारण्यास हरकत नाही' अशाही समजुतीने स्वीकारू नका किंवा अमुक आपल्या गुरूंचे म्हणणे आहे एवढ्यावरूनही तुम्ही ते स्वीकारू नये." आपल्या अनुयायांना सहृदयपणे प्रार्थून ते म्हणतात, "माझ्या नावाच्या मोठेपणामुळे तुम्ही स्वतःच्या विचारात व्यत्यय येऊ देऊ नका. माझ्या व्यक्तिमत्त्वामुळे तुमच्या विचारसरणींत बाधा न येवो."

सारीपुत्ताने म्हटले, "भगवन, तुमच्याहून अधिक थोर असा ज्ञानवेत्ता महात्मा मागे कधी झाला नाही, पुढे कधी होणार नाही व आजही नाही."

भगवान बुद्धांनी विचारले, "का रे सारिपुत्ता, मागे होऊन गेलेले सारे बुद्ध तुला माहीत असतीलच ना?"

"नाही महाराज."

"तर मग भविष्यकाळातील तरी तुला माहीत असतील?"

"नाही महाराज."

"तर मग निदान तू मला तरी जाणत असशील? माझ्या मनात तरी तू खूप खोल डोकावून पाहिले असशील?"

''तसेही नाही महाराज.''

''तर मग हे सारीपुत्ता, अशी पुष्पिता वाणी, असे अगडबंब शब्द तू का उच्चारिलेस? असे धीट बोल तू कसा बोललास?''

बुद्धांचा असा हा स्वच्छ बुद्धिवाद आहे. त्यांच्या शिकवणीत गूढ असे काही नाही. आपणाजवळ काही गुह्य ज्ञान आहे असे म्हणणाऱ्यांविषयी बुद्धांना तिरस्कार वाटे. ते म्हणतात, ''हे शिष्यांनो, या जगात तिघांजवळ गुप्तपणा नसतो; उघडपणा नसतो. स्त्रियांजवळ गुप्तपणा असतो, उघडपणा नसतो. उपाध्यायांच्या, भटभिक्षुकांच्या ज्ञानात गुप्तपणा असतो, उघडपणा नसतो; आणि खोट्या धर्ममतात गुप्तपणा असतो, उघडपणा नसतो... परंतु जो पूर्णपणे बुद्ध झाला, त्यांची मते व त्यांचे नियम सूर्यप्रकाशाप्रमाणे जगासमोर असतात. त्यात गूढ, गुप्त असे काही नसते.'' मरण्याचे आधी थोडा वेळ भगवान बुद्ध आपल्या आवडत्या शिष्याला–आनंदाला–म्हणाले, ''मी नेहमी सत्य उपदेशिले. सत्यामध्ये गुह्य सत्य व प्रकट सत्य असे भेद मी कधी केले नाहीत. आनंदा, तथागताजवळ झाकली मूठ नाही. एखादा गुरू आपल्या मुठीत काही बाकी ठेवतो; परंतु सत्याचे बाबतीत तथागत असे कधी करीत नाही.'' बुद्धांच्या प्रवचनांतून ते सॉक्रेटिसाच्या प्रश्नोत्तररूप पद्धतीने बोलत आहेत असे दिसून येते. अनेकांशी त्यांचे प्रश्नोत्तररूप संवाद चाललेले दिसतात. प्रश्न करणारे ज्या गोष्टी गृहित धरून आरंभ करीत, त्याच गोष्टी हळूहळू बुद्ध त्यांना सोडायला लावीत. निराळ्याच गोष्टी त्यांना स्वीकाराव्या लागत. मोठ्या कुशलतेने बुद्ध त्यांचे मन वळवीत आहेत असे दिसून येते.

आध्यात्मिक प्रांतांतील स्वातंत्र्य बुद्ध कधी हिरावून घेत नाहीत. स्वतःच्या अनुयायांनाही हे वैचारिक स्वातंत्र्य ते गमावू देत नाहीत. ते आपल्या अनुयायांना आपापल्या आध्यात्मिक स्वातंत्र्याचा भार स्वीकारायला लावतात. गुरूवर सर्व सोपवून आपण स्वस्थ बसावे ही गोष्ट ते करू देत नाहीत. एखाद्याचा आध्यात्मिक अधिकार मान्य करून शिष्यांनी स्वतः सत्यशोधनाचे कार्य सोडून द्यावे हे त्यांना संमत नाही. अनुयायी व शिष्य यांनाही स्वातंत्र्य असले पाहिजे. त्यांनी स्वतःच स्वतःला प्रकाश दिला पाहिजे; स्वतःला स्वतःच साहाय्य केले पाहिजे. बुद्ध म्हणतात,* ''ज्यांना स्वतःचा आत्मा हाच दीप आहे, ज्यांना अन्य आधार नसून आत्मा हाच आधार

---

* आत्तदीप, आत्तसरण, अनन्नसरण; धम्मदीप, क्षम्मसरण

–महापरिनिब्धागसूत्त : ३३

आहे, असे तुम्ही बना; सत्यधर्म हाच ज्यांचा दीप आहे, सत्यधर्म हाच ज्यांचा आधार आहे, असे बना.'' अधिकारांची सर्वश्रेष्ठ वाणी म्हणजे आपल्या आत्म्याची वाणी; आत्म्याच्या आवाजाला सार्वभौम स्थान. बुद्धांच्या शिकवणींत आग्रह नाही, हटवाद नाही. आपलेच खरे असे नाही. त्या काळात दुर्मिळ अशी विशाल दृष्टी त्यांच्याजवळ होती. अशी दृष्टी असल्यामुळे विरोधी मताचा, टीकेचा गळा ते गुदमरवू इच्छीत नाहीत. धर्माचा सर्वांत मोठा शत्रू म्हणजे असहिष्णुता असे त्यांचे मत होते. एकदा अंबलठ्ठिक येथील सार्वजनिक सभागृहात बुद्धदेव शिरले, तो तेथे त्यांचे शिष्य एका ब्राह्मणाविषयी बोलत होते. त्या ब्राह्मणाने बुद्धांवर अधार्मिकतेचा आरोप केला होता. भिक्षुसंघावरही त्याने टीका केली होती. त्यातील दोष दाखविले होते. शिष्यांचे बोलणे ऐकून बुद्ध म्हणाले, ''बंधूंनो, दुसरे माझ्याविरुद्ध बोलतात, माझ्या धर्माविरुद्ध किंवा संघाविरुद्ध बोलतात, म्हणून तुम्हाला रागावण्याचे काहीच कारण नाही; त्यांच्यावर असंतुष्ट व्हावयाचे काही कारण नाही. जर तुम्ही रुसाल, रागावाल तर आध्यात्मिकदृष्ट्या तुमची हानी होण्याचा संभव आहे; आणि तुम्ही जर संतापाल, चिडून जाल, तर ते लोक जे म्हणत आहेत ते कितपत यथार्थ वा अयथार्थ आहे, याचाही निर्णय करायला तुम्ही अक्षम ठराल.'' आज २५०० वर्षे झाली तरीही– अडीच हजार वर्षांच्या ज्ञानप्रकाशानंतरही बुद्धदेवांचे हे शब्द, हे थोर विचार किती उन्नत व उदात्त वाटतात! आपले पूर्वग्रह दुखावले गेले किंवा प्रशंसिले गेले एवढ्यावरून धर्मतत्त्वांची, मतांची सत्यासत्यता ठरवायची नसते. अशा स्तुतिनिंदांवरून तत्त्वे सत्य की चुकीची हे ठरवायचे नसते. कितीही विचित्र व चमत्कारिक अशी असत्ये कोणी मांडली, स्वतःच्या मताविरुद्ध दुसऱ्याचे मत कितीही पराकोटीस गेलेले असले, तरी त्या सर्वांचा विचार करायला बुद्ध सिद्ध असत. त्या सर्वांचा परामर्श घ्यायला ते भीत नसत. त्यांच्या काळात सर्वत्र गोंधळ माजलेला होता. मतमतांतरांचा गलबला होता. अशा काळात सर्व मतांची छाननी करण्यास सिद्ध असणे हाच एक उपाय होता. भ्रमनिरसनार्थ व सत्याची प्राप्ती व्हावी म्हणून हाच एक मार्ग होता. लोकांनी आपले जीवन बुद्धीच्या पायावर उभारावे म्हणून त्यांना साहाय्य देण्याचा हाच एक दृढ पंथ होता. इतर पंथांवर कोणी अयोग्य टीका केली, तर बुद्धांना खपत नसे. ते एकदा म्हणाले, ''हे आकाशावर थुंकण्यासारखे आहे. तुमच्या थुंकीने आकाश तर नाहीच मळणार; ती थुंकी मात्र थुंकणाऱ्याकडे परत येऊन त्याला घाणेरडे करील.''

बुद्ध संतापाने पेटले आहेत, त्यांच्या तोंडातून कठोर व निष्ठुर शब्द बाहेर पडले आहेत, असे कधीच झाले नाही. मानवजातीविषयी त्यांना अपार सहानुभूती वाटे. बुद्धांना हे जग दुष्ट नसे वाटत. जग वाईट आहे असे म्हणण्याऐवजी जगाचे अज्ञान आहे असे ते म्हणत. जग उच्छृंखल आहे असे म्हणण्याऐवजी ते तितकेसे समाधानकारक नाही, असे ते म्हणत. बुद्ध विरोधाला शांतपणे व आत्मविश्वासाने तोंड देत. त्यांच्यापाशी चिडखोरपणा नाही, भयंकर संताप नाही. बुद्धांची वागणूक म्हणजे मूर्तिमंत सुसंस्कृतता; त्यांचे वर्तन म्हणजे सद्भावनांचे आविष्करण. त्यांच्या वर्तनात थोडासा उपरोधिकपणा असे; परंतु त्यामुळे त्यांचे गोड वर्तन अधिकच रुचकर व स्वादिष्ट वाटे. एकदा त्यांचे परिभ्रमण चालले असता एका गृहस्थाने फारच कटू शब्द त्यांना उद्देशून उच्चारले. बुद्ध शांतपणे म्हणाले, ‘‘एखाद्याने याचकापुढे अन्न ठेवले; परंतु याचकाने जर ते नाकारले, तर ते अन्न कोणाचे?’’

‘‘त्या देणाऱ्या गृहस्थाचे.’’ तो मनुष्य म्हणाला.

‘‘त्याप्रमाणेच जर तुमचे शिव्याशाप मी स्वीकारायचे नाकारले, तर ते तुमच्याकडे परत येतील. तुम्हालाच त्यांचा स्वीकार करावा लागेल, नाही? परंतु मला मात्र दरिद्री होऊन जावे लागत आहे. कारण मी एक मित्र गमावून बसलो.’’ बुद्ध म्हणाले.

सक्तीने धर्मांतर करायला लावणे ही गोष्ट बुद्धांना ठावी नव्हती. त्यांच्या धर्मपद्धतीचा पाया अंधविश्वास नसून कृती हा होता. मानवी स्वभावाला विशिष्ट वळण लावावे, विशिष्ट सवयी लावाव्या अशी त्यांची इच्छा होती. आपण आपल्या ह्या मूर्ख वासनांमुळे दुःखी होतो. सुखी होण्यासाठी एकच मार्ग आहे, एकाच गोष्टीची आवश्यकता आहे. स्वतःसाठी एक नवीनच हृदय निर्माण करणे, नवीन डोळ्यांनी पाहायला शिकणे, ही ती गोष्ट. आपण मनातले असद्विचार जर दडपू व सद्विचारांची जर वाढ करू, तर आपले हे दुःखी मन, हे असज्जन मन, सुखी व सज्जन होईल. बुद्ध धर्मांतराचा विचार करीत नाहीत. तुम्ही कोणत्याही धर्माचे असा. बुद्ध यज्ञपूजक ब्राह्मणाच्याही पवित्र होमाग्नीसमीप बसतील नि स्वतःचे विचार सांगतील. स्वतःचे प्रवचन करीत असताना ते चुकूनही ब्राह्मणाच्या त्या पूजाधर्माची टवाळी करणार नाहीत. सिंह नावाचा एक जैन होता. पुढे तो बौद्धधर्मी

झाला; परंतु पूर्वीप्रमाणेच स्वतःच्या घरी येणाऱ्या जैन श्रावकांस तो अन्न देई, देणग्या देई. पूर्वीचा तो प्रघात चालू ठेवण्यासाठी त्याला मुद्दाम सांगण्यात आले होते. बुद्ध आपले विचार अत्यंत सौम्यपणे सांगत असत. दुसऱ्यांची मने वळवण्यास सत्य स्वतःच समर्थ असते. गौतम बुद्ध सत्यावर सारे सोपवीत, सत्याच्या सामर्थ्यावर विसंबत.

बुद्ध हे नैतिक विजयाचे महान वीर होते; परंतु अशा या मूर्तिमंत नीतीधर्माला, या थोर महात्म्याला संघाच्या नीतिनियमांविषयीच्या बारीकसारीक गोष्टींतही लक्ष घालावे लागे. एखादी संस्था स्थापणे म्हणजे जगाशी तडजोड करणे, सामाजिक गरजा मान्य करणे. समाजाच्या सर्वसाधारण चाकोरीच्या जीवनात ज्यांना ज्यांना समरसता वाटत नाही, अशांसाठी आश्रयस्थान निर्मिणे म्हणजे एखादी संस्था, संघटना स्थापिणे. बुद्धांनी असा संघ स्थापिला; परंतु त्यात अव्यवस्था माजली. काही भानगडी सुरू झाल्या. बुद्धांचा देवदत्त नावाचा एक पुतण्या होता. बुद्धांना बाजूस सारून स्वतःच संघाचा मुख्य व्हावे अशी त्याची मनीषा होती. बुद्धांच्या विरुद्ध त्याने कारस्थान केले; परंतु शेवटी त्याला क्षमा करण्यात आली. एकदा एक भिक्षू अतिसाराने आजारी पडला होता. तो मलमूत्रात लोळत होता. बुद्धांनी ते पाहिले. त्यांनी त्याचे अंग धुतले. त्यांचे अंथरूण बदलले; आवडता शिष्य आनंद बुद्धास त्या कामात साहाय्य देत होता. बुद्ध शिष्यांना म्हणाले, ''हे भिक्षूंनो, जो कोणी माझी शुश्रूषा करू इच्छील, तो आजाऱ्याचीही शुश्रूषा करील.'' बुद्धधर्मीय संघटनेत जातिभेदांस वाव नव्हता. बुद्ध उपदेशितात, ''हे भिक्षूंनो, ज्याप्रमाणे गंगा, यमुना, अचिरावती, शरयू, इत्यादी मोठमोठ्या नद्या समुद्राला मिळाल्यावर स्वतःची पूर्वीची नावे व कुळे विसरतात आणि त्या सर्वांना सागर हे एकच नाव प्राप्त होते. त्याप्रमाणे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र हे चार वर्ण ज्या वेळेस तथागताने शिकविलेल्या धर्माप्रमाणे, नियमांप्रमाणे वागून संकुचित संसारांतून विश्वसंसारात येतात, स्वतःची घरेदारे सोडून 'हे विश्वचि माझे घर' अशा स्थितीप्रत पोचतात, त्या वेळेस ते नाम-गोत्र विसरतात. भिक्षू या एकाच नावाने ते सारे संबोधिले जातात.''

बुद्धांच्या काळात स्त्रियांना स्वातंत्र्य होते. स्त्रियाही पवित्र जीवन कंठू शकतात, वैराग्यमय असे धर्ममय जीवन कंठू शकतात, अशी बुद्धांनी घोषणा केली. आयुष्याच्या

अखेरच्या वर्षी अंबपाली येथे एका वेश्येच्या घरी बुद्धांनी भोजन केले; परंतु संघात स्त्रियांना प्रवेश देण्यापूर्वी ते पुष्कळ वेळ घुटमळत होते. एके दिवशी आनंदाने त्यांना प्रश्न केला, ''भगवन, स्त्रियांच्या बाबतीत आम्ही कसे वागावे?''

''आनंद, त्यांचे दर्शन घेऊ नकोस; त्यांच्याकडे पाहू नकोस.'' ते म्हणाले.

''परंतु आमची व त्यांची गाठ पडली, तर आम्ही काय करावे?''

''त्यांच्याशी बोलू नकोस.''

''परंतु त्या आमच्याशी बोलू लागल्या तर?''

''अत्यंत सावध व दक्ष राहा.''

आनंदाला स्त्रीजातीविषयी सहानुभूती वाटे. स्त्रियांनाही संघात घ्यावे म्हणून त्याचा आग्रह होता. स्त्रियांची बाजू त्याने मांडली. शेवटी बुद्धांनी संमती दिली. संमती देणे हाच योग्य मार्ग होता; परंतु हा मार्ग योग्य असला तरी उपयुक्त होताच, असे कदाचित म्हणता येणार नाही. एकदा बुद्ध म्हणाले, ''आनंदा, स्त्रियांना जर संघात प्रवेश दिला नसता, तर शुद्ध धर्म अधिक काळ टिकला असता. संघाचे कल्याणकर नियम सहस्र वर्षे टिकले असते. परंतु ज्या अर्थी त्यांना आता प्रवेश दिलाच आहे, त्या अर्थी हे नियम आता पाचशेच वर्षे राहतील.'' संघात शिरताना स्त्रियांना आप्तेष्टांची संमती घ्यावी लागे; परंतु पुरुष निदान दिसायला तरी अधिक स्वतंत्र होता. स्वत:चा स्वामी होता. त्याला कोणाला विचारावे लागत नसे. संघाचे नियम अभंग नव्हते. बुद्ध म्हणतात, ''मी गेल्यावर संघाला वाटले तर संघाने कमी महत्त्वाचे असे बारीकसारीक नियम काढून टाकावे.''

महापरिनिब्बाणसूत्तात बुद्धांच्या मरणाची कथा अत्यंत साधेपणाने; परंतु करुण रीतीने देण्यात आलेली आहे. त्यांचे आता ८० वर्षांचे वय होते. प्रवासाने व यातायातीने ते थकून गेले होते. त्यांच्या अंगात आता त्राण उरले नव्हते. ख्रिस्तपूर्व ४८३ मध्ये कुशिनगराजवळच्या एका गावी बुद्ध मरण पावले. काशीपासून हा गाव १२० मैल दूर होता. सॉक्रेटिस, ख्रिस्त हे हुतात्मे झाले; परंतु बुद्धांचे मरण अति शांत असे होते. या तिघा महात्म्यांनी आपापल्या काळातील अंधश्रद्धा, भोळसटपणा, दुष्ट रूढी यांचे निर्मूलन केले. सॉक्रेटिस अथेन्समधील तत्कालीन धर्माचा जितका विरोधी होता, किंवा ख्रिस्त ज्यू धर्माचा जितका विरोधी होता, त्यापेक्षाही गौतम बुद्ध यज्ञ-यागात्मक अशा वैदिक धर्माचे विरोधी होते. असे असूनही ते ८० वर्षांपर्यंत जगले. किती तरी

अनुयायी त्यांनी गोळा केले व स्वतःच्या आयुष्यातच एक धार्मिक संघ त्यांनी स्थापिला. बुद्धांना हुतात्मा व्हावे लागले नाही. कारण भारतीयांचा स्वभावच धार्मिक. रूढ धर्माविरुद्ध बंड करणाऱ्यांसही हिंदुस्थानात सहानुभूतीने वागविण्यात येई. पूर्वेकडचा व पश्चिमेकडचा हा फरक आहे.

+++

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

२

बुद्धांच्या पहिल्या प्रवचनातील सारांश आपणास लाभलेला आहे. त्यातील शब्द व विचार बुद्धांचेच आहेत यात शंका नाही. त्या प्रवचनातील शिकवण अत्यंत साधी आहे. ज्यांना धर्ममय जीवन जगावयाचे आहे, त्यांनी प्रमाणबद्ध जीवन आखले पाहिजे. कशाचाही अतिरेक असता कामा नये. अति देहदंड नको किंवा देहाचे फाजील लाडही नकोत; मधला मार्ग घ्यावा, असे प्रवचनाच्या आरंभी सांगून दु:खासंबंधीची चार सत्ये त्यांनी सांगितली आहेत आणि नंतर दु:खनिरसनाचा उपाय त्यांनी सांगितला आहे:

१. जनन म्हणजे दु:ख; मरण म्हणजे दु:ख; रोग म्हणजे दु:ख; विनाश म्हणजे दु:ख; अप्रियाची प्राप्ती म्हणजे दु:ख; प्रिय वस्तूचा वियोग म्हणजे दु:ख. जननमरण, रागद्वेष या विश्वव्यापक गोष्टी आहेत. त्या सर्वत्र आहेत, सदैव आहेत. जीवनात मेळ नसून विसंवादीपणा आहे, त्याच्या त्या खुणा आहेत. मनुष्याच्या दु:खाच्या मुळाशी विरोध आहे, झगडा आहे. आपल्या आध्यात्मिक रोगाच्या मुळाशी स्पर्धा असते. ह्या सर्व क्षणिक व अशाश्वत जगात, या दृश्य पसाऱ्यात हा झगडा सर्वत्र भरून राहिला आहे. विरोध हे या जगाचे स्वरूप आहे. अशा ह्या विरोधांतून सुटका करून घेणे शक्य आहे व सुटका करून घेतलीच पाहिजे.

२. प्रत्येक वस्तूला कारण असते, प्रत्येक वस्तूचा परिणामही घडतो, हे साधे तत्त्व ह्या सर्व विश्वात भरून राहिले आहे. देव व मानव, स्वर्ग व पृथ्वी या सर्वांचा

व्यवहार या एका तत्त्वानुसार चालला आहे. अमर्याद अवकाशात पसरलेले जे हे अनंत विश्व, ह्या विश्वातील ह्या अनंत ग्रहमाला, ही अनंत ब्रह्मांडे आणि ह्यात पदोपदी होणारे हे अगणित फेरबदल, यांनाच केवळ कार्यकारणभावाचा कायदा लागू आहे असे नाही, तर मानवी जीवनात, ऐतिहासिक घटनांतही हाच कायदा कार्य करीत आहे असे दिसून येईल. दु:खाचे मूळ शोधून तेच जर उपटून टाकले गेले, तर दु:ख आपोआपच नाहीसे होईल. दु:खाचे मूळ कारण तृष्णा आहे. तृष्णा म्हणजे जगण्याची धडपड, जीवनाची हाव. कार्यकारणभावांच्या साखळीचे बारा दुवे यानंतर सांगण्यात आले आहेत व तेथे या गोष्टीचा अधिक विस्तार करण्यात आला आहे. अज्ञान व तृष्णा एकत्र बांधलेली आहेत, एकाच घटनेतील तात्त्विक व व्यावहारिक अशी ही दोन रूपे आहेत. अज्ञानामुळे जीवनात बिघाड उत्पन्न होतो. जीवनातील सर्वांगीण व्यवस्थेत भंग होतो. हे ज्ञान अतिरेकी व्यक्तिवादाच्या रूपाने प्रकट होते; स्वत:ला जगापासून अलग करण्याच्या रूपाने प्रकट होते; जगातील सुसंवादित्वाविरुद्ध बंड करण्याच्या रूपाने ते प्रकट होते आणि त्यामुळे मग नानाविध वासना जन्मतात. अनेक प्रकारची हांव सुटते. आत्मा बद्ध होतो, जखडला जातो. आत्मा वासनांचा दास होतो. तो त्रस्त होतो, रडकुंडीस येतो. या बंधनांतून मुक्त होण्यासाठी आत्मा धडपडतो. त्यातून मुक्त होता आले तर आत्मा आनंदेल. अज्ञानाचा नाश अंतर्ज्ञानाने, सहजस्फूर्त दैवी ज्ञानाने होतो. वासनांचा नाश नैतिक धडपडीने, उत्तरोत्तर वर जाण्याच्या अविरत प्रयत्नशीलतेने होतो.

पूर्वग्रह नसणे ही गोष्ट सापेक्ष आहे. आपण संपूर्णपणे पूर्वग्रहविरहित आहोत असे स्वत: बुद्धही म्हणू शकले नसते. कर्म व पुनर्जन्म ही तत्त्वे ते जणू स्वत:सिद्धच मानतात. गृहित सत्ये समजून स्वीकारतात. मनुष्य वागेल तसा बनेल. आपणच आपले भले वा बुरे नैतिक जग निर्मित असतो. प्रत्येक विचार, भावना, संवेदना, संकल्प यांचा परिणाम आपणावर, आपल्या वाढीवर, आपल्या विकासावर होत असतो. मानवजात सदैव स्वत:ला रंगरूप देत आहे, आकार देत आहे. त्या अदृश्य भूतकाळातून, भूतकालीन विचारांतून व घडामोडींतून आज जे आहे ते निर्माण झाले आहे. शाश्वत न्यायीपणाच्या सार्वभौम सत्तेखाली हे सर्व जीवन चालले आहे, असे बुद्धास दिसते. आपल्या कर्माचे परिणाम आपणास कधीही चुकविता येणार नाहीत. दु:ख, रोग, हानी, निराशा, अपयश, प्रेमाच्या वेदना व जखमा, हेतूंची, मनोरथांची

विफलता, या सर्वांत नैतिक तत्त्व ओतप्रोत भरलेले आहे. नैतिकदृष्ट्या या सर्वांना महत्त्व आहे. नैतिक कार्यकारणभावामुळे या सर्व गोष्टींना निश्चितता प्राप्त होत असते. स्वार्थाचे शासन होते; नि:स्वार्थीपणाला पारितोषिक मिळते. मनुष्याला आज ना उद्या स्वत:च्या कृत्यांचे परिणाम भोगावेच लागतील, असे बुद्ध नि:शंकपणे म्हणत. त्यांची ही निश्चितता खोल व गंभीर होती. एझिकेलच्या अर्थपूर्ण शब्दात म्हणायचे झाले तर ''आपणास आपल्या दुष्टपणाची लाज वाटेल. आपल्या दुष्टपणामुळे आपणास स्वत:चा वीट येईल.'' बुद्ध म्हणतात, ''माझे कर्म हीच माझी मिळकत, हीच माझी संपत्ती, हाच वारसा. माझे कर्म म्हणजेच मला धारण करणारा गर्भाशय. माझे कर्म म्हणजेच माझी जात, माझा वंश. माझे कर्म म्हणजेच माझा आधार.''

कर्माचा जो हा कठोर कायदा, त्याचेही एक तारक असे सुंदर रूप आहे. कर्माच्या या कायद्यामुळे अंगावर काटा उभा करणाऱ्या भेसूर नरकाग्नीच्या छाया नष्ट होतात. शासन भोगण्याचे, कष्ट भोगण्याचे कोणतेही स्थान कायमचे नाही. स्वर्ग किंवा नरक यांचाही सान्त व नाशिवंत वस्तूंतच अंतर्भाव स्वर्गसुखे व नरकयातना कितीही दीर्घकाल टिकणाऱ्या व उत्कट असोत, एक दिवस त्यांचा अंत होईल. त्यांचा अंत केव्हा, कधी, कसा व्हायचा ते आपणावर अवलंबून आहे. प्रत्येक नीच प्रवृत्तीला तिच्यावर संस्कार करून उच्च बनविणे, प्रत्येक क्षुद्र हेतूस ताब्यात ठेवणे, हीनदीन करणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या दुबळेपणास जिंकून घेणे, अशा रीतीने प्रयत्न करीत गेले पाहिजे. कर्माच्या कायद्याचा असा मात्र अर्थ नाही करता कामा, की जगातील दु:ख वा दारिद्र्य हा ज्याच्या-त्याच्या कर्माचा परिणाम असल्यामुळे आपणास त्याच्याशी काही कर्तव्य नाही. जर कोणास असे वाटेल, सर्व सजीव सृष्टीचे जे व्यापक बंधुत्व, त्याचे विशाल प्रतिबिंब जर कोणाच्या हृदयात पडणार नसेल, तर त्याच्या बाबतीत कायदा कठोरता दाखवील. दया व क्षमा यांचा कर्ता होण्याचे जो नाकारतो, त्याच्या बाबतीत हा कर्माचा कायदा निष्ठुर होईल. हा जो कर्माचा कायदा तो कोणा अधिष्ठात्या देवतेकडून चालविला जात असतो. लहरी देवदेवतांचे गोंधळात पाडणारे बंड येथे नाही. 'ईश्वरी अन्याय' असले गूढ शब्दप्रयोग् येथे नाहीत.

मनुष्यप्राणी म्हणजे रूप, वेदना, संज्ञा यांचा संघात आहे. रूप म्हणजे हा देह, ही इंद्रिये, शरीराची हालचाल करण्याची शक्ती. वेदना म्हणजे भावना; संज्ञा म्हणजे विचार. तसेच ज्या पंच विषयांच्या द्वारा आपण बाह्य जगाशी परिचित होतो, त्यांचाही

अंतर्भाव यात आहे आणि आजच्या आपल्या वृत्ती, आवडीनावडी, नानाविध शक्ती ज्या भूतकालीन कर्मांतून निर्माण झालेल्या संस्कारांमुळे आपणास प्राप्त झालेल्या असतात, त्या संस्कारांचाही वरील संघातात समावेश असतो. या संस्कारांमुळेच पूर्वजन्मांतील सद्सताचा वारसा या जन्मी आपणास प्राप्त होत असतो. आणि या सर्वांच्या डोक्यावर ते विज्ञान असते. हे विज्ञान आपल्या सर्व मानसिक क्रियाकर्मांना व्यापून असते. इंद्रियगम्य कल्पनेपासून तो इंद्रियातीत ध्यानापर्यंत या विज्ञानाचा पसारा व प्रभाव असतो. मनुष्याचे आंतरिक जीवन म्हणजे वासना, विचार, रागद्वेष यांची एक अखंड परंपरा. या सर्वांना एकत्र राखणारा हा शरीराचा बंध जेव्हा मरणसमयी गळून पडतो, तेव्हा अदृश्य अशा शक्ती एक नवीन व्यक्ती सृजितात. ही व्यक्ती मनोमय जणू असते व मृतात्म्याचे जीवन पुढे चालविते. त्या पूर्व पुरुषाने जे काही बरेवाईट केले असेल, त्याची कटू वा मधुर फळे भोगावयास ही लिंगदेहात्मक व्यक्ती उभी राहते. या व्यक्तीला वासनात्मक पुरुष म्हणा वाटले तर. ह्या दृश्य व्यक्तीला बनविणाऱ्या सर्व अंतर्बाह्य अणुरेणूंत सारखा बदल होत असतो; परंतु बदल होत असला तरी त्यांचा नि:शेष नाश नाही होत. जोपर्यंत त्यांना सर्वत्र एकत्र ठेवणारी शक्ती नष्ट होत नाही, पुन्हा जन्मास यावे असे वाटणारी वृत्ती जोपर्यंत नष्ट होत नाही, जोपर्यंत जीवनाची असोशी आहे, पुन्हा स्वतंत्र अस्तित्व असावे अशी जोपर्यंत इच्छा आहे, तोपर्यंत व्यक्तीला बनविणाऱ्या घटकांत बदल होत असला तरी त्यांचा संपूर्ण नाश होत नाही.

जर शाश्वत, अविचल असा आत्मा नसेल, तर अनात्म्याने केलेल्या कर्मांचा कोणावर परिणाम होतो? बुद्धांचे उत्तर असे की, ''जो वासनांचा दास आहे, तो मनाच्या पलीकडे कसा जाईल?'' बौद्धधर्माच्या आरंभीच्या पुस्तकांतून या अडचणीचा नीट उलगडा केलेला दिसत नाही. एकच उत्तर देण्यात येते, की मानसिक अखंडता असते. ज्याला आत्म्याचा स्वभाव समजला आहे, अनेक जन्मांतून हा जीवात्मा चालला आहे हे जो समजून आहे, त्याला कोणताही एक जन्म, जरी त्या जन्माचे परिणाम पुढील भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असले, तरी फारसा महत्त्वाचा वाटणार नाही.

३. अज्ञानाचा निरास होण्यासाठी कठोर नीती आवश्यक आहे. शील व प्रज्ञा यांचा अविभाज्य संयोग आहे. सदाचार व सहजस्फूर्त अंतर्दृष्टी यांचे कधी न तुटणारे

ऐक्य आहे. परंपरा, स्मृती, विधिनिषेध, रूढी, नीतिनियम, इत्यादींविषयी बुद्ध कधी बोलत नाहीत. सुखी होण्याचा मार्ग म्हणजे हृदय मांगल्याने भरून ठेवणे. ज्याच्याजवळ मंगल हृदय आहे आणि सत्कर्मांच्या रूपाने प्रकट होणारे मन आहे, त्याच्याजवळ सुखाचा मार्ग आहे. मनाचे मांगल्य, विचारांतील व आचारांतील निर्मळ, निर्भेळ असे शिवत्व, हा बुद्धांच्या धर्माचा पाया आहे. बुद्धकल्पित परिपूर्ण जीवनात, त्या अव्यंग जीवनात देवदेवतांची अडगळ नाही; बाहेरच्या शक्तींशी संबंध नाही. तुमचे बरे-वाईट तुमच्या स्वाधीन आहे असे ते सांगतात. ते शिष्यांना अनेकदा पुढील उपदेश देताना आढळतात, ''शिष्यांनो, इकडे या. दुःख दूर व्हायला हवे असेल, तर पवित्र जीवन जगा.''

पूर्णतेकडे जाण्याचा सोपान म्हणजेच बुद्धांनी सांगितलेला अष्टविध मार्ग. पहिली पायरी म्हणजे सम्यक् दृष्टी असणे, चार सत्यांचे ज्ञान असणे. हे ज्ञान म्हणजे उपनिषदांतील ज्ञान नव्हे. देव वगैरे मानणाऱ्यांच्या श्रद्धेशीही या ज्ञानाचा संबंध नाही; परंतु केवळ बुद्धीने सत्याचे आकलन केल्याने ज्ञान जिवंत होत नसते. जी सत्ये आपणास कळली ती स्वतःच्या सर्व जीवनात आपण प्रकट केली पाहिजेत, सिद्ध केली पाहिजेत, अनुभविली पाहिजेत, शोधली पाहिजेत. असे केल्यानेच ज्ञान सजीव होते, प्राणमय होते. पहिले पाऊल म्हणजे सदैव जागृत असणे, भानावर असणे. ज्या मार्गाने गेल्यास आपण सत्यच्युत व ध्येयच्युत होऊ, तो मार्ग चुकूनही न घेण्याची सदैव दक्षता म्हणजे ही पहिली पायरी. केवळ तात्पुरता मनात बदल होणे असा येथे अर्थ नाही. तर आत्म्याच्या खोल आंतरिक जीवनावर परिणाम घडवणारे मूलग्राही परिवर्तन, एक नवीन योजना, असा याचा अर्थ.

ही पहिली पायरी दुसऱ्या पायरीकडे नेते. दुसरी पायरी म्हणजे सुखभोगांच्या त्यागाचा निश्चय; कोणासही अपाय न करण्याचा, कोणाचाही द्वेष-मत्सर न करण्याचा निश्चय. सम्यक भाषणासाठी, असत्य, निंदा, शिव्याशाप लागेल असे बोलणे, वायफळ गप्पा यांचा त्याग करायला हवा. सम्यक आचार म्हणजे कोणतीही हिंसा न करणे; जे आपणास लाभलेले नाही त्याविषयी उदासीन असणे; शारीरिक सुखभोगांस मर्यादा घालणे; शरीराचे फार चोचले न पुरविणे. सम्यक् जीवन म्हणजे जगण्याचे जे जे निषिद्ध प्रकार, त्यांनी उपजीविका न करणे; उदाहरणार्थ, उंटांवर किंवा बैलांवर माल लादून व्यापार करणारे लमाण न होणे; दासांचा व्यापार न करणे;

खाटीक न होणे; मादक पदार्थ, विषारी पदार्थ यांचा व्यापारी न होणे; जकातदार किंवा खानावळवाला न होणे. बुद्धांनी सैनिक होण्यास कधीही संमती दिली नाही. भिक्षूंनी कधीही सैनिक होऊ नये, असे त्यांनी आज्ञापिले.

बुद्धांचा जो हा अष्टविध मार्ग आहे, तो नीतिनियमांची एक जंत्री नाही. जीवनाचा हा विशिष्ट मार्ग आहे. सम्यक् प्रयत्न म्हणजे ज्या दुष्ट प्रवृत्ती मनात दृढमूल झालेल्या असतील, त्या नष्ट करणे व सत्प्रवृतींना पोसणे; उत्तरोत्तर अधिक पूर्णतेकडे जाणे. मनोविकासाचा हा आरंभ आहे. आत्मपृथक्करणाची सवय असणे चांगले. आपल्या वरवरच्या मानसिक जीवनाच्या खाली मनाचा जो अपरंपार भाग आहे, त्याची नीट कल्पना येण्यासाठी आत्मपरीक्षण फार उपयोगी पडते. दुष्ट वासना-विकार, नाना लोभ, स्वार्थ, तृष्णा, यांची खोल गेलेली पाळेमुळे खणून काढण्यास आत्मपरीक्षणाची आवश्यकता असते. गुंतागुंतीच्या या मानसिक व शारीरिक यंत्रांत मेळ राहावा, समतोलपणा राहावा म्हणून आत्मपृथक्करण हे एक मोठे प्रभावी साधन आहे. मनुष्य दुसऱ्याचीच वंचना करतो असे नाही, तर स्वत:चीही वंचना करतो. आपण निरनिराळी मते अंगीकारितो, निरनिराळे विचार स्वीकारतो; याच्या मुळाशी केवळ शुद्ध नि:स्वार्थ हेतूच असतो असे नाही. जीवनात अपयश आलेले असते; मनोरथ विफल झालेले असतात; एक प्रकारचा संताप व वैताग आलेला असतो; आणि ह्यामुळे आपण मते बदलतो. आपले विचार बदलतात. आपला अहंकार दुखावला गेला, तर आपण सूडबुद्धीने प्रेरित होतो; आपण जुलमी होतो. आपल्या प्रेमाला प्रतिप्रेम मिळालेले नसते म्हणून, किंवा खाली मान घालवयास लावणारे एखादे शारीरिक व्यंग असले तर आपण सूड घेण्यास उभे राहतो; जगावर संतापतो. मानवप्राण्यासंबंधी विशेष लक्षात येणारी गोष्ट म्हणजे तो वारंवार स्वत:चीही वंचना करीत असतो. आपणापैकी बहुतेक काळाच्या हातांतील बाहुली असतात. आपण परिस्थितीचे जणू दास असतो. आपले विचार, आपल्या भावना एका रूढ ठरीव सांचाप्रमाणे असतात. आत्मपरीक्षणानेच ही चाकोरी सोडून आपण बाहेर पडू शकतो. ज्या रूढ सवयींच्या आधारावर आजपर्यंत मन अवलंबून होते, ते आधार काढून घेऊन, ते नष्ट करून मनाला स्वावलंबन शिकवण्यात येते. आपण आत्मसंशोधन करू लागतो. आत्मरूप पाहण्याचे आपण प्रयत्न करू लागतो. आध्यात्मिक विकासाच्या मार्गात असत वासनांचा जितका अडथळा होतो, तितकाच आलस्य व कर्मशून्यता यांचाही होतो.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

सम्यक् अवधानता म्हणजे वृत्ती स्थिर होतील अशा रीतीने शरीराकडे व मनाकडे पाहणे. एक प्रकारची अविचल अशी वृत्ती राहील असे करणे. सदैव दक्षता ठेवणे, जागृत असणे, खिन्न न होणे, आदळआपट न करणे. सारखे या गोष्टीमागे, त्या गोष्टीमागे, असे धावपळ करीत न हिंडणे. एक प्रकारचा स्वत:वर ताबा; स्वत:चे स्वरूप समजून घेऊन स्वत:ला ताब्यात घेणे आणि असे केले म्हणजे मग कोणतीही क्रिया केवळ यांत्रिक होत नाही. अनवधानतेने कोणतेही कर्म होत नाही. सारे व्यवहार डोळस होतात, बुद्धिपूर्वक होतात. जणू शाश्वततेच्या प्रकाशात वस्तूंचे स्वरूप पाहून आपण वागतो आणि सम्यक चिंतन. हे चतुर्विध आहे. अशी एक विचित्र समजूत झालेली आहे, की बुद्धांनी सम्यक जीवन जगण्यासाठी जो उपाय सुचविला तो म्हणजे कर्मशून्यता, वासनांचा त्याग, कमीत कमी इच्छिणे व कमीत कमी कर्म करणे; परंतु असे वास्तविक नाही. बुद्धांचा उपाय म्हणजे कर्मशून्यता नसून उलट प्रयत्नांची पराकाष्ठा आहे. ते तारक असे परम सत्य मिळविण्याचा दृढ निश्चय, तत्प्राप्त्यर्थ अखंड प्रयत्नांची आवश्यकता, सद्‌गुणांच्या अभ्यासात अनेक जन्म दवडणे, पदोपदी परमोच्च ध्येयापासून खाली घसरणाऱ्या मनास तसे होऊ न देणे, तीच तीव्र उत्कटता व प्रखरता टिकविणे, इत्यादी ज्या गोष्टी बुद्ध सांगतात त्यांचा अर्थ काय? या सर्वांचा अर्थ एवढाच, की मानवी इच्छाशक्ती दिव्य पराक्रम व परम पुरुषार्थ संपादण्यास समर्थ आहे. ध्यान म्हणजे सावधान असण्याची स्थिती; ध्यान म्हणजे इच्छाशक्तीचा प्रयत्न, ध्यान म्हणजे निष्क्रिय समाधी नव्हे, ध्यान म्हणजे पराकोटीस गेलेला प्रयत्न, पराकाष्ठेची धडपड, ध्यान म्हणजे सुमनांची अशी एकाग्रता, की जीत इच्छाशक्ती व विचार एकरूप होतात. बुद्धांच्या शिकवणीप्रमाणे जो-तो स्वत:चा तारक आहे, स्वत:चा उद्धारक आहे. ज्याने त्याने स्वत:चा मोक्ष मिळवून घ्यावा. शेवटच्या क्षणी मनुष्य एकटा असतो. फक्त त्याची इच्छाशक्ती त्याच्याजवळ असते. अशा वेळेस जगातली सारी इच्छाशक्ती त्याला पाहिजे असते. जो प्रचंड व उत्कट प्रयत्न त्याला त्या वेळेस करायचा असतो, त्या वेळेस अतूट इच्छाशक्तीची नितांत आवश्यकता असते. अशी एक सर्वसाधारण समजूत आहे, की तो जो दिव्य आध्यात्मिक अनुभव, तो मिळवायचा नसतो; तर गुरुकृपेने तो प्राप्त होत असतो; परंतु ही समजूत चुकीची आहे. या समजुतीचा अर्थ इतकाच, की कोणतेही महान अनुभव हे एक प्रकारे दिलेलेच असतात. योगी हा कर्मशून्य नसतो; परंतु स्वीकारणारा असतो. त्याचे जीवन

म्हणजे पराकाष्ठेचा संयम. त्याचे जीवन बांधीव असते. ते व्रती जीवन असते. या अष्टविध मार्गांतील शेवटची पायरी म्हणजे सम्यक चिंतनाची. सम्यक चिंतन हेच अंतिम साध्य, प्राप्तव्य. अष्टविध मार्गांचा मुकुटमणी म्हणजे हे चिंतन. ज्या वेळेस मन व इंद्रिये वारेमाप भटकत नसतात, चंचल विचार स्थिर झालेले असतात, त्या वेळेस आत्म्याची परमोच्च व परम विशुद्ध अशी स्थिती प्राप्त होते. त्या वेळेस आत्मा स्वत:चा निरुपाधिक असा अमर्याद आनंद उपभोगितो. परमोच्च जीवन ते हे. या वेळेस अज्ञान अस्तास जाते; तृष्णा शांत होते. त्यांची जागा अंतर्ज्ञान व पावित्र्य ही घेतात. मनाने मनासाठी निर्मिलेली ती परमशांती असते. मनाने मनासाठी निर्मिलेला तो परमानंद असतो. ती एक प्रकारची शांत अशी निर्विकार समाधी असते. आत्म्याचे निरामय व सत्य स्वरूप ते हे. उच्चतर जीवनाची अशा वेळेस पूर्वरुची कळते. थोडीशी गोड कल्पना येते. त्या परमोच्च जीवनाशी तुलना केली असता आपले हे दैनंदिन जीवन केवळ फिकट, रोगट व रडके वाटते. त्या परमोच्च जीवनात एक प्रकारचा मोकळेपणा अनुभवास येतो. स्वातंत्र्य व ज्ञान यांचा अमर्याद असा प्रत्यक्ष अनुभव तेथे येतो.

बुद्धांनी भिक्षुंसाठी व सामान्यजनांसाठी एक चालचलाऊ जीवनप्रणाली दिली आहे. कूतदंत नावाच्या ब्राह्मणाजवळ बोलताना बुद्धांनी सर्वांना बंधनकारक असे पाच नैतिक नियम सांगितले : हिंसा न करणे; जे आपणास लाभलेले नाही, त्याविषयी उदासीन असणे; वासना-विकारांचे लाड न पुरविणे; असत्यापासून दूर राहणे आणि पाचवी गोष्ट म्हणजे मादक पदार्थ न सेवणे. बुद्धांनी कर्मापासून दूर राहा असे कधीही सांगितले नाही. एकदा एका सामान्य जैन मनुष्याने बुद्धांना विचारले, ''आपण अकर्मता शिकविता का?'' बुद्धांनी उत्तर दिले, ''यति गौतम कर्मशून्यता मानतो असे प्रांजळपणे कोण बरे म्हणू शकेल? वाईट करू नका एवढेच मी सांगतो. कायावाचामनेकरून काहीही वाईट करू नका. नाना प्रकारची दुष्ट व पापमय कर्मे असतात त्यांपासून परावृत्त व्हा, ती करू नका, असे मी उद्घोषीत असतो... शरीराने, मनाने, वाणीने सत्कर्म करा असे मी सांगत असतो. नानाविध जी भली भली सत्कर्मे आहेत ती सदैव करा, हेच तर मी अट्टाहासाने सांगत आहे.'' बुद्धांच्या नैतिक योजनेत सत्कर्मापेक्षांही प्रेमाला अधिक महत्त्व आहे. जे प्रेम हृदयाला मुक्त करते त्या प्रेमाचा सोळावा हिस्साही किंमत साऱ्या सत्कर्म मिळून होणार नाही. कारण हृदयाला मोक्षसुख

देणाऱ्या प्रेमात सारी सत्कर्मे असतातच. प्रेम प्रकाशते, प्रकाश पसरविते, तेज देते.'' ते पुन्हा अन्यत्र म्हणतात, ''ज्याप्रमाणे माता स्वत:चा जीव धोक्यात घालूनही आपल्या एकुलत्या एक मुलाला जपते, त्याप्रमाणे प्रत्येकाने सर्व मानवांविषयी निस्सीम प्रेम मनात बाळगावे.'' सर्व प्राण्यांविषयी, सर्व सजीव सृष्टीविषयी एक प्रकारचा आदर, एक प्रकारचा पूज्यभाव बुद्धांच्या नीतीत आहे. जो खरा बौद्धधर्मी आहे, तो केवळ गंमत म्हणून प्राण्यांना मारणार नाही, खाण्यासाठी हिंसा करणार नाही. तिर्यक् योनींतील जीवही त्याची जणू भावंडे, पशुपक्षीही सखे-सोयरे. आपण मानवप्राणी या इतर सर्व प्राण्यांवर सत्ता चालविण्यासाठी जन्मलो आहोत, असे त्याला वाटत नाही. मन शांत व गंभीर ठेवावे, प्राणिमात्राविषयी प्रेम व सहानुभूती बाळगावी, असे बुद्धांनी अनुशासिले आहे. बुद्ध कधीही पापाविषयी बोलत नाहीत. पाप म्हणजे अज्ञान, मूर्खता, असे ते म्हणतात आणि अज्ञान व मूर्खता ज्ञानाचा प्रकाश आणून, सहानुभूती दाखवून दूर करता येतात.

४. जेव्हा व्यक्ती अज्ञान जिंकते, पुन्हा पुन्हा पश्चात्ताप करायला लावणाऱ्या कर्मांची शक्ती नष्ट करते, जेव्हा व्यक्ती निरिच्छ होते, निष्काम होते, ज्या वेळेस कशाचेही सुखदु:ख वाटत नाही, जेव्हा पूर्ण प्रकाश प्राप्त झालेला असतो, अशा वेळेस ती व्यक्ती जणू निराळ्या अशा जगात जाते. ते नूतन जग साकार व निराकार अशा दोहोपासून मुक्त असते. तेथे दु:खही नाही, आनंदही नाही. ती स्थिती मानवाला कल्पिता येणे शक्य नाही. ती स्थिती म्हणजे मुक्ती. ती स्थिती म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका. ती स्थिती म्हणजे निर्वाण. निर्वाणाचे स्पष्टीकरण करण्याचे बुद्ध नाकारीत. निर्वाण म्हणजे काय असा प्रश्न विचारण्यात फारसा अर्थ नाही. त्या निर्वाणदशेची वर्णने एक प्रकारे अर्थशून्यही असतील. ते निर्वाण वर्णायला वाणी असमर्थ आहे; परंतु असे ते निर्वाण कसे प्राप्त करून घ्यावे, ही गोष्ट बुद्ध सांगतात; जे माझ्या मार्गाने येतील, त्यांना 'याचि जन्मी, याचि डोळां' ती कृतार्थ दशा प्राप्त होईल, ते धन्य दर्शन घडेल, असे बुद्ध सांगत आहेत. बुद्धांनी नानाविध विधींचे अवडंबर माजविले नाही. तपश्चर्या, देहदंडना, देव एक की अनेक, इत्यादी गोष्टींविषयी त्यांनी कधी काही सांगितले नाही. माझी पूजाअर्चा करा असेही कधी त्यांनी म्हटले नाही. बुद्ध हे सत्याचे शोधक, सत्याचे उपासक व उपदेशक आहेत. त्यांनी आपली शिकवण नैतिक नियमांवर उभारली आहे. त्यांच्या शिकवणीतील मध्यबिंदू, मुख्य

प्राणमय वस्तू म्हणजे नैतिक जीवन. समकालीन तत्त्वज्ञानी वावदूकांजवळ आध्यात्मिक वादविवाद करताना ते दिसत नाहीत. जग अनंत आहे की सान्त आहे, अमर्याद आहे की समर्याद आहे, सादि आहे की अनादि आहे, हे जग दिक्कालाद्यनवच्छिन्न आहे की नाही, ज्याला सत्य ज्ञान मिळाले त्याचे विशिष्ट असे पृथक् अस्तित्व, व्यक्तीत्व उरते की नाही, मरणोत्तर त्याला जीवन आहे की नाही, इत्यादी प्रश्नांची चर्चा ते करू इच्छीत नसत.

बुद्धांजवळ नाना मीमांसा नाहीत, निरनिराळ्या उपपत्ती नाहीत. अनंत काळापासून माझ्याजवळ असलेले ते स्वयंभू, स्वयंप्रकाशी ज्ञान ते घेऊन या भूतलावर मी आलो आहे, असा दावा ते कधीही करीत नाहीत. जातकात ज्या गोष्टी आहेत, त्यावरून बुद्धांनी अनेक जन्म घेऊन अति कष्टाने व प्रयत्नाने ज्ञान मिळविले होते असे दिसते. आध्यात्मिक उन्नती कशी करून घ्यावी याची एक योजना ते आपल्या अनुयायांना देतात. एखादी मतप्रणाली न देता ते मार्ग दाखवतात. त्यांचा एखादा संप्रदाय नाही, एखादा नवीन धर्मपंथ नाही. एखादे तत्त्वज्ञान स्वीकारणे, एखादा संप्रदाय अंगीकारणे म्हणजे सत्यशोधनास रजा देणे असे त्यांना वाटे. सर्व संशोधन झालेच आहे, मी या पंथाचा आहे, असे म्हटले की मग सारे आटोपले! कधी कधी सत्य गोष्टींकडेही आपण डोळेझाक करतो; त्यांचा स्वीकार करायला तयार नसतो. त्यांच्याविरुद्ध आपल्याजवळ पुरावा असतो म्हणून नव्हे, तर ती विशिष्ट उपपत्ती आपल्याविरुद्ध असते म्हणून. बुद्धांनी स्वतः ज्ञान मिळविले. त्यांना स्वतः आलेला जो शब्दातीत अनुभव, त्यापासून त्यांच्या शिकवणीचा आरंभ आहे. बुद्धांचे कोणतेही तत्त्वज्ञान असो, त्यांची कोणतीही मतप्रणाली असो, त्या सर्वांचा संबंध तो अनुभव मिळविण्यासाठी आहे. त्यांचे जे काही तत्त्वज्ञान आहे, ते त्या अनुभवाप्रत पोचण्याच्या मार्गासंबंधी आहे. निरनिराळ्या उपपत्ती, नाना मीमांसा, यांविषयी बोलताना बुद्धांनी एकदा एक मार्मिक उपमा दिली होती : "अंड्यात असणाऱ्या पिलाने बाहेरच्या जगाविषयी केलेल्या कल्पना जितक्या मौल्यवान असू शकतील, तितक्याच मौल्यवान या नानाविध उपपत्ती व मीमांसा असतात." सत्य समजून घेण्यासाठी सत्याकडे जाणाऱ्या मार्गाने आपण चालत गेले पाहिजे.

बुद्धांची जी ही दृष्टी, तीच जगातील काही अति थोर अशा विचारवंतांचीही होती. तरुणांना बिघडवितो असा सॉक्रेटिसावर आरोप होता. त्या आरोपाला उत्तर

देताना सॉक्रेटिस म्हणाला, ''माझे विशिष्ट असे तत्त्वज्ञान नाही. अमुक एका ठरीव साचाचे सत्य माझ्याजवळ नाही. माझ्या एखाद्या विशिष्ट तत्त्वज्ञानामुळे मेलेटेसच्या शिष्यांचे किंवा त्याच्या इतर आप्तेष्टांचे नुकसान झाले आहे, असा पुरावा त्याने मांडला नाही.'' ख्रिस्तासही ठरीव साचाची ठोकळेवजा मते मुळीच आवडत नसत. त्याने एखादा नवीन धर्म शिकविला, एखादा नवीन पंथ स्थापिला असे नाही. जीवनाचा एक नवीन मार्ग दाखविणे एवढाच त्याचा हेतू. ख्रिस्ताचा क्रॉस एखाद्या संप्रदायाची आग्रही पंथाची निशाणी नसून एका नवपंथाची निशाणी होती. क्रॉस धारण करणे म्हणजे शिष्यत्वाची दशा. जगातील असाधुतेला साधुत्वाने जिंकून घेण्याची ती एक नवीन साधना होती. क्रॉस स्वीकारणे म्हणजे ही नवीन दृष्टी घेणे, हा नवीन पंथ अनुसरणे. क्रॉस हाती घेणे म्हणजे स्वत:ला चिकटून असणारी अहंता दूर करणे; मोठेपणाच्या व वैभवाच्या ज्या ऐहिक कोत्या कल्पना त्या दूर फेकणे. सेंट पॉल आपणास आत्म्याला आवडणारी फळे देतो. प्रेम, आनंद, शांती, अनंत कष्ट, सौम्यता, स्निग्धता, चांगुलपणा, श्रद्धा, नम्रता, संयम, इत्यादी गोष्टी तो देतो. हा आत्महंसाचा मौक्तिक चारा आहे. या आत्म्याच्या गोष्टींची तद्‌विरुद्ध अशा शारीरिक गोष्टींशी तो तुलना करतो. द्वेष, मत्सर, असूया, आसक्ती, आकारपूजा, क्रोध, झगडे, स्पर्धा, वितुष्टे, मारामाऱ्या, ही अनात्म्याला, देहाला आवडणारी फळे. सेंट थॉमस ऑक्विनास याने आयुष्याच्या अखेरच्या वर्षी अखंड समाधीसुख अनुभविले. त्याचा कार्यवाह रेजिनॉल्ड याने ''तुम्ही आणखी काही लिहा'' असे त्याला परोपरीने सांगितले; परंतु त्याने नाकारले. ''सौंदर्याचा साक्षात्कार'' या कवितेत कवी रॉबर्ट ब्रिजेस याने सेंट थॉमसच्या या समाधीचे पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे :

''नेपल्स येथे एकदम भावोन्मत्त होऊन तो पडला. जणू त्याची समाधी लागली. त्या प्रार्थनेच्या वेळेस मानवजातीच्या सर्व पापांपासून तो जणू मुक्त झाला असे मला वाटले. तो मुक्त झाला असे मनात येऊन मला किती आनंद होत आहे! कारण त्यानंतर ॲरिस्टॉटल किंवा ख्रिस्त यांच्याविषयी तो काही बोलत नसे, लिहीत नसे. त्या भावोन्मत्त स्थितीच्या वेळेस त्याला समोर का ख्रिस्त दिसत होता, ॲरिस्टॉटल दिसत होता? कोणीही दिसले असो; एक गोष्ट खरी, की पुनश्च एकही शब्द त्याने लिहिला नाही. त्याने दौत-टांक दूर सारली. त्या दिवशी तो श्रवणातीत झाला होता. 'अपुरे राहिलेले लिखाण त्याने पुरे करावे म्हणून रेनॉल्ड्सने आपली सारी मैत्री पणास

लावली असती, खूप आग्रह त्याने केला असता; परंतु आपले बोलणे त्या भावोन्मत्ताला कळत कुठे होते? तो ऐहिकाच्या अतीत गेला होता. निराळ्या जगात होता. एकदम एक श्वास घेऊन तो रेनॉल्ड्सला म्हणाला, 'हे बघ; तुला मी एक गुप्त गोष्ट सांगतो. मी जिवंत असेपर्यंत ती तू कोणासही सांगू नकोस. माझे लिहिणे आता संपले. अशा काही दिव्य गोष्टीचा मला साक्षात्कार झाला आहे, की आजपर्यंत जे काही मी लिहिले वा शिकविले ते मला सारे क्षुद्र वाटत आहे आणि माझ्या ईश्वरावर माझी श्रद्धा आहे. ज्याप्रमाणे माझी मते संपली, सांगणे-शिकविणे संपले, त्याचप्रमाणे हे जीवनही एकदाचे संपो.''

बुद्धांचे जीवन व त्यांची शिकवण यासंबंधीचा प्राचीनतम अशा परंपरेतून मिळणारा संशयातीत पुरावा आपण पाहिला. त्या वेळच्या धार्मिक जगात बुद्धांचा स्वभाव व त्यांची शिकवण नीट जुळती होती. त्यांची ती मूर्तिमंत साधेपणाची वृत्ती, त्यांचे सेवामय प्रेम, सर्वांच्या सेवेस धावण्याचा स्वभाव, हाच त्यांनी दाखविलेला सुखाचा मार्ग. दुःखांतून मुक्त होण्याचा त्यांनी जो हा साधा, प्रेममय नि सेवामय असा मार्ग दाखविला, त्यामुळेच त्यांना जगाचे उद्धारक असे म्हणण्यात येऊ लागले. त्यांचे समकालीन लोक ''जगाचे तारक'' अशा रीतीने त्यांना संबोधू लागले. अंतिम प्रश्नांचे निश्चित उत्तर देण्याचे ते नाकारीत. कारण या अंतिम प्रश्नांच्या उत्तरांची नीट व्याख्या करणे अशक्य होते; परंतु बुद्धांच्या या करण्यामुळे पुढे मतमतांतरे फार माजली. ज्यांची वृत्ती अति उत्कट नाही, अशांसाठी जरा कमी तात्त्विक व कमी कडक असे नवीन प्रकार पुढे बौद्धधर्मात रूढ झाले. कारण अशांचीही धार्मिक तहान भागविणे प्राप्त होते, योग्य होते.

+++

३

बुद्धांची शिकवण म्हणून त्यांचे अनुयायी काय समजत, बुद्धांनी खरोखर काय शिकविले, हे समजून घेण्यासाठी आपणास ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील हिंदुस्थानात कल्पनेने गेले पाहिजे. थोर थोर विचारस्रष्टेही इतर सामान्य जनांप्रमाणे स्थलकालनिबद्ध असतात. सभोवतीच्या आचारविचारांतूनच त्यांच्या कल्पनाही रंगरूप घेत असतात. त्यांच्या वर्तनाची तऱ्हा आसमंतांतल्या परिस्थितीतूनच जन्मलेली असते. अलौकिक बुद्धीचे महात्मे आपापल्या काळातील विचारात नवीन मौलिक भर घालतात यात शंका नाही; परंतु स्वतःच्या काळाच्या अतीत त्यांनाही जाणे शक्य नसते व ते जातही नाहीत. समकालीन लोकांच्या प्रश्नांना ते उत्तरे देतात. ती उत्तरेही, परंपरागत वचने व उत्तरे जी असतात, त्यांना फारशी सोडून नसतात. कधी कधी असे वाटते, की त्यांनी दिलेली उत्तरे नवीन होती; परंतु असे करताना, ज्या सत्याकडे आपण ओढले जात आहोत असे त्यांना वाटे, त्या गहन-गंभीर सत्यांना प्रकट करीत असता परंपरेने आलेलीच ती अपुरी भाषा ते वापरतात. त्याच संज्ञा व कल्पना ते वापरतात. स्वतःच्या काळाच्या पलीकडे जाण्याची इच्छा असूनही ते स्वतःच्या काळाचेच प्रतिनिधी राहतात. विचार हा कधीही असंबद्ध उड्या मारीत जात नाही. जुन्या विचारांतच नवीन अर्थ दाखवून बुद्धी नवीन कल्पनांकडे जात असते. परंपरा न तोडता बुद्धी पुढे जात असते. ज्यांना ऐतिहासिक दृष्टी नाही अशा टीकाकारांच्या टीकेपासून बुद्धांनाही त्रास सहन करावा लागला आहे. ऐतिहासिक दृष्टी नसल्यामुळे बुद्धांची स्तुतीही

केली गेली, निंदाही केली गेली. एकोणिसाव्या शतकात विज्ञान व नवज्ञान यांच्या वाढीमुळे युरोपभर संशयवादाची प्रचंड लाट उसळली आणि या वेळेसच पाश्चिमात्यांना बुद्धधर्म वाढत्या प्रमाणात ज्ञात होऊ लागला. युरोपात या वेळेस प्रत्ययवाद, अज्ञेयवाद, नास्तिकवाद, नैतिक पायावर उभारलेला मानवतावाद, इत्यादी वादांना वाढता पाठिंबा मिळत होता. संशयवादी व अश्रद्धावादी वाङ्मयात बुद्धांचे नाव आदराने उच्चारलेले अनेकदा दिसून येते. नैतिक पायावर मानवतावादाची उभारणी करणारेही म्हणू लागले, की आमच्या विचारसरणीचा पहिला मोठा पुरस्कर्ता बुद्ध होय. मानवाचे सुख, मानवाची प्रतिष्ठा, सर्व मानवांचे मानसिक ऐक्य, यांचा पहिला पुरस्कर्ता बुद्ध असे हे सांगतात. मनुष्याला सत्य ज्ञान होणे शक्य नाही असे म्हणणारे आणि दृश्य जगापलीकडे जाणण्यासारखी अशी सत्यता नाहीच मुळी असे म्हणणारे, दोघेही आपापल्या मताच्या मंडनार्थ बुद्धांची साक्ष काढतात. बुद्धिप्रधान अज्ञेयवादी, जे अस्पष्ट अशा इंद्रियातीत ज्ञानाचा जणू खेळ करू बघतात, तेही बुद्धांचेच उदाहरण पुढे मांडीत असतात. सामाजिक आदर्शवादी, नैतिक गूढवादी, बुद्धिप्रधान भविष्यवादी सारे बुद्धांच्या शिकवणीकडे आकृष्ट होतात व त्यांच्या शिकवणीचा स्वतःच्या समर्थनासाठी उपयोग करतात. बुद्धांच्या शिकवणीचे आजकाल फार महत्त्व आहे यात शंका नाही; परंतु बुद्ध ज्या काळात वावरले, त्या काळातील परिस्थिती जर आपण नीटपणे समजून घेतली नाही, तर त्यांची शिकवण समजण्याची आशा नाही आणि ह्यासाठी आपणाजवळ ऐतिहासिक कल्पनाशक्ती हवी आणि ती असणे सोपी गोष्ट नाही. बुद्धांनी स्वतःच्या आयुष्यात साध्या शब्दांनी उपदेश केला. ते सोप्या गोष्टी सांगत, साधे विचार सांगत; परंतु नंतरच्या काळात अनेक वादविवाद त्यांच्या साध्या शिकवणीत घुसले. साहजिकच मग बुद्धांच्या उद्‌गारांकडे पाहतानाही नंतर जी अनेक तत्त्वे व मते त्यात घुसली व जी आपल्याही डोक्यात असतात, त्यांचेही प्रतिबिंब त्यात पाहण्याची वृत्ती होते. जो जो थोर विचार असतो, मग तो धार्मिक असो वा तात्त्विक असो, त्यात अनेक अर्थ प्रसवण्याची शक्ती असते. ते अर्थ त्या त्या विचारस्रष्ट्यांच्या मनात असतात की नाही, देव जाणे. नंतरची अर्थविवरणे दूर करून बुद्धांकडे ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकातील एक महान विचारस्रष्टा या नात्याने पाहणे, त्या काळात सर्वत्र उपदेश देत संचार करणारी बुद्धांची ती सजीव मूर्ती डोळ्यांसमोर आणणे ही गोष्ट कठीण आहे, जरा नाजूक अशी आहे. हे पुनर्रचनेचे

कार्य कधीही पुरे होणार नाही हे स्पष्ट आहे; परंतु आपण प्रयत्न करू तर ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकाचे एक सर्वसाधारण असे चित्र डोळ्यांसमोर उभे करू शकू. त्या चित्राची बाह्य रूपरेषाच अधिक यथार्थ असणे शक्य आहे. कल्पनेने ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात आपण जाऊ या. काय बरे आपणास दिसते? त्या काळी हिंदुस्थानात विचारांचे शेकडो प्रवाह होते. नाना आचार, नाना रूढी; नाना श्रद्धा, नाना विश्वास; पशुपक्ष्यांची पूजा, जादूटोणा, मंत्रतंत्र, असे अनेक प्रकार होते; परंतु या सर्वांचा मिळून एक महान प्रवाह होऊन तो अद्वैतवादाकडे जात होता. सत्य शोधून त्या सत्याशी स्वत:चा नीट संबंध जोडणे हा जो मानवी प्रयत्न तो नेहमी बहुधा द्वैतांतच, अनेकतेतच परिणत होतो. हिंदुस्थानातही असे द्वैतवादी विचार त्या काळात होते; परंतु काही महत्त्वाच्या गोष्टीत या सर्व भिन्न दर्शनांची एकवाक्यता होती. प्राणी जन्मला तेव्हाच त्याचे जीवन सुरू झाले, किंवा तो मेला म्हणजे त्याचे जीवन संपले, असे नाही. अनंत जन्मांच्या साखळीतील हा जन्म एक दुवा आहे; प्रत्येक नवीन जन्म पूर्वीच्या जन्मावरून निश्चित होत असतो; पूर्वीच्या जन्मातील कृत्यांचा ठसा व परिणाम आजच्या जन्मावर होत असतो. पशू, मानव, देव, हे सारे आकार त्या साखळीतील दुवे आहेत. सत्कर्मांनी आपण स्वत:ला उन्नत करीत असतो, आपण स्वर्ग मिळवितो; दुष्कृत्यांनी आपण अध:पतित होत असतो. ज्याअर्थी सर्व प्राण्यांना मरण आहे, त्याअर्थी खरे सुख स्वर्गात वा पृथ्वीवर शोधण्यात अर्थ नाही. जन्म-मरणाच्या फेऱ्यातून सुटणे हे धर्ममय पुरुषाचे ध्येय असते; यालाच मोक्ष म्हणतात, ब्रह्मैक्य म्हणतात, निर्वाण म्हणतात.

जन्ममरणातून मुक्त होण्याचे नानाविध प्रकार व मार्ग त्या काळी कल्पिलेले दिसतात. त्यातील चार स्पष्टपणे उमटून पडतात:

(१) वैदिक सूक्ते उद्घोषितात, की ईश्वरी कृपा प्राप्त करून घेण्याची सर्वोत्तम साधने म्हणजे प्रार्थना व पूजा. (२) प्रथम प्रथम देवतांना साधा हविर्भाग देण्यात येत असे. त्यातून पुढे यज्ञयागांची विशाल प्रक्रिया जन्माला आली. हे यज्ञयाग लोकप्रिय झाले. उपनिषत्पूर्वकाळी हे यज्ञयाग फार गुंतागुंतीचे झाले होते. उपनिषदांनी सांगितले, की हे यज्ञयाग अपुरे आहेत. एवढ्याने भागणार नाही. तरी पण उपनिषदांनी यज्ञयागांचा संपूर्णपणे धिक्कार केला नाही. ऐहिक सुखप्राप्तीचा तो एक उपाय आहे, अमृतत्वही त्यामुळे मिळेल आणि या दृष्टीने यज्ञयाग उपयुक्त, असे उपनिषदे सांगतात. (३)

काही पंथांमध्ये संन्यासधर्म प्रिय होता. संयम, पावित्र्य, ध्यानधारणा, एकाग्रता, मनोनिग्रह इत्यादी साधनांनी मनुष्य विचारशक्ती व इच्छाशक्ती वाढवू शकतो. संन्यासमार्गाचे पुरस्कर्ते पुढे फसून दुसऱ्याच फंदात पडले. इच्छा दडपून, स्वेच्छेने देहदंड सोसून मनुष्य ऋद्धिसिद्धी मिळवितो, अतिमानुषी अशी अलौकिक शक्ती मिळवितो, असे समजण्यात येऊ लागले. यज्ञापेक्षा तप श्रेष्ठ आहे, ब्रह्मज्ञान मिळविण्याचे ते महान् साधन आहे, असे सांगण्यात येऊ लागले. (४) उपनिषदे विद्येवर भर देतात, अंतर्ज्ञानावर भर देतात, जे सत्य आहे त्याच्या साक्षात्कारावर भर देतात. वासनाविजय करावा, सांसारिक बंधने व स्वार्थ यांच्यापासून दूर असावे, अनासक्त राहावे. ज्ञानाला या सर्व गोष्टींची जोड हवी. विद्या म्हणजे एकाग्रता, एक प्रकारची तन्मयता, अखंड समाधी; हे गाढ चिंतन असते; परमात्म्याशी स्वतःच्या ऐक्याचा तो साक्षात्कार असतो. त्या अनुभूतीने सारी ऐहिक आसक्ती गळून जाते; सारे बंध तुटतात. असे हे चतुर्विध मार्ग होते. बुद्ध आत्यंतिकता टाळतात. त्यांचा ''मध्यम मार्ग'' आहे. देहाची पूजा व देहदंडना यांच्यातील मधला मार्ग त्यांचा आहे. बुद्धांचा दृष्टिकोन चौथ्या प्रकाराशी जुळता आहे. त्यांची शिकवण उपनिषदांतूनच निघालेली आहे. उपनिषदांचे असे मत आहे, की जे जग आपण जाणतो, ते जग–मग ते बाह्य असो वा आंतरिक असो, फारसे महत्त्वाचे नाही. या जगाला सत्यता नाही. खरी पारमार्थिक सत्यता द्रष्ट्या आत्म्याला आहे. सर्व आत्म्यांचा तो आत्मा आहे. ब्रह्म व हा आत्मा एकच आहेत. या परमोच्च सत्याचे ज्ञान, जीवात्म्याचे परमात्म्याशी हे ऐक्य व त्याचा साक्षात्कार म्हणजेच मोक्ष. ही एक जीवनदशा आहे. कोठे जायचे–यायचे नाही. विश्रांती घेण्याचे हे एखादे स्थान नाही. जीवनाचा हा एक विशेष गुण आहे. आध्यात्मिक शिकवणीने, व्रतनियमांनी, आध्यत्मिक प्रकाशाने हा गुण, ही मुक्तदशा अंगी येते. हे ध्येय लाभेपर्यंत मनुष्य कर्माने बद्ध आहे. तोपर्यंत 'पुनरपि जननं, पुनरपि मरणं' आहे.

जीवात्म्याचे परमात्म्याशी ऐक्य हा जो महासिद्धान्त, त्याच्या छायेखाली अनेक मतमतांतरे जन्माला आली. त्या त्या भक्ताचे दैवत परमात्म्याशी एकरूप केले जाई. अद्वैताची ती परिभाषा सर्वत्र वापरली जाई.

हे दृश्य नामरूपात्मक जगत् सत्य नाही, हा सिद्धान्त बुद्ध स्वीकारतात. तसेच हा दृश्य जीवही शाश्वत नाही. जीव व जगत् या दोहोतही एका अभंग कायद्याने सारखा

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

बदल होत असतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीचे हे कर्तव्य आहे, की या सतत बदलणाऱ्या कालबद्ध जीवनातून मुक्त होणे; या जीवनाच्या पलीकडे जाऊन निर्वाण प्राप्त करून घेणे. बुद्धिप्रामाण्य न मानणाऱ्या अनेक आग्रही धर्ममतांना बुद्ध किंमत देत नसत. परंतु या विश्वात खरोखर काही भावरूप, सद्रूप असे आहे की नाही, व्यक्तीत वा त्या निर्वाण-दशेत काही सत् असते की नाही, ते सांगण्याचे बुद्ध टाळीत. या जगातील जीवन किती अपूर्ण; येथे किती भेद, बंधने, दुःखे आणि त्या मोक्षदशेत किती निस्सीम आनंद, असे उपनिषदे सदैव सांगत असतात. बुद्धांच्या व उपनिषदांच्या शिकवणीत फरक असलाच तर तो संसाराविषयीच्या, जगविषयीच्या दृष्टिकोनात नसून, मोक्षदशेसंबंधींच्या, निर्वाणासंबंधींच्या कल्पनेत आहे.

बुद्धांच्या मौनाचा अर्थ काय, या प्रश्नाकडे वळण्यापूर्वी या मौनापाठीमागे असणाऱ्या बुद्धांच्या हेतूकडे जरा वळू या. बुद्धांच्या शिकवणीचे सार नैतिक श्रेष्ठतेत आहे. जीवनासंबंधींच्या व विश्वासंबंधींच्या त्यांच्या कल्पना त्यांच्या अत्यंत व्यावहारिक अशा कर्ममय दृष्टिकोनांतून निघालेल्या आहेत. प्रत्येक वस्तूचे अस्तित्व कोणत्या तरी कारणावर अवलंबून असते. ते कारण दूर करू तर कार्यही दूर होईल. सर्व दुःखाचे मूळ जर नष्ट केले तर सारे दुःखही दूर होईल. याज्ञिकांनी, धर्मोपाध्यायांनी बुद्धांच्या काळात यज्ञयागात्मक अगडबंब विधींचे उपाय सुचविले होते; परंतु त्यांनी रोग बरा होणार नव्हता. दुःखाचे मूळ उपटून टाकायचे असेल, तर हृदय शुद्ध करणे हा उपाय आहे. नीतीचा कायदा पाळणे हा उपाय आहे. ज्या नीतीने व्यक्तीचे चारित्र्य बनते, तिच्या स्वभावाचा विकास होतो, त्या नीतीचे महत्त्व जी जी तत्त्वज्ञाने कमी लेखीत, ती सारी तत्त्वज्ञाने बुद्ध झुगारून देत.

उपनिषदांची घोषणा जर सत्य असेल, जर आपण मुळात दैवी असू, तर आपणास मिळविण्यासारखे काय उरले? डोळ्यांसमोर ध्येय ठेवून तदर्थ धडपड करण्यासारखे काय राहिले? जैन व सांख्य तत्त्वज्ञाने अनेक जीव मानतात. हे अनंत जीव प्रकृतीच्या पसाऱ्यात पडलेले आहेत. यातून मुक्त होण्यासाठी त्यांनी योगाचरणाचा मार्ग दाखविला. उपनिषदांप्रमाणे एक विश्वात्मा माना किंवा सांख्य दर्शनाप्रमाणे अनेकपुरुषवाद माना. दोघांचेही आत्म्यासंबंधीचे, पुरुषासंबंधींचे अंतिम वर्णन एकच आहे. हा आत्मा, हा पुरुष शाश्वत आहे; अज, अव्यय आहे; परंतु आपण नीतीला जेव्हा प्राधान्य देतो, तेव्हा काही तरी सुधारावयाचे आहे असे गृहीत असते. मनुष्य

मुळात दैवी नाही. त्याला दैवी व्हायचे आहे. सद्‌विचार, सत्कर्मे, सद्‌वाणी यांच्या सतत अभ्यासाने, प्रयत्नपूर्वक रीतीने ही दैवी स्थिती उभारावयाची असते. मनुष्य हा एक प्रत्यक्ष, दृश्य असा धडपडणारा प्राणी आहे. जेथे सर्व संशय फिटतात, सारे बंध तुटतात, अशा त्या अतीन्द्रिय शाश्वत ज्ञानावस्थेच्या कथा या धडपडणाऱ्या मानवी प्राण्यास सांगण्यात काय अर्थ? ही वर्णने ऐकून त्याला कितीसे समाधान लाभणार? या प्रत्यक्ष चालत्या-बोलत्या सांसारिक मनुष्याला नीती मिळवावयाची आहे, त्या अतींद्रिय आत्म्याला नाही मिळवायची. हे सारे दृश्य जगत् अनात्म आहे, जगातील वस्तूंत वा व्यक्तीत ते शाश्वत सत्य नाही असे सांगणे म्हणजे केवळ वैचारिक उपपत्ती नाही किंवा जगाच्या भंगुरत्वासंबंधीचा हा एक भावनापूर्ण उद्‌गार असेही नाही; तर सर्व नीतीचा पाया या म्हणण्यात आहे. प्रयत्न व निश्चय यांच्या जोरावर आत्मा उभारावयाचा आहे, निर्मावयाचा आहे. अनात्म पसाऱ्यातून नीतिधर्माच्या पालनाने आत्मा निर्मा. आत्मा ही एक अशी वस्तू आहे, की जी उत्क्रांत होत असते, वाढत असते, विकसित होत असते. कष्टपूर्वक प्रयत्नांनी प्राप्त करून घेण्यासारखी ही गोष्ट आहे. आपोआप अनुभवायला मिळणारी ही वस्तू नाही. आपला हा जीवात्मा म्हणजे आपणास दग्ध करणाऱ्या भावनांचा, ज्यांचा आपण ध्यास घेतो त्या वासना-विकारांचा, आपला पिच्छा न सोडणाऱ्या अनेक इच्छांचा, जे अनेक निर्णय आपण घेतो त्या निर्णयांचा एक गोळा आहे. या सर्व गोष्टींमुळेच आपल्या जीवनाला एक प्रकारचा रंग चढला आहे. यामुळेच जीवनाचे हे नाटक चालले आहे. या वासना-विकारांत, या इच्छांत, या भावनांत, शाश्वत असे काही नाही. निरपेक्ष, न बदलणारे असे काही नाही. म्हणून तर आपण आज जसे आहोत त्याहून निराळे होणे शक्य आहे. व्यक्तीची सत्यता त्याच्या सर्जनात्मक संकल्पशक्तीत आहे. भावनांचा कोलाहल जेव्हा आपण शांत करतो, वस्तुजाताचा प्रवाह थांबवितो, शारीरिक वासना व भुका यांना गप्प करतो, त्या वेळेस आपणास आपल्यामधील आत्मसामर्थ्याचा साक्षात्कार होतो; एक प्रकारच्या आपल्या आत्मशक्तीची प्रचिती येते. आत्मा पथभ्रष्ट झाला, तर स्वार्थी बनून दुसऱ्यांचे नुकसान करायला प्रवृत्त होतो. जगातील दुःखाचे मूळ वासना-विकारांनी भरलेल्या अहंभावात आहे. अहंकारी असणे म्हणजे ज्याला अजून डोळे फुटले नाहीत अशा प्राथमिक अवस्थेतील अविकसित जीवाप्रमाणे असणे होय. केवळ स्वार्थ पाहणे म्हणजे दुसऱ्या व्यक्तींच्या सत्यतेविषयी आंधळे असणे.

आपल्या शारीरिक व मनोमय कोशांतून जेव्हा आपण बाहेर पडतो, स्वतःच्या शारीरिक इच्छा-वासनांच्या आसक्तींतून जेव्हा आपण बाहेर पडतो, तेव्हाच आपली खरी वाढ होऊ लागली असे समजावे. वासना-विकारांनी बरबटलेल्या अशा या दृश्य जगाचा जेथे मागमूसही नसतो, अशा त्या अति उदात्त व महनीय अशा स्थितीत आपल्या जीवनाची मुळे आहेत हे समजणे म्हणजे वाढू लागणे. अहंकारापासून मुक्ती म्हणजे सर्व सजीव सृष्टीविषयी सौम्यवृत्ती होणे; सर्व सचेतन सृष्टीविषय अति खोल व थोर सहानुभूती दाखविणे. अहंचा त्याग म्हणजे आपले संपूर्ण स्वरूप प्राप्त करून घेणे; या विश्वाच्या सुसंवादी रचनेतील स्वतःचे निश्चित व व्यवस्थित स्थान जाणणे.

'अहं' शाश्वत व अभंग आहे असे बुद्ध मानीत नाहीत. तसेच मनुष्य मेला की सारे संपले हेही मत ते स्वीकारीत नाहीत. जर मरणाने सारा खेळ खलास होत असेल, तर मग आत्मसंयमन वगैरे करून या क्षणभंगुर जीवनातील ओझे वाढवा का, असे पुष्कळांना वाटण्याचा संभव आहे. आपला हा अहंकारी जीवात्मा म्हणजे एक मिश्रण आहे.. तो सदैव असतो; परंतु बदलत असतो.

अति दैवी गोष्टींचा विचार करू लागल्याने मनुष्याचे लक्ष नैतिक मूल्यांपासून चलित होते. त्याची शक्ती, त्याची एकाग्रता, ह्यांना फाटे फुटतात. सभोवतालची प्रत्यक्ष परिस्थिती पाहून त्या नैतिक मूल्यांचा अधिकाधिक अनुभव घेणे ही गोष्ट बाजूस राहते. मनुष्याला ज्या शक्ती मिळालेल्या आहेत, त्यांचा उपयोग जीवनांतील सत्यं-शिवं-सुंदरम् वाढविण्याकडे मनुष्य करीत नाही असे बुद्धांना दिसून आले. आणि याचे कारण काय? तर मनुष्य दुसरी कोणती तरी दैवी शक्ती, बाहेरची शक्ती सारे करील, असे मानीत असतो. जे काम वास्तविक मनुष्याने करायचे असते, ते बाहेरची शक्ती करील असे जोपर्यंत तो मानतो, तोपर्यंत तो स्वतः आपल्या शक्तीचा उपयोग करून जीवन अधिक सुंदर व मंगल करावे म्हणून झटत नाही. बुद्धांना ही गोष्ट दिसून आली. काही तरी दैवी चमत्कार होऊन एकदम आपला स्वभाव उदात्त व उन्नत होईल, असे मनुष्यास वाटत असते; परंतु बाह्य शक्तीवर विसंबणे, म्हणजे मानवी प्रयत्न सोडणे. बहुजनसमाजाच्या दैवतांना बुद्ध नाकारीत नसत. परंतु हे देव नसून देवदूत जणू आहेत असे ते म्हणत. या देवांना, या देवदूतांनाही स्वतःला सुधारण्याची जरुरी असते; हे देव व देवदूतही दृश्य नाशिवंत वस्तूंपैकीच, असे बुद्ध

समजत. बुद्धांच्या शिकवणीवरून व प्रत्यक्ष त्यांच्या जीवनावरून ते प्रयत्नशील, कर्मप्रवण अशा जीवनाचे पुरस्कर्ते दिसतात. साऱ्या विश्वाचे कायद्याने नियमन होत असते. माणसा-माणसांच्या जीवनात जे आश्चर्यकारक अ-प्रमाण दिसते, त्याला दैवी शक्ती जबाबदार नाहीत असे बुद्ध म्हणत. ईश्वर म्हणजे मूर्तपुरुष अशी कल्पना बुद्ध स्वीकारीत नाहीत. आपल्या झगड्यात ईश्वर भाग घेत असतो, विश्वाच्या व्यवहारात ढवळाढवळ करणारा हा कोणी सुलतान आहे, अशा प्रकारच्या ईश्वरविषयक कल्पना बुद्धांच्या नव्हत्या. ईश्वरावर जोर देणे म्हणजे मानवाचे स्वातंत्र्य हिरावून घेणे होय, असे त्यांना वाटे; जी ध्येये मानवी आहेत, त्या ध्येयांसाठी मानवांना केवळ बाहुली करणे होय असे त्यांना वाटे. बुद्धांना महत्त्वाची गोष्ट वाटत होती ती ही, की ईश्वर अतिमानवी प्रांतात कशा रीतीने आविर्भूत होत असतो हे महत्त्वाचे नसून व्यक्तीत, या प्रत्यक्ष दृश्य जगात, तो विश्वात्मा कशा रीतीने प्रकट होत आहे, ही गोष्ट त्यांना महत्त्वाची वाटत होती. या विश्वाचे नियमन धर्म करतो, नैतिक कायदा करतो. हे जग देवांनी, देवदूतांनी नाही बनविले; तर मानवांच्या स्वेच्छेने ते निर्माण झाले आहे, बनले आहे. मानवी इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा सामग्राने झालेला परिणाम; मानवी इतिहास म्हणजे मानवांनी घेतलेले निर्णय, मानवांचे अनुभव. ज्या परिस्थितीत आपण जन्मतो, ती परिस्थिती भूतकाळातील अनेक स्त्री-पुरुषांच्या कृत्यांतून निर्माण झालेली असते आणि आपणही सर्व जण आपापल्या शक्तीप्रमाणे आपल्या कर्मांनी व संकल्पांनी इतिहासांतील पुढचा क्षण काय येणार हे ठरवीत असतो. मानवी इच्छाशक्ती कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम् अशी सार्वभौम वस्तू नाही ही गोष्ट बुद्ध जाणतात; इतर कोणापेक्षाही अधिक यथार्थतेने जाणतात. मनुष्य जरी स्वप्रयत्नांनीं, स्वतःच्या इच्छाशक्तीने सभोवतीचे जग बदलतो, त्याला आकार देतो, तरी हे जगही पदोपदी आपणास अडथळे करीत असते यात शंका नाही. आपणास सभोवतीच्या सजीव-निर्जीव सृष्टीशी सारखी टक्कर द्यावी लागत असते, ही गोष्ट बुद्ध जाणून आहेत. मनुष्य व परिस्थिती यांची अन्योन्य क्रिया-प्रतिक्रिया सारखी सुरू असते व यातूनच इतिहासाचे महावस्त्र विणले जात असते. मानवी प्रयत्नाला म्हणूनच महत्त्व आहे, किंमत आहे. मानवी प्रयत्न उपेक्षणीय नाही.

धर्माच्या आजच्या स्थितीपेक्षा धर्माची जी आदर्श स्थिती, ते धर्माचे ध्येय आहे. सर्व ध्येयात्मक हेतूचे परमैक्य म्हणजे धर्म. सर्व ध्येयांची बेरीज म्हणजे धर्म. हे ऐक्य

आपणास कर्मप्रवृत्त करीत असते. आपणात इच्छा निर्मित असते. धर्माची आपणावर सत्ता असते; कारण धर्मात अशी एक स्वयंभू शक्ती आहे. आपणाहून भिन्न, आपणाहून पृथक् अशा व्यक्तींच्या जीवनात साक्षात्कृत असा धर्म दिसतो म्हणू नव्हे. धर्माला सत्यता आहे, कारण आपल्या कर्मावर त्याची सत्ता आहे. धर्म ही नि:संशय कर्मप्रेरक शक्ती आहे आणि यासाठी धर्माला महत्त्व व सत्यता. धर्माला अस्तित्वच नाही असे बुद्ध कधीच म्हणत नाहीत. धर्माला स्वतंत्र अस्तित्वही असेल; परंतु सृष्टीच्या पलीकडे असणाऱ्या एखाद्या पुरुषोत्तमाशी धर्म जोडणे त्यांना पसंत नाही. धर्म किंवा नीतीचे ध्येय निसर्गाच्या पलीकडे आहे, ह्या गोष्टी मनुष्याच्या स्वभावाच्या बाहेरच्या आहेत असे मानणे, म्हणजे नैसर्गिक साधने नि:सत्त्व व भ्रष्ट आहेत असे मानणे होय. धर्म ही अशी बाह्य वस्तू मानणे, म्हणजे मनुष्य स्वभावत:च दुष्ट व पापी आहे व त्याचा उद्धार म्हणजे ईश्वरी कृपा होय, असे मानण्यासारखे आहे. मानवी स्वभावातील सुधारणा मानवी प्रयत्नांनी घडून आली आहे, मानवी प्रयत्नांचा हा नैसर्गिक परिणाम आहे, असे मग म्हणता येणार नाही. अतिमानवी शक्तीमुळे हे एकदम फरक झाले, एकदम क्रांती झाली, असे मग मानावे लागेल. धर्माकडे मनुष्याचा ओढा असतो याचा अर्थ बुद्ध असा करतात, की धर्म मानवी कर्मातून प्रकट होत असतो. न्यायी असावे, दयाळू असावे असे आपणास वाटते व आपण तसे वागू लागतो. या नैसर्गिक सत्कर्माची ओढ प्रत्यक्ष कर्मद्वारा जसजशी अधिकाधिक प्रकट होत जाईल, तसतसे जग अधिक सुंदर व मंगल होईल. जगातील अव्यवस्था, निर्दयता, जुलूम कमी होतील. धर्म हे जीवनातील प्राणमय तत्त्व आहे. कर्ममय धर्म जगाला उभारीत असतो. बुद्धांच्या धर्मात, त्यांच्या शिकवणीत, वैयक्तिक निष्ठेला वाव नाही; प्रेमाची खोल, गंभीर पराकाष्ठा नाही; प्रेमाचे वेड नाही; सांसारिक प्रेमाप्रमाणे दिसणारे जिवाशिवाचे हितगूज नाही; आत्म्या-आत्म्यातील जिव्हाळ्याचे संवाद नाहीत; तर मग बुद्धांचा धर्म म्हणजे काय? या दृश्य पसाऱ्यात व या दृश्य पसाऱ्यापलीकडे व्यापून राहिलेली जी सत्यता, तिचे दर्शन म्हणजे धर्माचा गाभा, धर्माचे रहस्य; स्वत:हून मोठे, स्वत:पलीकडे काही तरी आहे असे आतून वाटणे व त्याच्याशी सत्यरूप असणे हा धर्माचा प्राण, हे धर्माचे सत्य स्वरूप. बुद्धांमध्ये हा धर्माचा प्राण आहे. त्यांच्यात ही धर्माची सत्यता आहे.

✦✦✦

४

बुद्ध नाना प्रकारच्या मतांच्या वादांना प्रोत्साहन देत नसत. आंतरिक शांतीला, नैतिक प्रयत्नांना, त्यामुळे बाध येतो असे त्यांना वाटे. या अशा वादविवादांनी शेवटी आपण अति गहन व गूढ अशा गोष्टींजवळ जाऊन पोचतो. त्या गहनगूढांचे उत्तर मिळण्याचा हट्ट आपल्या बुद्धीने धरता कामा नये. जीवनाला जी किंमत आहे, जो अर्थ आहे, त्याला कारण जीवनापाठीमागे असणारी ही गूढता आहे. जी अनंतता बुद्धीच्या कक्षेत येऊ शकत नाही, अशी अनंतता व अपारता जीवनाच्या पलीकडे आहे. म्हणून तर जीवनाला अर्थ आहे, मोल आहे. हे दृश्य जगत म्हणजेच जर सारे असेल, हे जगत् व मानव जर स्वयंपूर्ण असतील, यांच्या पलीकडे अधिक खोल, उच्चतर, गहन-गंभीर असे जर काहीच नसेल, तर या संसारातील दुःख-क्लेश, नाना प्रकारचे पापताप, केवळ असह्य होतील. आपली बुद्धी अशा प्रकारच्या अतिंद्रिय, अति-ऐतिहासिक, दिक्कालातीत सत्यतेची मागणी करते, म्हणून आपण अशी सत्यता मानतो असे नाही; तर जे इंद्रियगम्य आहे, जे दृश्य नामरूपात्मक आहे, ते एका गूढतेने व्यापिलेले आहे व तेथे विचाराची गती कुंठित होते, म्हणून ती सत्यता आपण मानतो. या विश्वापाठीमागे काही तरी आहे असे मानणाऱ्या सर्व धार्मिक पद्धती त्या दिव्य शक्तीची भव्य वर्णने करतात; त्या दिव्य तत्त्वाचा आपणाशी असणारा जो संबंध, त्याचे उत्कट वर्णन करतात. परंतु या सर्व धर्मपद्धती जीवनाच्या अंतिम प्रश्नांना हात लावीत नाहीत. या सर्व पद्धती एक प्रकारे बाहेर वावरणाऱ्या आहेत. यांच्यापेक्षा या विश्वाच्या पाठीमागे काही तरी गूढ आहे; परंतु ते काय आहे

ते सांगता येत नाही असे सांगणारी, त्याविषयी मौन धरणारी धर्मपद्धती एका अर्थी त्या खोल प्रश्नाच्या अधिक जवळ आपणास नेते. गूढतेमुळे बौद्धिक विचाराला मर्यादा पडते, तार्किक व्याख्यांना मर्यादा पडते. ''त्याच्यासमोर वाणी मागे मुरडते; मनालाही ते न सापडल्यामुळे मागे फिरावे लागते.'' बुद्धांचे मौन दर्शविते, की ते एक महान गूढवादी होते. तरीही त्यांच्या अनुयायांनी पुढच्या काळात त्यांच्या मौनाचे नाना प्रकारे व्याख्यान केले, त्या मौनांतून नाना मते त्यांनी काढली. मनुष्यामध्ये जी तत्त्व जिज्ञासू वृत्ती आहे. ती कायमची दडपता येत नाही. सिलोनमधील लेखांवर विश्वास ठेवला, तर बुद्धांच्या मृत्यूनंतरच्या दुसऱ्याच शतकात बौद्धधर्मात निरनिराळे १८ संप्रदाय उत्पन्न झाले होते असे मानावे लागेल. बुद्धांच्या मौनाचे अपण तीन अर्थ करू शकू : (१) कार्यकारणात्मक दृश्य अशा पसाऱ्याच्या पलीकडे काही आहे की नाही याचे ज्ञान त्यांना नव्हते. (२) हे दृश्य जगत म्हणजेच सारी सत्यता व त्याच्यापलीकडे काही नाही हे त्यांना माहीत होते. (३) या विश्वात दृश्याच्या पलीकडे काही एक सत्यता आहे अशी त्यांची श्रद्धा होती; परंतु काही नैतिक कारणांमुळे व काही तार्किक कारणांस्तवही अनिर्वचनीय असणाऱ्या अशा त्या वस्तूची व्याख्या देण्याचे ते टाळीत. या तीन शक्यता आपण कल्पू शकतो. कोणी म्हणतात, की ''बुद्धांचे हे मौन त्यांच्या शून्यवादावरचे पांघरूण आहे. सर्व तंत्र-स्वतंत्र असे काही एक नाही. या दृश्य जगापलीकडे शाश्वत असे काही नाही. आत्म्यात चिरंजीव असे काही नाही. निर्वाण म्हणजे शून्यता, अभावाची रात्र.'' कोणी म्हणतात, की ''बुद्ध अज्ञेयवादी होते. वस्तूंतील सत्यता त्यांना ज्ञात झाली नाही, त्या सत्यतेचे ज्ञान त्यांना झाले नाही आणि अशी सत्यता असलीच तर तिचे ज्ञान होणे शक्यही नाही, असे ते मानीत असावेत. ती सत्यता अज्ञेय आहे. बुद्धांचे मौन म्हणजे न दिलेल्या निर्णयाचे आविष्करण होय.'' काही असेही म्हणणारे आहेत, की ''बुद्ध हे गूढवादी होते आणि इतर सर्व गूढवाद्यांप्रमाणे अनिर्वचनीय अशा त्या स्थितीचे, त्या सत्याचे, वर्णन करायला ते धजत नसत. ती अनिर्वचनीय स्थिती अनुभवायची असते, चर्चावयाची नसते.'' अर्वाचीन विवरणकार वरील मतांपैकी आपापल्या वृत्तीप्रमाणे, कलाप्रमाणे, कोणते तरी एक मत स्वीकारतात.

जे कोणी असे समजतात, की बुद्ध हे संशयवादी किंवा अज्ञेयवादी होते, कारण त्यांना अंतिम सत्यता समजली नाही. समजली तर ते वर्णन करते, अशांना बुद्धांच्या

शिकवणीतील मर्म समजले असे म्हणता येणार नाही. बुद्धांनी शतदा सांगितले आहे, की ''मी शिष्यांना दिले त्यापेक्षा कितीतरी मजजवळ आहे.'' बुद्धांच्या या उद्‍गारांचा वरील समजुतीशी विरोध येईल. बुद्धांची वृत्ती पलंगपंडित संशयवाद्याची नव्हती. पलंगपंडित संशयवादी त्या अंतिम सत्यतेसंबंधी अस्तिपक्षी वा नास्तिपक्षी उत्तर देता यावे म्हणून संशोधन करीत नाहीत, पराकाष्ठेची धडपड करीत नाहीत. बुद्ध असे नव्हते. तसेच त्यांना ती सत्यता खरोखरच नाही असे वाटते, तर तसे स्पष्टपणे सांगण्याचे नीतिधैर्य त्यांच्याजवळ नव्हते असे मानणेही न्याय्य नाही. बौद्धधर्मग्रंथात आपणास पुढील वृत्तांत एके ठिकाणी वाचायला सापडतो :

''कौशांबीस शिंशपवनात बुद्ध राहात होते. शिंशपवृक्षाची काही पाने हातांत घेऊन बुद्ध शिष्यास म्हणाले, ''माझ्या हातांतील पाने वनात असणाऱ्या पानांपेक्षा कमी की अधिक?''

शिष्य म्हणाले, ''महाराज, आपल्या हातांतील पाने थोडी आहेत. पलीकडे वनात पुष्कळ आहेत.''

बुद्ध म्हणाले, ''मी जे ज्ञान मिळविले ते सारे तुम्हास सांगितले नाही. जे सांगितले त्यापेक्षा न सांगितलेले किती तरी अधिक आहे. आणि शिष्यांनो, मी ते तुम्हाला का बरे सांगितले नाही? कारण त्याने तुमचे हित नाही. तुमचे पावित्र्य वाढण्यास त्यामुळे मदत नाही होणार; ते ज्ञान तुम्हाला ऐहिकापासून दूर वळवील असे नाही; ते ज्ञान सर्व इच्छा ताब्यात आणा असे नाही सांगणार; जे जे क्षणिक आहे ते सोडा असे नाही म्हणणार; ते ज्ञान शांतीकडे, प्रकाशाकडे, निर्वाणाकडे नेणारे नाही; म्हणून मी ते सांगितले नाही.''

एकदा मालंक्यपुत्त तर बुद्ध आपल्या आध्यात्मिक प्रश्नांना उत्तरे देत नाहीत म्हणून रागावला. तो बुद्धांना आव्हान देऊ लागला. त्यांचे ते करणे अविनयाचे वाटते. तो बुद्धांना म्हणाला, ''माझ्या प्रश्नांची उत्तरे द्याल तर तुमचा शिष्य म्हणून तुमच्या धर्मात मी राहीन; धर्ममय असे हे भिक्षुजीवन कठीन; परंतु जर उत्तरे न द्याल तर धर्म सोडून मी पुन्हा संसारात रमेन. जर तुम्हाला प्रश्नांची उत्तरे देता येत नसतील, तुम्हाला ज्ञान नसेल, तर स्वच्छ सांगा, की मला या गोष्टी कळत नाहीत, समजत नाहीत.''

बुद्ध शांतपणे म्हणाले, ''तुझ्या प्रश्नांची उत्तरे मी देऊ पाहत नाही; परंतु एक दृष्टांतरूप गोष्ट सांगतो. विषदिग्ध बाणाने घायाळ झालेला एक मनुष्य आहे असे

समज. त्याचे मित्र धावत जाऊन वैद्याला घेऊन येतात. तो वैद्य जखमेतून तो बाण आता उपटणार तो. जखमी मनुष्य ओरडतो, 'थांब, हा बाण मला कोणी मारला ते कळेपर्यंत मी तो काढू देणार नाही. हा बाण स्त्रीने मारला की पुरुषाने? ब्राह्मणाने, वैश्याने की शूद्राने? बाण मारणारा कोणत्या कुळात जन्मला होता? तो उंच होता की वामनमूर्ती होता? तसेच हा बाणही कोणत्या प्रकारचा आहे, कोणत्या जातीचा, ते सारे सांगा. मग हा बाण काढा.' तो जखमी मनुष्य जर असे म्हणू लागला तर काय होईल? या सर्व प्रश्नांची त्याला उत्तरे मिळण्यापूर्वीच तो मरून जाईल. त्याप्रमाणेच या जगापलीकडे, विश्वापलीकडे काय आहे, वगैरे प्रश्नांची उत्तरे मागणारा शिष्य-हे दुःख जगात का आहे, कोठून आले, कधी थांबेल, इत्यादी प्रश्नांची सर्व उत्तरे मागणारा शिष्य ती उत्तरे मिळण्यापूर्वीच मरून जायचा एखादा.''

बुद्धांचे उद्दिष्ट अत्यंत व्यावहारिक होते. ते आपल्या श्रोत्यांना नाना तर्कटे व कल्पना रचायला प्रवृत्त करीत नसत. ते आत्मसंयमनास प्रवृत्त करीत. ज्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला पाहिजे आहेत; परंतु बुद्धी ज्यांची उत्तरे शब्दात देऊ शकत नाही, त्या प्रश्नांचे ज्ञान 'माझ्या मार्गाने या व स्वतःला मिळवा' असे ते सांगत. बुद्ध म्हणतात, ''आपल्या विचारशक्तीवर ताबा मिळवून जर तिचा आपण नीट उपयोग करू, जर आपण हृदय शुद्ध करू, वासनांना नीट वळण देऊ, तर सद्गुणांची दैवी प्रभा आपल्याभोवती पसरल्याशिवाय राहणार नाही. निष्कलंक जीवनातच, निष्कलंक हृदयमंदिरातच ते परिपूर्ण शिवत्व, तो शाश्वत धर्म स्थापणे शक्य होईल. जो पाहील त्याला ते दर्शन घडेल.'' काशीला एका प्रवचनात ते म्हणाले, ''माझ्या शिकवणीप्रमाणे जर वागाल, तर याच जन्मात तुम्ही सत्याचे आकलन करू शकाल, त्या सत्याचा साक्षात्कार करून घ्याल.'' अशा श्रद्धेने व अधिकारवाणीने बोलणाऱ्या बुद्धांना अज्ञेयवादी कोण म्हणेल?

बुद्ध जरी नाना प्रकारच्या बुद्धिहीन भोळ्या विश्वासांच्या बाबतीत, नानाविध खुळ्या समजुतींच्या बाबतीत आक्षेप घेत असत, तरी विश्वातील नैतिक व्यवस्थेविषयी त्यांनी कधी शंका घेतली नाही. आत्मिक जीवनाचे महत्त्व ते मानीत. आत्मिक जीवनाची जी सर्वश्रेष्ठ सत्यता, तिच्याविषयी त्यांनी कधी शंका घेतली नाही. सद्गुणाच्या प्रत्यक्ष आचरणावर ते फार भर देत असत. बुद्धीची कसोटी लावूनच कोणतेही मत घ्या, असे ते सांगत. ते असे का सांगत? काही तरी उत्कट अशी,

निश्चित अशी नि:शंकता त्यांच्याजवळ होती. त्यांच्याजवळ नि:शंक असे सत्यज्ञान होते. नीतिधर्माचा, सद्‌गुणांचा कायदा हेच त्यांचे परब्रह्म, हीच त्यांची अंतिम सत्यता. मानवी आशा व धडपड यांना हेच त्यांचे उत्तर. ज्या तत्त्वावर जगाच्या सर्व अस्तित्वाचा पाया उभारलेला आहे ते तेच तत्त्व. इतिहासाचा अर्थ तो हा. यातच सर्व सृष्टीचा उद्धार आहे.

बुद्धांना सत्यज्ञान झाले होते, असे मानण्यावाचून गत्यंतर नाही. त्यांच्या शेकडो उद्‌गारांवरून तसे मानणे प्राप्त आहे. पुरावा सांगतो, की असे मानले पाहिजे; परंतु असे जर होते, तर त्या सत्यज्ञानाची त्यांनी घोषणा का नाही केली? त्यांना प्राप्त झालेले सत्य अनीश्वरवादी तर नव्हते? परब्रह्म म्हणून काही तरी आहे, असे धर्ममय अनुभव घेणारे सांगतात; परंतु अशा धर्मपर व्यक्तींचा तो महान अनुभव खोडून काढण्यासाठी, त्या अनुभवाचे महत्त्व कमी करण्यासाठी म्हणून बुद्धांचे शब्द देण्यात येत असतात. निर्वाण म्हणजे ''अनंत रात्रीतील अनंत निद्रा'' नव्हे का? निर्वाण म्हणजे ईश्वरावाचून स्वर्ग, आत्म्यावाचून अमरता, प्रार्थनेवाचून पावित्र्य. बुद्धांचे सारे तत्त्वज्ञान यात आले. टी. एच्. हक्स्लेला तर बौद्धधर्मात आशा वाटते. तो लिहितो, ''जो धर्म पाश्चिमात्य अर्थाने ईश्वर मानीत नाही, जो धर्म मनुष्याला आत्मा नाकारतो, जो धर्म अमृतत्वावर विश्वास ठेवणे म्हणजे मूर्खपणा म्हणतो, जो धर्म अशा अमर जीवनाची आशा करणे पाप समजतो, प्रार्थना, यज्ञयाग इत्यादींत जो धर्म अर्थ बघत नाही, मोक्षासाठी फक्त स्वत:च्या प्रयत्नावर विश्वास ठेवा असे जो धर्म सांगतो, ज्या धर्माच्या मूळच्या विशुद्ध स्वरूपात व्रते-वैकल्ये वगैरेंचा गोंधळ नाही, ज्या धर्माने जगातील बाहुबळाची कधी मदत घेतली नाही आणि तरीही जो धर्म आश्चर्यकारक वेगाने जुन्या जगाच्या निम्म्या भागावर पसरला आणि आजही त्या धर्माला माहीत नसलेल्या अनेक क्षुद्र भेळसट कल्पना जरी त्यात मिसळल्या असल्या, तरीही मानवजातीच्या बऱ्याचशा भागाचा जो धर्म अद्याप प्रभावी पंथ आहे, अशा ह्या बौद्धधर्मातच मला आशा वाटते.'' बुद्धकालीन भारतीय मनोबुद्धी जर आपण लक्षात घेऊ तर आपणास असे म्हणावे लागेल, की बौद्धधर्म जर अभावरूप असता तर बुद्धांच्या संदेशाचे स्वागत व स्वीकार होणे ही अशक्य गोष्ट होती. हिंदुस्थानातील धार्मिक वातावरणाशी ज्याचा परिचय आहे, तो असे कधीही मानणार नाही, की अभावाच्या तत्त्वज्ञानामुळे, शून्याच्या तत्त्वज्ञानामुळे, भारतात धार्मिक पुनरुज्जीवन

झाले. असे शून्यमय तत्त्वज्ञान हिंदुस्थानात धार्मिक पुनरुज्जीवन करू शकणार नाही. बुद्ध जरी सर्वश्रेष्ठ देवतेला, त्या परब्रह्माला नाकारीत, तरीही काही तरी अत्यंत उदात्त असे तत्त्व ते मानीत, असे त्यांच्या अनुयायांना वाटे. त्या परब्रह्माहूनही उच्चतर असे तत्त्व बुद्धांना प्राप्त झाले आहे, असे त्यांचे शिष्य मानीत. इतर देवतांच्या उपासकांनी आपली पूजा देवत्वाच्या दुसऱ्या एका स्वरूपाकडे वळविली. शिव व विष्णू या दोन महान् देवतांच्या वाढीचा तो काळ होता आणि पुढे बुद्धांनाही त्यांच्या अनुयायांकडून देवत्व दिले गेले. बुद्धांचे अनुयायी निरीश्वरतेकडे झुकणारे खात्रीने नव्हते.

बुद्धांची शिकवण तत्कालीन संदर्भात जर आपण पाहू. या दृश्य नामरूपात्मक जगाच्या पाठीमागे एखादी परम सत्यता बुद्ध मानीत असत की नाही, असा जर आपण प्रश्न करू, ह्या दृश्य जीवात्म्याच्या पलीकडे अमर असे आत्मतत्त्व ते मानीत की नाही, असा जर प्रश्न करू, निर्वाण म्हणजे अभावात्मक कल्पना की अमर जीवनाची भावरूप कल्पना असा प्रश्न करू, तर ते अधिक मनोरंजक व बोधप्रद होईल.

१ धर्माच्या कल्पनेचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. इराणी व भारतीय संस्कृतीत प्राचीन काळी ऋत म्हणजे नैतिक व नैसर्गिक अशी व्यवस्था, अशी कल्पना दिसते. या ऋताच्या सत्तेखाली, या कायद्याच्या सार्वभौम सत्तेखाली सर्व वस्तू व व्यक्ती असतात. हे सर्व चराचर ऋताने घातलेल्या मर्यादांप्रमाणे चालते. वैदिक काळातच ऋताच्या या कल्पनेत हळूहळू बाह्य जगच नव्हे, तर नैतिक जगही आले. जी तत्त्वे डोळ्यांपुढे ठेवून मनुष्य वागतो, त्याच्या चालीरीती, कायदे, शिष्टाचार, ह्या सर्वांना व्यापून ऋत असते. हे ऋत, ही नैतिक व्यवस्था कोणा देवाने नाही निर्मिली. हे ऋत स्वत:च दैवी आहे. ऋत म्हणजेच देव. ते अन्य देवदेवतांवर विसंबून नाही. वरुण व आदित्य जरी या ऋताचे पालक असले तरी ऋताला स्वयंभू शक्ती, स्वतंत्र दैवी तेज आहे. उपनिषदांमध्ये "धर्माहून श्रेष्ठतर काही नाही." "जे धर्ममय आहे तेच सत्य व धर्म म्हणजेच सत्य" अशी वचने आहेत. ऋत (व्यवस्था) व सत्य म्हणजे एकाच सत्यतेची व्यावहारिक व वैचारिक रूपे होत. त्या सत्यमय जगात पूर्ण सुसंवादीपणाचे जग आहे. जेथे सत्यता असते तेथे पूर्णपणे मेळ असतो. असंबद्धपणा, विस्कळीतपणा, पार्थक्य, सुसंवादीपणाचा अभाव, विसंगती, इत्यादी गोष्टी आपल्या ह्या मर्त्य जीवनाच्या खुणा आहेत. मर्त्य जीवनाची ही लक्षणे; परंतु आपणाला व्यवस्थितपणाची

प्रीती वाटत असते. सत्याचे संशोधन आपण करीत असतो. ह्यावरून सुसंवादी असे जे ते दुसरे जग, त्याच्याशीही आपले धागेदोरे असले पाहिजेत असे दिसते. ते जे निरुपाधिक तत्त्व आहे, ते म्हणजेच सत्यता, असे सांगण्यावर उपनिषदांचा भर आहे. सत्य व धर्म यांच्याशी त्या निरुपाधिक तत्त्वाला उपनिषदांनी एकरूप केले आहे. या प्रत्यक्ष जगात कार्यकर अशी जर कोणती प्रभावी शक्ती असेल, तर ती धर्म होय असे बौद्धधर्म अट्टाहासाने सांगतो. निरुपाधिक तत्त्व म्हणजेच सत्य यावर तितका जोर न देता 'निरुपाधिक तत्त्व म्हणजे धर्म' या गोष्टीवर बौद्धधर्माने जोर दिला. उपनिषदांनी उपपत्तींवर, वैचारिक मीमांसावर भर दिला. बौद्धधर्माने त्याच तत्त्वाच्या व्यावहारिक स्वरूपावर भर दिला. धर्म म्हणजेच सर्व चराचरांत भरून राहिलेली व्यवस्था. धर्म म्हणजेच निसर्गातील नियम; कार्यकारणभावाची साखळी म्हणजे धर्म; जातींचे नियम म्हणजे धर्म. धर्मात सारे येते.

"भगवन्, कोणाला पूज्य मानावे? राजाधिराज कोण?" कोणी प्रश्न केला.

" धर्म हा राजाधिराज." बुद्धांनी उत्तर दिले.

धर्म म्हणजे निरपेक्ष, प्रमादातीत न्याय. त्या सर्वश्रेष्ठ सत्यमय न्यायाची छाया म्हणजे आपला भौतिक न्याय, मर्त्य न्याय. हळूहळू धर्म हा शब्द वस्तूच्या स्वरूपाला व विशिष्टत्वाला, वस्तूच्या भूमिकेला व कारणालाही लावण्यात येऊ लागला.

ते जे निरपेक्ष तत्त्व त्याचे शेकडो मार्गांनी आपण आकलन करून घेत असतो. प्रत्येक धर्म त्या अंतिम सत्याच्या कोणत्या तरी एखाद्या विशिष्ट स्वरूपावर जोर देत असतो. त्या विशिष्ट स्वरूपाला मध्यवर्ती करून इतर रूपे त्याच्या भोवती उभी करण्यात येतात. त्या मध्यवर्ती स्वरूपाच्या संदर्भात इतर रूपाकडे पाहण्यात येते. बुद्धांनी नैतिक अंगावर भर दिला. नीतीचे स्वरूप त्यांनी मध्यवर्ती केले. आकाशातील ज्योतिर्मय गोलांच्या गतीपासून तो जीवनातील लहानशा हालचालीपर्यंत सर्वत्र हे नीतीचे दर्शन बुद्धांना होते. कधी कधी हे विश्व अव्यवस्थित आहे, या विश्वात काही विचारपूर्वक चालले आहे असे जरी न वाटले, तरी प्रत्यक्ष व्यवहारात ती दृष्टी आपण कधीही घेत नाही. हे जगत म्हणजे ऋताचे आविष्करण आहे, अशी आशा मनात धरून आपण कार्यप्रवृत्त होत असतो आणि अनुभवाने ही आशा अधिकाधिक सफळ होत आहे. या आशेचे समर्थन होत आहे; परंतु हा जो ऋताचा कायदा तो नैतिक स्वरूपाचा आहे. जेव्हा कधी आपले मन त्रस्त व संतप्त झालेले असते, आपले मन अस्ताव्यस्त

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले) नगर वाचनालय, सातारा.

झालेले असते, तेव्हा हे विश्व म्हणजे सारा ब्रह्मघोटाळा आहे, सारी बजबजपुरी आहे असे क्षणभर आपण मानतो; परंतु वागताना या विश्वात न्याय आहे, निरपेक्ष, पक्षातीत न्याय आहे, अशा दृढ श्रद्धेने व विश्वासानेच आपण वागतो. नैतिक ध्येये म्हणजे व्यक्तीच्या कल्पनेचे खेळ नाहीत. नैतिक ध्येये म्हणजे उत्क्रांतीतत्त्वानुसार उत्क्रांत होत आलेल्या वस्तू नाहीत. नैतिक ध्येये या विश्वाचा आधार आहेत. विश्वाच्या मुळाशी खोल ती रूतलेली आहेत. धर्म, न्यायता म्हणजे विश्वाचे प्रेरक तत्त्व असे बुद्ध मानतात. आपणही त्या न्यायाला जीवनात आणावे अशी आपणापासून अपेक्षा केली जात असते. प्रत्येक नैतिक ध्येयाची दोन स्वरूपे असतात; एक स्वरूप म्हणजे मनुष्य ते ध्येय प्राप्त करू शकतो हे होय आणि दुसरे म्हणजे या विश्वात त्या ध्येयाला आधार आहे. नैतिक ध्येय कृतीत आणणे जर आपल्या शक्तीच्या बाहेरचे असेल, तर त्यासाठी धडपड करा असे सांगण्यात काय अर्थ? अप्राप्य ध्येयांचे चिंतन करण्यात एक प्रकारची गोडी असेल, रमणीयता असेल; परंतु त्यांना नैतिक नाही म्हणता येणार. प्रत्यक्षात न येणाऱ्या ध्येयांना आपण आपली निष्ठा देऊ शकणार नाही. कोणी म्हणतील की, ''नैतिक मूल्ये जीवनात आणण्यासाठी जरी आपण पराकाष्ठा केली, तरी हे विश्व आपल्या आशांचा चक्काचूर करील आणि आपले सर्वोत्कृष्ट प्रयत्नही विफल केले जातील. जे काही आहे त्याला अधिक चांगले करण्याची आशा करता येणे शक्य नाही.''

आपणास असे निश्चित आश्वासन मिळाले पाहिजे, की सर्वव्यापी असे तत्त्व आहे व ते नैतिक पूर्णतेकडे जात आहे आणि त्या आदर्शाकडे जग जावे म्हणून आपण मर्त्य जीवही आपापल्या शक्तीप्रमाणे प्रयत्न करीत आहोत. प्रत्येक जीव आपापल्या क्षेत्रात आपापल्या शक्तीप्रमाणे तो आदर्श सफळ व्हावा म्हणून धडपडत आहे. बुद्धांनी असे आश्वासन दिले आहे. बुद्ध सांगतात, की ज्याच्यावर आपण निःशंकपणे विश्वास ठेवावा अशी एकच गोष्ट आहे व ती म्हणजे धर्म. ती गोष्ट म्हणजे निरपेक्ष न्यायता. या धर्माला प्रकट केल्यानेच जगाचा उद्धार होईल, जगाची दुःखातून सुटका होईल. ते म्हणतात, ''जगातील सारे जीव स्वतःची गुंतागुंतीची विविध रूपे बाजूला करतील.'' सर्वांना मोक्ष आहे. त्या परमदशेप्रत सारे पोचतील. बुद्ध एखादा सर्वज्ञ, सर्वशक्तिमान असा परमेश्वर नसतील मानीत; परंतु एक गोष्ट ते सांगतात, की तुमच्या नैतिक धडपडीच्या बाबतीत हे विश्व उदासीन नाही. हे विश्व

तुमच्या नैतिक प्रयत्नास उचलून धरणारे आहे. जे आहे त्यापेक्षा अधिक चांगले प्राप्त करून घेण्याची जी आपली धडपड, तिला धर्माचा पाठिंबा आहे. ऋतसत्याचा आधार आहे. या नामरूपात्मक अखंड प्रवाहाच्या पाठीमागे एक सत्यता आहे. तिच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यास ती उत्तर देते. धर्म म्हणजे केवळ अमूर्त कल्पना नव्हे, शून्य नव्हे. या इंद्रियगम्य जगाला निश्चित स्वरूप देणारी, आधारभूत असणारी एक सत्यता खाली खोल मुळाशी आहे. या दृश्य जगातील सारे जरी नाशिवंत असले, तरी असे काही आहे, की जे अविनाशी आहे. ते जात नाही, मरत नाही. ते जे अमर असे तत्त्व ते नैसर्गिक व आध्यात्मिक कायद्यांच्या रूपाने प्रकट होत असते. या दृश्य जगाचे अतिंद्रिय स्वरूप ते हेच. त्या थोर नैतिक व आध्यात्मिक स्वरूपाला प्रणाम करा; त्याची पूजा करा.

गौतम जेव्हा पूर्णपणे बुद्ध झाले, ज्ञानी झाले, तेव्हा पुढे त्यांनी काय करावयाचे ठरविले? ते म्हणतात, ''धर्माने मला जगू दे, धर्माला भजू दे, धर्माला आदरू दे.'' धर्ममय अंतर्दृष्टी म्हणजेच ज्ञानाचा प्रकाश. अष्टविध मार्गांचे अंतिम साध्य म्हणजे ही पवित्र अंतर्दृष्टी मिळवून घेणे. या जन्मातच हृदयाला मुक्त करणे, बुद्धीला मुक्त करणे, हेच अष्टविध साधनेचे साध्य. ही जी अंतर्दृष्टी ती एक व्यक्तीविशिष्ट अशी मानसिक अवस्था आहे का? प्रेमवस्तूशिवाय ते प्रेम आहे, अनासक्त प्रेम आहे, असे बुद्धांनी म्हटले आहे. बुद्ध सांगतात, या जगातच त्या स्थितीत परमश्रेष्ठ सत्यतेचा साक्षात्कार आपणास होत असतो. या इंद्रियगम्य दृश्य जगाच्या पाठीमागे लपलेले जे दैवी तत्त्व, ते त्या स्थितीत आपण प्रत्यक्ष पाहतो, धरतो, अनुभवतो. त्या स्थितीत असताना आपण गोंधळातील व्यवस्था पाहतो, नाशिवंतांतील अविनाशी पाहतो, नामरूपात्मकतेतील सत्यता पाहतो. ही अंतर्दृष्टी मन शांत व निश्चल ठेवून, बाह्य जगाविषयी अनासक्त राहूनच मिळविता येते. आपण नीतीचे वळण लावून घेऊन जेव्हा हृदय विशुद्ध करतो, जेव्हा आपण आपली सारी जाणीवशक्ती त्या खोल असलेल्या तत्त्वावर सोडतो, त्याच्यावर केंद्रिभूत करतो, त्या वेळेस आपल्यातील सुप्त शक्ती जागृत होतात; आणि एकदम एक नवीन अनुभव येतो. त्या अनुभवात निर्मळ व स्वच्छ अंतर्दृष्टी असते, मोकळा व अनासक्त आनंद असतो. कोणी म्हणतात, की बुद्ध जरी धार्मिक अनुभवास उच्चतम आध्यात्मिक साक्षात्कार मानीत असले, तरी त्या अनुभवात, त्या साक्षात्कारात सारभूत असे तत्त्व नाही. तो अनुभव

एखाद्या ध्येयाचा असा नाही; परंतु असे म्हणणारे बौद्धधर्मातील वचनांचा भंग करतात; त्या वचनांना झुगारून ते उगीचच्या उगीच बुद्धांवर वदतो व्याघाताचा आरोप करतात. उपनिषदे ज्याला ब्रह्म म्हणतात त्याचीच सत्यता बुद्ध सूचित करतात. बुद्धांनी त्यालाच धर्म हे निराळे नाव देण्याचे स्वातंत्र्य घेतले. त्या ब्रह्माचे आवश्यक असे नैतिक स्वरूप या संसारात अधिक मोलाचे आहे असे समजून, त्या नैतिक स्वरूपावर दृष्टी खिळविण्यासाठी त्या ब्रह्मालाच बुद्धांनी धर्म या नावाने संबोधिले. धर्माचा पंथ हाच ब्रह्माचा पंथ; धर्मात राहणे म्हणजेच परब्रह्मात राहणे. तथागत म्हणाले, ''धर्म माझे शरीर, ब्रह्म माझे शरीर, मी धर्माशी एकरूप आहे, ब्रह्माशी एकरूप आहे.'' अष्टविध मार्गाला ब्रह्मयान किंवा धर्मयान अशा दोन्ही नावांनी बौद्धधर्मात संबोधिलेले आहे.

अनात्मवादी प्रतिपादितात, की आत्मा-हा अहं-म्हणजे सतत बदलत जाणारे एक तत्त्व. अलगद्दूपम सूतांत सत्यवस्तूच्या विनाशाचेच तत्त्वज्ञान बुद्धांनी शिकविले आहे, असा त्यांच्यावर आरोप करण्यात आलेला आहे; परंतु बुद्ध तो आरोप तेथे संपूर्णपणे नाकारतात. ते म्हणतात, ''मी पाच प्रकारच्या अहंचा त्याग करा असे सांगत असतो. शरीररूपाने असणारा, मनोमय असणारा, भावनामय असणारा, प्रवृत्तीमय असणारा, विज्ञानमय असणारा, असे हे अहं सोडा असे मी सांगतो.'' एकदा दुर्बळ अशा तीस लोकांचा एक जथा बुद्धांना भेटला. हे लोक आपल्या स्त्रियांसह एका वनात कालक्रमणा करीत असत. त्यांच्यापैकी एकाची बायको नव्हती. त्याने एक वेश्या ठेवली होती; परंतु एके दिवशी त्याचे लक्ष चुकवून त्याची सारी चीजवस्तू घेऊन ती पळून गेली. ते सारे तिचा शोध करीत हिंडत होते. त्यांनी बुद्धांनाही तिच्याविषयी विचारले. बुद्ध म्हणाले, ''हे तरुणांनो, एका स्त्रीच्या शोधात फिरणे चांगले की स्वतःच्या शोधात, आत्म्याच्या शोधात् फिरणे चांगले?''

''भगवन, आत्म्याच्या शोधार्थ फिरणे चांगले'' ते म्हणाले. धम्मपदात म्हटले आहे, ''आत्म्याचा प्रभू आत्मा. दुसरा कोण प्रभू असू शकणार? ज्याने आत्मसंयमन केले आहे त्याला असा प्रभू मिळतो, की क्वचितच कधी कोणाला तसा मिळत असेल.'' एका सुप्रसिद्ध उताऱ्यात बुद्ध म्हणतात, ''शिष्यांनो, जे तुमचे नाही, त्याचे ओझे का घेता? त्यापासून मुक्त व्हा. आकार, भावना, विचार, इत्यादी गोष्टी म्हणजे तुम्ही नाही. या तुमच्या वस्तू नाहीत. एखादा मनुष्य या जंगलातील गवत, फांद्या, शाखा, पाने सारे घेऊन जात असेल, त्यांचा स्वतःसाठी उपयोग करीत असेल, ते

सारे जाळून टाकीत असेल, तर तुम्हाला असे वाटेल का, की तो तुम्हाला नेत आहे, तुमचा उपयोग करीत आहे, तुम्हाला जाळीत आहे?''

''नाही महाराज, असे नाही वाटणार.'' शिष्य म्हणाले.

''का बरे?'' बुद्धांनी प्रश्न केला.

''कारण, हे प्रभो, त्या वस्तू म्हणजे आमचा आत्मा नव्हता. त्या आत्म्याच्या वस्तू नव्हत.''

''त्याचप्रमाणे जे जे अनात्म आहे त्याचा त्याग करा. साऱ्या स्कंधांचा त्याग करा. आपल्या आसपास असणाऱ्या वृक्षादिकांचा जसा आत्मरूपाशी संबंध नाही, त्याचप्रमाणे या स्कंधांचा, वासनाविकारांचा, भावना-विचारांचा, मनोबुद्धीचा आत्म्याशी संबंध नाही.'' प्लॉटिनस म्हणाला होता, ''माझे असे माझ्यात काही ठेवू नका.'' मनुष्यामध्ये काही तरी चिरंतन, स्वयंभू, स्वत:सिद्ध असे आहे असे बुद्ध मानतात. त्या अविनाशी तत्त्वाचा नाशिवंत घटकांशी, नाशिवंत स्कंधांशी अनेक ठिकाणी विरोध दाखविण्यात आलेला आहे. बुद्ध जेव्हा प्रश्न करतात, ''जे चंचल आहे, नाशिवंत आहे, ते आत्मा असू शकेल का?'' तेव्हा जे चंचल नाही, भंगुर नाही, असे आत्मतत्त्व त्यांच्या डोळ्यांसमोर आहे असे स्पष्ट दिसते. बौद्धधर्मातील पुढील महावाक्यात हीच दृष्टी आहे : ''हे माझे नाही, मी हे नाही, हे मी नाही.'' ही सारी निषेधपर वाक्ये आत्म्याचा अनात्म वस्तूंपासून असणारा भेद स्पष्टपणे दाखवीत आहेत. आत्मा ही अशी वस्तू आहे, की या दृश्य जगातील सर्व निश्चित स्वरूपापासून, दिक्कालाद्यनवच्छिन्न वस्तूंपासून ती संपूर्णपणे अलग आहे. बुद्ध जेव्हा ''आत्मदीप व्हा, आत्मशरण व्हा'' असे सांगतात, त्या वेळेस त्यांच्या डोळ्यांसमोर हे भंगुर स्कंधा नसून, आपल्यातील नाशिवंत अनात्म वस्तू नसून, आपल्यातील विश्वात्मा, परमात्मा त्यांच्या डोळ्यांसमोर असतो. या दृश्य जगातील संघातांहून अधिक असे काही आत्म्यात आहे की नाही? आत्मा म्हणजे का पाचांचा संघात? पाच स्कंधांचा मेळावा? या प्रश्नाला कायमचे उत्तर देण्यात आले आहे, की आत्म्याचा संबंध शब्दातीत आहे. आत्म्याशी असलेले नाते अनिर्वचनीय आहे. आत्मा या पाचांचा मेळावा की आत्मा या पाचांपासून अलग, हे काहीच सांगता येणे शक्य नाही. सारिपुत्त सतीजवळ वाद करताना म्हणतात, ''तथागत पाचांचा संघातही नाही किंवा

त्यांच्यापासून अलग आहे असेही नाही.'' अनेक वचनांतून आत्म्याची शाश्वत धर्माशी एकरूपता वर्णिलेली आहे.

उपनिषदे म्हणतात, ''आत्म्याचा, विश्वात्म्याचा शोध करणे हे मानवाचे कर्तव्य आहे.'' परंतु बुद्ध म्हणतात, ''निर्दोष चारित्र्य मिळवा, नवीन व्यक्तित्व उत्क्रांत करा.'' कारण आपले सारे जीवनच बदलून टाकल्याशिवाय आपणातील सुप्तात्मा जागृत होणार नाही, प्रकट होणार नाही. जे वास्तविक आपले स्वरूप, जे आपण आहो ते होणे, हे मानवाचे ध्येय आहे. प्रत्येकाने आत्मरूपाकडे वाढत गेले पाहिजे. आपल्या आत्म्यात वाढत गेले पाहिजे. बुद्ध एक धोक्याची सूचना सदैव देतात, की जरी आपण सत्य दृष्टीने दैवी असलो, तरी प्रत्यक्ष व्यवहारात आपण तसे वागत असतो असे नाही. प्रत्यक्ष जीवनात दिव्यता प्रकट करणे हे आपले ध्येय आहे. ''याच जीवनात आपण शांत होतो, अवाक होतो, निर्विकार होतो. आत्मा ब्राह्मीभूत होतो व त्या आनंदात आत्मा विहरतो.'' विश्वात्मा प्रकट व्हावा म्हणून सारी बंधने, सारे पडदे दूर केले पाहिजेत. त्यासाठी सतत प्रयत्नपूर्वक नैतिक अभ्यास हवा. उपनिषदे म्हणतात, की ज्ञानाने मनुष्य मुक्त होतो. बुद्ध म्हणतात, की ज्याने सर्व इच्छांचा त्याग केला, ज्याने वासनाजय केला, तो सुखी होतो. ज्याचे जीवन विषयवासनेने बरबटलेले आहे, भीतीने व द्वेषाने अंध झालेले आहे, क्रोधाने व नीचतेने मलिन झालेले आहे, त्याला ते आत्मदर्शन नाही. त्याला तो ब्रह्मानंद मिळत नाही. बुद्ध ध्येयापेक्षा ध्येयाकडे नेणाऱ्या मार्गावर अधिक जोर देतात. विश्वात्मक स्वरूपाची सत्यता बुद्ध सूचित करतात. हा जो विश्वात्मा, परमात्मा, त्याचा या बदलत्या नामरूपात्मक संघाताशी गोंधळ मात्र करू नये.

बुद्धांच्या काळात जे विचार होते, त्यातूनच त्यांनी निर्वाणाची कल्पना घेतली. निर्वाण म्हणजे आनंदमय असे अंतिम ध्येय. त्या ध्येयासाठी सर्वांनी प्रयत्न करावा हा बुद्धांचा विचार उपनिषदांतील मोक्षाच्या विचारांशी समान असा आहे. उपनिषदांत व भगवद्‌गीतेत निर्वाण शब्द आला आहे. निर्वाण म्हणजे वासनांचा क्षय, ब्रह्माशी ऐक्य. निर्वाण म्हणजे केवळ नाश नव्हे; केवळ अभाव, केवळ शून्यता नव्हे. निर्वाण म्हणजे वासना-विकारांची आग शांत होणे, विझून जाणे; निर्वाण म्हणजे परिपूर्णतेशी आनंदमय ऐक्य अनुभविणे. निर्वाण-प्राप्ती झाली की कार्यकारणभावाची साखळी

तुटते. मग जन्ममरण नाही. ब्रह्मप्राप्ती, ब्रह्मभूत हे शब्द परमोच्च दशा दर्शविण्यासाठी म्हणून बुद्ध वापरतात. ही परमधन्य दशा या जन्मातही प्राप्त करून घेता येते, शरीर पडण्यापूर्वी मिळविता येते. ज्या निर्वाणात जन्म नाही, जरा नाही, आजारीपण नाही, मरण नाही, ज्या निर्वाणात दु:ख नाही, मलिनता नाही, असे ते निर्वाण आपण स्वत: कसे मिळविले, ते बुद्धांनी वर्णिले आहे. विशाख नावाच्या एका मनुष्याने जेव्हा भिक्षुणी धम्मदिना हिला निर्वाण म्हणजे काय असा प्रश्न केला, तेव्हा ती म्हणाली, ''विशाख, तू फारच पुढचे प्रश्न विचारतोस. अरे, सर्व धार्मिक जीवनाचा निर्वाण हा हेतू आहे. सर्व धर्ममय जीवनाची इतिकर्तव्यता म्हणजे हे निर्वाण. हे धर्ममय जीवन शेवटी निर्वाणसिंधूत जाऊन मिसळते. ते निर्वाण समजून घेण्याची तुला इच्छाच असेल, तर तू स्वत:च बुद्धदेवांकडे जाऊन त्यांनाच विचार. ते जे काही तुला सांगतील ते नीट ऐक.'' विशाख बुद्धदेवांकडे गेला. बुद्ध त्याला म्हणाले, ''भिक्षुणी धम्मदिना विदुषी आहे; परिणतप्रज्ञा आहे; तिने तुला सांगितले तेच मीही तुला सांगितले असते. तिने उत्तर दिले तेच बरोबर आहे. तेच लक्षात ठेव.'' आपण याच जन्मात दु:खाचा शेवट करू शकू. मरणोत्तर स्थितीची अभिवचने देण्यात बुद्धांना समाधान नाही. या जन्मातच ते दिव्यदर्शन होऊ शकते, अशी बुद्ध ग्वाही देतात. जे कोणी त्या पवित्र पर्वताच्या शिखरावर चढतात, त्यांची मुखमंडले तेजाने चमकतात. एक दिव्य प्रभा त्यांच्या तोंडाभोवती पसरते. मोगल्लान सारिपुत्ताला म्हणाला, ''तुझी बुद्धी निर्मळ झालेली दिसते, नि:शंक दिसते. मित्रा, तुझ्या शरीराचा रंगही किती सुंदर व निर्मळ आहे. तुला अमृतत्व तर नाही ना मिळाले?'' निर्वाण ही याच जन्मात प्राप्त करून घेण्यासारखी गोष्ट आहे आणि या निर्वाणाचा बौद्धिक व सामाजिक कर्माशी विरोध नाही. निर्वाणात अहंची जाणीव, स्वत्वाची जाणीव संपूर्णपणे नष्ट होते. एकदा दोन शिष्य बुद्धांना म्हणाले, ''भगवन, जो ज्ञानी झाला तो सर्व बंधनातीत असतो. त्याने जीवनाची सारी बंधने तोडलेली असतात. मी अमुक होईन, तमुक होईन, अशी आशा-आकांक्षा त्याला नसते.'' माझ्यापेक्षा कोणी अधिक चांगला, कोणी कमी चांगला किंवा कोणी माझ्याबरोबरीचा अशा प्रकारची जाणीव त्याला नसते.'' बुद्ध म्हणाले, ''जे खरी नाणी आहेत, तेसुद्धा अशाच रीतीने ज्ञानाचे स्वरूप वर्णितात. परंतु 'अहं' विषयी ते काही बोलत नाहीत. आपण काय मिळविले ते ते सांगतात. परंतु आत्म्याच्या बाबतीत मुके असतात.''

निर्वाण हे भौतिक नाही. या पृथ्वीशी, या मर्त्य जगाशी त्याचा जणू संबंध नाही. कारण ज्यांना निर्वाण प्राप्त होते ते जन्म-मरणाची खंतच बाळगीत नाहीत. त्याविषयी ते उदासीन असतात. निर्वाण स्वत:बरोबर परमोच्च सुखालाही घेऊन येत असते. थेर व थेरीगाथा यातील बहुतेक काव्याला निर्वाणाने प्रेरणा दिली आहे. मरताना या शरीराचे काय होते? ज्याला निर्वाण मिळाले त्याचे जीवन सर्वस्वी संपले का? की या इंद्रियगम्य जगाजवळचाच फक्त त्याचा संबंध संपतो आणि ती जी खरी सत्यता, तेथील अस्तित्वाचा आनंद तो मुक्तात्मा अनुभवू लागतो? या प्रश्नाचे उत्तर बुद्ध देऊ इच्छित नाहीत. ते टाळतात. निर्वाण म्हणजे केवळ शून्याकार असे मानावयास धार्मिक ग्रंथांतील पुरावा मिळणे फार कठीण आहे. बौद्धधर्माच्या ग्रंथांतून जेथे जेथे पावित्र्याच्या परमधन्य स्थितीचे अत्यंत वक्तृत्वपूर्ण वाणीने वर्णन केलेले असते, तेथे ते वर्णन खात्रीने शून्यतेचे नसते. नैतिक मार्गाने मिळणाऱ्या परिपूर्णतेचे वर्णन म्हणजे का मरणाचे, जीवनाच्या अभावाचे वर्णन? असे असणे शक्य नाही. निर्वाण म्हणजे शून्यता नव्हे, अभाव नव्हे. उदात्त व उच्च मार्गाचे प्राप्तव्य म्हणजे निर्वाण. निर्वाण म्हणजे वासना-विकारांपासून स्वातंत्र्य. निर्वाण म्हणजे अखंड शांती, चिरशांती. देवही ज्याची आशाआकांक्षा करतात असे जीवन म्हणजे निर्वाण. असे हे निर्वाण शून्यमय कसे असू शकेल? स्वत:चे अलग अस्तित्व राखणारी सारी बंधने गळून जाणे म्हणजे निर्वाण. ज्या ज्या गोष्टींमुळे आपण भेदभाव निर्मितो त्या सर्व गोष्टींना तिलांजली देणे म्हणजे निर्वाण. निर्वाण म्हणजे दिक्कालातीत अशा अनंततेतील, अशा सर्वात्मकतेतील स्थिर असे जीवन. पूर्वीच्या जीवनाचे हे केवळ शुद्धीकरण नसते, तर आजच्या व मागच्या सर्व आकारांचे, सर्व स्वरूपाचे ते समाप्तीकरण असते. निर्वाण म्हणजे जे येथे या क्षणी आहे, त्याहून काही तरी भिन्न असे जीवन. ज्या वेळेस ''मृत्युहीन, अंतहीन, चांचल्यहीन'' अशी विशेषणे निर्वाणास लावण्यात येतात, त्या वेळेस ही विशेषणे आपल्या या क्षणीच्या जीवनास उद्देशून योजिलेली नसतात, तर परिपूर्ण स्थितीची ती निदर्शक असतात. पूर्ण पुरुषास, मुक्त पुरुषास लावलेली ती विशेषणे असतात. ''ज्याला ते अमृततत्त्व लाभले त्याला कोणते माप मापू शकेल? ज्याअर्थी जीवनाचे सारे आकार तेथे विलीन होतात, त्याअर्थी वाणीचेही सारे मार्ग तेथे खुंटतात.''

अग्नि-वच्छगोत्त सूत्तामध्ये म्हटले आहे, की इंधन संपताच ज्वाळाही संपते, त्याचप्रमाणे वासना-विकार नष्ट होताच जीवनाचे जळण संपते; परंतु दृश्य अग्नी

विझणे म्हणजे संपूर्ण विनाश नव्हे. फक्त विषयवासना विझते. अशांतीची आग विझते. पसेनदि नावाच्या राजाला भिक्षुणी खेमा म्हणते, ''राजा, बुद्धदेवांनी हे सारे विवरण करून सांगितलेले नाही.''

''बुद्धांनी का नाही सांगितले?'' राजा विचारतो.

''राजा, तुला मी एक प्रश्न विचारते व तू त्याचे उत्तर दे. गंगेच्या वाळूचे कण मोजील असा कोणी तुझ्याजवळ आहे का? असल्यास सांग.''

''हे पवित्रे, असा माझ्याजवळ कोणी नाही.''

''राजा, समुद्राचे पाणी इतके आहे असे मोजून सांगणारा कोणी तुझ्याजवळ आहे का?''

''हे पवित्रे, असा कोणी माझ्याजवळ नाही.''

''का बरे नाही?''

''कारण, हे पवित्रे, सागर अनंत आहे, अगाध आहे.''

''राजा, त्याप्रमाणेच ज्या शरीरामुळे तथागताचे तुम्ही वर्णन करू शकता ते शरीर नष्ट होते. उन्मळून पडलेल्या ताडाच्या झाडाप्रमाणे शरीर शून्य होऊन पडते. ते भविष्यकाळी पुन्हा उठत नाही. नामरूपापासून मुक्त झालेला, देहापासून मुक्त झालेला हा तथागत, सागराप्रमाणे गहन-गंभीर, अगाध, अनंत असा असतो.''

जो मुक्तात्मा होतो, तो सर्व नाशिवंत संघातांपासून मुक्त होतो; परंतु याचा अर्थ तो शून्य होतो असा नाही. तो काही तरी सत्यरूपाने, शाश्वत रूपाने असतोच. अवर्णनीय असे ते स्वरूप असते. ज्या वेळेस यमक म्हणाला, की ज्याने सारे पाप धुतले आहे, ज्याच्यातील सारे असत् नष्ट झाले आहे, असा भिक्षु मरणोत्तर उरत नाही, त्याला मरणोत्तर जीवन नाही, तेव्हा बुद्ध म्हणाले, ''हे पाखंड मत आहे. ही नास्तिकता आहे. या जीवनातही संताचा स्वभाव समजणे कठीण आहे. मुक्ताचे चरित्र समजणे बुद्धीच्या पलीकडचे आहे.'' एकदा वत्साला बुद्ध म्हणाले, ''नामरूपासून जो मुक्त होतो, तो अनंत होतो. ज्याप्रमाणे सागर मोजता येत नाही, तद्वत सिद्ध पुरुषही अपरिमेय आहे.'' तर्कातीत अशी ती जीवनाची दशा आहे. त्या स्थितीचे नीट आकलन करता येणार नाही. 'नेति नेति' अशा नकारानेच त्या स्थितीचे वर्णन करता येईल. अशा स्थितीच्या वर्णनात अशी नकारात्मक विशेषणेच पदोपदी येतात. ती दैवी गुहा, तो अनंत ईश्वर, तो पारहीन सागर, ते अनंत वाळवंट, असे

शब्द या नेति नेति धर्मतत्त्वज्ञानात येतात. ती जी पूर्ण स्थिती, ती आपल्या ह्या सामान्य जीवनासारखी नसते; परंतु असे असले तरी काही तरी भावरूप असे प्रत्यक्ष जीवन तेथे असते यात शंका नाही. तेथे सारा शून्याकार नसतो. एवढेच की ती अलौकिक दशा वाणीने वर्णिता येत नाही; मनाने आकलिता येत नाही. हे जगत, हा संसार म्हणजे सतत फरक होत जाणारा अखंड प्रवाह; परंतु निर्वाणातील जीवनात अखंड शांती. निर्वाण म्हणजे अनंताच्या कुशीतील चिरविश्रांती. सामान्य अशा या मानवी जीवनातील जाणिवेपेक्षा त्या निर्वाणदशेतील जाणीव अशी निराळी असते. त्या जाणिवेला निराळेच नाव दिले पाहिजे. तिला अनात्म जगाची नेणीव म्हणा वाटले तर. आपणास या संसारात या अनात्म जगाची जाणीव असते; या बाह्य जगाची जाणीव असते. उपनिषदात म्हटले आहे, ''तो जरी जाणत नसला, तरी सारे जाणतो.'' कारण ज्ञाता व जाणणे या गोष्टी अलग कशा करता येतील? जाणणे नष्ट होत नाही; परंतु ज्याला जाणावे असे पृथक् काही उरतच नाही. ''ते पाण्याप्रमाणे पारदर्शक बनते. ते एक आहे, अद्वितीय आहे, साक्षी आहे. ब्रह्माचे जग ते हे.'' सारे स्फटिकासारखे स्वच्छ व पारदर्शक. तेथे कसला अंधार नाही, कशाचा विरोध नाही, तेथे चंचलाचे नावही नाही. बृहदारण्यक उपनिषदाच्या त्या सुप्रसिद्ध उताऱ्यात याज्ञवल्क्य आपल्या पत्नीस–मैत्रेयीस–म्हणतात, ''मुक्तात्मा परमोच्च सत्याशी, परब्रह्माशी एकरूप होतो. दुसऱ्या कोणत्याही शब्दात त्याचे वर्णन करता येणार नाही. ज्याप्रमाणे मिठाच्या खड्याला आतबाहेर निराळेपणा नाही, अंतर्बाह्य त्याची एकच चव, त्याप्रमाणे या आत्म्याला आतबाहेर दुसरे काही एक नसून त्याच्या अंतर्बाह्य एक ज्ञान संपूर्णपणे भरलेले असते. जीवात्मा या पंचभूतांपासून जन्मतो व त्यांच्याबरोबर गळतो. मरणोत्तर मग जाणीव नसते.'' हे शब्द ऐकून मैत्रेयीची वृत्ती जरा गोंधळल्यासारखी दिसते. तेव्हा याज्ञवल्क्य पुन्हा तिला म्हणाले, ''गोंधळात पाडणारे असे मी काहीच सांगितले नाही. हे प्रिये, खरोखरच तो आत्मा शाश्वत आहे, अविनाशी आहे. जोपर्यंत द्वैत आहे तोपर्यंत एक दुसऱ्यास बघतो, एक दुसऱ्यांची चव घेतो, एक दुसऱ्यास अभिवादन करतो, एक दुसऱ्याचे ऐकतो, एक दुसऱ्यास स्पर्श करतो, एक दुसऱ्यास जाणतो; परंतु जेव्हा सर्वत्र आत्माच भरलेला असतो, आत्माच भरलेला दिसतो, त्या वेळेस आपण दुसऱ्या कोणाला बघावे, कोणाचे ऐकावे, कोणाला स्पर्शावे, कोणाला हुंगावे, कोणाला जाणावे? ज्याच्या शक्तीमुळे आपण हे सारे

जाणतो, त्याला आपण कसे जाणावे? त्या आत्म्याचे नेति नेति असेच वर्णन करावे लागते. तो दुर्बोध आहे. त्याचे ज्ञान होणे कठीण. तो अविनाशी आहे, कारण त्याचा नाश होणे शक्य नाही. तो कोणाशी बद्ध होत नाही म्हणून तो बंधनातीत आहे. तो बंधन जाणत नाही, दु:ख जाणत नाही, नाश जाणत नाही. हे प्रिये, त्या ज्ञात्याला आपण कसे जाणावे?'' तो प्रकाशाचा प्रकाश आहे. एका सुंदर उताऱ्यात म्हटले आहे, ''जे प्रज्ञावंत त्या ब्रह्माला स्वत:च्या आत्म्यात पाहतात, त्यांना चिरशांती मिळते. इतरांना नाही. ते ब्रह्म ते हे, असे ते म्हणतात व अनिर्वचनीय आनंद अनुभवितात. तर मग त्याला कसे जाणायचे? त्याला स्वत:चा प्रकाश आहे, की ते ब्रह्म दुसऱ्यापासून प्रकाश घेते; तेथे सूर्य प्रकाशत नाही; चंद्रतारे प्रकाशत नाहीत; तेथे वीज नाही, अग्नी नाही. जेव्हा आत्मा प्रकाशतो, तेव्हा सारे प्रकाशित होते. त्याच्या प्रकाशाने सारे जगत प्रकाशित होते.''

उदानामध्ये बुद्धांच्या निर्वाणाच्या कल्पनेचे बरोबर वर्णन आहे. उदानात म्हटले आहे की, ''ती जी अंतिम सत्यता, ती तृष्णेच्या, अज्ञानाच्या, द्वैताच्या पलीकडे आहे; तेथे ना आसक्ती, ना मोह. ती सत्यता म्हणजे परतीर; ती सत्यता स्थिर आहे, शाश्वत आहे; कशानेही ती सत्यता विचलित होत नाही.'' असे हे निर्वाण आहे. उदानातील हे वर्णन बुद्धांच्या निर्वाणास तंतोतंत लागू पडते. बुद्धांनीच स्वत: म्हटले आहे, की ''असा एक लोक आहे, की जेथे ही पृथ्वी नाही; तेथे वायू नाही, प्रकाश नाही; तेथे ही पंचमहाभूते नाहीत; तेथे दिक्काल नाहीत; तेथे कशाचे भान नाही किंवा कशाचे भान नाही असेही नाही; तेथे ही अनंत जाणीव नाही, तेथे शून्यताही नाही; तेथे ना इहलोक ना परलोक; ना चंद्र ना सूर्य. मी त्याला येणेही म्हणत नाही वा जाणेही म्हणत नाही; ते तिष्ठणेही नाही. तेथे ना गती ना विश्रांती; तेथे ना जन्म ना मरण; तेथे स्थिरता नाही, बदलता अखंड प्रवाह नाही; तेथे आधार नाही, काही नाही; अशी ती स्थिती म्हणजे दु:खाचा अंत.'' बुद्धांनी वर्णिलेली ही स्थिती दिक्कालात मावू शकत नाही. ही स्थिती काळाच्या अतीत आहे, सर्व अवकाशांच्या अतीत आहे. ही स्थिती सर्व चांचल्याच्या, सर्व फेरबदलांच्या, स्थित्यंतरांच्या अतीत आहे. त्या स्थितीत कर्म नाही, दु:ख नाही. त्या स्थितीत गती वा विश्रांती समानार्थकच आहेत.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय सातारा
दाखल क्र. ११५७३५ अनुक्रमांक ८५४०४
किंमत २५०/- पाने २०८

+++

८

बुद्धांच्या स्वतःच्या विचारानुरोधाने जर आपण पाहू, त्यांच्या काळातील प्रवृत्तींच्या अनुसार जर आपण पाहू, तर त्यांच्या शिकवणीत अज्ञेयवाद किंवा शून्यवाद पाहून जाणे योग्य नाही. बुद्धांच्या शिकवणीत याहून अन्य अर्थ पाहणे शक्य आहे. इतकेच नव्हे, तर तेच योग्यही आहे. ते जे शाश्वत साधुत्व व शिवत्व, ते जे निरपेक्ष परमपद, त्याचा जर अस्तिरूप अनुभव बुद्धांना आलेला नसता, तर या नाशिवंत भंगुर मानवी जीवनांतील उणिवांचा जो गंभीर खोल अनुभव त्यांना आला तोही येणे अशक्य होते. शाश्वताच्या दर्शनाशिवाय या अशाश्वताचे ज्या प्रकारचे दर्शन बुद्धांना झाले, तसे होणे अशक्य आहे. शाश्वताच्या महान अनुभवाच्या पार्श्वभूमीवरच सापेक्ष व विनाशी अशा जगाची कल्पना नीट येऊ शकते. त्या निरुपाधिक व शाश्वत सत्याचे वर्णन बुद्ध नेति नेति रीतीनेच करतात किंवा अजिबात टाळतात. याचा अर्थ एवढाच, की त्या परम सत्याचे वर्णन करणे वाणीच्या पलीकडचे आहे. ते परम सत्य सर्व कल्पनांच्या, विचारांच्या अतीत आहे. ज्याची ज्याची आपण निश्चित कल्पना करू शकतो अशा वस्तूमात्राच्या पलीकडे ते आहे. अद्वैत वेदान्ताचे जे परब्रह्म किंवा ख्रिस्ती गूढवादी संतांचा जो परमेश्वर, त्याहून बुद्धांचे निर्वाण निराळे करणे कठीण आहे. अशा त्या शाश्वत सत्याच्या थोर आधारावरच बुद्ध हे जगाचे अनुभव तुच्छ ठरवितात; परंतु जगत तुच्छ मानायला लावणारा जो तो शाश्वत सत्याचा अनुभव वा त्याचे वर्णन करायला बुद्ध नाकारीत. कारण प्रत्यक्ष पुराव्याने ती गोष्ट सिद्ध करणे

अशक्य असे. तर्कातीत अशी ती वस्तू आहे. भारतीय मनोबुद्धीला त्या परमश्रेष्ठ सत्याच्या साक्षात्काराचे वर्णन करताना मुके राहणे श्रेयस्कर वाटते. त्या दिव्य अनुभवाला, त्या परम सत्याला, तर्ककर्कश व्याख्यांत बसविणे, तर्काच्या क्षेत्रात आणणे ही गोष्ट करताना कदाचित क्वचित उपनिषदे दिसतील. काही थोर आचार्यही या सत्स्वरूपाचे अत्यंत सूक्ष्म असे वर्णन देऊ बघतात; परंतु बुद्धांनी अशा प्रयत्नांचा संपूर्णपणे त्याग केलेला आहे. ते दुसरे धर्माचार्य एका टोकाला, तर बुद्ध दुसऱ्या टोकाला. अत्यंत तेजस्वी प्रकाशछायेची किंमत उपेक्षितो. बुद्धांनी दिलेली कारणे समजण्यासारखी आहेत. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकात हिंदुस्थानात निर्भय विचार मांडले जात होते, प्रखर भाषा बोलली जात होती, शेकडो प्रकारचे धार्मिक अनुभव सांगण्यात येत होते. मानवजातीच्या इतिहासात विचारांची अशी निर्भयता, वाणीची अशी स्पष्टता व तीव्रता व धार्मिक अनुभवांची अशी अपार विविधता क्वचितच कोठे आढळते. बुद्धांच्या काळात धर्मभोळेपणाही होता. वितंडवादही होता. समाजात अंधश्रद्धाही होती, प्रखर बुद्धिवादही होता. अज्ञानी लोकांचा भोळसटपणा व विद्वानांचे वितंडवादी पांडित्य यांत स्पष्ट रेषा काढणे कठीण झाले होते. सारा गोंधळ होता. अशा त्या गोंधळाच्या काळात बुद्ध मानवी स्वभाव व अनुभव यांतील सत्य गोष्टींवर भर देत. मानवी अनुभव व स्वभाव नीट पारखून घ्या असे ते म्हणत. केवळ आप्तवाक्य म्हणून काही मानू नका, उगीच विश्वास ठेवू नका. बुद्धीला जो पटवील त्याचा अधिकार. ज्याला अंतर्दृष्टी आहे, जो खोल बघतो, तो अधिकारी. प्रत्यक्षाचा खोल अनुभव जो घेतो, अंतर्भेदी दृष्टीने प्रत्यक्षात जो पाहतो, त्याला मानवी स्वभाव कळतो. ज्याने सांगितलेले आपणास पटते, त्याच्यासमोर आपण नमतो. दूरदर्शीपणामुळे, आदरामुळे किंवा भीतीमुळेही पुष्कळ वेळा आपण आज्ञाधारक होत असतो; परंतु यामुळेच जर एखाद्याला आपण मानीत असू, तर त्याची सत्ता आहे, त्याचा खरा अधिकार आहे असे म्हणता येणार नाही. प्रत्येकाने स्वत: विचार करावा अशी बुद्धांची निक्षून सांगी असे. स्वत:ची बुद्धी वापरण्याचे धैर्य प्रत्येकाने दाखवावे असे ते नेहमी सांगत. नानाविध उपपत्ती व मीमांसा, निरनिराळ्या विचारप्रक्रिया यांच्या चक्रात न पडता प्रत्यक्ष वस्तुस्थिती काय आहे ते प्रत्येकाने पाहावे, असे ते म्हणत. तसेच दुसरीही एक गोष्ट ते सांगत. प्रत्येकाने स्वत:च्या प्रयत्नाने सत्याचा साक्षात्कार करून घ्यावा, तो अनुभव घ्यावा. निरनिराळ्या मतांचे वादविवाद मनुष्याला पटकन काही तरी घ्यायला लावतात.

या वादविवादांनी माणसे शीघ्रज्ञानी जणू होतात. शांतपणे अविरत प्रयत्नाने सत्याचा शोध करणे त्यांच्या हातून होत नाही. सत्य ही अत्यंत पवित्र अशी पुरुषार्थ प्राप्त करून घेण्यासारखी वस्तू आहे. चर्चापटूंचे खेळणे म्हणजे सत्य नव्हे. जो स्वतःचा ज्ञानप्रकाश पेटवीत नाही, त्याला आत्म्याच्या जगात पाहता येणार नाही. तिसरी गोष्ट म्हणजे बुद्धांना केवळ बुद्धिप्रधान लोकांची करमणूक करायची नव्हती, तर बहुजनसमाजाला थोर व उदार असे विचार द्यावयाचे होते. सद्गुणांचे प्रत्यक्ष आचरण हाच धर्ममय जीवनाचा खरा राजमार्ग, असे जनतेस सांगावयास बुद्ध उत्सुक होते. चौथी गोष्ट म्हणजे आस्तिकवादी धर्मशास्त्र निरपेक्ष परब्रह्माची सापेक्ष संसाराशी गाठ घालताना त्या निरुपाधिक परब्रह्माला सोपाधिक व सापेक्ष बनविते. हे धर्मशास्त्र ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा मांडू लागते. ईश्वर म्हणजे सापेक्ष जगातीलच जणू एक वस्तू. ईश्वर आहे म्हणणारे व नाही म्हणणारे, दोघेही त्या ईश्वराकडे बाह्य दृष्टीने, भौतिक दृष्टीने पाहू लागतात. ईश्वराच्या अस्तित्वासंबंधीची अपार गूढता हे लोक ध्यानात घेत नाहीत. ईश्वराला सोपाधिक बनविणारे हे लोक त्याच्याकडे सृष्टिकर्ता, पिता, प्रियकर, सखा इत्यादी नात्यांनी पाहू लागतात. ईश्वराला उपाधींत पाहणारे जे हे धर्मशास्त्र, ते ईश्वराचा सांत प्रतीके व उपाधी यांच्याशी संबंध जोडून सारा गोंधळ निर्मिते. वास्तविक ते जे दिव्य आध्यात्मिक तत्त्व ते स्वयंभू आहे. ते निरपेक्ष आहे. त्याच्या अस्तित्वासाठी दुसऱ्या वस्तूंच्या जवळच्या संबंधाची आवश्यकता नाही. ते स्वयंप्रकाशी तत्त्व आहे. सृष्टीच्या पसाऱ्याहून, आपल्या मनातील विचारांहून अनंत पटीनी मोठे व निराळ्याच गुणधर्माचे असे ते तत्त्व आहे. म्हणून बुद्ध अशा साकार परमेश्वरापासून दूर राहतात. ईश्वरासंबंधीच्या या सगुण कल्पना त्यांना पसंत नसत. ईश्वर परिपूर्ण आहे असे कल्पून, सृष्टीतील सारी पूर्णता त्याच्या ठायी आहे असे मानून, मनुष्य शेवटी कर्मवीर न होता त्या ईश्वरावर श्रद्धा ठेवून बसणारा होतो. प्रयत्नाची जागा श्रद्धा बळकावते. प्रार्थना म्हणजे ईश्वराजवळ खासगी हितगूज, एक प्रकारची देवघेव, सौदा, असे होते. जगातील ऐहिक वस्तू मिळाव्या म्हणून आपण प्रार्थना करू लागतो. स्वार्थाची ज्वाळा अधिकच भडकू लागते. याच्या उलट बुद्धांचे ध्यान आहे. ध्यान म्हणजे स्वतःत बदल करणे. आत्म्याला नवीन बनविणे. जीवनात क्रांती करणे; पाशवी वृत्ती नष्ट करून, परंपरागत आलेल्या सामाजिक वृत्ती, वंशपरंपरा आलेल्या केवळ अनुकरणात्मक वृत्ती नष्ट

करून स्वतःचा नवीन विकास करून घेणे. पाचवी गोष्ट म्हणजे त्या परम सत्याचे स्वरूप तर्कातीत आहे. त्या सत्याविषयी तर्काच्या परिभाषेत बोलण्याचा आग्रह धरणे वेडेपणा आहे. या सर्व गोष्टी सोडून जे निर्वाण उरते ते केवळ शून्यमय नाही. ते निर्वाण अस्तिरूप आहे; ते निर्वाण म्हणजे अंतिम सत्यस्वरूप. या अंतिम सत्यालाच धर्म म्हणणे बुद्ध पसंत करीत. परब्रह्माच्या या अंतिम सत्याविषयी बुद्ध नितांत मौन स्वीकारतात. या त्यांच्या मौनाला उपनिषदात आधार आहे. उपनिषदे उद्घोषितात, ''तेथे दृष्टी जात नाही, वाणी जात नाही, मन जात नाही. ते ब्रह्म कसे शिकवावे हे आम्हाला समजत नाही.''

बुद्धांच्या विचारातील काही अपूर्णता मी जाता जाता सूचित करतो. बौद्धधर्माच्या पुढील इतिहासात बौद्धधर्माचा हिंदू धर्माशी संबंध आला तेव्हा या उणिवा दिसून आल्या. (१) तत्त्वज्ञान ही मानवी मनाची एक भूक आहे, आवश्यक अशी गरज आहे आणि जीवनाचे जे अंतिम प्रश्न त्यांविषयीचे मत स्पष्ट न सांगणे ही गोष्ट बुद्धासारख्या थोर विभूतीने जरी उपदेशिली, तरी ती यशस्वी झाली नाही. बुद्धांचे श्रोते ही वृत्ती स्वीकारायला सिद्ध झाले नाहीत. निश्चित मार्गदर्शनाच्या अभावी पुढे बुद्धांवर नाना प्रकारच्या आध्यात्मिक विचारप्रक्रिया लादण्यात आल्या. बुद्धधर्माच्या आरंभीच्या वाढीत या गोष्टी दिसून येतात. (२) धर्म म्हणजेच अंतिम सत्यता असे बुद्ध मानीत; परंतु व्यावहारिक दृष्ट्या ही गोष्ट तितकीशी जवळची, प्रत्यक्ष, इंद्रियगम्य अशी वाटेना. धर्म म्हणजेच परमेश्वर ही कल्पना अमूर्त वाटे. व्यवहारात थोडी मूर्त कल्पना हवी. आपण चक्रादी चिन्हांच्या साह्याने प्रार्थना करू शकू; परंतु चक्राची प्रार्थना करू शकणार नाही. अनुयायांनी पुढे बुद्धांनाच देवत्व दिले. (३) ब्राह्मणधर्मात ज्यांनी जगातील नानाविध अनुभव घेतले, अशांसाठी संन्यास राखून ठेवण्यात आला होता. तिन्ही आश्रमांतून गेल्यावर संन्यासाचा अधिकार; परंतु बुद्धांनी ब्रह्मचर्याश्रम व गृहस्थाश्रम यातून गेलेच पाहिजे असे नाही, असे सांगितले. वाटेल तेव्हा जगाच्या बंधनापासून, या उपाधीपासून मुक्त होण्यासाठी संसाराचा त्याग करावा.

बुद्धांच्या विचारात या अशा तीन अतिशयोक्ती राहिल्या. ज्या लोकांजवळ बुद्धांना झगडायचे होते, त्या काळातील आध्यात्मिक जीवनाला कोणत्या लोकांशी झगडावे लागत होते, तिकडे लक्ष दिले म्हणजे बुद्धांच्या विचारांतील या अतिशयोक्ती आपण समजू शकतो. परमेश्वराला साकार करून त्याला केवळ संसारातील एक

वस्तू बनवू पाहणारे सगुणधर्मवादी, विधिनिषेधांचे अवास्तव स्तोम माजविणारे कर्मकांडी आणि केवळ ऐहिकावरच भर देणारे जडवादी, असे त्या काळात पारमार्थिक जीवनाचे तीन शत्रू होते.

गंभीर आध्यात्मिक भाव, अति उच्च प्रकारचे नैतिक सामर्थ्य आणि अत्यंत योग्य असा बौद्धिक संयम या तीन गोष्टींचे प्रभावी मिश्रण बुद्धांमध्ये होते. स्वत:मधील दिव्यतेची मनुष्याला आठवण करून देणाऱ्या ज्या थोर विभूती या भूतलावर क्वचित कधी जन्माला येतात, अशांपैकीच बुद्धही एक आहेत. अशांच्या जीवनामुळे आध्यात्मिक जीवनाकडे आपण ओढले जातो. अशा विभूतींमुळे आध्यात्मिक जीवन सुंदर व आकर्षक वाटते. आपल्या हृदयात एक प्रकारचा नूतन अभिनव आनंद व उत्साह उचंबळतो. बुद्धांजवळ अलौकिक बुद्धी होती, परिणाम प्रज्ञा होती. त्यामुळे परमोच्च सत्याचे त्यांना आकलन होऊ शकले. त्याबरोबरच, त्यांचे हृदय प्रेमाने व कारुण्याने ओतप्रोत भरलेले होते. म्हणून या दु:खीकष्टी मानवजातीला दु:खांतून वाचविण्यासाठी त्यांनी सारे जीवन दिले. खरे थोर महात्मे मानवी व्यवहारात भाग घेतात, सेवेत रमतात. जरी त्यांचे आत्मे दैवी असले, तरी जगाला कंटाळून दूर न जाता या जगातच राहून जगाचा उद्धार ते करू पाहतात. सेवापरायण अशा थोर गूढवादी संतांचीच परंपरा, प्रेममय व सेवामय अशा थोर अध्यात्मवेत्त्यांचीच परंपरा बुद्धांनीही पुढे चालविली. त्या परंपरेला त्यांनी प्रतिष्ठा दिली, मान्यता दिली. त्यांचे दिव्य-भव्य व्यक्तिमत्त्व, त्यांची ऋषिसम दृष्टी, सत्यदर्शनाची त्यांची उत्कटता, जगताला संदेश सांगण्याची त्यांची तळमळ, दु:खीकष्टी जगताबद्दलची त्यांची जळजळीत प्रेमवृत्ती इत्यादी गोष्टींचा जे जे त्यांच्या सान्निध्यात येत, त्यांच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहात नसे. यामुळे बुद्धांच्या चरित्राभोवती चमत्कार व कथा यांचे सागर जमले. सामान्य माणसे अशा अद्‌भूत कथा निर्मून महापुरुषांविषयीचा आपला आदर प्रकट करीत असतात. आदरबुद्धी दाखविण्याचा हाच एक मार्ग त्यांना मोकळा असतो. बुद्ध हे इतर मानवांपेक्षा अनंत पटीने श्रेष्ठ व थोर होते, ते अलौकिक होते, अद्वितीय होते, ही गोष्ट सामान्य जनता एरव्ही कशाने सांगणार? कशाने सिद्ध करणार? आणि शेवटी तर पुढे पुढे संयमाच्या या थोर आचार्याला, प्रेमाच्या या महान उपदेशकाला, विवेकाचा व शहाणपणाचा मार्ग दाखविणाऱ्या या थोर ऋषीला देवत्व देण्यात येते. जनता त्यांना देव करते. सर्वज्ञ, पूर्णपुरुष, जगतदोद्धारक असे त्यांना

मानण्यात येते. जसजसा काळ जात आहे, शतकांपाठीमागून शतके जात आहेत, तसतसे बुद्धांचे मोठेपण अधिकाधिकच तेजस्वी व स्पष्ट असे दिसून येत आहे. साशंकवादीही आज त्यांच्याकडे गुणग्राहकतेने पाहत आहेत; अधिकाधिक पूज्यतेने व गंभीरतेने त्यांच्याकडे वळत आहेत. मानवजातीच्या इतिहासात युगप्रवर्तक अशा ज्या महनीय विभूती झाल्या, ज्यांनी स्वत:च्या काळाला व पुढील काळालाही संदेश दिला, अशांपैकीच भगवान बुद्ध हेही एक आहेत.

✦✦✦

माझी दैवते

आकाश

मानवी दैवतांनीच माझे जीवन समृद्ध केले आहे असे नसून मानवेतर दैवतांनीही माझ्यावर कृपेचा वर्षाव केला आहे. साऱ्या सजीव-निर्जीव सृष्टीवर मी पोसलो आहे. हे वरचे निळे निळे अनंत आकाश, हे सूर्य-चंद्र,हे अगणित तारे, हे मेघ आणि सायंकाळचे देखावे, आणि मंगल उषा नि गंभीर निशा, पाऊस, उचंबळणारा समुद्र, वाहणारी नदी, झुळझुळ वाहणारा ओढा, हे उंच डोंगर, आणि ही क्षमामूर्ती धरित्री, हे हिरवे वृक्ष नि ही फुले, ही पाखरे, आणि ही गाय नि हे मांजर, हा बैल नि हा कुत्रा, सर्वांमुळे माझे जीवन समृद्ध झाले आहे.

आकाश

निसर्ग ही मानवाला मिळालेली अमोल देणगी आहे. ती त्याची प्रयोगशाळा आहे; त्याचप्रमाणे ती आनंदशाळा आहे, आरोग्यशाळा आहे. निसर्गाचा अपरंपार परिणाम आपणावर होत असतो. वर-खाली अनंत लहान-मोठ्या वस्तू आपल्या सभोवती दिसत असतात. आपले लहानमोठे किरण फेकून त्या वस्तू आपल्या मनाला विकसित करीत असतात, जीवनला समृद्ध असतात.

हे अनंत आकाश

अशा या नैसर्गिक संभारात हे वरचे अनंत आकाश मनाला सर्वांहून अधिक ओढून घेते. मी तरी लहानपणापासून आकाशाचा उपासक आहे. या माझ्या उपासनेने माझ्यावर किती परिणाम झाला आहे त्याचे मी मोजमाप करू शकत नाही.

आकाशाचा सर्वांत मोठा परिणाम होतो तो व्यापकतेचा. संस्कृत भाषेत आकाशाला अनेक सुंदर नावे आहेत. त्यातील अनंत हे नाव मला फार आवडे. अनंत म्हणजे ज्याला अंत ना पार. पाहावे तिकडे दूर दूर आहेच. लहानपणी वाटायचे की आकाश जवळ आहे. एखाद्या झाडावर चढले की त्याला हात लागेल असे वाटे.

मी आईला म्हणत असे, ''आई, त्या घरावर एक शिडी ठेवली किंवा त्या आंब्याच्या झाडाला उंच कळक बांधला तर चढून आकाशाला हात नाही लावता येणार? देव ना वर राहतो? त्याचे ना ते अंगण ? तेथे आपल्याला जाता नाही येणार?''

आई म्हणायची, ''ते जवळ वाटले तरी फार दूर आहे.''

मला समजत नसे. मी विचार करीत बसे.

इंग्रजीतील एका कवितेत म्हटले आहे, ''लहानपणी देव लांब नसतो. झाडांची टोके आकाशाला, स्वर्गाला टेकलेली आहेत आणि तेथे जवळच देव असणार असे वाटते. लहानपणाची ती श्रद्धा मोठेपणी मावळते. देव दूर पळतो.''

पळतो एवढेच नाही, जणू नाहीसाच होतो.

क्षितिजाचे काव्य

आकाश जवळ उंच दिसले तरी तिकडे ते आपल्या भूमातेला भेटायला आले आहे असे वाटते. मैल, अर्धा मैल चालले म्हणजे आकाशाला भेटू , हात लावू असे वाटते. लहानपणी मी असा अनेकदा चालत गेलो आहे. दूरचे निळे निळे डोंगर तर आकाशाच्या कुशीत डोके घुसवीत आहेत असे वाटे; परंतु जावे तर आकाश आणखीच दूर. उंच डोंगरावर जावे तर ते पुन्हा आणखी उंच जावे. मैदानातून दूर चालत जावे तर क्षितिज दूर पळावे. कोठे आहे याचा अंत?कोठे आहे शेवट? ते अनंत आहे. जेवढे मिळेल तेवढे घ्या, या ध्येयाप्रमाणे ते आहे. ज्याप्रमाणे ध्येय उत्तरोउत्तर पुढेच जात असते त्याप्रमाणे आकाशाचे असते.

ते आहे की नाही?

आकाश म्हणजे शेवटी काय? हे जे वर निळे निळे दिसते ते काय? कवींनी अनेक कल्पना केल्या. ईश्वराच्या मंदिराचे का हे छत आहे? त्या छताला सूर्य-चंद्र टांगलेले आहेत. भव्य दीप टांगलेले आहेत. भव्य दीप लावलेले आहेत आणि ते अगणित तारे ! ते तेथे लावलेले आहेत. प्रभूचे अपार वैभव; परंतु खरोखरच हे

आकाश म्हणजे काय? वर वर जाल तर आणखी वर वर आहेच; परंतु जेथै त्याला हात लावता येईल असे काही कोठे आहे का? नाही. आकाश म्हणजे अनंत पोकळी. कोट्यवधी ताऱ्यांचा जो अपरंपार प्रकाश परावर्तित होत असतो, त्याचे आपणास निळे निळे असे रूप दिसते. आकाश म्हणून वस्तू नाहीच. जे निळे निळे दिसते त्याला आपण आकाश म्हणतो. कोट्यवधी तारे कोट्यवधी मैल दूर आहेत आणि त्या सर्वांच्या प्रकाशाचा अत्यंत दुरून दिसणारा पुंजीभूत परिणाम म्हणजे हे आकाश! हे निळे निळे अपरंपार दूर आहे आणि तेथे जाऊ तर काही दिसणारही कदाचित नाही.

विश्वाचे पांघरूण

सर्वांच्या पलीकडचे ते आहे. जणू या विश्वाला घातलेले पांघरूण आहे. म्हणून संस्कृतमध्ये त्याला अंबर म्हणजे वस्त्र असा शब्द आहे. प्रभूने आपल्या कृपेचे वस्त्र जणू पांघरवले आहे. सुंदर कल्पना. सर्वांना ते जवळ घेते. सर्वांना पोटात घेते. आकाशाच्या पलीकडे काही नाही. त्याच्या पोटात जणू विश्व.

निर्मळता, अलिप्तता

आकाशात अनेक वस्तू येतात, जातात; परंतु ते निर्लेप असते. प्रचंड वादळे उठतात. धुळीचे लोट वर उडतात. आकाश गढूळ झाल्यासारखे, धूसर झाल्यासारखे वाटते. पृथ्वीवरील कचरा, पाचोळा पंख फुटून वर उडू लागतो. निळ्या आकाशात जणू वर जाऊ बघतो. तुम्ही आम्हाला तुच्छ मानता? धुळीचा कण, केरकचरा म्हणता? आम्ही वर चढू शकतो. उंच उडू शकतो. वाऱ्यावर स्वार होऊन आम्ही आकाशाला भेटू. चंद्र सूर्यांना भेटू. त्या चमचम करणाऱ्या चिमुकल्या ताऱ्यांना भेटू असे जणू जगाला जाहीर करीत या वस्तू वर उडतात. आकाश झाकोळते; परंतु थोड्या वेळाने काय दिसते? ना धुळीचे लोट, ना पालापाचोळा पुन्हा ते अनंत आकाश निळे निळे वर शोभत राहते!

आकाशापासून अलिप्तता शिका

आकाश कोणाला प्रतिबंध करीत नाही. आलेत या, जाता जा,असे जणू ते मूकपणाने सांगत असते. सुख ना दुःख. केवळ अनासक्तता निर्विकारता. श्रीअरविंदांच्या 'योगासंबंधी सूचना' पुस्तकरूपानं प्रसिद्ध आहेत. त्यात ते म्हणतात, ''मन शून्य करण्याचा, केवळ रिकामे करण्याचा अभ्यास करावा. काही नाही. विचार दूर करीत आहोत. मानवी बुद्धीची खोली झाडून साफ करीत आहोत, ही भावना, ही

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

जाणीवही नसावी. काहीच नाही. नाही हेही नाही. ज्याप्रमाणे आकाशात पक्षी उडतात; धूळ उडते, धूर येतो, ढग येतात; परंतु हे सारे जाऊन मागे आकाश निळे असते; त्याप्रमाणे आपण मनाच्या आकाशात, हृदयाच्या, बुद्धीच्या आकाशात करावे. आलेत या, गेलेत जा. मी सारे झाडून मोकळा आहे. कशाशी संबंध नाही. अशा अभ्यासाने शांती मिळेल. मनावर, बुद्धीवर, हृदयावर बोजा पडणार नाही. आकाशापासून ही अलिप्तता शिका.'' अशा अर्थाचे विचार आहेत. आकाश हा सारा बोजा आपल्या छातीवर घेत नाही. परंतु आपले मन बघा. आपण असे भारावून गेलेले असतो. मनावर किती बोजा. कचऱ्याचे ढीग डोक्यावर घेऊन जणू आपण उभे असतो. मान-अपमान, आशा-निराशा, सुख, नाना दुःखे, नाना इच्छा, नाना वासना-कल्पना, नाना भावना, चिंता. सारे जणू हृदयाशी धरून बसतो आणि मग कुढत बसतो. दडपले गेलो असे ओरडतो. यातून निसटण्याचा मार्ग एकच, की या साऱ्या गोष्टी थोडा वेळ तरी हाकलून द्यायला शिकले पाहिजे. अनासक्तता, निःसंगता शिकायला हवी. आकाशाची हीच मोलाची शिकवण आहे. समाजात वागताना वावरताना वादळे येणार, टीकांचे विद्युत्पात होणार; उपहास, विडंबन, अपवाद निंदा यांची धुळवड होणार; परंतु या साऱ्या गोष्टी दूर ठेवून मनाचा तोल नि शान्ती निळ्या आकाशाप्रमाणे ठेवायला शिकणे ही यशाची, आनंदाची, शांतीची गुरुकिल्ली आहे.

तेथे आपपरभाव नाही

आकाश अलिप्त आहे, निःसंग आहे तसेच मोकळे आहे. ते आपले पंख मिटीत नाही. जणू अधिकच पसरते. आकाशाप्रमाणे मोकळे असावे. आत, गाठीचे काही नाही. लपवालपव नाही. छपवाछपव नाही. निःस्वार्थ मनुष्यच हे करू शकतो. कारण त्याला इतरांना वगळून काही मिळवायचे नसते. मोकळेपणा हवा असेल तर अधिकाधिक निःसंग, निःस्वार्थ व्हायला हवे. आकाशाजवळ काही नाही. ते केरकचरा, धूळ-धुरोळा जवळ ठेवीत नाही; त्याचप्रमाणे सूर्य, चंद्र, ताऱ्यांनाही जवळ घेत नाही. धूळ नको, हिरे-माणकेही नकोत. अशी वृत्ती झाली म्हणजे मोकळेपणा येतो. मग सारे मित्र. सर्वांना जवळ घेता येते. आकाशाला आपपर नाही. गरुडाने भरारी मारावी, चिमणीने भुरभुर करावी. सजल मेघाने लोंबावे, निर्जल मेघाने गर्जावे. सर्वांना प्रवेश सर्वांना परवानगी, सर्वांना जवळ घ्यायला अनंत हात सदैव सिद्धच आहेत!

आकाशाप्रमाणे मोकळे, व्यापक, नि:संग व्हावे असे मला वाटते. सर्वांना भेटावे. सर्वांपासून दूर जावे. म्हटले तर सर्वांचा, म्हटले तर कोणाचाच नाही; परंतु ही माझी वृत्ती टिकत नाही. कोठे तरी आसक्ती जडते. आपलेपणा निर्माण होतो. धडपडत राहणे हीच मौज आहे.

आकाश जणू ब्रह्माचे रूप

निळ्या निळ्या आकाशाचा रंग आपण राम-कृष्णांना दिला आहे. सर्वव्यापी आकाशाचा रंग ज्यांना आपण देव मानले त्यांना नाही द्यायचा तर कोणाला द्यायचा? ''नभासारखे रूप या राघवाचे'' असे समर्थ म्हणतात. नभाप्रमाणे निळा, नभाप्रमाणे व्यापक, जवळ परंतु दूर असा तो प्रभू आहे. जणू ईश्वराचे, परब्रह्माचे स्वरूप म्हणजे आकाश. आकाशावरून विश्वंभराची कल्पना करावी.

कवींच्या कल्पना

प्राचीन काळापासून आकाशाने कवींना वेड लावले आहे. वेदातील ऋषी विचारतो, ''खांबाशिवाय, आधाराशिवाय हे वरचे आकाश कोणी पसरले? कोणी उभे केले?'' कोणाचा हा विशाल तंबू? त्याला ना काठी, ना आधार! असे अरबी-पर्शियन कवी विचारीत. मुसलमान मशिदी, इमारती, यांना वर घुमट असतो. आकाशाची ती कल्पना आहे. विश्वाची प्रचंड मशीद प्रचंड प्रभूने उभारलेली आहे! आकाश हा तिचा घुमट आहे, अशी ती कल्पना आहे. आकाशाच्या घुमटाखाली बसून प्रार्थना करावी. विश्वाच्या भव्य इमारतीचा घुमट म्हणजे आकाश. किती सुंदर भव्य कल्पना! आणि अरबी लोक त्याला तंबू म्हणत. त्या तंबूत देवाने झुंबरे टांगली आहेत. दिवे लावले आहेत. तंबूला हिरे, माणके, मोती यांच्या झालरी आहेत, अशी वर्णने ते करतात. सृष्टिसुंदरीने तोंडावर घेतलेला हा बुरखा आहे, अशी ही एक सुंदर कल्पना कोठे तरी मी वाचली होती आणि ही उलटी कढई आहे अशी कल्पना आपल्याकडील काव्यात अनेक ठिकाणी आढळते.

हा वर पसरलेला समुद्र आहे, चंद्राची नाव तिच्यातून चालत आहे अशीही एक रमणीय कल्पना एका मराठी कवितेत आहे, 'न हे नभोमंडळ, वारिराशी' असे हा कवी म्हणतो. आणि तारका म्हणजे घाटीचा फेस असेही तो रूपक पुढे चालवून वर्णितो.

आकाश म्हणजे देव

पंचमहाभूतांपैकी आकाश हे परमभूत आहे! इतर भूते त्याच्या पोटात राहून व्यापार करतात. चिनी लोक आकाशाला देव मानीत. चिनी इमारतींना क़ळस नसतात. तो आकाशाचा अपमान होईल, असे त्यांना वाटते. आकाशात का असे घुसायचे? आकाश म्हणजे प्रभू. आकाश म्हणजे प्रभूची कृपा. त्याच्या कृपेची छाया. या आकाशाच्या घुमटाखाली कोणीही बसावे. आकाशाचे छत सर्वांसाठी. विश्वाचा हा निळा मंडप सर्वांसाठी–चराचरासाठी. चंद्र, सूर्य, तारे–सारे येथून सर्वांना प्रकाश देतात. देवाचा मंडपही सर्वांसाठी, देवाचा प्रकाशही सर्वांसाठी.

एखादे वेळेस वाटते की, आकाश म्हणजे प्रभूचा चित्रफलक आहे. याच्यावर नाना प्रकारच्या रंगाकृती तो चितारीत असतो. ढगांचे आणि सूर्याच्या प्रकाशाचे साहाय्य घेऊन तो विश्वचित्रकार येथे अद्‌भुत चित्रसृष्टी रचीत असतो. विशेषत: सायंकाळी त्याला वेळ असतो. सायंकालीन आकाशाची भव्यता कोण वर्णील? तेथे अनंत रंगांचे भांडार असते, क्षणाक्षणाला रंग बदलत असतात, आकार बदलत असतात. पाहून मनाला तृप्ती होत नाही आणि तास दोनतास ही रंगलीला करून पुन्हा सारे पुसले जाते! पृथ्वीवरच्या आपल्या लेकरांसाठी का प्रभू ही चित्रशाळा उघडीत असतो? मुलांची करमणूक व्हावी म्हणून आई त्याला रंगीबेरंगी खेळणी देते. त्याच्या पाळण्यावर खेळणी टांगते. त्या विश्वमातेचाही का असाच खेळ चालू असतो? तो का चित्रकलेचे शिक्षण देत असतो? का केवळ गंमत दाखवीत असतो? कोणाला माहीत! परंतु त्या श्रीरंगाला आपली कला दाखवायला आकाशासारखा भव्य नि निळा चित्रफलकच हवा. फळा दिसतो, वरची चित्रे दिसतात; परंतु चित्रकार मात्र अदृश्यच असतो!

हृदयाला आकाशाची उपमा पुष्कळ वेळा देतात. उपनिषदात हृदयाकाश, दहराकाश असे शब्दप्रयोग येतात. तो आत्मा कोठे आहे? खालील खोलखोल शुद्ध असा दहराकाशात तो आहे. हृदयाला आकाशाची उपमा शोभते. आकाशात ज्याप्रमाणे ढग, धूळ, धूर, केरकचरा यांची गर्दी होते; पक्षी उडतात; त्यात कोकिळाही असतात, गिधाडे, घाण करणारी वटवाघुळे असतात, त्याप्रमाणे या हृदयाकाशातही सारी गर्दी असते! आसक्तीचे ढग, विकारांची धूळ, वासनांचा गलबला सारे असते; परंतु आकाशात सर्वांच्या पलीकडे ज्याप्रमाणे स्वच्छ सूर्यनारायण असतो, त्याप्रमाणे

आपल्या हृदयातही खाली खोल तो प्रेमाचा, मांगल्याचा, ज्ञानाचा सूर्य असतो. शेवटी त्याचे अंतरंगी दर्शन होऊन कृतार्थ वाटते. आकाश ज्याप्रमाणे शेवटी धुतल्याप्रमाणे निळे निर्मळ शोभते, त्याप्रमाणे आपले हृदयही धडपडीनंतर निर्मळ प्रसन्न असे होते. तेथे मग सद्भावनांचे तारे चमकतात. ज्ञानाचा सूर्य तळपतो, भक्तिभावाचा चंद्र मिरवतो. हृदयाला आकाश नि समुद्र, यांच्या उपमा नेहमी देतात. एक वरचा समुद्र, एक खालचा समुद्र आणि दोहांशी तुलना केली जाणारा अंत:समुद्र! आकाशाचा अंत लागणे कठीण. तेथे काय काय तरी दिसते. सारे ब्रह्मांड जणू तेथे भरलेले असते.

मला आकाशाखाली झोपणे फार आवडते. लहानपणी दारात डोके ठेवून आकाशाकडे बघत, वारा घेत मी निजायचा. मग कोणी तरी माझे अंथरूण ओढून दार लावीत. अंमळनेरला मी पुष्कळदा बाहेर मोकळ्यावर निजत असे. आकाशाकडे बघत, डोळे मिटत. थंडी असली तर मी खूप पांघरूण घेतले आहे; परंतु त्या विश्वमाउलीनेही आपली निळी दुलई, निळी शाल माझ्यावर घातलेली आहे. तिच्या कुशीत मी आहे. मला ही भावना सद्गदित करीत असे, करते.

हे आकाशा, निळ्या निळ्या नभा, अनंत अंबरा, रविशशीनक्षत्रांनी भरलेल्या गगना, तुला कोणत्या शब्दांनी संबोधू, हाका मारू! 'गगनं गगनाकारं' हेच तुझे वर्णन! तुझ्यासारखे दुसरे कोण आहे? तुझ्याप्रमाणे निर्मळ, नि:संग, मोकळा, व्यापक असा माझा स्वभाव होत जावो. तुझ्याप्रमाणे सर्वांना जवळ घेण्याचे मला भाग्य लाभो. या जन्मी, शतजन्मी हे भाग्य वाढत जावो. तू माझा महान गुरू, सद्गुरू; तू मुकेपणाने मला अनंत शिकवलेस. तुझे उपकार किती मानू? प्रणाम, तुला अनंत प्रणाम!

✦✦✦

प्रकाश

आज तेज म्हणजेच प्रकाश या महाभूतांची महती मी गाणार आहे. उपनिषदांतील 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना मला फार आवडते. मानवी मनाची ती हाक आहे. 'हे प्रभो, अंधारातून मला तू प्रकाशाकडे ने!' याच्याहून अधिक सुंदर प्रार्थना जगात नसेल. सर्व धर्मांचे सार या सूत्रात आहे. पारशी धर्मात प्रकाश आणि अंधार यांचा सदैव झगडा वर्णिला आहे. अंधार पुन:पुन्हा आकाशाला घेरायला येतो; परंतु शेवटी अंधार पराभूत होतो. वास्तविक अंधार म्हणजे काही नाहीच! अंधार म्हणजे कमी प्रकाश एवढाच अर्थ. रवींद्रनाथांनी म्हटले, चूक अशी खरोखरच नसतेच. चूक म्हणजे कमी ज्ञान! अशा चुकांतूनच ज्ञान वाढत गेले. सारे ज्ञानमय आहे, असे वेदान्ती म्हणतो तेव्हा हाच अर्थ असेल. त्याप्रमाणेच सारे प्रकाशमय आहे. तुला अंधार वाटतो, त्यातही प्रकाश आहे.

गायत्री मंत्र

हिंदूधर्मात गायत्री-मंत्राला अत्यंत पवित्र स्थान दिले आहे. त्या मंत्रात प्रकाशाचीच प्रार्थना आहे. ''सूर्याच्या तेजाची आम्ही प्रार्थना करतो, त्या तेजस्वी प्रकाशाचे आम्ही ध्यान करतो. आमची बुद्धी सतेज होवो.'' अशी ती प्रार्थना आहे. ऋषीला प्रकाश हवा आहे. प्रकाश नसेल तर काय अर्थ?

प्रकाशमय देवतांची प्रार्थना

जेथे जेथे प्रकाश दिसतो, तेथे तेथे आपले हात जोडले जातात. आपण सूर्याची उपासना करतो. चांद्रायणव्रत करतो. ताऱ्यांचे स्तोत्र गातो. अग्नीला भजतो. पारशी

लोक अग्नी, सूर्य यांना किती मानतात! वेदांत अग्नीचा केवढा महिमा! सूर्य तेजस्वी खरा; परंतु तो दूर आहे. पुन्हा दिवसभर नाही. त्याचा प्रकाश चोवीस तास कसा मिळणार? परंतु हा अग्नी ! हा तर घरोब्याचा देव. चोवीस तास, दिवसभर घरात अग्नी ठेवता येतो. आपण अग्निहोत्राचे व्रत केले. अग्नीचा एवढा महिमा का? ज्याने अग्नीचा प्रथम शोध लावला त्याला केवढी कृतार्थता वाटली असेल! आकाशातील ते तेज धरेवर मिळाले. आपण पकडून ठेवले. घरात ते सदैव असावे असे ठरवले.

अग्नीला प्रार्थिताना म्हटले आहे, ''तेजोऽसि तेजो मयि धेहि'' ''तू तेज:स्वरूप आहेस. माझ्यात तेज ठेव'' निस्तेज जीवन काय कामाचे? मुखावर तेज असो, दृष्टीत तेज असो, वाणीत तेज असो, विचारात– बुद्धीत तेज असो. सारे जीवन अंतर्बाह्य प्रकाशमय असो.

प्रकाशाजवळ अंधार नाही, घाण नाही. रोगजंतू प्रकाशात मरतात. शरीराचे रोग प्रकाशाने बरे होतात, मनाचेही. प्रकाशात वाढ होते, विकास होतो. ज्या झाडामाडांना प्रकाश मिळत नाही ती खुरटी होतात. सावटात, छायेत पीक येत नाही. झाडाच्या फांद्या तोडतात. शेताला ऊन मिळते, प्रकाश मिळतो तेव्हा शेत पिकते.

प्रकाशाची उपासना

मानवाने प्रकाशाचे उपासक व्हावे. प्रकाश कोठूनही येवो, तो घ्यावा. सकाळची संध्याही पवित्र, सायंकाळचीही पवित्र. जीवनाची दारे सारी उघडी असू देत. ज्याप्रमाणे झाडाची मुळे सर्व दिशांना जाऊन पोषण मिळवतात, त्याप्रमाणे आपणही सर्वत्र जावे नि प्रकाश मिळवावा.

प्रकाश म्हणजे ज्ञान

प्रकाशात आपणाला सारे दिसते. प्रकाश तारतो. तो खड्डा दाखवतो, काटे दाखवतो, साप दाखवतो, धोका दाखवतो; परंतु या बाहेरच्या खड्ड्यांपेक्षाही अज्ञानाचे खड्डे धोक्याचे असतात. ज्ञानाच्या प्रकाशात पावले टाकली पाहिजेत. केवळ बाहेरचा सूर्य असून काय उपयोग? अंत:सूर्यही हवा. आत ज्ञानाचा सूर्य, ज्ञानाचा दिवा आहे का? 'अंतरिचा ज्ञानदिवा मालवू नको रे' असे संत सांगतात. खरा प्रकाश तो हा. बाहेरच्या प्रकाशाची उपासना करून सारे जीवनच अंतर्बाह्य प्रकाशमय करायचे. सूर्याजवळ खळमळ नाही, कश्मल नाही, त्याप्रमाणे आपल्या बुद्धीजवळ खळमळ

नको. सारी संकुचितता, स्वार्थ यांची राख केली पाहिजे. बुद्धी भव्यदिव्य असो. प्रकाशाच्या उपासनेचा हा अर्थ.

जर्मन कवी गटे मरताना म्हणाला, ''आणखी प्रकाश, आणखी प्रकाश!'' थोर उद्गार! गटे प्रकाशाचा भक्त होता. हे मरण मला आणखी प्रकाशाकडे नेईल असे त्याला वाटले. मरणाच्या दारातून तो आणखीच प्रकाशमय जगात जणू जात होता. आपण 'मृताला अग्नी घेऊन जावो' असे म्हटले आहे.

''अग्ने नय सुपथा राये''

हे अग्निदेवता, या मृतात्म्याला सन्मार्गाने ने, वैभवाकडे, कल्याणाकडे ने. अग्नी म्हणजे त्या ज्वाळा! त्या ज्वाळा मृताला नेतात. त्याला प्रकाश देतात. प्रकाशाहून थोर वाटाड्या कोण?

दिवा देखून नमस्कार

लहान मुलाला भारतीय माता प्रकाशाची पूजा कर म्हणून सांगते :

दिव्या दिव्या दीपोत्कार
कानी कुंडले मोतीहार
दिवा देखून नमस्कार

हा श्लोक माता मुलाला शिकवते. प्रकाशाची मूर्ती त्याच्यासमोर उभी करते. तो प्रकाशदेव कानात कुंडले घालून आला आहे. गळ्यात मौक्तिक हार घालून आला आहे. त्या झगझगीत ज्योती, त्या जणू त्याचे अलंकार! प्रकाश पाहताच आपण प्रणाम करतो. दुकानात दिवे लागताच व्यापारी नमस्कार करतात. काळाबाजार करणारे असले तरीही प्रकाशाची कदर करतात. आज ना उद्या तेही सन्मार्गावर येतील.

प्रकाशासाठी जन्म

लहान मूल आईच्या पोटात सजीव होते. हालचाल करू लागते तेथे अंधार असतो. तेथे संकुचितता असते. ते लहान जग. ते बाळ चळवळ करू लागते आणि शेवटी प्रकाशासाठी बाहेर येते! मोठ्या विश्वात येते. उजेडात येते आणि डोळे उघडून बघते. आपण सूर्यदर्शनाचा समारंभ करतो. मूल महिन्याचे झाले म्हणजे त्याला अंगणात आणतो. ''तो बघ देव, तो सूर्यनारायण'' असे त्याला म्हणतो. तू प्रकाशात राहणारा, प्रकाशात वाढणारा आहेस. अंतर्बाह्य शुची,

स्वच्छ राहा. शरीर सतेज, मनोबुद्धी सतेज, असा हो, असे जणू त्याला आपण अप्रत्यक्षपणे सांगत असतो.

खरा प्रकाश कोणता?

ते लहान मूल प्रकाशासाठी बाहेर आले; परंतु ते जसजसे वाढते तसतसे अंधारात लोटले जाते! आपण तोंडाने प्रकाशाची उपासना करणारे; परंतु कृतीने तमाचे भक्त आहोत. द्वेष, मत्सर, खून-कत्तली हे सारे तमोगुणाचे राज्य आहे. मुलाबाळांना संकुचित दृष्टीचे करणे म्हणजे त्यांना अंधाराची पूजा कर असे सांगण्यासारखे आहे. खरा प्रकाश सूर्याचा नाही, कोणाचा नाही. खरा प्रकाश प्रेमाचा. आईचे प्रेम मुलाला वाढवते. तुम्ही प्रकाशाचे उपासक असाल तर प्रेम करा. दुसऱ्यांच्या जीवनात दैन्य, दास्य यांचा अंधार असतो. तू प्रेमाने त्यांच्याजवळ जा. त्या जीवनात आशा येईल, प्रकाश येईल. जगात विजेचे दिवे, आणखी शक्तीचे दिवे आहेत; परंतु प्रेमाचा दिवा जगात नाही. तो तर आपण मालवून टाकला आहे. आपण सारा अंधार माजवला आहे. भुतांचा गदारोळ आहे. एकमेकांना चावे घेत आहोत, एकमेकांना तुडवत आहोत. या अंधाऱ्या दुनियेत प्रकाश कधी येईल? प्रेम करू लागाल तेव्हा.

प्रकाशाची समता

सूर्य आपले किरण सर्वत्र नेतो. श्रीमंत असो, गरीब असो. सूर्य सर्वांना ऊब देतो. चंद्राचा प्रकाश राजवाड्यावर पडतो, झोपडीवरही पडतो. प्रकाशाचे किरण सर्व जीवनाला मिठी मारायला धावत असतात. तुमच्या हृदयातील प्रेमसूर्य सर्वांची जीवनपुष्पे विकसवण्यासाठी असो. सूर्य उगवला की बागेतील लाखो फुले फुलतात. कण्हेरी असो की गुलाब असो. सर्व कळ्यांना प्रकाश फुलवतो. तुम्ही-आम्हीही सर्वांच्या जीवनकळ्या फुलाव्यात म्हणून धडपडले पाहिजे. नकोत भेदभाव, नकोत स्वार्थ. जीवनाचे तुकडे नका करू. सारे जीवन प्रकाशमय करू या. म्हणून श्री ज्ञानेश्वर भावार्थदीपिकेच्या शेवटी म्हणतात :

दुरितांचे तिमिर जावो
विश्व स्वधर्मसूर्ये पाहो
जो जे वांछील, ते ते लाहो प्राणिजात ।

पापाचा अंधार जावो आणि धर्माचा सूर्य येवो. पाप म्हणजे अज्ञान. मी सत्य, बाकी सारे मिथ्या असे मानणे. संकुचितता म्हणजे पाप आणि धर्म म्हणजे सर्वांची

धारणा करणारे कर्म ते पुण्य. संकुचिततेचा अंधार जाऊन, सर्वांची धारणा करणारा विचारसूर्य येवो असे ज्ञानेश्वर म्हणतात. म्हणजे मग कोणाला कशाची ददात राहणार नाही. हा खरा प्रकाश, प्रेमाचा प्रकाश! तो जोवर नाही तोवर अंधारच आहे.

प्रकाशाची विश्वपूजा

सूर्य तिकडे उगवतो आणि सारी सृष्टी आरती घेऊन उभी राहते! झाडे डोलत असतात. वारा गीत गात असतो. फुले सुंदर पोषाख करून सुगंधाची आरती ओवाळतात. ते सूर्यफूल, ते तर सूर्याकडे तोंड करून असते. ज्या बाजूला सूर्य त्या बाजूला त्याचे तोंड आणि रात्रीचे लाखो किडे, ते पतंग!- दिवा देखताच धावून येतात. प्रकाश, प्रकाश! त्या प्रकाशाला प्रदक्षिणा घालतात, या प्रकाशाला प्रदक्षिणा घालून आणि शेवटी त्याला मिठी मारून जातात. प्रकाशाची उपासक बाळे!

उचंबळणारे रवींद्रनाथ

रवींद्रनाथ प्रकाशाचे पूजक. ते उन्हात खुर्ची टाकून बसायचे. प्रकाश पाहून नाचायचे. गीतांजलीतील एका गीतात ते म्हणतात, ''प्रकाश, प्रकाश- सर्वत्र प्रकाश! बाहेर प्रकाश, आत प्रकाश.'' सारी सृष्टी त्यांना प्रकाशाने नटलेली दिसते. झाडेमाडे किरणांना डोक्यावर घेऊन नाचतात. दवबिंदू प्रकाशात चमकतात. मौज! आनंद! असा हा प्रकाशाचा महिमा आहे! तो गावा तेवढा थोडाच. भारतीय जनता प्रकाशाची म्हणजेच प्रेमधर्माची उपासक होवो.

+++

पाणी

आज आपोमातेला मी शब्दांजली वाहणार आहे. वेदांमध्ये आपोदेवतेची सुंदर स्तोत्रे आहेत. खरोखरच पाण्याहून प्राणप्रिय असे दुसरे काय आहे? या पृथ्वीवर पाणी नसते तर जीवन शक्य झाले नसते. पहिला जीव पाण्यात जन्मला. त्या जिवाची उत्क्रांती होत आपण मानव पुढे जन्मलो. पाणी म्हणजे सर्व जीवनाची जननी. म्हणून पाण्याला संस्कृत कवींनी नावच जीवन दिले! संस्कृत भाषा फार सहृदय नि अतिसंपन्न. पाण्याला दिलेले एकेक नाव, योजलेला एक शब्द म्हणजे मूर्तिमंत काव्य आहे! त्या प्राचीन पूर्वजांना पाणी पाहून उचबंळून आले. या वस्तूला कोणती नावे देऊ, या वस्तूचे कसे वर्णन करू, त्यांना समजेना. त्यांची प्रतिभा भराभरा शब्द प्रसवू लागली. अमृत, पय, जीवन! एकेक पाण्याला योजलेला शब्द किती अन्वर्थक, किती गोड. 'पाणी नाही म्हणजे काही नाही.'

बिरबलाची एक गोष्ट आहे. अकबराच्या एका नातेवाईकाने नोकरी मिळत नाही म्हणून तक्रार केली.

"अरे तुला साधी बेरीज-वजाबाकी तरी येते का?" अकबराने विचारले.

"म्हणजे काय? मला अडाणी मूल समजता?"

"उद्या दरबारात या."

दुसऱ्या दिवशी तो आप्त दरबारात आला. बादशहा सिंहासनावर होता. शेजारी बिरबल होता.

‘‘सत्तावीस नक्षत्रांतून पावसाची दहा नक्षत्रे वजा केली तर बाकी काय राहील?’’

‘‘सतरा नक्षत्रे उरतील !’’

‘‘चूक. बिरबल, तुम्ही उत्तर द्या.’’

‘’शून्य उरेल !’’

सारे हसले. बिरबल वेडा असे सर्वांना वाटले.

‘‘शून्य कसे?’’ बादशहाने विचारले.

‘‘महाराज, पावसाची नक्षत्रे काढून टाकली तर पृथ्वीचे स्मशान होईल. खाल काय? प्याल काय? जीवनच अशक्य होईल !’’

सारे खाली माना घालून उभे राहिले.

‘‘मी प्रश्न विचारला तो साध्या बेरीज–वजाबाकीचा नव्हता. तुमच्या लक्षात यायला हवे होते की, काहीतरी हेतू मनात धरून मी विचारला होता. बिरबलाच्या ते लक्षात आले. तुम्ही दगड आहात !’’

अशी ती गोष्ट आहे. पाणी नाही म्हणजे काही नाही. बाहेर ऊन मी म्हणत असावे. तहानेने जीव खालीवर होत असावा आणि थंडगार पाणी पेलाभर मिळावे, तो केवढा आनंद असतो ! पूर्वी खानदेशात असताना एकदा मी नि माझे मित्र अजिंठ्याची लेणी बघायला पहुर गावाहून पायी निघालो. ऊन कडक होते. नदीवर फराळ करून पाणी भरपूर पिऊन निघालो; परंतु पुढे वाटेत तहान तहान झाले ! कोठे पाणी दिसेना. दूर शेतात कोठे विहीर दिसेना. चिंचेची पाने खाऊन आम्ही तोंडाला ओलावा आणीत होतो. केव्हा आढळेल पाणी असे झाले. वाटेत एक आंधळा भेटला.

‘‘पाणी कुठं मिळेल?’’ आम्ही विचारले.

‘‘आता जवळच नाला आहे. भरपूर पाणी आहे’’ तो म्हणाला. आम्ही आनंदलो. खिशातून दोन आणे काढून त्याला दिले. मला तो प्रसंग नेहमी आठवतो. मनुष्य अन्नावाचून राहील, वस्त्रावाचून राहील; परंतु पाण्यावाचून कसा राहणार? पाणी हा जीवनाचा आधार ! रखरखलेली झाडे–माडे, रखरखलेली पृथ्वीपाण्याची किती आतुरतेने वाट बघतात आणि पावसाचे पाणी पडताच सारी पृथ्वी रोमांचित होते. हिरवे हर्षाचे रोमांच तिच्या अंगावर उभे राहतात.

आपण जेथे वस्ती करतो तेथे पाणी बघतो. नदीनाला बघतो. मग घरे बांधतो. पाण्याच्या आधारावर राहायचे, जगायचे. पाण्यामुळे शेतेभाते पिकतात. बागा

फुलतात. मळे तरारतात. पाणी खेळवून आपण हिरवी हिरवी भूमी सर्वत्र फुलवतो, हसवतो. अन्नमय प्राण असे आपण म्हणतो; परंतु पाणी नसेल तर ते अन्न कोठून मिळणार?

पाणी म्हणजे प्रभूचे रूप. नदी पाहून आपण प्रणाम करतो, उगाच नाही. रवींद्रनाथ म्हणतात, 'या नद्या म्हणजे ईश्वराची वाहती करुणा !' पाणी म्हणजे प्रभूची कृपा. ते सर्वांना जवळ घेते. सर्वांना जिरवते. ते कोणाला वाईट म्हणत नाही. हिडिस-फिडिस करीत नाही. वाघ आला त्याची तृषा हरील, गाय आली तिचीही तहान भागवील. राव येवो, रंक येवो; चोर येवो, साव येवो...सर्वांना पाणी तृप्त करते. सर्वांना शांत करते. पाण्याजवळ अशी ही समता आहे. परमेश्वर ज्याप्रमाणे सर्वांना स्वतःचे मानीत असेल त्याचप्रमाणे हे पाणी !

आणि पाण्यामध्ये समान पातळीचा महान धर्म आहे. पाण्याचे बिंदू एकमेकांच्या मदतीसाठी धावतात. विहिरीतून हजारो घागरी पाणी काढलेत तर जेथून काढलेत, तेथे खळगा दिसतो काय? नाही. आजूबाजूचे जलबिंदू तेथे धाव घेतात. खळगा भरून काढतात. रस्त्याच्या कडेला खडीचे ढीग असतात. आपण घमेलेभर खडी नेली तर तेथें खळगा पडेल. आजूबाजूचे दगड थोडेच धावून येणार आहेत ! तसे पाण्याचे नाही. पाण्याची ही समता पाहूनच त्याला सज्जनांच्या मनाची उपमा देण्यात आली असेल. पंपा सरोवरचे पाणी कसे होते? आदिकवी वाल्मीकी म्हणतात, ''सज्जनानां मनो यथा!''

पाणी असे उदार आहे. समवृत्ती आहे. त्याच्याजवळ प्रेमळपणा आहे. पाणी झिरपत झिरपत पाताळापर्यंत जाऊन पोचते. पृथ्वीच्या पोटात शिरते.

जमिनीवर दगड टाकला तर तो तेथेच पडेल; परंतु पाणी आत झिरपत जाईल. तुकाराम म्हणतात-

'तुका म्हणे पाणी । पातळपणे तळी खणी' पाणी पातळ आहे; अहंकाराने टणक नाही झालेले. ते निरहंकारी आहे. म्हणून ते सर्वत्र जाते. ते जणू सर्वव्यापी आहे. दुसऱ्यांशी एकरूप होणे हा त्याचा धर्म. त्याला स्वतःची जणू जाणीवच नाही. ते निरपेक्ष आहे. 'पानी तेरा रंग कैसा? जिसमें मिलावे वैसा !' ज्यात मला मिसळाल तसा मी. शेणात मिसळला, मी शेणखळा होईन. गुलाबात मिसळला, गुलाबपाणी बनेन. निर्मळपणा हा पाण्याचा अभिजात स्वभाव आहे. गढूळ पाणी करून ठेवा.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

दोन दिशी पाहा. सारी माती खाली बसते. पुन्हा वर निर्मळ पाणी शोभते ! घाण टाकून निर्मळ होत जाणे हे पाण्यापासून शिकावे आणि म्हणूनच पाण्याशिवाय स्वच्छता नाही. मळका कपडा, मळके अंग-पाणी घ्या नि स्वच्छ करा. रिठे, सोडा, साबण सर्व असून जर.नळाला पाणी नसेल तर काय उपयोग? स्वच्छतेचे सार्वभौम साधन म्हणजे पाणी.

पाणी तुम्हाला जीवन देते, टवटवी देते, उल्हास देते; हे तर खरेच; परंतु पाण्यातील शक्तीला अंत नाही. हे साधे पाणी; परंतु त्याच्यात अग्नी आहे. विद्युत आहे. पाण्याचा प्रचंड झोत सोडा. त्यातून बिजली निर्माण होईल. पाण्याच्या जोरावर कितीतरी कामे करून घेतात. शिवाय पाणी रोगहारक आहे. 'डॉक्टर वॉटर !' म्हणून एका भिषग्वराने ग्रंथ लिहिला. पाणी हाच वैद्य, हाच धन्वंतरी. वेदातील ऋषी म्हणतो :

'अप्सु मे सोमो अब्रवीत्। अन्तर विश्वानि भेषजा।' सोम मला म्हणाला, पाण्यात सर्व औषधे आहेत. ताप अधिक असेल तर कपाळावर पाण्याची पट्टी ठेवा. अजीर्ण असेल, पाणी अधिक प्या. बद्धकोष्ठ असेल, एनिमा घ्या. नाशिकच्या तुरुंगात असताना माझ्या बोटाला काय झाले होते कळेना. धुळ्याला असताना उंदीर रात्री चावला की, काय शंका आली. मी ओल्या पाण्याची पट्टी बोटाला बांधून ठेवत असे. शेवटी माझे बोट बरे झाले ! बंगालमध्ये काळताप म्हणून एक भयंकर ताप आहे. त्या तापात थंडगार पाणी डोळ्यांवर सारखे ओततात. ताप कमी होतो. डोळे दिवसातून तीन-चारदा धुवा. ते सतेज राहतात. स्मृति-ग्रंथात म्हटले आहे, ''नाक, कान, डोळे यांना पाण्याचा स्पर्श मधून मधून करावा. हुशारी वाटते.'' ते अगदी खरे आहे. जुने लोक पाच-सात वेळा चूळ भरीत. त्यांचे दात स्वच्छ राहात. तोंड स्वच्छ होई. आता खानावळीतून तोंडही नीट धुता येत नाही ! नंबर लागलेले असतात. गाडी पकडायची असते. पटकन चूळ भरून मनुष्य जातो. मग पायोरियादी रोग होतात. पाण्यामध्ये घाण दूर करण्याची, स्वच्छता निर्माण करण्याची अपार शक्ती आहे. पाण्याला 'अमृत' म्हटले आहे. खरोखरच पाणी म्हणजे अमर रसायन आहे. वेदातील ऋषी म्हणतो : ''हे पाण्या, माझं पाप धुऊन ने. मला वैभव मिळावं. महान आनंद मिळावा. सृष्टीतील सौंदर्य दिसावं म्हणून तुझा कल्याणकारी रस मला दे. तू आमची आई आहेस !'' किती सुंदर भाव !

+++

प्राचीन ऋषिवर

ही भारतभूमी अतिप्राचीन आहे. किती जुनी आहे, प्रभू जाणे. जणू ती अनादी आहे. तिचे अतिप्राचीन स्वरूप कसे होते, याविषयीही वाद आहेत. एकेकाळी हिमालय नसेल, मारवाडातील वाळवंट नसेल, फक्त मध्यप्रदेश कदाचित असेल. त्याच्याभोवती सात समुद्र असतील. ज्या वेळेस हिमालय नसेल त्या वेळेस गंगा, यमुना, सिंधू, ब्रह्मपुत्रा या नद्या तरी कोठून असणार? आणि कोणी म्हणतात की, आफ्रिका नि हिंदुस्थान संयुक्त होते. मध्ये हा पश्चिम समुद्र, हा हिंदी महासागर नव्हता. आफ्रिकेतील मूळच्या रहिवाशांच्या भाषा नि दक्षिण हिंदुस्थानी भाषा यांत काही समानार्थी शब्द आहेत. संशोधक सुताने स्वर्गास जातात ! खरे खोटे प्रभूला माहीत.

परंतु केव्हा तरी महान उत्पात झाले आणि आजची भरतभू निर्माण झाली, उत्तरेस प्रचंड हिमालय पावसाळी वारे अडवायला उभा राहिला आणि उन्हाळ्यातही वितळलेल्या बर्फाचे अपरंपार पाणी पाठवू लागला. प्रचंड भूकंप झाले असावेत. समुद्र होते तेथे पर्वत उभे राहिले, समुद्र होते तेथे वाळवंटे राहिली-एक महान् त्रिकोणाकृती देश उभा राहिला. एका बाजूला जगातील परमोच्च पर्वत आणि तिन्ही बाजूला धो धो करणारा सागरी आदिकवी वाल्मीकीच्या समोर असा हा अखंड भारत सदैव उभा असे. प्रभू रामचंद्राच्या गुणांचे वर्णन करताना वाल्मीकी म्हणतात : ''समुद्र इव गांभीर्ये धैर्ये च हिमवानिव-समुद्राप्रमाणे गंभीर नि हिमालयाप्रमाणे धैर्यवान असा रामचंद्र होता.''

अशा प्रकारे हा अवर्णनीय देश, ही भारतमाता केव्हा तरी जन्माला आली आणि नाना जाती-जमाती येथे येऊ लागल्या. येथे अगदी मूळचे काही लोक होतेच. काही पंडितांचे म्हणणे आहे की, मानवप्राणी प्रथम हिंदुस्थानात जन्मला. येथून तो सर्वत्र गेला. मधूनमधून प्रचंड उत्पात झाले असतील. पुन्हा प्रलयकाळी दूरच्या मानवजाती निवारा शोधीत इकडे आल्या असतील. एके काळी येथूनच आपण मध्य आशियाकडे गेलो होतो, हे ते विसरले असतील. पुन्हा ते नव्याने आले. ते स्वतःला आर्य म्हणत नि येथे होते त्यांना अनार्य म्हणत.

आर्यांच्या पूर्वीही काही जातीजमाती येथे आल्या असाव्यात. सिंध प्रांतांत व पंजाबच्या काही भागांत जी संस्कृती उत्खननात मिळाली आहे ती कोणाची? ती का एतद्देशीय आदिवासींची? ते सुसंस्कृत लोक होते. त्यांनी शहरे वसवली होती. तीन-तीन मजली घरे होती. रस्त्यांची आखणी होती. विहिरी होत्या. सार्वजनिक स्नानगृहे होती. बाजारपेठा होत्या. माल साठवण्यासाठी कोठारे होती. त्यांना चित्रकला माहीत होती. दागदागिने वापरीत, कपडे पेहरीत. केव्हाची ही संस्कृती? मोहेंजोदडोची ही संस्कृती अतिप्राचीन आहे. अडीच-तीन हजार वर्षांपूर्वीची तरी असावी. वेदकाळ पाश्चात्य पंडित ख्रिस्तपूर्व दोन हजार वर्षे धरतात आणि म्हणून त्याच्या पूर्वीची हजार-दीड हजार वर्षांची, म्हणजे सुमारे चार-पाच हजार वर्षांची ही मोहेंजोदडो संस्कृती असावी असे त्यांचे म्हणणे; परंतु हे गणित बरोबर नाही. भगवान पाणिनीचा काळ ख्रिस्तपूर्व आठवे शतक, असे आता सर्वमान्य झाले आहे. पाणिनीच्या पूर्वीचे यास्काचार्य. यास्काचार्यांच्या निरुक्त ग्रंथात वेदांचा अर्थ लावू पाहणाऱ्या अनेक विद्वानमंडळांचे उल्लेख आहेत. म्हणजे वेदांचा अर्थ त्या काळी स्पष्ट होतनासा झाला होता. यास्कांच्या पूर्वीच पुष्कळशी प्राचीन उपनिषदे, आरण्यके, ब्राह्मणे झाली असली पाहिजेत. हा सारा वैचारिक चळवळीचा काळ कित्येक शतकांचा असला पाहिजे आणि त्याच्या पूर्वीचे वेद, सारी सूक्ते गोळा केली गेली. त्याच्या चार संहिता झाल्या. हे सारे लक्षात घेऊन भारतीय पंडित वेदांचा काळ ख्रिस्तपूर्व तीन-चार हजार वर्षे हा मानतात. काही सूक्ते तर अतिप्राचीन, सात-आठ हजार वर्षांपूर्वीची असावीत. कदाचित मध्य आशियात रचलेली ती असावीत, असे लोकमान्य म्हणत. कै. चिंतामणराव वैद्य भारतीय युद्ध ख्रिस्तपूर्व तीन हजारांच्या सुमारास झाले असे म्हणत. तेव्हा ही मोहेंजोदडोची संस्कृती या सर्वांहून प्राचीन. म्हणजे आणखी किती वर्षे मागे जावे लागेल याची कल्पना करा.

परंतु कालनिर्णय पंडित करतील. मोघम कल्पना मला पुरे. या देशात मोहेंजोदडो संस्कृती फुलली होती. येथील मूळचे लोक सुसंस्कृत होते. त्यांना अनार्य म्हटले, एवढ्यावरून ते रानटी होते असे नाही. येथल्या शबरासारख्या आदिवासी राजांची शहरे होती. त्यांना दरवाजे होते. अशा या आदिवासींजवळ, आलेल्या आर्यांच्या झटापटी सुरू झाल्या. जय-पराजय होत गेले. एतद्देशीय लोक मागे हटू लागले. आर्य सिंधूपासून गंगेपर्यंत पसरले. काही आर्य ओरिसापर्यंत येऊन जलमार्गाने सुंदर अशा लंकेत गेले. तेथेच बलाढ्य रावण पुढे राज्य करू लागला. रावणाला राक्षस म्हटले तरी तो आर्य होता, तो यज्ञयाग करणारा होता; परंतु हिंदुस्थानातील आर्य नि लंकेतील हे आर्य एकमेकांस विसरले आणि पुढे त्यांचे लढे झाले.

संस्कृतीचा विकास

शत्रूला हटवून आर्यांनी छोटी छोटी राज्ये निर्माण केली. प्रथम हे सारे गुरेढोरे पाळणारे होते. शेती करणारे होते. "आम्ही सारे विश म्हणजे वैश्य आहोत" असे ऋषी म्हणतो; परंतु स्वभावाप्रमाणे ते नाना कर्मे करू लागले. कोणी देवाची स्तुती करू लागले. पुरोहित झाले, कोणी लढू लागले; कोणी शेतीभाती करू लागले; ज्यांनी जिंकून घेतले त्यांना सर्वांचे काम करायला लावण्यात आले; असे प्रकार होऊ लागले.

संस्कृती वाढू लागली. धान्य पिकू लागले. कापूस होऊ लागला. वस्त्रे विणली जाऊ लागली. मोठमोठी खिल्लारे असत. दूधलोणी भरपूर. सोने, लोखंड सारे काही मिळू लागले. रथ असत. घोडे असत. नावा असत. हजार हजार वल्ही असलेल्या नावा ! जीवन समृद्ध होऊ लागले. नीतिनियम ठरू लागले. समाजनियम होऊ लागले. समाजजीवनाला मर्यादा घालण्यात आल्या. वैवाहिक नीती जन्माला आली. भावा-बहिणींच्या नात्यांना पावित्र्य आले. द्यूत, सुरापान यांना महापातकात गणू लागले.

"अक्षैः मा दीव्यः कृषिमित्कृषस्व-फासे नको खेळू, शेतीच कर" अशी आज्ञा ऋषी करू लागले.

नाना देव-दैवते

हे आर्य लोक उत्साही, चपळ, पराक्रमी असे होते. ते नवीन नवीन कर्मक्षेत्रे धुंडाळीत. विचाराच्या क्षेत्रातही ते उंच उड्डाणे करीत. प्रथम ही सारी सृष्टी पाहून ते भीत, घाबरत. सारे काही देव करतो, त्या त्या घडामोडीचा प्रमुख देव असावा असे

त्यांना वाटे. पावसाचा देव, पाण्याचा देव, नीतीचा देव, अनेक देव. सर्वांची ते स्तुती करीत. उषादेवीला पाहून ते नाचत. उषा सदैव घवघवीत सुंदर. ती दवबिंदूंनी न्हाऊनमाखून येई. जणू ती अमृतत्वाची ध्वजाच आहे ! किती सुंदर वर्णने ! आणि सूर्य तिच्या पाठोपाठ येतो. एखाद्या सुंदर तरुणीच्या मागे मनुष्याने प्रेमाने जावे तसा हा सूर्य ! हा तेजोनारायण, हा जगाचा मित्र ! तो जणू विश्वाचा डोळा, सर्व स्थिर चराचा आत्मा. त्याच्याशिवाय जीवनच अशक्य आणि हा पाहा प्रबळ पर्यन्य ! मुसळधार पाऊस ! वारे घो घो करीत आहेत. नद्या बेफाम धावत आहेत. आकाश जणू खाली वाकले आहे. पृथ्वीला भेटत आहे. विराट विश्वाचा विराट प्रेम नाच ! विराट आलिंगन! पृथ्वी आणि तिचा पती यांची प्रेममय भेट ! आणि धरणी सस्यश्यामल होते; धनधान्य प्रसवते. विश्वंभराची अपार लीला ! आणि हा अग्नी घरोब्याचा देव, ऊब देणारा! संरक्षण देणारा; तेज देणारा, पाप जाळणारा आणि वासरांकडे धावणाऱ्या गायीप्रमाणे भरल्या हृदयाने उचंबळून येणाऱ्या या नद्या ! त्यांना पाहून ते ऋषी सद्‌गदित होत. सर्व घाण वाहून नेणाऱ्या त्या आपोदेवतांना ते म्हणत : 'इदमापः प्रवहत यत्किंच दुरितं मयि।' माझ्यातील सारे पाप धुऊन न्या आणि आकाशातील ते अनंत तारे? ते का आकाशव्यापी देवतेचे हजारो नेत्र आहेत? ते का आपल्याकडे पाहात आहेत?

ऋताचा कायदा

या विश्वाचा पसारा कोण चालवतो? कोण नियमन करतो? कोण सूर्याला पाठवतो? ऋतू कसे येतात? पावसाला कोण धाडतो? हे सारे देव कायद्याने वागतात. त्यांना त्या कायद्याचे–ऋताचे उल्लंघन करता येणार नाही.

कोणता खरा देव?

परंतु खरेच का असे देव आहेत? कोणी पाहिले आहे त्यांना? तो बलाढ्य देव कोठे राहतो? दाखवा मला? आणि हे शेकडो देव? खरा कोणता? याला प्रणमावे तर तो रागावायचा. काय आहे ही भानगड? कोणत्या देवाला भजू? कोणाला आहुती देऊ? कोणी तरी आहे का? हे पर्वत कोणी उभे केले? प्रथम हे हालत असतील. कोणी त्यांना स्थिर केले? आणि या नद्यांना कोण वाहवतो? आकाशाला कोणी पसरतो? वाऱ्यांना कोण थांबवतो ! अग्नीला कोण पेटवतो? सूर्य, चंद्र ताऱ्यांना कोण प्रकाश देतो? दिवसरात्र कोण करतो? पूर्वी काहीच नव्हते ना? म्हटले तर होते, म्हटले तर नव्हते. आकाशातून हे सारे विकसन आले? ते चैतन्य म्हणजेच का देव?

म्हणजे तो सर्वत्र आहे. सारे त्याचे रूप. हे वन म्हणजे ब्रह्म, हे आकाश म्हणजे ब्रह्म. सारे ब्रह्मच. नावे निराळी. अर्थ एकच. नदी, नाला, विहीर, समुद्र, तळे, सरोवंर; परंतु पाणी एकचे. अग्नी असो की सूर्य असो; वारे असोत, तारे असोत. एकाच शक्तीची ही विविध रूपे.

एकाच चैतन्याचा विकास

''एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति-सत् एकच आहे. विचारवंत लोक त्याला विविध नावांनी हाक मारतात'' कोणातरी विचारवंताने गोंधळलेल्या बुद्धीला हा थोर विचार दिला. भव्य विचार !उत्तरेचा उत्तुंग हिमालय नि तिन्ही बाजूंचा अनंत तरंगधारी सागर हाच नाही का संदेश देत? माझी हजारो लहान मोठी शिखरे आहेत; सोन्याप्रमाणे झळकणारी कांचनगिरीसारखी आहेत; रुप्याप्रमाणे चमकणारी धवलगिरीसारखी आहेत; परंतु या सर्वांच्या मुळाशी, पाठीशी मी एक हिमालय आहे. ही सारी माझीच रूपे. असा हिमालय विविधतेत एकता पाहण्याचा संदेश देत आहे आणि या अनंत लाटा लहान मोठ्या माझ्यावर उसळत आहेत; परंतु त्या साऱ्या माझ्या. एकच पाणी सर्वांत आहे. त्या माझ्यातूनच उठतात, माझ्यातच विलीन होतात. खाली खोल पाहाल तर मीच एक सागर-गंभीर तुम्हाला दिसून येईल. असे सागर सांगतच आहे. सारें स्थिरचर हेच सांगत आहे. एकाचा सारा पसारा. एकाचे हे विविध वैभव. एकाच बीजातून विविध फांद्या, फुले, फळे त्याचप्रमाणे एकाच चैतन्याचा हा विराट विकास चालला आहे.

भारतीय महर्षींने हा थोर संदेश दिला, जणू भारतात नाना जाती-जमाती येणार, धर्म येणार, संस्कृती येणार हे त्याला दिसत होते. विविधतेत एकता पाहाल तर भरभराटाल असे जणू तो सांगत आहे. तत्त्वज्ञानेही परिस्थितीतूनच जन्मतात. गरजातून जन्मतात, आणि मग अशी दृष्टी घेणाऱ्याला सारे शुभ नि मंगल वाटते. त्याला दिवस रात्र दोन्ही गोड वाटतात.

''उषा मला गोड निशाहि गोड.
दिशा मला गोड नि धूळ गोड.''

सर्वत्र त्याला सौंदर्य दिसते. सर्व विरोधातून, वेदनांतून, वाईटातूनही शेवटी अमृत बाहेर येईल असे त्याला वाटते.

अशी दृष्टी ते थोर महर्षी देऊ लागले. मरण म्हणजे जीवन म्हणून लागले. मरण म्हणजे विश्वाशी एकरूप होणे. झाडा-माडांशी, फुला-फळांशी, ताऱ्या-वाऱ्याशी

तुम्ही मिळून जाल असे ते सांगतात. वाटले तर पुन्हा मर्यादित आकार घ्याल. जीवनसिंधूत विलीन व्हावे वा पुन्हा विशिष्ट रूप जन्मावे. आपण जाण्यासाठी येतो; येण्यासाठी जातो. कशाचे दुःख, कशाचा शोक? सर्वत्र अनंत जीवन भरलेले आहे. मृत्यू म्हणजे जणू माया.

प्रत्यक्ष व्यवहारात वेदान्त

थोर थोर विचार ते ऋषिवर देत आहेत आणि केवळ विचारात ते रमत नाहीत. जीवन सुधारण्यासाठी तत्त्वज्ञान असते. पायरी-पायरीने वाढत जा असे ते सांगतात. प्राण्यांवर प्रेम करायला सांगतात; परंतु आधी गायीवर तरी करा. अरे, ही गाय म्हणजे अमृताची कुपी आहे. ''मा गाम् अनागां अवधीः '' अरे, या निरपराधी गायीला नका रे मारू, असे ऋषी कळवळून सांगतो. दूध देणारी, शेताला बैल देणारी, प्रेममयी कारुण्यमूर्ती गाय! तिचा महिमा त्यांनी वाढवला. गोपाळकृष्णाने पुन्हा शिकवला; परंतु माणसांना दुर्लक्षून ते गायीचा कळवळा करणारे नव्हते. सर्व भावांना सांभाळा असे ते सांगत. अनुदार मनुष्याचा त्यांनी धिक्कार केला आहे. ''जो शेजाऱ्याला देत नाही, त्याच्या घरी कशाला धान्याची कोठारे? ते धान्य नसून साठवणाऱ्या मूर्खांचे ते मरण आहे.'' असे ऋषी गर्जून सांगतो. ''सत्यं ब्रवीमि वध इत् सत्तस्य ।'' ऋषीला खोटे बोलून काय करायचे?

अशा रीतीने जीवनात अद्वैत आणा असे ते सांगू लागले. सर्वांचा संसार सुखाचा करा. रुद्रसूक्तकार तर म्हणतो : ''अंथरूण द्या, पांघरूण द्या. दूध, तूप, मध द्या; बुद्धी द्या, धैर्य द्या, विनय द्या, वैभव द्या. सर्व समाजाला अंतर्बाह्य सुसंस्कृत करा, विकसित करा'' असे तो म्हणतो. ''ऱ्हीश्च मे श्रीश्च मे'' नुसते वैभव किंवा नम्रता नको. वैभवाबरोबर नम्रता आणि नम्रतेबरोबर वैभव. नाही तर काहींची नुसती खाली मान आणि काहींची मान तिरशिंगरावासारखी. दोन्ही त्याज्यच. समाजात केवळ दीन नि केवळ घमेंडनंदन कोणी नकोत. अशी ही थोर दृष्टी आहे.

वैभवाचा खरा मार्ग

आणि वैभवसुद्धा सुपथाने जाऊन मिळणारे असू दे. अग्नीजवळ धन-दौलत, वैभव मागितले; परंतु ''चांगल्या मार्गाने वैभवाकडे ने'' असेच म्हटले आहे.

समाजात खरे अद्वैत राहिले, सर्वांचा विकास झाला तर केवढा आनंद उचंबळेल! विविध क्षेत्रांत आपण कामे करीत असलो तरी ती कामे सर्वांच्या सुखासाठी आहेत

ही भावना मनात असली म्हणजे झाले. म्हणून वेदाच्या शेवटी– ''समानीव आकूतिः समाना हृदयानि वः– तुमचे विचार एक असोत, तुमची हृदये एक असोत'' असे म्हटले आहे. तुम्ही वस्त्र निर्माण करीत असाल; म्हणा हे सर्वांसाठी. असा सर्वांच्या कल्याणाचा विचार सर्व उद्योगांच्या मुळाशी असू दे. ती भावना हृदयात जिवंत असू दे. म्हणजे मग आनंदाला काय तोटा?

शुद्ध सतेज बुद्धी

शुद्ध बुद्धी हीच सर्वांत मोठी देणगी आहे. ज्ञान ब्रह्म. ब्रह्म म्हणजे सर्वांत मोठी वस्तू. सर्वांत मोठी वस्तू म्हणजे ज्ञान. ज्ञान म्हणजेच परमेश्वर. अशी सुंदर व्याख्या ज्यांनी केली त्यांचे किती उपकार ! महंमद पैगंबरही एकदा म्हणाले, ''सृष्टीचे नीट निरीक्षण करणाराने नमाज म्हटला नाही तरी चालेल.'' कारण ज्ञानमय प्रभूची तो सारखी प्रार्थनाच नव्हता का करीत! सृष्टीच्या निरीक्षणानेच ज्ञान स्फुरते. अरबस्तानातील रात्रीच्या वेळेच्या अत्यंत शांत आकाशाखाली उभे राहून विश्वाशी एकरूप होऊनच महंमदाने ज्ञानाचा आवाज ऐकला.

वेदांतील सर्वांत पवित्र मंत्र म्हणजे गायत्री मंत्र. त्याला का पावित्र्य? कारण त्यात स्वच्छ बुद्धीची मागणी आहे. सूर्याजवळ अंधार नाही; त्याप्रमाणे माझ्या बुद्धीजवळ अंधार नसो; अशी थोर प्रार्थना त्यात आहे. बुद्धी सतेज असावी. सर्वत्र खोल घुसणारी नि प्रकाश आणणारी अशी असावी. कारण स्वच्छ ज्ञानप्रकाशाहून अधिक पवित्र काय? 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही प्रार्थना गायत्री मंत्राच्या पोटातूनच निघालेली आहे.

मर्त्याने अमर्त्याची उपासना करावी

सर्वांच्या कल्याणाची इच्छा असेल तरच असत्याकडून सत्याकडे जाता येईल. मारणमरणातून चिरंजीवाकडे–स्थिर जीवनाकडे जाता येईल; अंधारातून प्रकाशाकडे जाता येईल. म्हणून असत्य नको; संकुचितता नको, ''भूमा स्याम–आपण मोठ्या दृष्टीने व्हायला हवे.'' असे ऋषी म्हणतो.

''अद्या मरीय यदि यातूधानोऽस्मि–मी राक्षसी बुद्धीचा असेन तर मरू दे ताबडतोब मला.'' कारण जगून काय करायचे? मर्त्य माणसाने अमर्त्य जे आहे त्याची पूजा करावी. अमर्त्य काय आहे? त्या त्या माणसांत जे चैतन्य आहे ते अमर्त्य आहे. व्यापक असते ते अमर असते. सत्य अमर असते. त्याची आपण पूजा करावी.

अमर असा प्रकाश उत्तरोत्तर विकसित होत मानवजातीला मिळत आहे, त्याची आपण उपासना करावी. तो जो ज्ञानाग्नी प्राचीन काळापासून पेटत येत आहे, त्याची आपण मर्त्यांनी आपल्या जीवनात पूजा करावी. तरच यश मिळेल. तो समाज वैभवाकडे जाईल.

प्राचीन ऋषींनी असे थोर थोर विचार दिले. मी एकटा बसलो म्हणजे मला हा विचार आठवतो, मी उचंबळतो. मी एकटा असलो म्हणजे तेथेच डोके वाकवून त्या प्राचीन ज्ञात–अज्ञात ज्ञानेश्वरांना मी वंदन करतो. माझी ती थोर दैवते आहेत.

✦✦✦

ध्रुव बाळ

लहान मुलांनी परमेश्वर जितक्या सुलभतेने मिळवला, तसा दुसऱ्या कोणाला मिळवता आला नाही. इतरांना किती कष्ट, किती यातायात; किती घोर तपश्चर्या नि योगसाधना; परंतु लहान बालकांनी एका झेपेत प्रभूला पकडले. लहान मुलांचा स्वभाव निर्मळ असतो. त्यांचा निर्धारही अचल असतो. त्यांनी एकदा मनात घेतले की घेतले. त्यांची एकाग्रताही पटकन होते. किती स्थिर दृष्टीने एखाद्या वस्तूकडे ती पाहात राहतात. खेळात रमली तर तहानभूक विसरतात. हिंदुस्थानचा इतिहास लहान मुलांनी जणू बनवला आहे. ध्रुव बाळापासून तो हुतात्मा शिरीषपर्यंत लहान बाळांची महान परंपरा आहे. या तेजस्वी परंपरेचे ध्रुव नि प्रल्हाद प्रस्थापक आहेत.

प्राचीन भारतातील किती तेजस्वी, पुण्यप्रतापी मुले माझ्या डोळ्यांसमोर येतात. सनक, सनंदन, सनातन आणि सनत्कुमार हे ब्रह्मदेवाचे चार मानसपुत्र. तो उपमन्यू, तो सत्यकाम, नि तो मृत्युदेवाजवळही अध्यात्मविद्येचे धडे घेणारा बाळ नचिकेत; पित्याला शिकवणारा अष्टावक्र; मरायला आनंदाने तयार होणारा चिमणा चिलया, आणि मायबापांबरोबर सारी सुखे सोडून उपाशीतापाशी जाणारा तो रोहिदास; किती तरी तेजस्वी बाळे; परंतु ध्रुव नि प्रल्हाद यांचे तेज औरच आहे.

ध्रुवतारा, ताऱ्यांभोवतालचे काव्य

तो आकाशातील ध्रुवतारा आपण ध्रुवाचा मानतो. तो आकाशातील तारा सर्व जगाला मार्गदर्शन करीत आला आहे. भारतीय ध्रुव आकाशात बसून साऱ्या विश्वाचा झाला आहे. प्राचीन भारतीय दंतकथा आकाशातील ताऱ्यांच्या महाकाव्याशी एकरूप

झालेल्या आहेत. त्या अति प्राचीन पूर्वजांना हिंदुस्थानात आल्यावर स्वच्छ अशा खात्रीच्या निरभ्र आकाशात अनंत तारे दिसत. त्यांचे मन उचंबळे. ते सारखे पाहात राहिले असतील. आकाशातील ताऱ्यांभोवती रमणीय दंतकथा पूर्वजांनी निर्माण केल्या. त्यांनी ते श्रवण नक्षत्र पाहिले. कावडीसारखे दिसणारे. त्यांना वाटले काय बरे हे आहे आणि श्रावणाची करुण कथा जन्मली. अंध आईबापांना मुलगा कावडीत घालून हिंडवी. श्रावण त्या मुलाचे नाव. किती सहृदय कल्पना आणि दशरथाच्या हातून त्या मुलाचा–पितृनिष्ठ बाळाचा–चुकून मृगया करताना वध झाला. मायबाप पुत्रशोकाने मेले आणि दशरथाला त्यांनी शाप दिला. तूही पुत्रशोकाने मरशील. राजाला त्या शापातही जणू आशा मिळाली. पुत्र नसेल तर पुत्रशोक कोठला? तेव्हा पुत्र होणार ही आशा निर्माण झाली. साऱ्या रामायणाचा धागा येथे सापडतो. परंतु श्रावणाची कथा, रामायणाचे हे सूत्र आकाशातील तीन ताऱ्यांच्या श्रवण–नक्षत्रांभोवती सारे गुंफलेले आहे आणि व्याध व मृग नक्षत्र यांची कथा! व्याध हा तेजस्वी तारा आणि मृग नक्षत्राची ती हरिणाकार आकृती आणि तेजस्वी ताऱ्यांचा तो बाण. हे सारे पाहून मृग–व्याधाची रमणीय दंतकथा पूर्वजांनी निर्मिली. एक व्याध होता. त्याने मृगाला पकडले. मृग म्हणाला, ''एकदा गेल्यावर तू मरायला पुन्हा कशाला येशील?''

मृग म्हणाला, ''मी सत्यव्रत आहे.'' व्याध म्हणाला; ''जा; तुम्हा चतुष्पादांची सत्यनिष्ठा पाहू दे.'' मृग गेला. त्याच्या घरची मंडळी चिंतातुर होती. पिले चारा खात ना. त्याची पत्नी केविलवाणी दशदिशांकडे पाहात होती. वृद्ध मायबापे अश्रू ढाळीत होती. इतक्यात मृग दिसला.

''बाळ, का उशीर? आमच्यावर का रागावलास?'' मायबापांनी विचारले. मृगाने सारा प्रसंग सांगितला.

तो म्हणाला, ''तुम्हाला शेवटचं भेटून घ्यायला मी आलो आहे. आता जाऊ दे.''

सारी म्हणाली, ''आम्हीही येतो. आम्हालाही मरू दे.''

सारा कळप निघाला. व्याध वाट पाहात होता.

''मी आलो; मार.'' मृग म्हणाला.

''आम्हाला मार.'' मुले म्हणाली.

''आम्हाला मार.'' वृद्ध मायबापे म्हणाली.

''आम्हा सर्वांनाच मार.'' हरिणी म्हणाली. मृगाची सत्यनिष्ठा आणि त्या सर्वांचे अन्योन्य प्रेम पाहून तो व्याध विरघळला.

''जा. मी कुणालाच मारीत नाही.'' तो बोलला.

सत्यनिष्ठा मृग-कुटुंबाचे आकाशात ते तारे झाले. प्राणदान करणारा तो व्याधही तेजस्वी तारा झाला. सुंदर रूपक-कथा! ययाती-शर्मिष्ठा यांचे असेच काव्य आहे. शर्मिष्ठेच्या ताऱ्याला इंग्रजीत ''आरामखुर्चीतील रमणी'' असे नाव आहे आणि जवळच पाठीमागे इंग्रजी 'वाय' अक्षराच्या आकाराचा ययातीचा तारा आहे. जणू दोघे प्रेमालाप करीत आहेत. परस्परांचा वियोग परस्परांना क्षणभर सहन होत नाही. ययाती-शर्मिष्ठांचे प्रेम आदर्श मानले जाते. सासरी जाणाऱ्या शकुंतलेला कुलपती कण्व म्हणतो, ''ययातिरिव शर्मिष्ठा भर्तुर्बहुमता भव-ययातीची शर्मिष्ठा जशी आवडती तशी तू दुष्यंताची हो.''

अगस्तीच्या ताऱ्याची अशीच गोष्ट. अगस्तीचा तारा भाद्रपदअखेर दिसू लागतो, आणखी वैशाखअखेर तो दिसेनासा होतो. उत्तर गोलार्धात तो अधिक दिसतो; दक्षिण गोलार्धात गेल्यावर दिसत नाही. ताऱ्यावरून त्याच्या अस्तोदयावरून कथा निर्माण झाली. तो दिसू लागला म्हणजे समुद्र शांत होतो, तो अस्तास गेला म्हणजे पावसाळा सुरू होतो, समुद्र खवळतो. अगस्ती ऋषी, समुद्र प्राशन करणारा अगस्ती ऋषी वसाहती वसवणारा, सात समुद्र हिंडणारा म्हणून प्रसिद्धच आहे. त्याचे नाव त्या ताऱ्याला दिले. अशा या ताऱ्यांभोवती गुंफलेल्या गोष्टी आहेत. प्राचीन पूर्वज आकाशप्रेमी नि प्रतिभावान होते.

ध्रुवकथा

ध्रुवकथा अशीच जन्मली असावी. तो ध्रुवाचा जरा लहानसा; परंतु तेजस्वी तारा उत्तरेला दिसतो. त्याच्याभोवती कोणी नाही. जणू परित्यक्त बालक. जरा लांब दोन ठळक तारे दिसतात. सावत्र आई सुरुची नि पिता उत्तानपाद म्हणजे पाय उचलून लाथ मारणारा (अक्षरश: ज्याने पाय उचलला आहे असा.) त्या दूरच्या ताऱ्याला यांनी का खाली ढकलले? बापाने मांडीवरून का लोटले? ध्रुवाच्या आईचे नाव सुनीती. सावत्र आईचे नाव सुरुची. ती ऐटीने उभी आहे. आई कोठे आहे? नीतीला कोण मान देणार? ती अंधारगृहातच होती. तिचा अगदी बारीक तारा दिसतो आणि तो बाळ देवाकडे गेला. देवाजवळ हट्ट धरता झाला. त्याला अढळ स्थान मिळाले

आणि आता पिता नि सावत्र आई त्याला प्रदक्षिणा घालू लागली. सप्तर्षी भोवती फिरू लागले. अशा आकाशातील दर्शनावरून ध्रुवाची कथा निर्माण झाली असावी.

भारताची ध्येये या सर्व दंतकथांतून दृष्टीस येतात. दंतकथा म्हणजे आपले अमर भांडार आहे. त्यांची ऐतिहासिक सत्यता पाहायची नसते. सत्य म्हणजे तरी काय? जन्मला, जगला, मेला म्हणजे का सत्य? मारामाऱ्या, द्वेष-मत्सर, काम-क्रोध म्हणजे का सत्य? ही सृष्टी, हा संसार, हा समाज यांच्याविषयी? ज्या आदर्श कल्पना आपल्या मनात खेळतात, त्यांनाच खरोखर सत्यत्व आहे. कारण त्यांच्यासाठी आपण धडपडतो. ध्रुवाची कथा त्या अर्थाने सत्यमय आहे. न्यायमूर्ती रानडे ध्रुव, प्रल्हाद इत्यादींच्या प्राचीन कथांविषयी बोलताना म्हणायचे, ''या गोष्टी खरोखरच घडल्या अशा अर्थानं आपण पाहू नये. त्या कथांतील सार घ्यावे.''

लहानपणी भागवतात ही ध्रुवकथा मी प्रथम वाचली. तसेच आमच्या गावात एक कीर्तनकार आले होते. त्यांनी ध्रुवाख्यान फार रंगवले. माझ्या डोळ्यांतून पाणी येत होते. ध्रुवाच्या गोष्टीने मला वेड लागले होते. नावडत्या राणीचा तो बाळ. मुलांत खेळताना त्याचा अपमान होतो.

''तुझ्या बापानं तुला टाकलं आहे. राजाचा मुलगा; परंतु भिकारी. उगीच ऐट कशाला?'' असे मुले त्याला म्हणतात. ध्रुव आईला विचारतो, ''मी जाऊ का बाबांकडे?'' ती नको म्हणते; परंतु आशेने ध्रुव जातो. तो बापाला शोधतो. पित्याच्या मनात क्षणभर वात्सल्य जागे होते. तो त्याला मांडीवर बसवतो. इतक्यात पट्टराणी येते. ती त्याला ढकलून देते. ''या मांडीवर बसण्याचं तुझ्या नशिबात नाही. माझ्या पोटी यावं लागतं. हो दूर. पूर्वपुण्याई लागते राजाच्या मांडीवर बसायला.'' ती पतीला बोलते. तिच्या मुठीत वागणारा राजा बाळाला ढकलतो. बाळ रडत आईकडे जातो. माता वाटच पाहात होती. अपेक्षित ते घडले.

''काय झालं बाळ? तिनं मारलं ना? म्हटलं तुला जाऊ नकोस. तरी गेलास. का बरं, आईचं ऐकलं नाहीस? ये, रडू नकोस.''

''आई, पित्यानं मला लोटलं. सावत्र आईनं मारलं. राजाच्या मांडीवर बसायला पुण्य लागतं, भाग्य लागतं, असं ती म्हणाली. आई, मी घरात राहणार नाही. मी जातो. पुण्य मिळवायला जातो. त्याचा मार्ग सांग, उपाय सांग. मी इथं राहणार नाही. उद्या मुलं आणखीन अपमान करतील. अपमान म्हणजे मरण.''

''बाळ, यशाचा मार्ग एकच, सर्व वैभवाचा मार्ग एकच. त्या विश्वंभराला शरण जा. ज्यानं हे विश्व निर्मिलं, हे अनंत तारे निर्मिले, त्याची प्रार्थना कर.''

''तो कसा मिळेल? कुठं जाऊ, कुठं पाहू?''

''तपोवनात जा. त्याचा जप करीत बस. त्याचा धावा कर. त्याला हाक मार. तुझ्या हाकेला तो ओ देईल. बाळ, परंतु तू कशाला जातोस? इथंच राहा. मला तरी कोण? तूच एक माझं विसाव्याचं स्थान.''

''आई, जाऊ दे. परमेश्वर तुला सांभाळील. मी इथं राहणार नाही. अपमान दूर केल्याशिवाय मला चैन पडणार नाही. तुझा आशीर्वाद हे माझं बळ.''

आणि बाळ आईच्या पाया पडून निघाला. आठ वर्षेही वयाला नव्हती. अजून मुंजही झाली नव्हती. असा हा कोवळा वेल्हाळ बाळ जग जिंकायला नव्हेतर जगदीश्वराला जिंकायला बाहेर पडला. श्रद्धा नि विश्वास. सरलता नि पावित्र्य यांच्या बळावर तो त्या महान ध्येयार्थ बाहेर पडला. माता साश्रू नयनांनी पाहात होती.

आणि पित्याच्या कानांवर वार्ता गेली. राजा दुष्ट होता तरी लोकनिंदेला भीत असे. त्याने मुलाला समजावून आणायला दूत पाठवले. बाळ गेला नाही.

''तुझा पिता बोलावीत आहे.'' ते म्हणाले.

''परात्पर पिता मला बोलावीत आहे तिकडे मी जातो.'' तो म्हणाला.

निराश होऊन सेवक, दूत परतले. स्वतः राजा मग निघाला. कवींनी हा प्रसंग किती सुरेख रंगवला आहे. अपमान करणारा पिता बाळाची समजूत घालीत असतो:

''फीर मागे देईन एक गाव
ध्रुव बोले देईल देव–राव ''

असा संवाद चालला. आता बापाजवळचे क्षणभंगुर वैभव कशाला? तो प्रभुवराजवळ शाश्वत वैभव मागायला जात असतो. सामान्य बालक तेव्हाच भुलले असते. एक गाव,दहा गावे, अर्धे राज्य, सारे राज्य राजा देऊ लागतो; परंतु ध्रुव विचलित होत नाही. मोहात पडत नाही. वडी पाहून, खाऊ पाहून, खेळणे पाहून मूल भुलते. परंतु हे मूल निराळ्या तेजाचे होते. बाप हिरमुसला होऊन माघारी वळतो आणि तेजस्वी ध्रुवबाळ पुढे जातो.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)

नारदऋषींची भेट

वाटेत नारद भेटतात. तेही त्याला घरी जा म्हणून सांगतात. ''तू लहान. घोर अरण्य लागेल. वन्य श्वापदे अंगावर येतील. साप फूत्कारत येतील.नको जाऊ बाळ. चल मी तुला घरी नेतो. तुझ्या पित्याची समजून घालतो. अरे, तुझी मुंजही नाही. ज्ञानाचा काय तुला अधिकार? थोर-मोठ्यांना देव मिळत नाही. हजारो वर्षं तपश्चर्या करतात; परंतु प्रभुप्राप्ती होत नाही. तुला मुलाला कुठून देव मिळायला? चल माघारा; हट्ट नको करू.''

''आता मरेन; परंतु माघारी येणार नाही. देव मला भेटेल.'' आई म्हणाली- लहान मुलाची हाक तो ऐकेल. आई का खोटं बोलेल? मला जाऊ दे. मला कशाचीही भीती नाही. लहान मुलाला कोणी खाणार नाही. तुम्ही जा; मला जाऊ दे.''

''बाळ, त्याला तू कोणत्या नावानं हाक मारणार?''

''मी देवा देवा म्हणेन; प्रभू प्रभू म्हणेन-''

''तू 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' हा मंत्र म्हण. या मंत्राचा अहोरात्र जप कर. प्रभुमूर्ती अंतःकरणांत स्थापन कर. चार हातांचा तो देव, शंख चक्र, गदा, पद्मधारी, पीतांबर नेसलेला, वैजयंती माळा गळ्यात असलेला असा तो नारायण-त्याची मूर्ती हृदयात बघत जा. तुला देव भेटेल जा. तुला यश येवो.''

सत्त्वपरीक्षा

तो तेजस्वी, करारी ध्रुव पुढे जातो आणि सुंदर तपोवन लागते. नदी वाहात असते, सुंदर पक्षी दिसतात. फुलाफळांनी भरलेले वृक्ष दिसतात. पवित्र रमणीय जागा. ध्रुवाने आसन घातले. त्याने जप सुरू केला. हृदयात ती नारायणमूर्ती बिंबली होती. त्याची सत्त्वपरीक्षा सुरू झाली. श्वापदांच्या आरोळ्या कानांवर येऊ लागल्या. जणू विश्वातील सारी दुष्ट शक्ती त्या लहान बाळाला भक्षू पाहात होती. शुक्राचार्यांना सृष्टीतील सारे मोहक सौंदर्य भुलवू पाहात होते. ध्रुवाला विश्वातील भेसूरता भिववू बघत होती; परंतु शुक्राचार्य अचल राहिले. तसाच हा बाळ अचल राहिला. त्याने डोळे उघडून पाहिलेही नाही.

हृदयी बिंबले स्वरूप सुंदर
मग काय पार संसाराचा ॥

अंतःकरणात प्रभुमूर्ती होती. ध्रुव अंतर्मुख होता. अंतर्दृष्टी होती. हृदयातील नारायणाकडे तो बघत गेला.

प्रभू आला!

सात दिवस अहोरात्र बाळाने जप केला. प्रत्यक्ष परमात्मा समोर येऊन उभा राहिला; परंतु अंत:करणातील रूपाच्या ठिकाणी ध्रुवाचे डोळे गुंतले होते, ते बाहेर बघतील कशाला? तो आपल्या साधनेतच तन्मय होता. शेवटी प्रभूने त्याच्या हृदयातील ती मूर्ती नाहीशी केली. बाळ कावराबावरा झाला. जणू प्रकाश गेला. ठेवा गेला. त्याने डोळे मिटले, उघडले– आत बाहेर सर्वत्र तोच दिसू लागला. हाच तो देव! त्याला वाटले. त्याने प्रभूचे चरण धरले. तो गहिंवरला. देवा! देवा! म्हणू लागला. तो स्तुती तरी काय करणार? मनातील भावना शब्दांत प्रकट होऊ पाहात होत्या. भगवंताने त्याच्या गालाला शंख लावला आणि बाळ वेदोमूर्ती झाला. एखाद्या थोर कवीप्रमाणे तो प्रभूची स्तुती करू लागला.

''बाळा, मी प्रसन्न झालो आहे. काय देऊ?''

''न जाणारं, शाश्वत रूपाचं वैभव दे. माल क्षणभंगुर काही नको.''

''मी तुला अढळपदावर बसवतो, तू अच्युत आहेस. कुणीही तुला च्युत करू शकणार नाही; परंतु आधी घरी जा. तुझ्या वडिलांना, सावत्र आईला आता दु:ख होत आहे. तुझी आईही कंठी प्राण धरून आहे. घरी जा. सर्वांना सुखव. न्यायानं राज्य कर आणि शेवटी मेल्यावर अढळपदावर आरूढ हो. तिथून जगाला मार्गदर्शन कर.''

कृतार्थ बाळ परत येत होता. राजाच्या कानांवर वार्ता आली. सारी प्रजा दर्शनार्थ लोटली. चतुरंग सैन्यानिशी राजा सामोरा गेला. आनंदाला सीमा नव्हती. पित्याने बाळाला हृदयाशी धरले. सुरुचीनेही धन्यवाद दिले आणि तो आपल्या मातेला भेटला. त्या प्रसंगाला कोण वर्णील? राजाने ध्रुवाला राज्याभिषेक केला. राजा तपासाठी निघून गेला. ध्रुवाने न्यायाने राज्य चालवले, मेल्यावर तो अढळपदी बसला.

ध्रुव ध्रुवचि तो खरा

प्राचीन काळापासून ही ध्रुवकथा सर्वांना स्फूर्ती देत आली आहे आणि भारतवर्ष आहे तोवर ती स्फूर्ती देत राहील. ध्रुव म्हणजे विश्वाचा महामेरू. ध्रुव म्हणजे क्षुद्र गोष्टींना न भुलणे, क्षणभंगुराला न कवटाळणे; ध्रुव म्हणजे निर्भयता, ध्रुव म्हणजे विश्वास; ध्रुव म्हणजे अपार श्रद्धा, अनंत साधना, ध्रुव–कथा सांगत आहे की एकदा ध्येय निश्चित केलेत म्हणजे त्याच्या पाठोपाठ जा. मग दुसरी गती नाही. दुसरा उद्योग नाही.

ध्रुवाने अपमान सहन केला नाही. अपमान सहन करणे म्हणजे आत्महत्याच ती. अपमान गिळल्यावर शिल्लक काय राहणार? अर्थात ध्रुव सदाभिमानाचा भोक्ता होता. अहंकारी नव्हता. आई सावत्र असली तरी पिता सावत्र नव्हता. पित्याला सारी बाळे समानच; परंतु पिताही सावत्रपणा दाखवतो. हे त्या तेजस्वी बाळाला सहन झाले नाही.

माझे एक मित्र आहेत त्यांचे वडील त्यांना न्याय्य हिस्सा देत नाहीत. त्यांच्या गैरहजेरीत पित्याने वाटणी केली. एका मुलाला अधिक दिले, एकाला कमी. माझा मित्र ध्येयार्थी. तो देऊन टाकील सारे असे का पित्याला वाटते? माझ्या मित्राने मला ही गोष्ट सांगितली. मी म्हटले, ''कशाला झगडता? आपण स्वातंत्र्याच्या लढाईत सर्वस्व त्यागानं पडलो. मग जमिनीची काय कथा?'' ते मला म्हणाले, '' मला जमिनीची आसक्ती नाही; परंतु हा अपमान वाटतो. आम्ही दोघे सख्खे भाऊ असं असताना हा अन्याय का? मला हा अन्याय सहन होत नाही.'' मला ध्रुवाची गोष्ट आठवली. ध्रुव अपमान सहन करू नको सांगतो; परंतु अपमान सहन न करणे म्हणजे का कोर्ट कचेऱ्या करणे? ध्रुवाने बापाचे काहीच नको म्हटले. अन्यायी पित्याचे मला काहीच नको आणि स्वत: उभा ''देवा, सांगू दु:ख?'' इतरेजनांजवळ रडकथा सांगत न बसता, हृदयात सत्यनारायणाला स्थापून तो प्रयत्नदेव झाला. ध्रुव या शब्दाचाच आता 'प्रखर निश्चयी' अस अर्थ झाला आहे. ध्रुव म्हणजे शाश्वत टिकणारे. ध्रुवासारखा करारी नि निर्धारी ध्रुवच. म्हणून कवी मोरोपंत म्हणतात :

''ध्रुव ध्रुवचि तो खरा प्रखर काय विश्वास तो'' अशी श्रद्धा; असा अचल विश्वास, असा मोहविर्ममुक्त निश्चय कोठून आणायचा?

मी जाऊ का रानात?

लहानपणी आई चुलीजवळ असे. मी तिच्याजवळ असे. मी विचारायचा, ''आई, मी जाऊ का ध्रुवासारखा? मला भेटेल का देव? तू सांग.'' आई एकच म्हणे, ''कुठं तो ध्रुव आणि कुठं तू रडका, हट्टी मुलगा?'' परंतु माझ्या कितीदा तरी मनात विचार येत. कधी वाटे, शेतावरच्या आंब्याच्या झाडावर बसून राहावे. जवळच्या नदीत पहाटे स्नान करावे. रात्रंदिवस 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' म्हणावे. ध्रुवाला देव सात दिवसांत भेटला. मला नाही का भेटणार? माझे वडील येतील. मी त्यांना

दिसणार नाही. ते शोधतील. आई म्हणेल "ध्रुवाप्रमाणं वेडबंबू गेला की काय? काय करावं या पोराला! भारीच विचित्र!"

परंतु आई म्हणे ते खरे. कोठे तो ध्रुव आणि कोठे मी? मी चंचल आहे. अजून शेकडो मोह आकृष्ट करतात. निश्चय ठरत नाही. ध्येय दिसत नाही. असे असले तरी या ध्रुव कथेने माझ्यावर अपार परिणाम केला आहे. ध्रुवनारायणाची ती तसबीर मला अत्यंत आवडते. स्थिरमती ध्रुव आसनावर बसला आहे. समोर भगवान कृपाळूपणाने उभा आहे. किती तरी वेळा माझ्या मनात येते की आपण बसलो आहोत नि प्रभू मस्तकावर हात ठेवीत आहे; परंतु मनोराज्य काय कामाचे? त्यासाठी अनंत साधना हवी, ती कोठून आणू?

बाळ ध्रुवा,हे चिरंजीव भारतीय आदर्शा! तू मला भरपूर दिले आहेस. तू हजारो वर्षं कोट्यवधी लोकांत श्रद्धा, विश्वास दिली असशील. जन्मोजन्मी तू माझा आधार राहा. दिवसेंदिवस क्षुद्रता सोडून उच्च ध्येयाकडे मला जाऊ दे. निर्दोष विकासाकडे जाऊ दे. तू आमच्या जीवनाचा ध्रुवतारा आहेस. पवित्र, निर्मळ, अढळ, सतेज, प्रशांत असा तू सदैव मार्गदर्शन करीत राहा. तुला भक्तिमय प्रणाम.

✦✦✦

प्रल्हाद

ध्रुव म्हणताच प्रल्हादही आठवतो. ही अमर अशी जोडी आहे. दोघेही बंडखोर; दोघे पित्याविरुद्ध बंड करणारे. एकाने पित्याचा त्याग केला. दुसरा तेथेच पित्याच्या क्रोधाला तोंड देऊन लढत राहिला. सत्याग्रही पद्धतीने सारे सहन करीत अविचल असा तो राहिला. प्रल्हाद हिरण्यकशिपूचा मुलगा. त्याच्या आईचे नाव कयाधू. हिरण्यकशिपू हा मोठा सम्राट होता. त्याचे नावच हिरण्यकशिपू म्हणजे सोन्याची पेटी. जगातील सारी धनदौलत त्याच्याजवळ होती. साऱ्या सोन्या-चांदीचा, हिरेमाणकांचा तो स्वामी होता. त्याच्याहून कोण मोठा, कोण पूजार्ह, कोण मानार्ह? बाळ प्रल्हाद हे पित्याचे वैभव पाहात होता; परंतु ते त्याला रुचले नाही. ती पापमय सत्ता त्याला आवडली नाही. जगाला गुलाम करून लूटून आणलेले ते भाग्य! त्यांची काय किंमत? काय त्यात अर्थ? त्याला पित्याचा मोठेपणा पटेना, विश्वाचे भक्षण करणारा मोठा, की रक्षण करणारा मोठा? कोण मोठा? आपला पिता तर जगाला छळत आहे. तरीही हे विश्व चालले आहे. माझ्या पित्यासारखे सहस्रावधी सम्राट पृथ्वीला छळणारे झाले असतील, पुढे होतील; परंतु पृथ्वी आहे; हें सम्राट मात्र धुळीत मिळाले. कोण मोठा? प्रल्हादला सर्वत्र पित्याची स्तुतिस्तोत्रे ऐकायला येत. दरबारात पित्याचे भाट. सर्वत्र पित्याचे खुशामते; परंतु पाठीमागे पित्याची निंदाही त्याला ऐकू आली असेल. वरवरच्या स्तुतीच्या खालचे सत्य त्याने पाहिले असेल.

शिक्षण

प्रल्हाद शिकू लागला. गुरू धडे देऊ लागले. कोणते शिक्षण त्याला मिळणार? सम्राटांच्या राज्यात सम्राटांचे गोडवे. हुकूमशाही राज्यपद्धतीत दुसरे शिक्षण नसते.

त्या हुकूमशाहीचे सर्वत्र समर्थन असते. प्रल्हादला तेच शिक्षण मिळू लागले. गुरू सांगत, ''पित्याला प्रणाम कर. हिरण्यकशिपू हाच देव. हाच त्रैलोक्यात थोर सर्वांहून. यांची स्तोत्रं हात जोडून म्हण.''

माझा देव वासुदेव

परंतु प्रल्हाद ऐकेना. तो म्हणे : ''माझा पिता जन्मदाता म्हणून पूज्य असला तरी तो थोर नाही; खरा थोर तो परमेश्वर. तो वासुदेव. तो विश्वंभर. तो सर्व व्यापून राहणारा भगवान विष्णू. ज्याच्या इच्छेनं हे विश्व जन्मतं, ज्याच्या इच्छेनं हे चालतं, तो विश्वंभर खरा पूजार्ह. मी त्याचं नाव घेईन. त्याला नमो नमो म्हणेन. दुसरं दैवत मला नको. पिता आज आहे, उद्या जाईल. परमेश्वर सनातन आहे. त्या सनातनाला मी भजेन. क्षणभंगुराची पूजा करण्यात काय अर्थ?''

गुरू म्हणत : ''असं बोलू नकोस, कुणी ऐकलं तर काय म्हणेल? मीच असं शिकवतो असं होईल. माझी नोकरी जाईल. मला सुळावर चढवतील. असं नको करू बाळ. म्हण, 'हिरण्यकशिपू मोठा; तो सर्वांहून थोर. त्याला भजावं; त्याला नमावं.' म्हण.'' प्रल्हादाने ऐकले नाही. तो एकच धडा शिकत होता, ''वासुदेवाय नम: । वासुदेवाय नम:।'' गुरूने धाक दाखवला. शिक्षा केली. छड्या मारल्या. प्रल्हाद तरीही वासुदेवाचे नाव सोडीना. तो म्हणे, ''मी खोटं कसं बोलू? माझा पिता वरिष्ठ; वरिष्ठ असं कसं म्हणू? आपण सारी मर्त्य माणसं. मातीत मिळणारी. खरा थोर एक परमात्मा; तो चराचराचा स्वामी, या ब्रह्मांडाचा सूत्रचालक. त्यालाच वंदावं, त्यालाच भजावं. गुरुजी, तुम्हीही वासुदेवाय नम: म्हणा. तुम्ही कशाला पाप करता? तुम्हाला माझे बाबा खरोखर मोठे असं वाटतं का? तुम्ही भिऊन वागता आणि ज़िथं भीती आहे तिथं कुठलं सत्य, तिथं कुठला धर्म, तिथं कुठला परमात्मा?''

मुलांचा मेळावा

आणि प्रल्हाद या गोष्टीचा मुलांत प्रचार करी. तो त्यांना म्हणे, ''माझ्या पित्याच्या नावाचा काय जयजयकार करता? लोकांना तर त्यानं त्राहि भगवान केलं आहे. हजारोंना त्यानं तुरुंगात टाकलं आहे. लाखोंना गुलाम केलं आहे. पित्याचं नाव सोडा. प्रभूचं नाव घ्या. चराचराचा जो स्वामी, जो अनंत विश्वे निर्मितो, रवी, शशी, तारे वर फुलवतो, त्याला भजा. त्याला वासुदेव म्हणतात. त्याला नारायण म्हणतात. भगवान विष्णू म्हणतात. त्याची आपण स्तोत्रं म्हणू. त्याचा जयजयकार करीत नाचू.''

प्रल्हाद मुलांचा नायक झाला. घरोघर प्रचार होऊ लागला. लोकांच्या मनाची कोंडी झाली होती, ती मुलांनी फोडली.

नौखालीतील महात्माजींचा अनुभव

अगदी हुबेहूब असाच अनुभव नौखालीत महात्माजींना आला. कोणी घराबाहेर पडेना. महात्माजी लोकांना प्रार्थनेला बोलावीत. कोणी येईना. महात्माजींचे अनुयायी रस्त्यांतून 'रघुपति राघव राजाराम' म्हणत जात. स्त्री-पुरुष, मुले-बाळे घरांच्या खिडक्यांतून बाहेर डोकावत; परंतु त्या भजनी मंडळीत कोणी सामील होईना. मुसलमान म्हणत, "काय छाती आहे या लोकांची जाहीरपणे रामनाम म्हणण्याची. इथं अल्ला शब्द घुमेल. रामनाम बंद!" महात्माजींच्या अनुयायांना एक युक्ती सुचली. त्यांनी मुलांना खेळायला बोलावले आणि एक मुलगा आला. दुसरा आला. मुले चेंडू खेळू लागली. हसू खेळू लागली. आत्मा मुक्त झाला. दोन दिवशी तिरंगी झेंडा तेथे लावण्यात आला. "या . याचं गाणं म्हणू, नि आज आपण 'रघुपति राघव राजाराम' म्हणत जाऊ. चला." मुले निघाली. पंधरा मैल ती मिरवणूक निघाली. शेकडो मुले गर्जना करीत निघाली. मग मोठी मंडळीही बाहेर आली. स्त्रियाही आल्या. मुसलमान बघतच राहिले. "रामनाम इथं बंद." अशा गुर्मीत आपण होतो; परंतु ही मुले निर्भयपणे जयघोष करीत जात आहेत. त्या मुलांवर त्यांना हात टाकवला नाही. त्या दिवशी महात्माजींच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू आले. त्यांच्या तोंडावर आशा फुलली, आणि आल्यापासून पहिल्यांदाच ते म्हणाले, "अंधारात आज मला किरण मिळाला." हा किरण वानरसेनेने त्यांना दिला. मुलांची शक्ती, कुमारांची शक्ती अपूर्व आहे. प्रल्हादाने असेच बाळगोपाळ गोळा केले. निर्भयतेचे वातावरण निर्माण होऊ लागले. हिरण्यकशिपू की जय या ऐवजी, भगवान वासुदेव की जय, असे घोष होऊ लागले.

पित्यासमोर

पित्याच्या कानांवर गोष्टी गेल्या. त्यांनी गुरुजींस बोलावून सारे विचारले. गुरुजी थरथरत होते. ते म्हणाले, "मी काय करू? तुमचा मुलगा ऐकत नाही. तो मलाच उलट शिकवतो. म्हणतो, 'तुम्ही चुकीचं शिकवता. सारं शिक्षण म्हणजे परमेश्वराला भजणं, त्याला स्तवणं.' मी त्याला शतवार सांगितलं की हिरण्यकशिपू सर्वांत मोठे. तो संतापून म्हणाला, 'तो भगवान वासुदेव मोठा, तुम्ही मला खोटं शिकवता.' काय

करायचं तुमच्या मुलाला? तो इतर मुलांनाही फूस देतो. तोच जणू शाळा चालवतो. मुलं त्याच्याभोवती.''

पिता खवळला. त्याने पुत्राला बोलावणे पाठवले. प्रल्हाद आईजवळ होता. ती त्याला सांगत होती, ''बाळ, पित्याचं ऐक. ते रागावतील. मारतील. त्यांचा शब्द मोडू नकोस.''

प्रल्हाद म्हणाला, ''आई, मी का सत्य सोडू? सत्याहून थोर काय आहे? सत्यासाठी जगावं. वडील पूज्य; परंतु ते का देवाधिदेव? शेवटी सर्वांना मरायचंच आहे.''

आई म्हणाली, ''तुझा पिता अमर आहे. त्यांनी तसे वर मिळवले आहेत. घोर तपश्चर्या करून त्यांनी अमरता संपादिली आहे. ते सर्वांना अजिंक्य आहेत.''

प्रल्हाद म्हणाला, ''अमरतेचा वर देवाजवळूनच त्यांनी मिळवला ना? म्हणजे शेवटी कोण? कुणाचा त्यांनी जप केला? वरांची कोणाजवळ भिक्षा? आपण मर्त्य जीव. सर्वश्रेष्ठ तो परमात्मा. त्याला भजावं; त्याला नमावं. खोटा अहंकार काय कामाचा? सत्य ते सत्य.''

आई म्हणाली, ''तुझा पिता महाबळी आहे. सारी संपत्ती त्याच्यापाशी आहे.''

प्रल्हाद म्हणाला, ''बळीचा बळी तो वासुदेव. त्याच्या पदरजावरून सारी संपत्ती ओवाळून टाकावी.''

''बाळ, तू नाही ना ऐकत? ते तुला छळतील. त्यांना दयामाया नाही.''

''आई, तू निश्चिंत अस. तो प्रभू माता, अनाथांचा रक्षणकर्ता.''

देवानं वर तरी का दिले?

अनेक दैत्यांनी तपश्चर्या करून वर मिळवले. वर देणारे देव का मूर्ख होते? असे कसे भोळसर ब्रह्मा, विष्णू, महेश? वर देत नि पुढे त्यांना निस्तरावे लागत. हे दैत्य उद्या त्रिभुवनाला, 'दे माय धरणी ठाय' करून सोडतील, ही गोष्ट देवांना का दिसत नव्हती? देवांना सारे दिसत होते. त्यांनी वर दिले यात चूक नव्हती, दैत्य झाले म्हणून काय झाले? त्यांनी तपश्चर्या केली असेल तर तिचे फळ त्यांना मिळालेच पाहिजे. सत्कर्म कोणीही करो ते विफल कसे होईल? तेच दैत्य पुढे दुष्कर्मे करू लागल्यावर त्यांचे शासनही देवाने केले. कितीही वर मागितले तरी प्रभूला नाश करायला मार्ग

असे. प्रभूच्या अनंत ज्ञानासमोर मानवी ज्ञान कितीसे? हिरण्यकशिपूने दिवसा मरण नको. बाहेर नको. मानव, दानव, देव कोणाकडून नको. हिंस्र प्राण्याकडून नको. सजीवांकडून नको. निर्जीवांकडून नको. असे शक्य तो सर्व बाजूंनी अमरत्व मिळवले होते; परंतु त्याचे मरणही टळायचे नव्हते.

पितापुत्रांचा संवाद

आईजवळून प्रल्हाद पित्याकडे आला. त्याने पित्याला प्रणाम केला. पिता जरा प्रसन्न झाला.

''बाळ, काय काय शिकलास?''

''नमो वासुदेवाय नमो वासुदेवाय.''

''अरे वासुदेव, हा तुझ्या पित्याचा शत्रू आहे. कुठून आणलास हा वासुदेव? माझं स्तवन कर. माझी गाणी गा. गुरुजी सांगतात ते ऐक.''

''शिकवणारे गुरू म्हणजे पापाचे तरू?''

''जपून बोल. मी सांगितलेले ऐक.''

''इतर ऐकेन; परंतु या बाबतीत नाही. सर्व त्रिभुवनाचा स्वामी तुम्हांला, मला, सर्वांना जन्माला घालणारा तो परात्पर पिता भगवान वासुदेव,-त्याचं नाव घ्यावं, त्याला भजावं!''

''प्रल्हाद, ऐकणार की नाही?''

''नाही; नम्रपणानं परंतु निर्भयपणे सांगतो, नाही!''

''तुला शिक्षा होईल.''

''मला भय नाही.''

''तुझे हाल हाल करीन.''

''मी आनंद मानीन.''

''आगीत टाकीन, तेलात टाकीन, पर्वतावरून लोटीन.''

''प्रभूची कृपा समजेन.''

''सर्प डसवीन. हत्तीच्या पायाखाली तुडवीन.''

''प्रभुकृपा मानीन.''

पित्याचा संताप अनावर झाला. त्याने पुत्राच्या थोबाडीत दिली. प्रल्हाद शांतपणे उभा होता. पित्याने खड्ग उपसले. पुत्र प्रशांत होता.

‘‘जा, याचे हाल हाल करा. भगवान वासुदेवाचं नाव घेणार नाही असं कबूल करायला लावा. न्या या कार्ट्याला.’’

प्रल्हादाला नेण्यात आले. आईने पुन्हा समजावून पाहिले. तो सत्याग्रही अचल होता. मातेचे हृदय शतविदीर्ण झालं.

‘‘आई, रडू नकोस. तुझा बाळ सत्यासाठी सारं सहन करीत आहे. सोनं अग्नीत घालून बघतात. माझीही परीक्षा होवो. मी देहाचा भक्त आहे की सत्याचा, त्याची शहानिशा होवो.’’

अनन्वित छळ

आणि त्या कुमाराचे शत-छळ झाले. त्याला आगीत टाकले. तरी तो फुलाप्रमाणे टवटवीत होता. त्याला पर्वतावरून लोटले तरी तो सुरक्षित होता.

न मरे यास्तव नेला पर्वतशिखरासि लोटला खाली.
परि तो निर्भय चित्ती वाहे नारायणासी लाखोली ॥

तो मनात वासुदेवाचा, नारायणाचा धावा करीत होता. तो अचल होता, निडर होता.

प्रल्हादाला पित्यासमोर उभे करण्यात आले.

‘‘तू मरत कसा नाहीस? काय आहे जादू?’’

‘‘प्रभू सर्वत्र आहे. तो मला सांभाळीत आहे. त्याच्या इच्छेनं आपण जगतो. त्याच्या इच्छेनं मरतो.’’

‘‘त्याच्या इच्छेनं?’’

‘‘हो. तुम्ही मला कुठंही न्या. तिथं तिथं तो मला सांभाळील. अग्नीत तो अमृतरूप होऊन मला शांतवील. पर्वताचं अंग मला फुलाप्रमाणं मऊ लागेल. पाषाणाची पारिजातकं होतील. प्रभू सर्वत्र आहे.’’

‘‘सर्वत्र?या इथं आहे? या खांबात आहे?’’

‘‘हो , अणुरेणूत तो आहे.’’

पित्याने लाथ मारली. स्तंभातील अणूंचा स्फोट झाला. नारसिंह रूप प्रकट झाले. त्या वेळेस दिवस नव्हता. रात्र नव्हती. संध्या-समय होता. नारसिंह म्हणजे धड ना मानव ना पशू. सजीव-निर्जीव नको म्हणून नखे हे साधन. नखे म्हटली तर सजीव,

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा

म्हटले तर निर्जीव. घरी-दारी नको म्हणून उंबऱ्यात, हिरण्यकशिपूला जमिनीवर नको म्हणून आपल्या मांडीवर नारसिंहाने फाडून मुक्त केले!

सत्याग्रही नि समाजवादी

असा हा भरतखंडातील पहिला बाळ सत्याग्रही. महात्माजींच्या जीवनावर प्रल्हाद चरित्राचा केवढा परिणाम! प्रल्हाद सारे सहन करतो. तो सत्याला सोडत नाही. प्रभूवर विसंबून असतो; परंतु प्रल्हाद केवळ सत्याग्रही नव्हता. त्याच्याजवळ आणखी काही तरी होते. प्रसन्न नि शांत झालेल्या नारसिंहाने वर माग म्हणून म्हटले. प्रल्हाद काही बोलेना.

''दुर्लभ असा मोक्ष तुला देऊ?''

''मला एकट्याला मोक्ष नको. मी एकटाच मुक्त होऊन काय करू?''

प्रल्हादाचे असे हे उत्तर आहे. तो सर्वांचा मोक्ष इच्छितो. सर्वांचे सुख, स्वातंत्र्य इच्छितो. तो सर्वांचा विकास इच्छितो. तो स्वत:पुरते पाहणारा नव्हता. तो प्रभूला म्हणाला, ''तुझी भक्ती मला दे. मला जनतेची सेवा करू दे.''

मोक्ष अपुरा

महात्माजी म्हणत की, ''सभोवतालचा मानवी समाज जोवर अपूर्ण आहे तोवर आपला मोक्षही परिस्थितिसापेक्ष आहे. अन्यायी राज्यात जगून तुम्ही मोक्षाचे अधिकारी कसे काय? सभोवतालचं दारिद्र्य, अन्नानदशा, विषमता ही पाहून तुम्ही मुक्त कसे काय? तुमचा मोक्ष सर्वांशी जोडलेला आहे. सर्वांना सुख मिळेपर्यंत मी पुन:पुन्हा जन्म घेईन असे भगवान बुद्ध म्हणत. तुकाराममहाराज 'गर्भवासी सुखे घालावे आम्हांसी' असेच म्हणतात. तेही 'नलगे मुक्ती' असेच म्हणतात. पुन:पुन्हा जन्म घेऊन ते सेवा करू इच्छितात. कारण एकट्याची मुक्ती त्यांनाही नको असेल. अपूर्ण जगात ती संपूर्णत: मिळणं अशक्य, प्रल्हादानं देवांपाशी वैयक्तिक मोक्ष मागितला नाही.''

सेनापतींचा आवडता प्रल्हाद

महर्षी सेनापती बापटांना प्रल्हादाचे फार प्रेम. हरिजन दौऱ्यांत आम्ही हिंडत होतो. जेथे जेथे शाळेत वा सेवा दलात मुलांमुलींसमोर बोलायची वेळ येई तेव्हा सेनापती प्रल्हादाचे उदाहरण सांगून ''असे बंडखोर व्हा. म्हातारे लोक तुमचं ऐकणार नाहीत. तुम्ही त्यांचं ऐकू नका. उद्याचं जग तुमचं आहे. म्हातारे

मुर्दाबाद, तरुण जिंदाबाद. मुलंमुली जिंदाबाद असं म्हणा. मनाला पटेल ते करा.''

प्रल्हाद हा सेनापतीचा आदर्श आहे. आज हजारो वर्षे ध्रुव-प्रल्हादांच्या आदर्शांनी भारतीय संसारात मार्गदर्शन केले आहे. ही जोडी अमर आहे. अनंत काळपर्यंत ही जोडी धीर देईल, श्रद्धा देईल, अलोट धैर्य देईल. त्या दोघांना माझे सहस्र प्रणाम. माझ्या हृदयमंदिरातील ही दोन तेजस्वी दैवते आहेत.

✦✦✦

श्री शिवराय

स्वराज्यसंस्थापक : श्रीशिवराय

आपण आज स्वातंत्र्यासाठी धडपडत आहोत. प्रबळ अशा परसत्तेशी आपण झुंज देत आहोत. मध्येच निराशा घेरते. अशा प्रसंगी कोणाचे स्मरण करावे, कोणाची मूर्ती डोळ्यासमोर आणावी? कोणाचे ध्यान करावे, कोणाजवळ स्फूर्ती व प्रेरणा मागावी? अंतःकरणात अतूट व अखूट असा ध्येयवाद व आशावाद कशाने निर्माण होईल? कितीही विपत्ती येवोत, अडचणी आ पसरून उभ्या असोत, त्या सर्वांतून मार्ग काढीत आम्ही आमचे ध्येय गाठूच, असा अमर विश्वास कोण बरे आपणास देईल? कोण प्रकाश देईल? कोण मार्ग दाखवील?

मातीतून कर्मवीर

ज्याला उज्ज्वल भूतकाळ आहे, त्याला उज्ज्वल भविष्यकाळ आहे. भूतकाळातून आपणास अमर असा संदेश मिळत असतो. भूतकाळातील त्यागाचे, पराक्रमाचे, ध्येयोत्कटतेचे प्रसंग आपणास स्फूर्ती देतात. मनुष्य व मातीचे मडके यांत काय फरक? आपणही मातीच आहोत; परंतु मातीत चैतन्यमय विचारविद्युत संचरली म्हणजे त्या मातीतूनच कर्मवीर मानव निर्माण होत असतात. शालिवाहन राजाची गोष्ट सांगतात. त्याने मातीतून झुंजार वीर निर्माण केले व शक-शत्रूंचा पराजय केला. मातीतून वीर निर्माण करणे म्हणजे काय? शालिवाहन राजाने मातीप्रमाणे पडलेल्या महाराष्ट्रातील जनतेत तेज फुंकले. लोकांची डोकी म्हणजे खोकी होती. मने मेलेली होती. शालिवाहन राजाने जनतेच्या डोक्यात तेजस्वी विचार

निर्माण केले. त्यांच्या हृदयांत जिवंत,उदात्त भावना निर्माण केल्या. त्याने मढ्यांना चैतन्यकळा दिली. मेलेले राष्ट्र उभे केले. नवयुग निर्मिले. नवीन शक सुरू केला.

राज्यकर्ता महावीर शिवाजी

शालिवाहन राजाच्या अमर पराक्रमाची खूण म्हणून गुढीपाडवा आपण मानतो; परंतु ती खूण मानीत असलो तरी ती गोष्ट फार फार जुनी झाली. शालिवाहनानंतर असा कोण पुण्यप्रतापी महापुरुष महाराष्ट्रात झाला, की ज्याची स्फूर्ती सदैव पुरेल? ज्याचे स्मरण ध्येयार्थ मरायला शिकवील? ज्याचे स्मरण गुलामगिरीत एक क्षणभरही खितपत पडू देणार नाही? आहे का असा शककर्ता महावीर? आहे का अशी अद्वितीय विभूती? येते का डोळ्यांसमोर, राहते का उभी अंतःकरणात?

होय. महाराष्ट्राजवळ अशी चिरकीर्ती विभूती आहे. महाराष्ट्राचे थोर भाग्य; देवाची त्याच्यावर थोर कृपा. महाराष्ट्राचे मस्तक ज्याच्यामुळे सदैव उन्नत राहील असा थोर पुरुष महाराष्ट्रात होऊन गेला. ज्याने अंधारात प्रकाश आणला, दास्य दवडून स्वातंत्र्य आणले, असा तो लोकोत्तर पुरुषसिंह होता. काय बरे त्याचे नाव?

त्या पुण्यश्लोक विभूतीचे नाव गो-ब्राह्मण-प्रतिपालक छत्रपती श्री शिवाजी महाराज.

महाराष्ट्रा, शिवरायाचे दिव्य चरित्र आठव आणि आजच्या बाक्याप्रसंगी वीराप्रमाणे उभा राहून मातृभूमी स्वतंत्र करण्याचे काम पुरे होईपर्यंत माघार घेऊ नकोस.

अंधार व निराशेचा काळ

शिवरायाच्या वेळची देशस्थिती मनासमोर आणा. किती विपन्न दशा होती! उत्तर हिंदुस्थानात मोगलांचे राज्य होते. हिंदू राजे-महाराजे मोगलांचे अंकित झाले होते. धर्माची अवहेलना होत होती. मंदिरे उद्ध्वस्त केली जात होती. बाटवाबाटव होत होती. ठायीठायी सरदार, जहागीरदार, जमीनदार यांची सत्ता. जनता त्रस्त झाली. धर्महीउरला नाही, खायलाही उरले नाही.

दक्षिण हिंदुस्थानातही तोच प्रकार. मुसलमानांच्या लोंढ्याला दोनशे वर्षे विजयनगरच्या साम्राज्याने रोखले; परंतु पुढे तालिकोटच्या लढाईत हा कोट ढासळला; आणि सर्वत्र मुसलमानी सत्ता पसरली. दक्षिण हिंदुस्थानात पाच पातशाह्या झाल्या. त्या त्या ठिकाणचे मातब्बर हिंदू ह्या शाह्यांची सेवा करू लागले. गरिबांची दैना होऊ लागली. कोठे आधार दिसेना. सर्वत्र अंधार व निराशा होती.

मुसलमानी राजे सक्तीने धर्मप्रसार करीत होतेच; परंतु हिंदू धर्मातील तुच्छ मानलेल्या जातींतील हजारो-लाखो लोकदेखील नाइलाजाने मुसलमानी धर्माचा स्वीकार करू लागले. मुसलमानी फकीर विरक्तपणे धर्माची गीते गात गावोगाव हिंडत. हातात कंदील व मुखात धर्माचे सोपे गीत! हे शेकडो त्यागी फकीर मुसलमानी धर्माचा संदेश देत होते. हिंदू धर्माचा संदेश कोण देणार?

विस्कळीत हिंदू समाज

धर्म जणू रसातळाला गेला. त्याचप्रमाणे अन्नान्नदशाही होती. सर्वत्र जुलूम, भांडणे, धर्माधर्मांची भांडणे. जातीजातीची भांडणे. शैव-वैष्णवांची भांडणे. सर्व हिंदू समाज जसा विसकळीत होऊन गेला होता. ना एक ध्येय, ना एक विचार. प्रबळ झंझावाताने जीर्ण-शीर्ण पर्णे दशदिशा उडून जावी, त्याप्रमाणे दीन-दरिद्री दुबळी जनता वाटेल तशी फेकली जात होती. जनतेला 'त्राहि भगवान' झाले.

परंतु अमावास्या जितकी जवळ, तितकी बीजेची चंद्रकोरही जवळ. हिंदुस्थानभर अंधार होता; परंतु कोठे तरी प्रकाश येणार असे वाटू लागले. कोठे मिळणार हा प्रकाश? कोठून मिळणार आशा? महाराष्ट्राकडे हे महान कर्म आले. भारताला मार्गदर्शन करण्याचे महान कर्म.

पांडुरंगाच्या अध्यक्षतेखाली नवा महाराष्ट्र

मुसलमानी धर्मातील एकेश्वरतेचा परिणाम होत होता. मशिदीत सारे समान. सारे भाऊ. एक ईश्वर व आपण सारे भाऊ. हिंदू धर्मात कोट्यवधी दैवते आणि शेकडो पंथभेद. सारा समाज जसा फाटून गेला होता. मुसलमानी संस्कृतीचे प्रखर प्रहार होत होते.

अशा वेळेस संत पुढे आले. त्यांनी काळाचा संदेश ऐकला व तो आमनतेला दिला. त्यांनी ब्रह्मविद्येची गुप्त भांडारे खोलली. संस्कृतातील धर्म जनतेच्या भाषेत आणला. ओवी व अभंग यांच्याद्वारा महाराष्ट्राची मते एक होऊ लागली. भागवतधर्मी संतांनी पंढरपूरचा विठुराया महाराष्ट्रासमोर उभा केला. अनेक दैवते असतील; परंतु एका दैवताकडे सर्वांचे डोळे वळविले, आणि जनतेत ऐक्य निर्माण व्हावे म्हणून वाऱ्या निर्मिल्या. आषाढी-कार्तिकीच्या महावाऱ्यांची परंपरा निर्मिली. त्या त्या ठिकाणांहून थोर संतांबरोबर हजारो नारी-नर नामघोष करीत निघू लागले. पंढरपूरच्या वाळवंटात महाराष्ट्राच्या ऐक्याचे दर्शन होऊ लागले. तेथे त्या विटेवरील समचरण

मूर्तीसमोर, कटितटावर कर ठेवून उभ्या असलेल्या मुक्या पांडुरंगासमोर सारा महाराष्ट्र भेदभाव विसरू लागला. पांडुरंगाच्या मुक्या अध्यक्षतेखाली नवमहाराष्ट्र उभा राहू लागला.

ऐक्याचा सोहळा

लोक जातिभेद विसरून एकमेकांस क्षेमालिंगने देत आहेत. नामघोषात रंगले आहेत... ते महान दर्शन होते. त्या दृश्याचे वर्णन सांगताना तुकाराम महाराज म्हणतात...

‘‘कठोर हृदये मृदु नवनीते

पाषाणा पाझर फुटती रे

एकमेका लोटांगणी येते रे’’

तो ऐक्याचा सोहळा पाहून पाषाणाला पाझर फुटतो. कठोर हृदयाचे सनातनी– त्यांचीही मने लोण्यासारखी झाली असती. एकमेक एकमेकांस प्रणाम करीत होते.

वन्हि तो पेटवावा रे

भागवतधर्मी संतांनी सोपा सुटसुटीत नीतिधर्म दिला. जनतेच्या भाषेत दिला. भेदभाव कमी केला. लाखो लोक जमवून ऐक्याचे दर्शन घडविले. उत्कटता निर्माण केली. यात आणखी भर घालण्यासाठी त्या वेळेस समर्थ रामदासस्वामीही उभे राहिले. बाळपणीच ‘आई, चिंता करितो विश्वाची’ असे म्हणून हा मुलगा कोपऱ्यात विचार करीत बसे. घरातून हा बालशुक बाहेर पडला. बारा वर्षे तपश्चर्या करून पुढे बारा वर्षे देशपर्यटन केले. समर्थांनी देशाची स्थिती पाहिली. त्यांचे हृदय विदीर्ण झाले. लोकांत त्राण नव्हते.

‘‘न मिळे खायला खायला खायला’’ असे हृदय पिळवटून समर्थ सांगत आहेत. लोकांच्या पोटात अन्न नाही. डोक्यात विचार नाहीत. काय करावे?

समर्थांनी महाराष्ट्र भूमी कार्यक्षेत्र म्हणून पसंत केली. महाराष्ट्र डोंगराळ प्रदेश. ठायी ठायी उंच किल्ले, खोल दऱ्या. येथे स्वराज्याची शक्यता आहे असे का त्यांना वाटले?

पडलेल्या जनतेत सुप्त शक्ती असते, पण घर्षणाशिवाय ठिणगी पडत नाही.

‘‘वन्हि तो पेटवावा रे । पेटविताचि पेटतो ।।’’

असे समर्थ म्हणाले. कोठेतरी ठिणगी पडू दे. वन्ही पेटू दे; परंतु वन्ही कसा पेटवणार?

समर्थांनी कर्माचा संदेश दिला

भागवतधर्मी संतांनी ऐक्य निर्मिले. उत्कटता निर्मिली; परंतु कर्माचा संदेश द्यायला समर्थ उभे राहिले. त्यांनी एक नवीन दैवत दिले. कोदंडपाणी प्रभू रामचंद्र! रामचंद्रांची उपासना त्यांनी उपदेशिली. यात हेतू होता. रामाचा अवतार कशासाठी? रावणाचे निर्दालन करण्यासाठी. बंदिखान्यात पडलेले कोट्यवधी देव सोडवण्यासाठी राम आला. आजही नाही का येणार? येईल; परंतु जीवन संयमी करा. फोल चर्चा थांबवा. थोडे धारिष्ट करा. देव यायला तयार आहे; परंतु...

''कृपाळूपणे अल्प धारिष्ट पाहे।।''

तुमच्या धाडसाची तो अपेक्षा करतो. तुम्ही हात, पाय, हलवा. उठा,गोपाळांनी काठ्या लावल्या म्हणजे प्रभूची करांगुळी आहेच.

बळाची उपासना

रामचरित्राचा संदेश समर्थांनी दिला आणि हनुमान उभा केला. गावोगावी हनुमानाची स्थापना केली. बळाची उपासना. हृदयात ऐक्य हवे व दंडात बळ हवे. ठायी ठायी आखाडे गजबजू लागले. दंड थोपटले जाऊ लागले. बळ व बळाबरोबर संघटना होऊ लागली; परंतु हे हनुमंताचे बळ. हे बळ रामाच्या सेवेत अर्पायचे. जो महान पुढारी उभा राहील, जनतेतून पुढे येईल त्याच्या चरणी ही शक्ती अर्पण करा. ठायी ठायी प्रबळ तरुणांची संघटना करून ती महान नेत्याला नेऊन द्या.

नैराश्य भेदणारा राम- महिमा

समर्थांनी रामायणातील युद्धकांडावर भर दिला. बाकीच्या काण्डावर त्यांनी फार लिहिले नाही. युद्धकाण्डावर सारा जोर. ही मराठीतील ठणठणीत युद्धकाण्डे सर्वत्र खणखणीत भाषेत घोषविली जाऊ लागली.रामकथेचा प्रचंड महिमा नैराश्य भेदून आत जाऊ लागला.

जनतेत संघटनेचे, संयमाचे, एकजुटीचे, शिस्तीचे विचार कोणी पसरायचे? समर्थांनी प्रचंड संघटना आरंभिली. ठिकठिकाणी जी बुद्धिमान व तेजस्वी मुले दिसतील त्यांना ते संघटनेत ओढू लागले.

''तीक्ष्ण बुद्धीची, सखोल।'' अशी मुले जी दिसतील ती आमच्याकडे पाठवा.''मग त्यांचा गावा । आम्ही उगवू ।।'' मग त्यांच्या मनातील गोंधळ आम्ही दूर करू, त्यांना ध्येय देऊ, असे समर्थ आपल्या शिष्यांना सांगत आहेत. मनाचे सोपे

सुटसुटीत श्लोक केले. हे श्लोक फकिरांच्या साक्याप्रमाणे, दोह्यांप्रमाणे म्हणता येतात.समर्थांचे शिष्य हे श्लोक म्हणत, नवविचार देत हिंडू लागले. आपण स्वतंत्र होऊ, जरा धारिष्ट करू या, असे हे तेजस्वी प्रचारक सांगू लागले.

नव–संदेश

''उत्कट भव्य ते घ्यावे । मिळमिळीत अवघेचि टाकावे।'' हा संदेश समर्थांनी दिला.

''मराठा तितुका मेळवावा।
शहाणे करून सोडावे । सकल जन।।''

असेही संदेश त्यांनी दिले. ही प्रचंड जागृती होऊ लागली; परंतु जनतेतील जागृतीला स्वातंत्र्याच्या ध्येयाकडे कोण नेणार? जनतेच्या आशा, आकांक्षा, उद्योग, या सर्वांना एका ध्येयाभोवती कोण असणार? परिस्थिती परिपक्व होती. कोणीतरी महान नेता येणार असे वाटत होते. चळवळीची प्रचंड लाट उचंबळत होती.

''धीर धरा धीर धरा तकवा।
हडबडू गडबडू नका ।।''

असे समर्थ विद्युत्वाणीने सांगत होते.

शाहीरही निर्माण होऊन एक तुणतुणे हाती घेऊन बहुजन समाजाला स्फूर्ती द्यायला ठायी ठायी हिंडू लागले होते. अरुणोदय होत होता. पक्षीवृंद गाऊ लागला. उडू लागला. चालना देणारा प्रतापी सूर्यनारायण येणार अशी श्रद्धा वाटू लागली.

लाटेतून स्वच्छ फेस निर्माण होतो, त्याप्रमाणे जनतेतील लाटेतून तेजस्वी महापुरुष उत्पन्न होतो. जनतेच्या हृदयांतील वेदनांतून तो निर्माण झालेला असतो. योग्य परिस्थिती महापुरुषाला जन्म देते.

महापुरुषाचा जन्म

शिवनेरीला शिवराणा जन्मला. १६३० साली अक्षयतृतीयेला अक्षयकीर्ती छत्रपती जन्माला आले. माता जिजाईला दु:खात आनंद झाला. राजे शहाजी दूर राहात होते. पित्याच्या मांडीवर बाल शिवाजी खेळला नाही. शहाजी त्या वेळचा महान योद्धा. उत्तरेकडे कोणी तरी शहाजहान, दक्षिणेकडे कोणी तरी शहाजी! अशी म्हण पडली होती. दिल्लीपतीचा साल्हेर मुल्हेरजवळ शहाजीने धुव्वा उडविला होता. बाळराजाला मांडीवर खेळवीत तो निजामशाही वाचवीत होता; परंतु पुढे शहाजी

विजापूरकडे आला. विजापूरचा राजा शहाजीस सामोरा गेला. शहाजीने दक्षिणेककडे-विजापूरकडे राज्य वाढविले. तिकडे जणू स्वतंत्र सम्राट असा तो वागू लागला. मोठा दरबार भरे. कवी गाणी गात.

असा शहाजी शोभत होता; परंतु नावाला का होईना, तो विजापूरचा अंकित होता. अद्याप तो स्वतंत्र बंड करू शकत नव्हता; परंतु आपल्या मुलाने स्वतंत्र व्हावे, असे त्याला वाटत असावे. पुण्याजवळची जी जहागीर त्याने बालशिवाजीला दिली. तिची व्यवस्था दादोजी कोंडदेव पाहात. त्या जहागिरीसाठी शिवाजीच्या नावाचा जो शिक्का शहाजीने तयार करून दिला त्यात ''प्रतिपच्चंद्ररेखेव''ही मुद्रा वाढत जाईल असे लिहिले होते. शिवाजीचे स्वतंत्र राज्य झाले तर खंडोबाला सोन्याची नाणी वाहीन, असाही शहाजीचा नवस होता. आपण विजापूरच्या दरबाराला जोडून राहायचे, शिवाजीला तिकडे वाढू द्यायचे; विजापूरकरांना फार शंका येणार नाही, असे शहाजीस वाटत असावे आणि शिवाजीची शक्ती वाढली तर पुढे वरून शिवाजी व दक्षिणेकडून आपण चाल करून मध्ये विजापूर पकडून गारद करावे असेही मनात असेल. दक्षिणेकडचे राज्य शिवाजीच्या राज्यास पुढे जोडू व नर्मदेपासून कन्याकुमारीपर्यंत स्वतंत्र मराठा राज्य होईल, असे विचार शहाजीच्या मनात नसतील असे नाही.

काही असो; विजापूरच्या भर दरबारात कुर्निसात न करणारा, विजापूरच्या रस्त्यात गो-माता मारणाऱ्याला शासन करणारा हा बालवीर, शहाजीपासून दूर पुण्याजवळ माता जिजाबाईच्या प्रेमळ, पवित्र व तेजस्वी सान्निध्यात वाढत होता. रामायण-महाभारतातील कथा ऐकत होता. समर्थांच्या हिंडणाऱ्या प्रचारकांचे स्वर ऐकत होता: आसपासची परिस्थिती न्याहाळीत होता. तरुणांचे विचार ऐकत होता.

ध्येयवादी तरुणांचा गोतावळा

बालशिवाजीसमोर स्वातंत्र्याचे भव्य ध्येय उभे राहिले. हे ध्येय कसे कृतीत आणायचे? रामाला वानरांनी साहाय्य केले. मला कोण करील? गरीब मावळे करतील. हे तरुण शेतकरी करतील. मोठमोठे इनामदार, जहागीरदार, जमीनदार हे मदत करणार नाहीत हे शिवरायाने जाणले. ज्यांना खायला नाही, ज्यांच्या अंगावर वस्त्र नाही तेच उठतील. जिकडे पाहावे तिकडे गढीवाल्यांचे राज्य. हे गढीवाले विजापूरकरांचे मिंधे असत व इकडे गरीब जनतेला लुटीत. शेतकऱ्यांची शेते, त्यांची फळझाडे, त्यांचे

गवत–सारे आधी गढीवाल्यांसाठी. शिवरायाने विजापूरकरांविरुद्ध, गढीवाल्यांविरुद्ध बंड उभारले. बंड कसे उभारायचे? पैसा कुठून आणायचा? सैन्य कसे निर्मायचे? शस्त्रास्त्रे कोठून आणायची? कसे लढायचे? कोठून लढायचे? सारे प्रश्न होते. बालशिवाजी व त्याचे सवंगडी याची चर्चा करीत. शिवरायाला गर्व नव्हता. गोकुळातील कृष्ण गोपाळबाळांत मिसळे, काला करी, खेळे, तसे हे शिवराय होते. डोंगर चढावे, दरीखोरी पाहावी; घोडदौड करावी; पट्टा, भाला, समशेर, सारे शिकावे. तरुणांबरोबर लुटुपुटीच्या लढाया कराव्या असे चाले. समान विचारांचे, समान ध्येयाचे तरुण जमू लागले, गोष्टी गाऊ लागल्या, तरुणांचे जथे ठायी ठायी वाढू लागले. कर्माची प्रतीक्षा करू लागले.

गरिबांचे संघटन

''मी गढीवाल्यांच्या गढ्या नष्ट करण्यासाठी आलो आहे.'' हे शिवरायांचे शब्द वाऱ्यावर सर्वत्र गेले. महाराष्ट्रातील सारी गरीब जनता एक होऊ लागली. शिवरायांनी सर्वांना जवळ केले. ब्राह्मण, प्रभू, मराठे, अठरापगड जातीतील तेजस्वी, निश्चयी, त्यागी माणसे जमू लागली. मराठा म्हणजे आडनावी मराठा नव्हे; महाराष्ट्र ज्याला आपला वाटतो. महाराष्ट्र ज्याला मातृभूमी वाटते, महाराष्ट्रातील मुसलमान ते जर महाराष्ट्रात गुण्यागोविंदाने राहतील तर तेही मराठेच. या व्यापक अर्थाने शिवाजी महाराज मराठा शब्द समजत. शिवाजी महाराजांच्या सैन्यात, आरमारात मुसलमानही होते. अफजलखानाला भेटायला जाताना जे आठ वीर शिवरायांबरोबर होते. त्यात एक मुसलमानही होता; आणि अफजलखानाबरोबर त्याच्या रक्षणार्थ हिंदू होते.

शिवराय केवळ मुसलमानांच्या विरुद्ध नव्हते. ते अन्यायविरुद्ध होते. जनतेचा संसार धुळीस मिळवणाऱ्यांविरुद्ध होते. छत्रपतींनी अफजलखान सफा केले तसे चंद्रराविही सफा केले. ते जनतेचे कैवारी होते. पातशाहीच्या पाशातून, सरदार–जहागीरदार यांच्या पाशातून मुक्त करायला हा महापुरुष आला होता.

बहुजन समाजातील नेते

ज्याप्रमाणे आजचे पुंजीपती, आजचे संस्थानिक, जहागीरदार, जमीनदार हे सरकारकडे वळतात, त्याचप्रमाणे शिवरायांच्या वेळेचेही गोष्ट. पेन्शनरांची मुले, सरकारजमा लोकांची तेजस्वी मुले ज्याप्रमाणे स्वातंत्र्याच्या लढ्यात येत, तसेच त्या

वेळेसही झाले. बाप विजापूरकरांचा अंमलदार, तर मुलगा शिवरायांच्या सैन्यात, असे प्रकार होते. शिवरायांना ते ९६ कुळांतील बडे लोक, ते अहंकारी क्षत्रिय मिळाले नाहीत. कोण मिळाले? शिवछत्रपतींचे सेनापती कोण? जनतेतीलच नेते. नरवीर तानाजी, येसाजी, बाजी पासलकर, नेताजी हे बहुजन समाजात जन्मलेले. सूर्यवंश, चंद्रवंश अशा आख्यायिका सांगणारे ते नव्हते. शिवाजी महाराजांनी जनतेत क्रांती केली. शिवाजी महाराजांना ही क्रांती करणे का शक्य झाले? आजूबाजूला किती पातशाह्या. वरती प्रचंड मोगल साम्राज्य. खाली विजापूरचे राज्य. पूर्वेकडे गोवळकोंड्यांचे राज्य. पश्चिमेकडे सिद्दी. चारी बाजूंस मातब्बर शत्रू असता, या पुरुषाने क्रांती कशी केली? मुख्य बळ कोणते?

जनता जनार्दनाची विराट शक्ती पाठीशी

जनता म्हणजे जनार्दन. हा जनार्दन छत्रपतींनी आपल्याकडे वळविला. या दरिद्री नारायणाची उपासना त्यांनी मांडली. ज्याला क्रांती करायची असेल, दुष्टांची सत्ता नष्ट करायची असेल त्याने जनतेचे प्रश्न हाती घेतले पाहिजेत. शिवाजी महाराजांसमोर ही दरिद्री जनता होती. 'प्रजेच्या गवताच्या काडीसही कोणी स्पर्श करू नये; पोटच्या पोरांप्रमाणे जनतेने वाढविलेली झाडे, त्यांना शिवू नये.'' असे हुकूम शिवरायांनी दिले. नाही तर जनतेने आंब्याची झाडे लावावी, गढीवाल्यांनी आंबे न्यावे. हे प्रकार बंद करण्यासाठी शिवराय उभे राहिले. म्हणून सारी जनता त्यांच्याभोवती उभी राहिली. हा अवतारी पुरुष असे जनता मानू लागली. 'अवतार' या शब्दाचा अर्थच मुळी असा की, जो अहंकाराने उंच पदी न बसता खाली जनतेत येतो; तिच्या सुख-दुःखाशी एकरूप होतो. ते शिवराय जनतेच्या सुख-दुःखाशी एकरूप झाले होते. म्हणून जनता जनार्दनाची विराट शक्ती त्यांच्या पाठीशी उभी राहिली.

हाती सतीचे वाण

शिवरायांनी जनतेचे बळ जागृत केले. तिची सहानुभूती मिळविली. त्याचप्रमाणे ध्येयार्थ प्राणार्पण करण्याची वृत्तीही निर्मिली. संतांच्या उपदेशाने, समर्थांच्या प्रचाराने त्यागाची व पुरुषार्थाची ज्वलंत भावना पेटली होती. शिवरायांनी स्वतः संकटात पुढे होऊन मरणाची बेपर्वाई शिकविली. अफजलखानासमोर स्वतः जाऊन ते उभे राहिले. शाहिस्तेखानावर स्वतः जाऊन हल्ला केला. ते स्वतः हातात सतीचे वाण घेऊन उभे होते, म्हणून त्यांना ध्येयार्थी माणसे निर्माण करता आली.

गनिमी लढाईचे नवे तंत्र शोधले

आणि द्रव्य, शस्त्रास्त्रे वगैरेंची ते जमवाजमव करू लागले. कधी सरकारी खनिजे लुटावे, कधी श्रीमंतांजवळचे द्रव्य आणावे. अशा रीतीने द्रव्याची आरंभीची जमवाजमव होऊ लागली. शस्त्रे गोळा होऊ लागली; परंतु सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे लढण्यांची एक नवीन पद्धतच या प्रतिभाशाली पुरुषाने निर्माण केली. मोगलांच्या विजापूरकरांच्या प्रचंड फौजा. हत्ती, घोडे या फौजांशी समोरासमोर तोंड देणे कठीण. अकस्मात यावे, छापा घालावा, मारावे, लुटावे, निघून जावे, अशी ही गनिमी पद्धतीची अभिनव लढाई शिवछत्रपतींनी निर्मिली. ती यशस्वी केली. गनिमी पद्धतीत जनतेचे सहकार्य लागते. ते तर शिवरायांस संपूर्णपणे असे. लोक शत्रूची बातमी देत. धान्य देत. आसरा देत. अशा रीतीने शिवरायांचे बंड प्रचंड होऊ लागले.

किल्ला म्हणजे स्वातंत्र्याची किल्ली

ठिकठिकाणचे डोंगरी किल्ले हाती असणे म्हणजे सत्तेची किल्ली, ही गोष्ट शिवरायांनी ओळखली. ते एकामागून एक किल्ले घेत चालले. किल्ला म्हणजे स्वातंत्र्याची किल्ली. तोरणा किल्ल्यावर तोरण बांधून शिवराय महाराष्ट्रभर संचार करू लागले. तेजस्वी इतिहास निर्माण होऊ लागला. वीर, महावीर, मुत्सद्दी, पृथ्वी-मोलाची माणसे निर्माण झाली. ते आबाजी सोनदेव, ते अढळ मांडीचे महावीर नेताजी, हत्तीशीही झुंज घेणारे येसाजी, जखमी हाताला शेला गुंडाळून लढणारे व मुंडके तुटले तरी ज्यांच्या स्फूर्तिमय धडाने शेकडो सैनिक मारले असे ते वीरशिरोमणी मुरारजी आणि पावन खिंडीत शिवराय सुखरूप पोचावे म्हणून धारातीर्थी पडणारे व तोफांचा आवाज ऐकून 'माझे कर्तव्य मी केले !' असे म्हणून प्राण सोडणारे थोर बाजी आणि शिवरायांच्या स्वातंत्र्य रामायणातील आपल्या रक्ताने ज्याने सुंदरकाण्ड लिहिले, लाडक्या रायबाचे लग्न दूर ठेवून आधी कोंडाण्याचे लग्न लावायला जो गेला, मध्यरात्री घोरपडीने जो चढला, लढता लढता ज्याचा हात तुटला आणि शेवटी शिवरायाचे स्मरण करीत जो पडला... तो अतुल कीर्ती, अमरस्फूर्ती तानाजी व 'मी दोर केव्हाच कापून टाकला आहे, पळता कोठे?' असा संदेश देणारा तानाजीचा भाऊ सूर्याजी आणि तानाजीच्या मृत्यूचा सूड घेणारे, उदयभानूला कंठस्नान घालणारे वृद्ध शेलारमामा आणि जरा शिस्त मोडल्यामुळे शिवप्रभू ज्यांच्यावर रागावले म्हणून शत्रूवर पुन्हा तुटून पडून, कलंक पुसून टाकण्यासाठी धारातीर्थी पडलेले प्रतापराव

गुजर किती नावे सांगावी? किती ज्ञात, अज्ञात वीर, महावीर ! किती बलिदाने, किती आत्मार्पणे !

आग्र्याहून सुटका

आणि ती आग्र्याहून सुटका ! किती कठीण प्रसंग ! केवढे धाडस! संभाजीस ताटात घेऊन जेवणारा ब्राह्मण ! कशी उदात्तता, वीरता ! आग्र्याहून शिवराय सुखरूप येतात. कोणी आणले? जनता-जनार्दनाने. या महापुरुषाला जनतेने जणू सांभाळले; आणि आईसमोर अंगाला राख फासलेले शिवराय उभे राहिले तेव्हा जिजामातेला काय बरे वाटले असेल, शिवराय सुखरूप आलेले पाहून कशी चैतन्य कळा संचरली असेल. किती गूळ वाटला गेला असेल, किती उत्सव-समारंभ झाले असतील?

विजापूरकरांना दिल्लीपतीचा शह देऊन शहाजीराजांना सोडविल्यावर पुढे काही वर्षांनी जेव्हा शहाजीराजे भेटीला येत होते, तेव्हाचे शिवरायांचे ते विनयमधुर वर्तन ! ते पायी सामोरे गेले. पित्याच्या चरणांवर त्यांनी मस्तक ठेवले. पित्याने प्रतापी पुत्राला हृदयाशी धरले. किती गोड उदात्त असा तो प्रसंग !

ज्याची दर्या त्याचे वैभव

सैन्य वाढत होते. राज्य वाढत होते. घोडदळ तयार झाले. दर बारा कोसांवर सुसज्ज असे डोंगरी किल्ले खडे राहिले. किल्ल्यांत धान्य, शिबंदी, शस्त्रास्त्रे, सारे जय्यत असे. तसेच शिवरायाने समुद्राचेही महत्त्व ओळखले. आरमार तयार केले. समुद्रात किल्ले बांधले. मराठ्यांचे एक होडगेही पूर्वी फिरत नव्हते; परंतु असे खंबीर आरमार तयार केले की, जे पुढे अरबी समुद्रात इंग्रजांसह भारी झाले ! किती दूरवर दृष्टी. छत्रपतींचे एक वाक्य आहे, ''ज्याचा दर्या त्याचे वैभव.'' सुरत, मुंबई येथील इंग्रज वखारी शिवरायांनी पाहिल्या. या जलचरांची शक्ती या दूरदृष्टी पुरुषाने ओळखली. व्यापार हवा, वैभव हवे, तर समुद्र ताब्यात हवा, हे सूत्र त्यांनी सांगितले; परंतु हे महान सूत्र पुढे पेशवे, मराठे विसरले. इंग्रज बळावले. हिंदुस्थान परतंत्र झाला. शिवराय काळाच्या पुढे होते. त्यांची बुद्धी स्वतंत्र, अर्वाचीन होती.

राज्य बळकट राहावे म्हणून ते नगद पगार देत. कोणाला जहागिऱ्या दिल्या नाहीत. बक्षीस देत. पगार देत. जहागिऱ्या दिल्या तर पुढे जहागीरदार स्वतंत्र होऊ लागतात. त्यांचा स्वार्थ बळावतो. मध्यवर्ती सत्ता कोलमडते. म्हणून जहागिऱ्या न देण्याचा दंडक त्यांनी घातला. हाही पुढे पाळला गेला नाही.

राज्याभिषेक झाला

अशा रीतीने शिवराय स्वातंत्र्य बांधीत होते आणि एके दिवशी १६७४ साली तो महामंगल विधी झाला. शिवराय छत्रपती झाले ! समर्थांनी आशीर्वाद दिला. माता जिजाईने आशीर्वाद दिला. दोघांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. सारे मराठी हृदय उचंबळले. महाराष्ट्राने दुवा दिला. राज्याभिषेक झाला.

अनंत सुधारणा केल्या

शिवरायांना आपली परंपरा जणू प्राचीन राजर्षींच्या परंपरेस जोडायची होती. अष्टप्रधानपूर्ण राज्यपद्धती त्यांनी सुरू केली. निरनिराळी खाती पाडली. त्यावर योग्य अधिकारी नेमले. ते पुन्हा वंशपरंपरा नेमले नाहीत. गुणांची किंमत राहिली. राज्याचा पसारा वाढत होता. स्वतंत्र मराठी सत्तेचा परदरबारी पत्रव्यवहार होऊ लागला. शेकडो परभाषेतील शब्द मराठीत घुसले होते. शिवरायांनी ''राज्यव्यवहार कोश'' करवून सर्व परकी शब्दांना संस्कृत प्रतिशब्द रूढ केले. आपले असेल ते ठेवावे. नवीनच कल्पना असेल तर घ्या एखादा परकी शब्द; परंतु घरचे बुडवून परके घेण्यात काय अर्थ?

देवाचे घेणे

''उदंड पडली कामे ।'' अशी समर्थांची हाकाटी होती; परंतु आता ''बुडाला औरंग्या पापी ।'' असे पाहून स्वातंत्र्याचा सूर्योदय पाहून जनतेतील जागृती, कर्तव्यदक्षता, ऐक्य, शिस्त, त्याग, शौर्य, धैर्य, ध्येयोत्कटता, चारित्र्य हे सारे पाहून समर्थ संतोषले. त्यांचे ध्येय मूर्त करणारे शिवराय, त्यांच्यासाठी समर्थ तुळजापूरच्या देवीपुढे सद्‌गदित होऊन प्रार्थना करते झाले ''तुझा तू वाढवी राजा ।''

शिवराय ही जणू देवाची देणगी. असा दैवी देण्याचा राजा कोठे पाहायला मिळणार? शिवरायात खरोखर दिव्यता होती. ते विरक्त झाले असते, तर थोर संत झाले असते. एकदा हंपीजवळ जंगलात जाऊन शिवराय ध्यानात रमले. जणू प्रभूशी ते एकरूप होऊ पहात होते; परंतु जनता तडफडत होती. ते पुन्हा जनतेकडे धावून आले. असा हा राजा होता.

पकडून आणलेल्या यावनीस पाहून ते म्हणाले, ''आई, मी तुझ्या पोटी येतो तर किती सुंदर दिसलो असतो.'' किती थोर उद्‌गार ! असे उद्‌गार काढणारा पुरुष सामान्य नसतो.

असा हा जितेंद्रिय पुरुषसिंह होता. मुसलमानी धर्माची निंदा कधी त्यांनी केली नाही. कुराणाचा अपमान केला नाही. मशिदी, दर्गे यांनाही इनामे दिली. परधर्मियांस राजी राखले. असा राजा इतिहासात कोठे पाहावा कोठे शोधावा ! म्हणून समर्थ जगदंबेला म्हणाले, ''तुझा तू वाढवी राजा ! हे देवा, शिवछत्रपती तुझे देणे. त्याची भरभराट कर.''

स्वातंत्र्यमूर्ती अंतर्धान पावली

भरभराट होत होती; परंतु आयुष्य कमी झाले. १६८० मध्ये वयाच्या अवघ्या पन्नासाव्या वर्षी महाराष्ट्राची ही पुण्यमूर्ती, ही स्फूर्तिदेवता, ही स्वातंत्र्यमूर्ती अंतर्धान पावली ! परंतु शिवछत्रपती महाराष्ट्राच्या रोमरोमांत आहेत. ते अमर आहेत.

महाराष्ट्राचे हे मुके किल्ले स्वातंत्र्याचा संदेश देत आहेत ! गरिबांचे प्रश्न हाती घ्या, त्यागाची परमावधी करा, नेत्यांचे ऐका, असे आदेश हे किल्ले देत आहेत. लोकमान्य म्हणत, 'सिंहगडावर वर्षातून एक महिना राहतो; परंतु येथील ती हवा मला मग वर्षभर पुरते.'' अशी ही स्वातंत्र्यप्रेरणा महाराष्ट्रातील किल्ले सदैव देतील. रायगड, सिंहगड, प्रतापगड, पुरंदर, पन्हाळा, रांगणा किती नावे ! किती अमर आठवणी ! किती तेजोवलये या किल्ल्यांभोवती ! महाराष्ट्रा, यांचा संदेश नाही का तुला ऐकू येत?

जिवंत शिकवण

शिवछत्रपती गेले ! संभाजी महाराजांची ती करुण-गंभीर कारकीर्द संपली. राजाराममहाराज उभे राहिले. औरंगजेब सर्व शक्तिनिशी आला होता. राजाराममहाराज चंदी-तंजावरकडे गेले. महाराष्ट्रात कोण होते? रामचंद्रपंत अमात्य, संताजी घोरपडे, धनाजी. अनेक वीर व मुत्सद्दी उभे राहिले व शर्थीने लढले. औरंगजेब थकला. शिवाजी महाराज नव्हते. राजाराममहाराज दूर. तरी शिवाजी महाराजांची शिकवण जिवंत होती. त्यांनी दिलेला ध्येयवाद जिवंत होता. आजही ती शिकवण आपणास घेता येईल. ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य-अस्पृश्य, हिंदू-मुसलमान, सारे भेद भिरकावून एक भारत डोळ्यांसमोर ठेवून महात्माजींसारख्या अद्वितीय नेत्याच्या नेतृत्वाखाली प्राण हाती घेऊन अमर आशेने व निश्चयाने जर आपण उभे राहू तर आजही त्वरित स्वतंत्र होऊ.

विशाल दृष्टी

संभाजी महाराजांची कारकीर्द सुरू होती. काळाकुट्ट अंधार सर्वत्र पसरला. तेव्हा समर्थांनी शेवटचा संदेश पाठविला;

शिवरायाचे आठवावे रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप ।
शिवरायाचा कैसा सापेक्ष । आटोपावा ।।
शिवरायाचे कैसे चालणे । शिवरायाचे कैसे बोलणे ।
शिवरायाचे कैसे वागणे । सावधान ।।

अशा आशयाच्या त्या ओव्या मनन करण्यासारख्या आहेत. आजही आपण जर शिवरायांचे रूप, त्यांची शिकवण सारे स्मरू तर सारे करंटेपण नष्ट होईल. "जो तो बुद्धीच सांगतो ।" असली पाचकळ चर्चा, चावटपणा बंद होईल. जीवनात प्रखरता, खोल व उदार बुद्धी, व्यापक व विशाल दृष्टी येईल.

रामराज्य

महाराष्ट्रात आदर्श रामराज्य सुरू झाले. रामराज्य? हो; रामराज्य. रामराज्य जनतेसाठी होते. रामचंद्रांचा आदर्श समर्थांनी सर्वांसमोर ठेवला होता. शिवछत्रपतींच्या राज्याची खूण कोणती? त्यांच्या ध्वजाचा रंग कोणता? भगवा रंग. भगवा रंग म्हणजे संन्यासाची खूण. भगवा झेंडा असे दाखवतो की, राजा हा संन्यासी आहे. तो प्रजेचा विश्वस्त आहे. खजिना प्रजेचा. प्रजेच्या कल्याणात खर्च व्हायचा. ज्या राज्याची खूण भगवा झेंडा ते रामराज्य; परंतु नुसती भगवी निशाणे काय कामाची? आज जो भगवा झेंडा वापरणारी संस्थाने आहेत ती प्रजापालनात किती दक्ष आहेत? प्रजेचे विश्वस्त म्हणून हे संस्थानिक वागतात का? भगवा झेंडा म्हणजे गरिबांचे कल्याण. भगव्या झेंड्याचा हा अर्थ आज तिरंगी झेंड्यांत आहे. त्या शेतकरी कामकऱ्यांसाठी झगडा. तिरंगी झेंड्यावर चरखा आहे. चरखा म्हणजे दरिद्री नारायणाची निशाणी. तिरंगी झेंड्याने गरिबांना हृदयाशी धरले आहे. तो झेंडा अन्याय सहन करीत नाही, खोटे भेदभाव निर्मित नाही, मुसलमानास द्वेषित नाही. भगव्या झेंड्याचाच विकसित अवतार– अखिल भारतास शोभेसा अवतार म्हणजे तिरंगी झेंडा. शिवछत्रपतींच्या वेळेस 'मराठा तितुका मेळवावा !' असा संदेश होता. भगवा झेंडा महाराष्ट्रातील मुसलमानांसह सर्वांना एकत्र हाक मारीत होता. तिरंगी झेंडा सर्व भारतीयांस हाक मारीत आहे.

न्यायाची प्रस्थापना

भगवा झेंडा राज्याची खूण करून शिवप्रभू जनतेच्या सेवेत रमले. भांडणे बंद पडली. समर्थ, संत यांच्या प्रचाराने ऐक्य झालेच होते. कोणतेही महाकार्य करायच्या आधी शक्य तो सर्वांचा मेळ घालावा.

''सर्वषामविरोधेन ब्रह्मकर्म समारंभे ।।''

जे ब्रह्मकर्म आहे, मोठे कर्म आहे, ते सर्वांच्या अविरोधानेच प्राप्त होते, सफळ होते. शिवरायांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी शक्य तो अविरोध निर्माण केला. सर्वांना एकत्र आणले. सर्वांची सुखदुःखे पाहिली. न्याय सर्वत्र स्थापिला.

हे सारे पाहून समर्थ नाचू लागले. ते म्हणाले;

''उदंड जाहले पाणी ।
स्नानसंध्या करावया ।।''

इतके दिवस स्नानसंध्या रुचत नव्हती जणू. लोभ व क्षुद्र कलह सोडून उभे राहिले पाहिजे. परकी सत्तेवर संपूर्ण बहिष्कार घालायला उभे राहिले पाहिजे. सरकारच्या तोंडाकडे पाहणे बंद झाले पाहिजे. आपला जन्मसिद्ध स्वातंत्र्याचा हक्क मिळवून घ्यायला सर्वांनी उभे राहिले पाहिजे. यात पुरुषार्थ आहे. याने उज्ज्वल भूतकाळाला शोभेसे आपण होऊ.

शिवछत्रपती भारताची अमृत-संजीवनी

महाराष्ट्रा ! शिवछत्रपतींची खरी पूजा आपण घरोघर स्वातंत्र्यासाठी लढू तेव्हाच होईल. घरोघर शिवछत्रपतींची ती तेजोमय तसबीर ठेवा. तिला हार घाला. त्यांची उदात्त शिकवण अंगी आणा व स्वतंत्र व्हा.

शिवछत्रपती म्हणजे महाराष्ट्राची, भारताची अमृत-संजीवनी आहे. महाराष्ट्र उभा राहील. भारत स्वतंत्र होईल.

शिवछत्रपतींची आरती

आरती शिवराया, तुझ्या वंदितो पाया ।
तुझ्यावरून कुरवंडावी, आम्ही आमुची काया ।। आरती ।।
भारती दाही दिशा, होती दास्याची निशा ।
अशा वेळे आणलीस, प्रभो स्वातंत्र्य-उषा ।। आरती ।।

जागले सर्व जन, दिली अद्‌भुत स्फूर्ती ।
जागले सर्व जन, झाली अपार कीर्ती ।। आरती ।।
ठायीं ठायी वीर नाना; बाजी मुरार, तान्हा ।
स्वातंत्र्यार्थ शिवराया, देती आनंदे प्राणा ।। आरती ।।
महाराष्ट्र पुण्यभूमी, केली पसंत तुम्ही ।
लावियला भव्य दीप, येथे मोक्षाचा तुम्ही ।। आरती ।।
किती तुज आळवावे, प्रभो किती रे गावे ।
स्फूर्तीचा सागर तू, तुला सदैव घ्यावे ।। आरती ।।
ऐक्याचा, स्वातंत्र्याचा, देशी संदेश थोर ।
त्यागाची अंतरंगी, फुलविशी चंद्रकोर ।। आरती ।।
तुझी स्मृती नित्य राहो, अमुचे करंटेपण जावो ।
भारतमाता प्यारी, झणी स्वतंत्र होवो ।। आरती ।।

जय हिंद !

+++

देशबंधू दास

दोन शब्द

सेवादल चरित्रमालेतील देशबंधू चित्तरंजन दास यांचे चरित्र दुसरे पुष्प होय. १९२५ मध्ये देशबंधू मरण पावले. त्यानंतर सहा महिने मी त्यांचे एक चरित्र लिहीत होतो. ते बृहत् चरित्र अद्याप तसेच माझ्या ट्रंकेत पडून आहे. १७/१८ वर्षे ती पाच-सहाशे पाने प्रकाशाची वाट पाहात आहेत. ती पाने हे चरित्र लिहिताना मजजवळ नाहीत. त्यातील काही प्रसंग व गोष्टी डोळ्यांसमोर आहेत. एक गुजराथी चरित्र येथे मला मिळाले होते. त्याची काही पाने फाटली होती. कोण लेखक तेही कळेना, परंतु सुंदर आहे ते चरित्र, सुंदर भाषेत लिहिलेले. हे चरित्र लिहिताना त्याचाही मी उपयोग केला आहे. त्या चरित्रकारांचा मी ऋणी आहे. या पुस्तकाची नवी आवृत्ती काढण्याचा सुयोग आला व माझे हस्तलिखित बाड जर हाती आले तर या चरित्रात आणखी काही गोष्टी व प्रसंग घालीन. तोवर ते चरित्र सेवा दलातील बंधुभगिनींनी गोड करून घ्यावे व देशबंधूंची उत्कटता, कळकळ व निस्सीम त्यागमय देशभक्ती आपल्या जीवनात आणण्यासाठी मन:पूर्वक प्रयत्न करावेत.

– साने गुरुजी

देशबंधू दास

मुंबईतील एका भव्य चाळीच्या मोठ्या गच्चीवर सेवा दलाची मुले बसली होती. रात्रीची वेळ होती. मुले जेवून खाऊन आली होती. गच्चीवरून समुद्र दिसत होता. त्याच्या लाटा कानांवर येत होत्या. जवळची नारळीची झाडे वाऱ्याने डोलत होती. मी आल्याबरोबर मुले वाटोळी बसली.

''आज कोणाच्या सांगता पुण्यकथा ?'' एकाने विचारले.

''आज ज्या प्रांतातील एका थोर देशभक्ताच्या कथा सांगणार आहे, ज्या प्रांतात प्रचंड नद्या आहेत; वंदे मातरम् गीत ज्या प्रांतात जन्मले व हिंदुस्थानभर गेले; सुजलां, सुफलां, सस्यश्यामलां ही विशेषणे ज्या प्रांताला विशेष करून लावता येतील; ज्या प्रांताने जगातील महान् कवी दिला, जागातील थोर शास्त्रज्ञ दिला, जगातील थोर त्यागी दिला; ज्या प्रांताने भारतमातेसाठी अपरंपार बलिदान केले; अशा प्रांतातील थोर देशभक्ताच्या गोड व हृदयंगम गोष्टी सांगणार आहे. त्यागाच्या व वैभवाच्या कथा सांगणार आहे, कोणता बरे हा प्रांत, ओळखा?''

''बंगाल, बंगाल.'' मुले एकदम म्हणाली.

''होय. बरोबर ओळखलेत. ऐका तर आता. गोष्टी संपेपर्यंत कंटाळू नका.''

''त्या दिवशी विनोबाजींच्या गोष्टी ऐकताना आम्ही कंटाळलो का ? वेळ कसा गेला ते समजलेसुद्धा नाही. तुम्हीच बोलून दमाल. आम्ही रात्रभरसुध्दा बसू.''

''आता करतो हं आरंभ.''

विक्रमपूर परगणा

पूर्व बंगालमध्ये विक्रमपूर नावाचा परगणा आहे. गंगेचा एक फाटा व ब्रह्मपुत्रा यांची बनलेली विशाल पद्मा नदी तिच्या तीरावर हा परगणा आहे. पद्मेला सर्वनाशा असेही नाव आहे. पद्मेला अपार पूर यावा व गावेच्या गावे वाहून जावी. पद्मेच्या काठी किती संस्कृती फुलल्या व नाश पावल्या. पद्मेने किती राज्ये उभारली व पाडली. पद्मा नदीने स्वतःच्या हाताने अनंत इतिहास लिहिला व स्वतःच पुसूनही टाकला. अंधार व प्रकाश यांचा खेळ पद्मा खेळत आली. पद्मेचा प्रवाह फारच विशाल. पूर येतो तेव्हा तिचे पात्र आठ आठ मैलसुध्दा रुंद होते. रविंद्रनाथ या पद्मेच्या प्रवाहावर कित्येक महिने गलबतात बसूनच राहिले होते. गीतांजलीतील काही अमर गीते या पद्मेच्या संगीतात जन्मलेली आहेत.

विक्रमपूर पूर्व बंगालचे जणू हृदय. येथे कला फुलल्या. व्यापार वाढला. ज्ञान नांदले. येथले व्यापारी दूर सिंहलद्वीप, सुमात्रा, अरबस्तान सर्वत्र जात. प्रसिध्द चिनी प्रवासी ह्युएनस्यँग यांचा गुरू पंडित शीलभद्र त्याची येथेच जन्मभूमी. तुम्ही गोपीचंदाची गाणी ऐकली आहेत ना ? बोलपट पाहिला असेल. तो गोपीचंद याच प्रांतातला.

तेलीर बाग

अशा या इतिहासप्रसिद्ध परगण्यात तेलीरबाग म्हणून एक गाव आहे. चित्तरंजन दास–देशबंधू दास – यांचे पूर्वज या गावात राहात होते. देशबंधूंचे पणजोबा रतनकृष्ण दास हे अति उदार म्हणून प्रसिद्ध होते. औदार्याचा गुण हा वंशपरंपरागत जणू आला आहे.

आजोबांच्या गोष्टी

देशबंधूंचे आजोबा जगद्बंधू. खरोखरच ते जगाचे बंधू होते. ते राजशाही येथे सरकारी वकील होते. त्यांनी पुष्कळ पैसा मिळविला; परंतु दोन्ही हातांनी तो खर्च केला. दरिद्री, आप्त, शेजारी–पाजारी सर्वांना ते देत. ते नाही कधी म्हणत नसत. त्यांच्या औदार्याची कीर्ती सर्व विक्रमपूर परगण्यात पसरली होती. त्यांनी आपल्या जन्मग्रामी एक अतिथिशाळा चालविली होती. कोणाही पांथस्थाची तेथे राहण्याची, जेवण्याची मोफत व्यवस्था होत असे. तेथील नोकरचाकर नीट वागतात की नाही हे पाहण्यासाठी एके दिवशी जगद्बंधू नावेत बसून निघाले. ते आपल्या गावी येऊन

पोहोचले. तो मध्यरात्र होत आली होती. सर्वांची निजण्याची वेळ. थकलेले नोकरचाकर आरामाच्या तयारीत होते. तो जगद्बंधू आले.

‘एका अतिथीला जागा देता का? उपाशी आहे. जेवणाची सोय करता का?’

‘अशा मध्यरात्री यायला काही वाटत नाही ! सकाळी ये जा.’ तेथील नोकर म्हणाला.

जगद्बंधू रागावले. त्यांनी आपले खरे स्वरूप प्रगट केले. नोकर घाबरले. पाया पडू लागले. क्षमामूर्ती जगद्बंधू म्हणाले, ‘असे करीत जाऊ नका. कोणी केव्हाही येवो, त्यांचे स्वागत करा. तो देवच आला आहे असे समजा.’

आणि एकदा जगद्बंधू पालखीत बसून कोणत्या तरी गावी जात होते. वाटेत एक वृद्ध ब्राह्मण त्यांनी पाहिला. तो अनवाणी होता. मोठ्या कष्टाने जात होता. जगद्बंधूही वृद्ध झाले होते, अशक्त होते; परंतु त्या ब्राह्मणाचे कष्ट त्यांना पाहवत ना. त्यांचे हृदय विरघळले. पालखीतून ते खाली उतरले. त्या ब्राह्मणाला त्यांनी पालखीत बसविले आणि स्वत: तीनचार मैल पायी चालत गेले.

आणि जगद्बंधू कवीही होते. धार्मिक विषयांवर ते कविता लिहीत. त्यांची सत्यनारायणाची कथा अद्याप घरोघर वाचली जाते. ते रसिक होते व रसिकांचे आश्रयदाते होते. अनेक साहित्यिकांना ते साहाय्य करीत.

आईबाप

देशबंधूंच्या पित्याचे नाव भुवनमोहन. ते कलकत्त्यातील एक सुप्रसिध्द ॲटर्नी होते. ॲटर्नी म्हणजे दुसऱ्याची सर्व कायदेशीर कामे चालवणारा– त्यांचा प्रतिनिधी होऊन सारे बघणारा वकील. भुवनमोहनही अति उदार होते. त्यांच्या उदारपणास सीमा नव्हती. जे जवळ असेल ते देत. निर्भय व सत्यप्रेमी ते होते. देशाविषयीही त्यांना फार प्रेम वाटे. हिंदू धर्मातील रूढींचा त्यांना राग येई. श्रेष्ठकनिष्ठपणाचा तिटकारा वाटे. हिंदू धर्माचे उज्ज्वल स्वरूप निर्माण करू पाहणाऱ्या ब्राह्मो समाजाचे ते सभासद झाले.

परंतु देशबंधूंची आई जुन्या वैष्णव पंथाचीच होती. वैष्णवधर्माची ती गोड गाणी गाई. निर्गुण–निराकार परब्रह्माची उपासना तिला मानवेना. भक्तिप्रेमाचा, देवाजवळ रुसण्या रागवण्याचा गोड वैष्णवधर्म, भागवतधर्म तिला आवडे. देशबंधूंची आई फारच क्षमाशील होती. तिचे डोळे दुसऱ्याविषयीच्या करुणेने सदैव भरलेले

असत आणि दुसऱ्याचे दुःख दूर करूनच ते हसत. त्यांच्या घरात एक दूरचा नातलग राहात होता. तो फुकट जेवे, एवढेच नाही तर दारू पिऊन येई. दारूच्या नशेत देशबंधूंच्या आईला तो शिव्या देई. भुवनमोहनांना एके दिवशी या गोष्टीचा राग आला.

'याला हाकलून देतो. नको आपल्या घरात.' ते म्हणाले.

'परंतु बिचारा जाईल कोठे ? उपाशी मरेल. राहू दे. त्यांचे बोलणे मला थोडेच लागते आहे आणि शुद्धीवर आले म्हणजे त्यांनाही जरा वाईट वाटते. राहू दे. नका घालवू.' ती माऊली म्हणाली.

जन्म

अशा कुटुंबात देशबंधू जन्मले. ज्या कुळात औदार्य, दया, क्षमा इत्यादी गुण पिढ्यान्‌पिढ्या संचित होत आले होते अशा थोर कुळात देशबंधू जन्मले. रडणाऱ्यांबरोबर रडणारे, दुःखितांना पाहून दुःखी होणारे, अशांच्या पवित्रपावन कुळात देशबंधू जन्मले. १८७० च्या नोव्हेंबर महिन्याच्या पाचव्या तारखेस देशबंधूंचा जन्म झाला. त्या वेळेस कलकत्त्यातील भवानीपूर गावात त्यांचे वडील राहात असत. देशबंधूंचे नाव चित्तरंजन असे होते.

लहानपणचे भविष्य

रवींद्रनाथांचेही घराणे कलकत्त्यास होते. एकदा लहान चित्तरंजनास घेऊन त्याची आत्या रवींद्रनाथांच्या घरी गेली होती. तेथे बायका गोष्टी बोलत बसल्या होत्या. तेथली एक वृद्ध आजी चित्तरंजनाची तेजस्वी बालमूर्ती पाहून म्हणाली, 'हा मुलगा पुढे कोणीतरी मोठा पुरुष होईल.' आणि त्यांची जी पत्रिका करण्यात आली तिच्यात हा मुलगा पुढे संन्यासी होईल असे होते.

विद्यार्थी दशा

१८८६ मध्ये प्रवेश परीक्षा पास होऊन ते प्रेसिडेन्सी कॉलेजात गेले. त्यांची वक्तृत्वकला लहानपणापासून दिसून येऊ लागली. शाळेत आल्यापासूनच ते सभोवती मुले जमवायचे. चर्चा करावयाचे, वाद करावयाचे. त्यांचे गुरुजन म्हणत, 'हा पुढे मोठा वक्ता होईल.'

सर्वांचे आवडते

मुले त्यांच्याकडे ओढली जात, त्यांचा स्वभाव खेळकर व आनंदी होता. ते असत तेथे नेहमी गडबड असायची, गप्पा असायच्या. एका विद्यार्थ्याला चित्तरंजनाचे

मित्र व्हावे असे फार वाटत होते; परंतु तो लाजाळू होता, संकोची होता. तो चित्तरंजनाकडे बघत दूर उभा असे. चित्तरंजनांचा हात हातात घ्यावा असे त्याला वाटे; परंतु स्पर्श होत नसे. एके दिवशी चित्तरंजनांच्या ध्यानात ही गोष्ट आली.

'तुम्ही असे दु:खी का असता ? दूर दूर एकटे का उभे राहता ? तुम्हाला का कोणी मित्र नाही?' चित्तरंजनांनी विचारले.

'तुम्ही माझे मित्र व्हा. तुमच्याजवळ बोलावे असे किती दिवस वाटते आहे.'

'मग का बोललात नाही? वेडे, चला माझ्याबरोबर.' असे म्हणून चित्तरंजनांनी त्या विद्यार्थ्याचा हात धरला व त्याला नेले. ते दोघे परम मित्र बनले.

विलायतेस प्रयाण

१८९० मध्ये ते पदवीधर झाले. सन्मानाने उत्तीर्ण व्हायला थोडे मार्क कमी पडले. चित्तरंजन जरा खट्टू झाले, परंतु पित्याने त्यांना इंग्लंडमध्ये पाठवायचे ठरविले. आय. सी. एस. होण्यासाठी ते निघाले. घरी गरिबी येत होती. औदार्यामुळे दारिद्र्य येत होते. पित्याला वाटे की मुलगा आय. सी. एस. होऊन आला तर दारिद्र्य जाईल, कटकट मिटेल. म्हणून कर्ज काढून त्यांनी मुलाला विलायतेत पाठविण्याचे ठरविले. चित्तरंजन सहा हजार मैलांवर जावयास निघाला.

दु:खी आई

चित्तरंजनाच्या आईस दु:ख होत होते. मुलगा परमुलखात दूर जाणार याचे वाईट वाटत होते. चित्तरंजन आईचे सर्वांत आवडते. चित्तरंजन जरी दूर गेला तरी त्यांना हुरहूर वाटे आणि आता तर सातासमुद्रापलीकडे हा लाडका पुत्र जाणार !

'आई, रडू नको.' चित्तरंजन म्हणाले.

'दर आठवड्यास पत्र पाठवशील ना?' तिने विचारले.

'होय. कधीही चुकणार नाही. तुझा आशीर्वाद मला तारील. तू काळजी नका करू.' आणि चित्तरंजन आय. सी. एस. होण्यासाठी गेले.

पार्लमेंट सभासदाचा विरोध

चित्तरंजन इंग्लंडात गेले. अभ्यासात रमले. परीक्षा झाली; परंतु त्याच वेळेस महर्षी दादाभाई नौरोजी इंग्लंडमध्ये पार्लमेंटात निवडून येण्यासाठी उभे राहिले होते. एक हिंदी मनुष्य पार्लमेंटात प्रतिनिधी म्हणून जाऊ पाहात होता. चित्तरंजन दादाभाईसाठी प्रचार करू लागले. त्यांचे वक्तृत्व देशसेवेस धावून आले. देशसेवेचा

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

तो पहिला धडा. दादाभाई निवडून आले. याच सुमारास पार्लमेंटच्या एका सभासदाने हिंदी जनतेविषयी काही अपमानास्पद उद्‌गार काढले होते. या सभासदाचे नाव मॉक्लिन साहेब. तो काय म्हणालह होता ? 'हिंदू-मुसलमान हे आमचे गुलाम आहेत. आम्ही त्यांना तलवारीने जिंकून घेतले आहे.' कोणाचे हृदय पेटले ? चित्तरंजनांचे चित्त संतप्त झाले. त्यांनी हिंदी लोकांची सभा भरविली. त्या सभेत अत्यंत तेजस्वी असे त्यांनी भाषण केले. मॉक्लिनसाहेबाचा त्यांनी निषेध केला. उदारमतवादी ग्लॅडस्टनसाहेबांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या एका सभेत चित्तरंजनांचे उत्कृष्ट भाषण झाले. ते म्हणाले, 'इंग्रजांनी आम्हाला पाशवी बळाने जिंकलेले नाही. तुम्ही तलवारीने नाही जिंकलेत. आम्ही आपसात भांडत होतो. आमच्यात ऐक्य नव्हते. शिस्त व संघटना नव्हती. तुमच्यामध्ये ते गुण होते. एक प्रकारे तो तुमचा नैतिक विजय होता. राष्ट्रीय सद्‌गुण तुमच्यात अधिक होते. आमच्यात त्यांची उणीव होती; परंतु या पार्लमेंटच्या सद्‌गृहस्थांना पाशवी बळाचा मोठेपणा वाटत आहे. हिंदी लोकांना आम्ही तलवारीने जिंकले, तलवारीने त्यांच्यावर राज्य करू असे ते म्हणत आहेत. हिंदी लोक आमचे गुलाम असे म्हणत आहेत. असे शब्द ऐकून कोणता हिंदी मनुष्य संतापणार नाही ? राष्ट्रे कायमची कोणी गुलाम राहात नसतात. इंग्लंड व हिंदुस्थान सहकार्याने नाही का नांदणार ?'

अशा अर्थाचे चित्तरंजन बोलले. हे त्या काळातील शब्द आहेत, ज्या काळात काँग्रेसचा आवाज सामर्थ्यवान नव्हता, काँग्रेस जन्मून सातच वर्षे झाली होती, ती बाल्यावस्थेत होती. अशा काळात इंग्लंडमध्ये हिंदी राष्ट्राची प्रतिष्ठा स्थापण्यासाठी चित्तरंजन उभे राहिले. त्यांनी केलेल्या भाषणांना तिकडील वर्तमानपत्रांतून प्रमुख स्थान देण्यात आले. काहींनी अग्रलेख लिहिले आणि त्या चळवळीमुळे शेवटी त्या मॉक्लिनसाहेबास माफी मागावी लागली. पार्लमेंटमधूनही त्यांची हकालपट्टी झाली.

देशभक्तीत पास; आय. सी. एस. मध्ये नापास

चित्तरंजनांनी देशाची प्रतिष्ठा सांभाळली. साहेबाला हिंदी राष्ट्राची क्षमा मागायला लाविले; परंतु आय. सी. एस. च्या परीक्षेचे काय ? ब्रिटिश सरकारला चित्तरंजनांची ही तेजस्विता सहन झाली नाही. त्यांना नापास करण्यांत आले. जे उमेदवार हवे असतात त्यांना पास करण्यात येते. नापास जे झाले, त्यांच्यात चित्तरंजन पहिले होते. घरी गरिबी वाढत होती. आईबाप आशेने पाहात होते. चित्तरंजनास

काय वाटले असेल ? परंतु ते डगमगणारे नव्हते. ते हसून म्हणत, 'नापास झालेल्यांच्या यादीत तर मी पहिला आहे ना ?'

बॅरिस्टर झाले

देशाचे भाग्य की, चित्तरंजन आय. सी. एस. झाले नाहीत. त्यांची सेवा भारतमातेस मिळावयाची होती, परकीय सरकारला मिळावयाची नव्हती. ते आता बॅरिस्टरीकडे वळले. पैशाची फार टंचाई असे. घरून वेळेवर पैसे येत ना. चित्तरंजन कसेतरी राहात होते. दोन दोन, तीन तीन दिवस ते केवळ पाव व गरम पाणी यावर राहात. कोठला चहा, कोठली कॉफी ? शेवटी ते बॅरिस्टर झाले व मातृभूमीस यायला निघाले.

गमतीचा गंभीर परिणाम

चित्तरंजन आईला प्रत्येक आठवड्यात पत्र पाठवीत असत. इंग्लंडहून निघताना त्यांनी आईला घरी तार केली नाही; परंतु निघत आहे अशा अर्थाचे पत्र लिहून पोस्टात टाकण्यासाठी आपल्या मित्राजवळ त्यांनी देऊन ठेवले; परंतु मित्र ते टाकायला विसरला. घरी पत्र गेले असेल अशी देशबंधूंची कल्पना होती. ते मुंबईस उतरले; परंतु त्यांनी घरी तार किंव पत्र पाठविले नाही. घरी एकदम जाऊन आईला चकित करू, गंमत होईल असे त्यांना वाटत होते. ते मुंबईहून पाटण्यास आले. तेथे मित्राकडे राहिले. तेथे मित्राजवळ बोलताना म्हणाले, 'घरी जाऊन एकदम चकित करीन. मी मुंबईस उतरलो; परंतु तार केली नाही. पत्र पाठविले नाही.' शेवटी त्या मित्राने चित्तरंजनांच्या घरी तार केली की, चित्तरंजन आला आहे; परंतु घरी आई ध्यास घेऊन बसली होती. दर आठवड्यास चित्तरंजनचे पत्र यावयाचे; परंतु ना पत्र, ना तार. त्या प्रेमळ मातेने अन्नपाणी वर्ज्य केले. ती अंथरुणास खिळली. जेव्हा त्या मित्राची तार आली तेव्हा आईला धीर आला आणि चित्तरंजन घरी आले. एकदम आईजवळ गेले. दोघांची हृदये उचंबळली. आपण गंमत करणार होतो, आईला चकित करणार होतो, तो सारा आनंद पार कोठल्या कोठे गेला. आईची कृश मूर्ती पाहून चित्तरंजन फार दु:खी झाले. त्यांनी आईची क्षमा मागितली.

वकिलीस सुरुवात

चित्तरंजन १८९३ मध्ये विलायतेतून कलकत्त्यास आले आणि त्यांनी वकिली सुरू केली. घरी सारी ददात होती. वडील लोकांचे कर्ज फेडून स्वत: कर्जबाजारी

झाले होते. भुवनमोहन एका मित्राला चाळीस हजारांचे जामीन राहिले होते. पुढे ही जामीनकी सारी त्यांना भरावी लागली. कोठून आणायचे पैसे ? ते स्वत: कर्जाच्या समुद्रात बुडाले. कोण तारणार, कोण वर काढणार ? चित्तरंजनांच्या मनात आले की, वकिली करून एके दिवशी हे सर्व कर्ज फेडू.

नादारीत नाव

भुवनमोहनबाबूंनी एके दिवशी स्वत:चे नाव दिवाळखोरीत नोंदविले. अत:पर कर्ज देता येत नाही असे पित्याने खाली मान घालून जाहीर केले; परंतु पित्याच्या अपमानात पुत्रही भागीदार झाला. स्वत:चेही नाव दिवाळखोरांच्या यादीत सामील करण्यांची चित्तरंजनास जरूर नव्हती; परंतु पित्याची अप्रतिष्ठा होत असता त्यांना स्वत:च्या प्रतिष्ठेची पर्वा वाटत नव्हती. तेही दुनियेसमोर एक दिवाळखोर म्हणून उभे राहिले.

चौफेर निराशा

बडे बडे वकील त्यांच्याकडे तुच्छ दृष्टीने पाहात. त्यांना फारसे काम मिळेना. ते कलकत्ता सोडून इतर जिल्ह्यांच्या ठिकाणीही थोडेफार काम मिळाले तर जात. जे काही थोडेफार काम मिळे त्यात ते संपूर्णपणे लक्ष घालीत; परंतु एकंदरीत या वेळेस चोहोबाजूस अंधार होता. श्रीमंतीत वाढलेली आई. ती आता घरचे सारे काम करी. चित्तरंजनांजवळ कधी कधी ट्रॅमच्या तिकिटासही पैसे नसत. ते पायी कोर्टात जात. या अशा निराशेत त्यांच्या हृदयातील परमेश्वर काही दिवस दूर झाला. हृदयात खूप खळबळ होती. अपार भावना उसळत होत्या. त्यांना कोठे प्रकट करणार ?

काव्यनिर्मिती

या भावना काव्यात प्रकट होऊ लागल्या आणि त्यांच्या भावगीतांचा पहिला संग्रह प्रसिध्द झाला. त्याचे नाव 'मालंच.' या पुष्पहारात सुंदर भावनोत्कट गीते आहेत. ईश्वराची श्रद्धा व अश्रद्धा या दोहोंचे दर्शन यात आहे.

'ते पाहा सुंदर स्वप्न. तो पाहा प्रभू. तो हळूहळू येत आहे. तालबद्ध पावले टाकीत, फुले फुलवीत येत आहे. आनंद फेकीत येत आहे. स्मितांची वृष्टी करीत येत आहे. पृथ्वीवरचे सौंदर्य त्याचेच. या वसंत ऋतूतील सौंदर्य त्याचेच.'

असे चित्तरंजन सृष्टीतील सौंदर्य पाहून म्हणतात. सर्वत्र प्रभूची मूर्ती, त्यांचे सौंदर्य पाहतात. परंतु हा भाव टिकत नाही. ते मग म्हणतात, 'देव, देव; कोठे आहे

देव ? त्याला सत्य समजून मी पूजा केली; परंतु कोठे आहे तो ? ईश्वर, ईश्वर म्हणून मी हाका मारल्या, परंतु देवाच्या नावाने हाका मारून रडणे वेडेपणा आहे. हा ईश्वर सर्वत्र वणवा पेटवून राहिला आहे. आमची सर्व सुखशांती मातीत मिळवीत आहे. आमच्या निराधारतेचे दुःख पदोपदी वाढवीत आहे.'

आणि दुसऱ्या एका गीतात म्हणतात :

'अरे धर्ममार्तंडा, तू मात्र उच्च व बाकीचे तुच्छ का रे? कोठल्या शून्यातून हा तुझा देव तू निर्माण केलास ? कशाला ही त्याची गाणी तू गात आहेस? कशाला ही आरती? तुझे भाऊ तिकडे दुःखाने रडत आहेत, तेथे तू का नाही जात ? एक देवता निर्मून आकाशाकडे तोंड करून पूजा करीत बसला आहेस, त्या देवळातच तुझे जीवनपुष्प फुकट जाईल, सुकून जाईल.'

या मालंचात अशी सुंदर गीते आहेत. येथे देव नसला तरी मानवाविषयी अपार सहानुभूती आहे. पतितांबद्दल प्रेम आहे. दुःखितांविषयी करुणा आहे. दुसऱ्याचे दुःख दूर करण्यासाठी ते स्वतःचे दुःख विसरू पाहतात. ते एका गीतात म्हणतात–

'दुसऱ्यांच्या दुःखाची आग तू विझविली पाहिजेस. तू विझविली पाहिजेस. तू स्वतःचे दुःख विसर. त्यावर हास्याचा, आनंदाचा पडदा घाल; तू स्वतःच्या वासना नष्ट करून स्वतःचे जीवन सर्वस्व दुसऱ्यांचे अश्रू पुसण्यासाठी देऊन टाक. या जगात जन्मून आपल्या डोळ्यांतील प्रेमळ रिणांनी एखाद्याच्याही जीवनाची कळी जर तुला फुलविता आली नाही, एखाद्याचीही वेदना जर तुला शांत करता आली नाही, तर तुझ्या जीवनाचा काय उपयोग ? जे जीवन केवळ स्वतःसाठी असते ते व्यर्थ असते; जे जीवन विश्वासाठी असते ते कृतार्थ होते.'

या कवितेत देशबंधूंचे सारे तत्त्वज्ञान आहे. त्यांनी जगालाच सारे दिले. स्वतःला पुढे शून्य केले.

सागर – संगीत

मालंचातर 'माला', 'सागरसंगीत', 'किशोर–किशोरी', 'अंतर्यामी' अशी सुंदर सुंदर काव्ये त्यांनी लिहिली. माला काव्यसंग्रहात प्रेमाच्या सुंदर कविता आहेत; परंतु त्यांचे सर्वात प्रसिद्ध काव्य म्हणजे सागरसंगीत. जणू स्वतःच्या हृदयातीलच अनंत भावनांचे संगीत ते ऐकत होते. ते वकील झाले होते; परंतु त्यांचे हृदय

वकिलीसाठी नव्हते. कुटुंबाची प्रतिष्ठा पैसे मिळवून वाढवता यावी म्हणून ते वकील झाले होते; परंतु त्यांचे अंतरंग अन्यत्र होते. स्वत:च्या मनातील थोर थोर भावना वकिलीच्या धंद्याखाली त्यांनी दडपून ठेवल्या होत्या. एखादी सुंदर शिक्षणसंस्था काढावी, ज्ञानप्रसार करावा, साहित्यसेवा करावी असे त्यांच्या मनात येई; परंतु या सर्व ऊर्मी, या भावनांच्या लाटा त्यांनी दडपून ठेवल्या होत्या. कुटुंबासाठी त्यांनी आपल्या आंतरिक आशा-आकांक्षांचे जणू बलिदान केले. त्यांचे वकील होणे म्हणजे अपरंपार त्याग होता. चित्तरंजनांनी पुढे अपार त्याग केला. पैसे दिले, स्वत:चे घर दिले, परंतु कुटुंबाच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यांनी इतर भावना गुंडाळून वकिली हाती घेतली. या गोष्टीतील त्याग, हा मूक त्याग सर्वात अधिक थोर होय.

चित्तरंजन सकाळी उठत व सागरतीरी जाऊन बसत. कलकत्त्यास समुद्र जवळ नाही. हुगळी नदी हा गंगेचा फाटा किंवा गंगेला मिळालेली नदी आहे. तिलाच गंगा म्हणतात. तिलाच सागर म्हणतात. समुद्राच्या भरतीचे पाणी येतेच. चित्तरंजन तेथे बसत. सूर्योदय होत असावा. आकाशात रंग पसरावा व खाली सागरतरंग नाचत असावेत. वारे वाहत असावेत व सागरलीला सुरू असावी. तेथे सागराचे कधी शांत रूप दिसे, कधी उग्र. कधी चित्तरंजनांना तो सागर एखाद्या प्रेमी राजकुमाराप्रमाणे वाटे, तर कधी त्रिशूळधारी रुद्राप्रमाणे भासे. हृदयातील सारे भाव त्या सागर-संगीतात ते ऐकत होते.

त्यांच्या हृदयतंत्रीला सागराचा स्पर्श होई आणि संगीत स्रवू लागे. समुद्र आपल्या लहरींच्या अंगुलींनी चित्तरंजनांची हृदयवीणा जणू वाजवी. सागरसंगीतात महान निसर्गपूजा आहे. अति सुंदर भाषा आहे. सृष्टीत जणू ते बुडाले आहेत.

ते सागराला विचारतात, 'या प्रभातकाळी तू काय म्हणतो आहेस, काय गातो आहेस ? तुझे गीत सर्वत्र भरून राहिले आहे. काय त्याचा अर्थ ? तू क्षणात कोमल स्वर काढतोस, क्षणात गंभीर काढतोस; क्षणात तुझा सूर ऐकून डोळ्यांत अश्रू येतात, तर दुसऱ्याच क्षणी मी उन्मत्त होऊन जणू वेडा बनतो. तुझे हे सूर ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात. या अनंत तानांवर मी डोलत राहतो व समोरच्या प्रभातवेळेकडे शांतपणे पाहात राहतो.'

चित्तरंजन स्वत:च्या हृदयातील का सूर ऐकत होते? घरची करुण स्थिती पाहून का अश्रू येत होते? देशाची स्थिती पाहून का पुन्हा उन्मत्त होऊ पाहात होते ?

काय होते हे सारे ? सागरसंगीतात चित्तरंजनांचा हृदयसिंधू आहे. त्यांच्या हृदयाला भूक होती. कशाची? देशसेवेची? स्वातंत्र्याची? विश्वप्रेमाची? ती भूक शांत होईपर्यंत का हृदयसागर गर्जत राहणार होता?

असे क्षण आम्ही क्वचितच अनुभवले !

१९११ मधील गोष्ट आहे. एके दिवशी चित्तरंजनांकडे त्यांचे मित्र जमले होते. थंडीचे दिवस होते आणि चित्तरंजनांनी सागरसंगीत पुस्तक मागवून घेतले. त्यांनी त्यातील कविता म्हणून दाखविल्या. श्रोत्यांची जणू समाधी लागली. ते मित्र म्हणाले, 'असे क्षण आम्ही क्वचितच कधी अनुभवले असतील.'

सागरसंगीतात तो आहे

आणि पुढे चित्तरंजनांची आई जेव्हा अत्यवस्थ होती तेव्हा चित्तरंजन मुंबईला गेलेले होते. मुलगा केव्हा भेटेल असे मातेला झाले होते. ती पुत्रासाठी तळमळत होती. शेवटी ती माता म्हणाली, 'त्याचे सागरसंगीत पुस्तक माझ्याजवळ आणून द्या. त्या पुस्तकात तो आहे.' आणि माता सागरसंगीत वक्षःस्थलाशी धरून देवाघरी गेली. असे हे सागरसंगीत काव्य आहे. देशबंधूंची ती वाङ्मयीन मूर्ती आहे.

अंतर्यामी

अंतर्यामी या काव्यात चित्तरंजनांची श्रद्धा पुन्हा जागृत झाली आहे. ईश्वरी प्रेमाचा पुन्हा उदय झाला आहे. हृदयात पुन्हा दीप लागला आहे. पुन्हा फुले फुलली आहेत. ते म्हणतात:

'वाजवा, विजयाचा डंका वाजवा. आज भय नाही. संकोच नाही. शंका नाही. शेवटी आशेचा विजय झाला. श्रद्धा व अश्रद्धा यांच्या झटापटीत श्रद्धा विजयी झाली. माझ्या गळ्यात किती हे विजयहार ! माझे पंचप्राण या विजयाने, या वैभवाने थरथरत आहेत. हृदयात पाहा ती फुलबाग पुन्हा फुलत आहे. आज दुःख सुखमय झाले, सुख दुःखमय झाले. सुखदुःख एकरूप झाले. कोणत्या गीताच्या गर्वाने माझे हृदय भरून आले आहे?'

असा अंतर्यामी पुन्हा भेटला. मालंच व अंतर्यामी या दोन काव्यसंग्रहांच्या मध्यंतरी दहा वर्षे गेली. दहा वर्षे हृदयमंथन चालले होते. दहा वर्षे आशा-निराशांचा झगडा चालला होता. शेवटी आशेचा, श्रद्धेचा, प्रेमाचा विजय झाला.

वासंतीदेवी

आणि १८९७ मध्ये, जीवनात प्रकाश व अंधार यांचे युद्ध चालू असतानाच त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचे नाव वासंतीदेवी. चित्तरंजनांच्या जीवननौकेचे सुकाणू म्हणजे वासंतीदेवी. दासांच्या जीवनात वासंतीदेवीमुळेच संगीत आले. प्रमाण राहिले. चित्तरंजनांच्या जीवनाचा वासंतीदेवी म्हणजे मोठा आधार होता. चित्तरंजनांचा स्वभाव वासंतीदेवींना समजे तसा कधी कोणाला समजला नाही.

वंगभंगाची चळवळ

चित्तरंजन वकिलीच्या धंद्यात धडपडत होते. अद्याप ते पुढे आले नव्हते. कुटुंबाची प्रतिष्ठा केव्हा पुन्हा नीट स्थापीन असे त्यांना झाले होते आणि ते वंगभंगाचे दिवस आले. व्हॉइसरॉय कर्झन याने बंगालचे दोन तुकडे केले. सारी बंगाली जनता खवळून उठली; परंतु सरकार लक्ष देईना आणि १९०६ मध्ये कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरली. दादाभाई अध्यक्ष होते. सभेत जहाल पक्ष व नेमस्त पक्ष यांची खडाजंगी झाली. लोकमान्य टिळक, बिपिनचंद्र पाल वगैरे पुढारी सभेतून उठून गेले. त्यांच्याबरोबर चित्तरंजनही उठून गेले होते.

दडपशाही

राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी, बहिष्कार यांची चळवळ सुरू झाली. सारा बंगाल गर्जत होता. बंगालच्या राष्ट्रीय भावनांच्या या पुरास नीट वळण लावण्यासाठी एक महापुरुष आला. बडोदे संस्थानातील शिक्षणाधिकाऱ्यांच्या जागेचा राजीनामा देऊन श्री. अरविंद घोष हे बंगालला निघून आले. एका राष्ट्रीय महाविद्यालयाचे ते प्रमुख झाले. त्यांनी 'वंदेमातरम्' पत्र सुरू केले. अत्यंत भावनामय व तेजस्वी विचार वंदेमातरम देऊ लागले. काही तरुण दहशतवादाकडे वळले. सभांनी हे सरकार ऐकत नसेल तर बॉंब फेकूया असे तरुण म्हणू लागले आणि पहिला बॉंब फेकला गेला. १९०८ च्या एप्रिल महिन्याची ३० तारीख होती. त्या दिवशी हा पहिला स्फोट झाला आणि मेच्या पहिल्याच तारखेस तो सोळा वर्षांचा तेजस्वी तरुण खुदीराम बोस पकडला गेला आणि मेच्या दुसऱ्या तारखेस अरविंद, त्यांचे बंधू बारीन्द्र, उल्हासकर दत्त इत्यादी अनेक देशभक्तांना अटक झाली. सर्वत्र धरपकड होत होती. मधून मधून बॉंब उडत होते. पिस्तुले झाडली जात होती.

अरविंदांचा बचाव

कलकत्त्यातील काही लोकांनी या तरुणांच्या बचावासाठी काही फंड गोळा केला. काही वकिलांची नावे जाहीर झाली. हे वकील या तरुणांचा खटला चालविणार होते. या वकिलांच्या यादीत चित्तरंजनांचे नाव नव्हते; परंतु पुढे पैसे संपत आले आणि हे भाडोत्री वकील अळंटळं करू लागले. अरविंदासारख्यांना कोण वाचवणार? कोण पुढे येणार? कोण त्यांची बाजू मांडणार?

अलिपूर बॉंबकेस

अलिपूर बॉंबकेस म्हणून हा खटला प्रसिध्द आहे. अरविंद व इतर तरुण कैदेत होते. अरविंद ईश्वरध्यानात रमले. तुरुंगात श्रीकृष्णाचे दर्शन त्यांना होऊ लागले, परंतु अशा अवलियाला कोण वाचवणार? अरविंदांच्या बहिणीने एक पत्र प्रसिद्ध केले. सर्व राष्ट्रापुढे तिने हात पसरले होते. ती भगिनी लिहिते :-

'माझा भाऊ निर्दोष आहे; परंतु जवळ पैसा नाही. पैसा मिळाला तर वकील देता येईल. बचाव करता येईल. माझा भाऊ वाचेल. मी सर्व राष्ट्रापुढे हात पसरीत आहे.'

चित्तरंजन ते पत्र वाचून हळहळले, कळवळले; परंतु दुसऱ्या वकिलांच्या हातातील कामात ते कशी ढवळाढवळ करणार? ते रोज आपल्या मित्रांजवळ म्हणत, 'हे माझ्याकडे का नाही खटला घेऊन येत? हा खटला मीच चालवू शकेन. अरविंदांना मीच वाचवू शकेन. अरविंदांचा आत्मा ! त्या आत्म्याची ओळख मलाच आहे. त्या थोर आत्म्याची इतरांस ओळख होणे अशक्य आहे.

चित्तरंजनांकडे खटला आला

शेवटी तो खटला चित्तरंजनांकडे आला. त्यांना अत्यंत आनंद झाला. ते म्हणाले, 'एक दिवस हे काम माझ्याकडे येईल अशी मला खात्री होती. मी का अरविंदांचा कोणी नाही? ते का माझे भाऊ नाहीत?' आणि असे म्हणून ते खटल्याच्या कामात पडले. हा खटला एक वर्षाहून अधिक काळ चालला होता. चित्तरंजनांच्या समोर रात्रंदिवस हे खटल्याचे काम असे. रात्री दोन दोन वाजेपर्यंत ते कागदपत्रे पाहात बसत. घरात अडचण असे. इतर कामे या काळात त्यांनी घेतली नाहीत. कर्ज काढून घरखर्च चालविण्यात येई. घरची गाडी, घोडा सारे विकले गेले आणि ते शेवटचे त्यांचे भाषण ! आठ दिवस भाषण करीत होते आणि समारोप करताना

म्हणाले, 'न्यायाधीश महाराज ! अरविंद निर्दोषी आहेत. एक काळ असा येईल की, ज्या वेळेस राजकीय झगड्यांची धूळ शांत झालेली असेल. नि:पक्षपाती दृष्टीने त्या वेळेस पाहता येईल आणि अरविंदांचा महान आत्मा जग ओळखील. अरविंदांचा आवाज साता समुद्रापलीकडेही जाईल. एक थोर प्रेषित, एक ईश्वराचा दूत असे जग त्यांना संबोधील. सर्वत्र त्यांचा गौरव व जयजयकार होईल.'

चित्तरंजनांची ही भविष्यवाणी किती यथार्थ झाली आहे ! आणि न्यायाधीशांनी निकाल दिला. अरविंद निर्दोषी ठरले. न्यायाधीश निकाल देताना म्हणाले, 'चित्तरंजनांनी अति उत्कृष्टपणे काम केले. चित्तरंजनांसारखा बचाव करणारा येथे नसता तर कदाचित एका निर्दोष पुरुषास मला मरणाची शिक्षा द्यावी लागली असती. त्यांपासून चित्तरंजनांनी मला वाचविले.'

स्वाभिमानी चित्तरंजन

हा अलिपूर बॉंब खटला चालवीत असता एकदा न्यायाधीश 'Non-sense' म्हणून उद्‌गारला. चित्तरंजनांचे डोळे लाल झाले. हा न्यायाधीशच उद्या निकाल देणार. त्याच्याजवळ जपून वागले पाहिजे. अपमान गिळला पाहिजे. असे विचार त्यांच्या मनात आले नाहीत. ते एकदम म्हणाले, 'या वेळेस तुम्ही न्यायासनावर आहात, ही दु:खाची गोष्ट आहे. दुसऱ्या स्थितीत असते तर योग्य उत्तर मी दिले असते.'

संपत्तीच्या शिखरावर

अरविंदांच्या खटल्यात चित्तरंजन दासांनी अपरंपार मेहनत घेतली. ती निष्काम सेवा होती; परंतु पुढे अपरंपार फळ मिळाले. चित्तरंजनांची देशभर कीर्ती गेली. बंगालभर त्यांचा जयजयकार झाला. चित्तरंजनांचे अलौकिक व परिणामकारी वक्तृत्व, कायदेपटुत्व, उलटतपासणीतील कुशलता, परिश्रम सर्व गोष्टी जनतेच्या नजरेस आल्या आणि मोठमोठे खटले आत्ता त्यांच्याकडे येऊ लागले. एकेका दिवसाला हजार, दोन हजार रुपये त्यांना मिळू लागले. लक्ष्मी भराभरा येऊ लागली.

परंतु ते पैशांचे आषक नव्हते. देशसेवकांचे सारे खटले त्यांनी विनामूल्य चालविले. बिपिनचंद्र पाल व ब्रह्मबांधव उपाध्याय यांचे खटले चालवीत असता ज्यूरी रडली, इतके परिणामकारक चित्तरंजनांचे भाषण झाले. बंगालभर ठिकठिकाणी या खटल्यांसाठी त्यांना जावे लागे. सर्व बंगाल या सेवेसाठी त्यांचा ऋणी आहे.

जुने देणे दिले

आणि चित्तरंजनांनी आता एक चमत्कार केला. त्यांनी स्वत:चेही नाव दिवाळखोरांच्या यादीत घातले होते, परंतु आता संपत्ती आली होती. त्यांनी पूर्वीच्या देण्याचा सारा हिशोब केला आणि सर्व देणे देऊन टाकले. न्यायमूर्ती फ्लेचर म्हणाले, 'नादारीत नाव नोंदवल्यावर मागून सर्व ऋण फेडून टाकल्याचे हे पहिलेच उदाहरण.'

कुटुंबाची प्रतिष्ठा वाढली

चित्तरंजनांच्या या कृतीमुळे सारा बंगाल चकित झाला. त्यांच्या कुळाची, कुटुंबाची प्रतिष्ठा वाढली. चित्तरंजनांची कीर्ती सर्वत्र पसरली. आता सुखाचे, भाग्याचे दिवस होते. घरात आनंद होता.

मायबापाचे निधन

आणि वडील भुवनमोहन आजारी पडले. आईही आजारी पडली. आईचे हे शेवटचे आजारीपण. चित्तरंजन मुंबईला कामासाठी गेले होते. आई अत्यवस्थ आहे असे कळताच ते लगेच परतले; परंतु वाटेतच त्यांना स्वप्न पडले. आईचा आत्मा उडून जात आहे असे त्यांनी पाहिले. ते घरी आले तो आई निघून गेली होती. चित्तरंजनांचे सागरसंगीत वक्ष:स्थळाशी धरून ती देवाघरी निघून गेली होती. आई गेली आणि पुढे सहा महिन्यांनी वडीलही मरण पावले. त्यांनी दानधर्म केला. गरिबांना अन्नदान दिले. भरपूर मेवामिठाई वाटली. ते स्वत: हजर राहून सर्वांना पोटभर मिळते का नाही ते पाहात होते. ते स्वत: वाढीतही होते.

स्फूर्तिदात्री माता

आईवर त्यांचे अपार प्रेम होते. माता त्यांची स्फूर्तिदेवता होती. रोज कोर्टात जाण्याच्या आधी ते आईच्या पाया पडून जात. आईच्या आशीर्वादावर त्यांची श्रद्धा होती. आईचे स्मरण येताच त्यांचे डोळे भरून येत. मरताना त्यांची आई म्हणाली, 'जन्मोजन्मी हाच पती मिळो; चित्तरंजनासारखा मुलगा मिळो.' या उद्गारांवरून आईचे चित्तरंजनांवर किती प्रेम होते याची कल्पना येईल.

समाजसुधारक

चित्तरंजनांचे वडील ब्राह्मण समाजाचे सभासद होते; परंतु चित्तरंजन वैष्णवधर्मीच होते. वैष्णवधर्मी असूनही ते समाजसुधारक होते. चित्तरंजनांवर

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

ब्राह्मपंथीयांचाही राग व सनातनी वैष्णवधर्मीयांचाही राग. रूढी वगैरे ते मानीत नसत. त्यांनी आपल्या मुलीचा मिश्र विवाह केला होता. मोठी मुलगी अपर्णादेवी. सुधीरचंद्र रॉय नावाच्या एका तरुणावर तिचे प्रेम होते; परंतु सुधीरचंद्राचे वडील परवानगी देत ना. तीन वर्षे चित्तरंजनांनी वाट पाहिली. शेवटी सुधीरचे वडील विरघळले. एका मुलीच्या लग्नात भटजीसही बोलवायचे नाही असे त्यांचे म्हणणे होते, परंतु वासंतीदेवी सांगत होत्या 'भटजी वगैरे बोलवा. सुधारणा हळूहळू करा. एकदम सर्वांची मने दुखवू नका.' चित्तरंजन गच्चीत फेऱ्या घालीत होते. शेवटी पत्नीच्या सांगण्याप्रमाणे त्यांनी केले. हुंडा वगैरे घेण्याच्या ते विरुद्ध होते. बंगाली कन्या स्नेहलता हिने हुंड्यापायी स्वतःला जाळून घेतले होते. वरविक्रयाची ही रूढी पाहून चित्तरंजन संतापत, दुःखी होत. ते एकदा म्हणाले :

'आपली अनंत निद्रा अद्याप जात नाही ही दुःखाची गोष्ट आहे. अनेक स्नेहलता भस्म होत आहेत. तरी आईबाप जागे होत नाहीत. मुलींची हुंड्यामुळे लग्ने होत नसतील तर त्यांना शिकवा. स्वतःची जीवनयात्रा चालविण्यास त्यांना समर्थ करा. त्या समाजोपयोगी कामे करतील. जीवन कृतार्थ करतील.'

भावा-बहिणींवर अपार प्रेम

चित्तरंजनांचे आपल्या बहीणभावांवर फार प्रेम होते. त्यांनी त्यांचे शिक्षण केले. एक भाऊ प्रफुल्लरंजन हे पुढे हायकोर्टाचे जज्ज झाले होते. सर्वांत लहान भाऊ वसंतरंजन हाही बॅरिस्टर होऊन आला होता. कलकत्त्यास तो बॅरिस्टरी सुरू करणार इतक्यात तो आजारी पडला. दार्जिलिंग येथे तो अल्पवयात मरण पावला. चित्तरंजनांस फार दुःख झाले. त्यांना तीन बहिणी. सर्वात मोठी बहीण विधवा होती. ती व तिची मुले चित्तरंजनांजवळ असत. दुसरी एक बहीण ऊर्मिलादेवी. तीही गतधवा झाली. तिने पुढे राष्ट्रसेवेस वाहून घेतले. मुलींची राष्ट्रीय शाळा ती चालवी. तिसरी बहीण अमलादेवी. अमलादेवीचा कंठ अति गोड होता. १९१७ मध्ये कलकत्त्यास काँग्रेस भरली. त्या वेळेस अमलादेवीने वंदे मातरम् गीत म्हटले होते. पुरुलिया येथे तिने एक अनाथाश्रम चालविला होता. आंधळे, लुळे सर्वांना तेथे आश्रय मिळे. चौथी एक बहीण लहानपणीच वारली.

चित्तरंजनांना मुलगा एकच.

असा हा संसार चालला होता. कसली ददात नव्हती. आनंद होता.

सुखी पतिपत्नी

आणि वासंतीदेवींचे चित्तरंजनांवर अपार प्रेम. वाईट दिवस गेले होते. चिंता संपली होती. पतीच्या आवडीनिवडी जणू त्या स्वत:च्या मानीत. वासंतीदेवी प्रेमाने चित्तरंजनांना 'चित्त' अशी हाक मारीत. 'चित्त, आज कोणत्या रंगाचे लुगडे नेसू?' त्या विचारीत आणि चित्तरंजन सांगतील त्या रंगाचे त्या नेसत. त्यांच्या अन्योन्य प्रेमाला सीमा नव्हती.

हृदयातील खरी भूक

परंतु चित्तरंजन जरी या बाह्य वैभवात होते, तरी त्यांच्या हृदयाची भूक दुसरीच होती. हृदयसागर आणखी कशासाठी तरी गर्जत होता. दुसरे कोणीतरी त्यांना हाक मारीत होते. कोण हाक मारीत होते? बंगालमध्ये चैतन्य म्हणून अति थोर संत होऊन गेले. चैतन्य म्हणजे मूर्तिमंत प्रेम. निळा समुद्र पाहून हा माझा घननीळ कृष्णच नाचत आहे असे त्यांना वाटे व बाहू उभारून ते समुद्रात घुसू बघत. दारुड्यांनी मारून रक्तबंबाळ केले तरी चैतन्य म्हणायचे, 'त्यांनी मला मारले तरी मी त्यांना प्रेमच देणार.' चैतन्य महाप्रभू म्हणजे बंगालमधील वैष्णवधर्माचा प्राण. चैतन्यांना गौरांग असेही नाही आहे. चित्तरंजन म्हणायचे, 'बंगालला जाणायचे असेल तर चैतन्यांना जाणलेच पाहिजे.' बंगाली लोकांची भावनोत्कटता चैतन्यांचे चरित्र वाचू तर थोडीफार समजेल. चित्तरंजन चैतन्यांच्या चरित्रात डुंबत, चण्डिदासांची गीते यातून मला नवप्रेरणा मिळाली, नवचैतन्य मिळाले असे चित्तरंजन म्हणत.

ते कथाकीर्तनास जावयाचे. हरिसंकीर्तन करावयाचे. एकदा श्रीरामकृष्णांची समाधी असलेल्या बेलूर मठात ते गेले होते. श्रीरामकृष्ण परमहंसांची पुण्यतिथी होती. कीर्तनाचा गजर चालला होता. चित्तरंजन तेथे रमले होते; परंतु दुसरीकडे खूप गर्दी होती. कशाची ? तेथे प्रसाद वाटण्यात येत होता. चित्तरंजन तेथे आले. तेथे हिंदू होते, मुसलमान होते, अमेरिकन मिशनरीही होते. जातिवर्णविरहित, धर्मभेदरहित असा तो प्रेममय मेळावा पाहून चित्तरंजनांचे हृदय उचंबळले.

ही तीर्थस्थाने सोडून घरी का खाऊ ?

त्यांनी प्रसादासाठी हात पुढे केला. स्वामी प्रेमानंद म्हणाले, 'तुम्ही जेथे उतरला आहात तेथे प्रसाद पाठवला आहे. येथे गर्दी आहे.' चित्तरंजन भावभक्तीने म्हणाले, 'येथेच सर्वांबरोबर मला खाऊ दे. हे तीर्थस्थान सोडून घरी का खात बसू?'

सारी प्रभूची लीला आहे

चित्तरंजन वैष्णवधर्मातील प्रेममय भक्तीच्या द्वारा अद्वैताकडे वळले. सर्वत्र तो माझा प्रभू आहे असे ते म्हणत. वाऱ्याच्या सळसळण्यात, वृक्षपर्णांच्या मर्मध्वनीत, पाखरांच्या गोड कलरवात, पुष्पांच्या सुगंधात, सूर्यचंद्रतारकादींच्या तेजात, निळ्या निळ्या सुंदर पर्वतश्रेणीत, सदैव वाहणाऱ्या सरितांत, उचंबळणाऱ्या सागरसंगीतात सर्वत्र त्या प्रभूचीच अनंत लीला आहे. हर्षशोकात तोच. आशानिराशा त्याचाच खेळ. एकाच परमतत्त्वाची सर्वव्यापी छाया सर्वत्र आहे असे म्हणत. मला कोणी एखादा सद्गुरू भेटेल का, महापुरुष भेटेल का की जो मला चैतन्यांची सर्व धर्मसाधना नीट देईल अशी त्यांना तळमळ होती. त्यांचे एक मित्र कामिनीचंद्र त्यांना म्हणाले, 'चित्तरंजन, देवासाठी सर्व सोडून द्यावे लागेल. तुम्हाला संन्यासी व्हावे लागेल.'

चित्तरंजन म्हणाले, 'माझ्या पत्रिकेत संन्यासयोग आहेच.'

नारायण मासिक

वैष्णवधर्मातील सत्कल्पनांच्या प्रसारार्थ त्यांनी नारायण मासिक काढले. मनातील देशविषयक व देवाविषयक भावना या मासिकातून ते प्रकट करू लागले. जे पुढे कृतीत यावयाचे होते ते शब्दांत उतरू लागले. साहित्याची गंभीर चर्चा ते करीत. त्यांची माता मरण पावली होती. मातेची जागा वंगमाता घेत होती. बंगालवर त्यांचे किती प्रेम ! देश म्हणजेच देव. त्या अद्वैताचाच अनुभव ते वंगमातेच्या पूजेत घेत. त्या मासिकात एकदा त्यांनी लिहिले :

'बंगालचे पाणी व बंगालची धूळ यात एक प्रकारचे अमर सत्य लपलेले आहे. हेच सत्य निरनिराळ्या युगांत निरनिराळ्या स्वरूपात प्रकट होत असते. साहित्य, तत्त्वज्ञान, काव्य, युद्ध, पूर, धर्म, कर्म, अज्ञान, अधर्म, स्वातंत्र्य, पारतंत्र्य, जय, पराजय, वैभव, विपत्ती सर्वांतून हेच सत्य प्रकट होत असते. वाऱ्याने डोलणारी बंगालमधील हिरवीगार भाताची शेते, मोहोराने बहरलेल्या आमराया, सायंकाळी मंदिरांतून होणाऱ्या भुपदीपारती, ते शंखध्वनी व ते घंटांचे नाद, खेड्यातील चित्रात रेखाटल्याप्रमाणे असणाऱ्या झोपड्या व झोपड्यांसमोरची स्वच्छ अंगणे, बंगालमधील नद्या, सरोवरे, तळी, वापी; पूजेच्या फुलांच्या फुलबागा; बंगालचे आकाश, बंगालचा वारा, बंगालचे तुळशीपत्र; बंगालचा सागरसंगम, त्रिवेणी संगम; काशी, मथुरा, वृंदावन आणि बंगालचा समस्त इतिहास; या सर्वांतून ते

सनातन सत्यच लपलेले असते. या सर्वांच्या द्वारा ते सनातन सत्यच नाचत असते, प्रकाशत असते.'

चित्तरंजनांनी या उताऱ्यात पश्चिमेकडे मथुरा वृंदावनापर्यंत व इकडे जगन्नाथपुरीपर्यंत बंगालची व्याप्ती केली आहे. या सर्व प्रदेशात चैतन्य नाचले, हिंडले. विक्रमपूरची सत्ता काशीपर्यंत होती म्हणून त्या सर्वांचा अंतर्भाव.

या नारायण मासिकात साहित्यविषयक अत्यंत मार्मिक टीकालेख चित्तरंजनांनी लिहिले. चित्तरंजन कवी होतेच; परंतु ते खोल व सहृदय टीका करू शकतात ही गोष्टही दिसून आली. साहित्यिक लोकांत त्यांना मान मिळू लागला. १९१५ मध्ये बाकीपूर येथे बंगाली परिषद भरली होती. या परिषदेतील साहित्य विभागाचे ते अध्यक्ष होते आणि पुढच्या वर्षी डाक्का येथे भरलेल्या साहित्य परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते.

कवी गोविंददास

आणि तेथीलच कवी गोविंददास यांची ती गोष्ट आहे. गोविंददास हे अत्यंत गरीब होते. ते त्या साहित्यसंमेलनास आले होते; परंतु त्यांना आत प्रवेश मिळेना. त्यांना कोण ओळखणार? स्वागतसभासद व्हावयास त्यांच्याजवळ पैसे कोठे होते ? गोविंददासांची राष्ट्रीय गीते बंगालभर पसरली होती; परंतु हेच ते गोविंददास असे कोणाला माहीत नव्हते. त्यांच्या एका गाण्यात पुढील भाव होता.

'तू स्वदेश स्वदेश म्हणून म्हणतोस, परंतु हा देश तुझा नाही. हा देश तुझा असता, ही गंगा व ही यमुना जर तुझी असती, तर परक्यांच्या मालाने भरलेली, परकीय सैन्याने भरलेली गलबते या नद्यांतून वावरली असती का ? कशाला म्हणतोस हा स्वदेश माझा ? हा देश तुझा नाही राहिला.' असा हा जनतेचा कवी होता. दरिद्री कवी होता. चित्तरंजनांच्या कानांवर गोष्ट गेली. ते धावत आले. दरिद्री कविरायाला त्यांनी हृदयाशी धरिले. त्यांना सन्मान्य स्थानी नेऊन बसविले. कवी गोविंददास यांचे हृदय या प्रेमाने भरून आले. त्यांनी चित्तरंजनदासांना पुढे एक अत्यंत प्रेमळ, करुणगंभीर व भावनोत्कट पत्र लिहिले. या गोविंददासांनी आपल्या एका कवितेत म्हटले आहे.

'आज तुम्ही मला ओळखीत नाही, परंतु उद्या माझ्या समाधीवर तुम्ही फुले उधळाल.'

परंतु मरणाच्या आधीच चित्तरंजनांनी त्यांना ओळखले. त्यांचा सन्मान केला.

वृंदावनात जाऊ

चित्तरंजनांचा आत्मा दैवी प्रेमाकडे जायला आतून अधीर होत होता. ते बाह्य वैभव, ते विलास यात त्यांचा आत्मा नव्हता. ते सर्वांना देत होतेच. वंगभंगानंतर जे प्रचंड आंदोलन झाले, जे क्रांतिवीर झाले, त्यात अनेकांवर आपत्ती आल्या. किती फाशी गेले, किती काळ्या पाण्यावर गेले. कित्येकांच्या घरी अडचणी होत्या. जे पुढे तुरुंगातून सुटून आले त्यांना कोठे आधार नव्हता, परंतु त्या सर्वांना चित्तरंजनांचा एकमात्र आधार होता. सहस्र हातांनी हा उदारात्मा सर्वांना देत होता. विद्यार्थ्यांना देत होता. बिपिनचंद्र पाल यांचा सर्व खर्च चित्तरंजनच चालवीत. असा हा शतमुखी त्याग सुरूच होता; परंतु त्यांचा आत्मा सर्वस्वत्यागाची हाक ऐकत होता. ते वासंतीदेवीस म्हणायचे, 'आता सर्व सोडून वृंदावनात जाऊ. तेथे कृष्णाचे दर्शन घेऊ. गोपींनी प्रेमाचे पूर जेथे वाहवले त्या यमुनेच्या तीरी लोळू. तेथे गीते आळवू, अश्रू ढाळू.'

वृंदावनाऐवजी भारतमातेची हाक

परंतु प्रभूची निराळीच योजना होती. त्या वेळेस १९१४ चे महायुद्ध सुरू होते. लोकमान्य टिळक सुटले होते. त्यांनी पुन्हा काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. लोकमान्य येईपर्यंत जहाल पक्षाचे लोक काँग्रेसपासून दूर होते. त्यांना काँग्रेसमध्ये कोण घेणार? दारे जणू बंद होती, परंतु लोकमान्यांनी दूरदृष्टीने थोडे पडते घेऊन, मिळते घेऊन, काँग्रेसमध्ये शिरकाव करून घेतला आणि राष्ट्रीय पक्षाची ते पुन्हा नीट संघटना करू लागले. ठिकठिकाणची आजपर्यंत स्वस्थ असणारी माणसे त्यांना ते पुन्हा ओढू लागले. राजकारणात खेचू लागले. लोकमान्य व डॉ. ॲनी बेझंट यांनी स्वराज्याची चळवळ सर्वत्र सुरू केली. लोकमान्यांनी दौरे सुरू केले, परंतु ॲनी बेझंट बाईस अटक झाली. देशभर अटकेचा निषेध झाला. कलकत्त्यास १९१७ जुलैच्या १७ तारखेस प्रचंड सभा भरली. चित्तरंजनांचे तेजस्वी भाषण झाले. सरकारचा निषेध करण्यात आला.

महायुद्धाच्या या काळात स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न झाले. गदर चळवळ झाली. अनेक फाशी गेले आणि बंगालभर धरपकड सुरू झाली. त्या वेळच्या मॉडर्न रिव्ह्यूने लिहिले, 'बंगालमध्ये असे एकही घर नसेल, ज्यातील एखाद्या तरी तरुणास अटक झालेली नाही.' पत्नींचे पती, बहिणींचे भाऊ, मातांचे पुत्र तुरुंगात होते. त्यांची ना

चौकशी ना काही. तरुण असणे हाच फक्त गुन्हा. ज्या ठिकाणी स्थानबद्ध करून ठेवीत, त्या जागा वाईट असत. कधी तेथे सापही असत. जमीन उखळायची. अधिकारी येऊन म्हणायचे, 'येथे का कसरत करता? अद्याप मस्ती जिरली नाही?' कोणी आजारी पडत. कोणी क्षयी होत. या तरुणांची कोण बाजू घेणार ? चित्तरंजनच त्यांच्यासाठी उभे होते. १९१७ च्या ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या तारखेस कलकत्त्यास या अटकबंद तरुणांविषयी प्रचंड सभा झाली. चित्तरंजनांचे हृदयास घरे पाडणारे भाषण झाले आणि शेवटी ते म्हणाले :

'ज्या घरात कोणास अटक झाली नाही असे एखादेच घर पूर्व बंगालमध्ये असेल. सुधारणा देणार, सुधारणा देणार असा एकीकडे डांगोरा पिटीत असता इकडे ही अटक करणे हा का शहाणपणा आहे? सरकारचे हे करणे अन्याय आहे, अयोग्य आहे.'

चित्तरंजन अशा रीतीने पुन्हा देशाकडे ओढले जाऊ लागले आणि १९१७ साली तर कलकत्त्यास काँग्रेस भरली. देशात पुन्हा उत्साह संचारत होता. लोकमान्य आले. चित्तरंजनांना त्यांनी संपूर्णपणे राजकारणात पडण्याचा प्रेमपूर्वक आग्रह केला आणि १९१८ मध्ये मुंबईस काँग्रेसचे जादा अधिवेशन भरले तेव्हा चित्तरंजन पुण्यास आले. लोकामान्यांकडे पाहुणे म्हणून उतरले. त्यांचे भाषण झाले. लोकमान्य म्हणाले, 'एक दिवस लौकरच असा येईल की, ज्या दिवशी चित्तरंजन संपूर्णपणे देशसेवेस वाहून घेतील.'

रौलेट बिल

बंगालभर विनाचौकशी शेकडे तरुण कोंडवाड्यांतून ठेवलेले होते. या तरुणांवर आरोप तरी कोणते ? कोणता पुरावा? सरकारने एक कमिटी नेमली. त्या कमिटीचे रौलेट साहेब अध्यक्ष होते. या कमिटीने सर्व चौकशी केली. क्रांतिकारकांची संघटना कशी आहे, त्यांचे प्रयत्न कसे चालतात ते सर्व मांडले आणि काही उपाय सुचविले. हे तरुण हिंदुस्थान सरकारच्या वटहुकुमांनी अटकेत होते, परंतु महायुद्ध थांबले. आता या वटहुकुमांची काय जरूर? परंतु हे चळवळे तर दडपून ठेवता आले पाहिजेत. प्रांतिक सरकारांना अधिक सत्ता या बाबतीत द्यावी, पोलिसांना संशयावरून वाटेल त्याला अटक करता यावी, अशा प्रकारचे उपाय या कमिटीने सुचविले. सरकार

काहीतरी असा कायदा करणार असे जाहीर झाले. रौलेट बिल हिंदुस्थान सरकार पास करणार असे नक्की झाले.

महात्मा गांधी उभे राहिले

काँग्रेसचे शिष्टमंडळ विलायतेत गेले होते. लोकमान्य विलायतेत होते आणि इकडे मानवी स्वातंत्र्यास काळिमा फासणारे बिल पास होत होते. दहा बारा लाख हिंदी शिपाई महायुद्धात मेले. अब्जावधी रुपये हिंदुस्थानने दिले. बक्षीस काय? तर हा रौलेट कायदा. हा असह्य अपमान होता. ही कृतघ्नता होती आणि साबरमतीच्या आश्रमातील सिंह बाहेर आला. हे बिल पास करू नका नाहीतर मी सत्याग्रह करीन, असे नम्रपणे महात्माजींनी व्हॉइसरायांना कळविले, परंतु सरकारने १९१९ च्या मार्चमध्ये बिल पास केले. आफ्रिकेत सत्याग्रहाचे युद्ध लढणाऱ्या महावीराची परीक्षा हिंदी सरकारला अद्याप व्हायची होती. चंपारण्यातील लढा, खेडा ज़िल्ह्यातील लढा महात्माजी लढले होते; परंतु आता अखिल भारतीय लढा होता.

प्रार्थनेचा व उपवासाचा दिवस

मार्च महिन्यातील तो शेवटचा रविवार होता. त्या दिवशी सर्व हिंदुस्थानभर सभा भरायच्या होत्या. प्रार्थना करायची, उपवास करायचा, कायदा मागे घ्या अशी सरकारला विनंती करायची, असा हा कार्यक्रम महात्माजींनी दिला आणि हिंदुस्थानभर एक नवीन चैतन्य उसळले.

कलकत्त्यातील सभा

कलकत्त्यात प्रचंड सभा झाली. चित्तरंजनाचे भाषण झाले. ते म्हणाले :

'आज महात्मा गांधींनी नेमलेला दिवस. आंतरिक वेदना प्रकट करण्याचा हा दिवस आहे. भरभराटीचे दिवस असतात तेव्हा आपणास स्वतःचे भान नसते. विपत्काळीच आपण नीट डोळे उघडतो. आत्मसंशोधन करतो. ईश्वराचा संदेश ऐकू येतो. हिंदी राष्ट्राच्या इतिहासात आज आणीबाणीची वेळ आहे. प्रत्येकाच्या आत्म्याची कसोटी आहे. तुमचा आत्मा शक्तिसंपन्न होऊ दे, परंतु ही कोणती शक्ती? कोणते बळ आपण मिळवायचे? पशुबळ, शस्त्रबळ हे आपले बळ नाही. प्रेम हे आपले बळ. महात्माजींचा नवभारतास हा संदेश आहे. महात्माजींच्या संदेशातील भावना तेव्हाच आपण आपलीशी करू शकू - जेव्हा स्वार्थ, द्वेष, ईर्ष्या, मत्सर यांचा आपण त्याग करू. आपला रौलेट कायद्याला विरोध आहे. का ? तर हा

कायदा पास झाला तर राष्ट्रीय जीवनाचा विकासच थांबेल. राष्ट्राचा कोंडमारा होईल. ही महान राष्ट्रीय आपत्ती आहे. ती येऊ नये म्हणून आपण उभे राहूया. देशप्रेमाने उचंबळून उभे राहूया. या देशप्रेमाने आपण त्याग करायला तयार राहूया. आज राष्ट्राचे हृदय उडत आहे, प्रेमाचा विजय हा ठरलेलाच. कारण या प्रेमाच्या मुळाशी प्रामाणिकपणा आहे.'

हत्याकांड

कलकत्त्यातील सभा शांतपणे पार पडली; परंतु दिल्ली, पंजाबकडे कोणते प्रकार होत होते ? १९१९ मार्चच्या ३० तारखेस दिल्लीत विराट सभा झाली. तेथे गोळीबार झाले. स्वामी श्रध्दानंद गुरख्यासमोर छाती उघडी करून 'चलाव तेरी गोली' असे म्हणाले, हिंदू मुसलमानांचे रक्त सांडले. हिंदूच्या प्रेतास मुसलमानांनी खांदे दिले. मुसलमानांच्या हिंदूंनी. मशिदीतून स्वामी श्रद्धानंदांनी प्रवचने दिली.

पंजाबात ओड्वायर गव्हर्नर होता. त्याने धरपकड सुरू केली. पंजाबला राष्ट्रीय विचारांचा वारा लागू नये अशी त्याची इच्छा होती. महायुद्धाच्या वेळेस रिक्रूटभरतीसाठी पंजाबभर जुलूम झाले होते. लोकांमध्ये असंतोष होता. या असंतोषात सत्याग्रहाची ठिणगी पडू नये म्हणून पंजाबी सरकार जपत होते. डॉ. किचलू, डॉ. सत्यपाल वगैरेंस अटक झाली. महात्माजी मुंबईहून पंजाबकडे जायला निघाले, परंतु त्यांना वाटेतच अटक करून पुन्हा मुंबईस आणून सोडण्यात आले. देशभर वार्ता अशी पसरली की, महात्माजींना अटक झाली आणि देशभर वादळ झाले. अहमदाबादला होळ्या पेटल्या. कलकत्ता संतापले. पंजाबात तेच प्रकार. अमृतसर येथे जालियनवाला बागेत प्रचंड सभा भरली होती. सरकारचा निषेध करण्यासाठी ही सभा होती; परंतु जनरल डायरने सभेवर गोळीबार केले. गोळ्या संपेपर्यंत मारा केला. विमानेही आली. काही ठिकाणी बाँबफेकही झाली आणि लष्करी कायदा सुरू केला. जालियनवाला बागेत शेकडो निरपराधी जीव मेले. स्त्रिया, पुरुष, मुले यांची ती क्रूर कत्तल होती आणि लोकांना रस्त्यांवरून फटके मारले. पोटावर सरपटत जायला लावले. विद्यार्थ्यांना उन्हातून अनेक मैल चालविले. हिंदी राष्ट्राच्या विटंबनेस सीमा नव्हती आणि या डायरची इंग्लंडमधील लॉर्डच्या सभेत पाठ थोपटण्यात आली. त्याची नोकरी गेली म्हणून त्याच्यासाठी फंड उभारण्यात आले. याहून अपमान तो कोणता ?

दाखल
किंमत पाने

हंटर कमिटी व काँग्रेस चौकशी कमिटी

सरकारने या हत्याकांडाची व एकंदर लष्करी कायद्याखाली झालेल्या अत्याचाराची चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली. हंटरसाहेब तिचे प्रमुख असल्यामुळे तिला हंटर कमिटी म्हणतात. काँग्रेसनेही चौकशी करण्यासाठी एक कमिटी नेमली. त्या कमिटीत महात्मा गांधी होते. चित्तरंजनांचीही तिच्यावर नेमणूक करण्यात आली. त्यांची प्रकृती त्या वेळेस बरी नव्हती. तरीही चार महिने या कमिटीचे काम त्यांनी केले. काँग्रेसने भला मोठा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल पुढे सरकारजमा करण्यात आला. हंटर कमिटीने सारी सारवासारवच केली.

अमृतसरची काँग्रेस

१९१९ सालची काँग्रेस अमृतसर येथेच भरली. जेथे शेकडोंचे बलिदान झाले, जे शहर अग्निदिव्यातून गेले तेथेच सारे राष्ट्रसेवक जमा झाले. लष्करी कोर्टाने ज्यांना वाटेल तशा शिक्षा फर्मावल्या होत्या, त्यातील पुष्कळांची मुक्तता झाली. दुःखात थोडे सुख आले आणि हिंदुस्थानला कोणत्या सुधारणा द्यायच्या त्याही याच वेळेस जाहीर करण्यात आल्या. अमृतसरला महात्मा गांधी, लोकमान्य, चित्तरंजन, डॉ. ॲनी बेझंट, पंडित मोतीलाल नेहरू अशी थोर थोर मंडळी होती. चर्चा चालल्या. सुधारणासंबंधीचा मुख्य ठराव या काँग्रेसमध्ये चित्तरंजनांनीच मांडला. लोकमान्यांनी चित्तरंजनांकडे नेतृत्व दिले. चित्तरंजन देशाच्या राजकारणात पुढे येऊ लागले. ते हळूहळू अखिल हिंदुस्थानचे पुढारी होऊ लागले.

कलकत्त्याची खास काँग्रेस

देशात अशांतता होती. पंजाबमधील अन्याय सरकारने दूर केला नव्हता. रौलेट कायदा रद्द करण्यात आला नव्हता आणि महायुद्धात तुर्कस्तानसाठी म्हणून हिंदी मुसलमानांना दिलेली अभिवचने तहाच्या वेळेस खुशाल मोडण्यात आली होती. त्यामुळे सारे हिंदूमुसलमान एक झाले. महात्माजींनी या सरकारवर संपूर्णपणे बहिष्कार घालावा असे राष्ट्राला सुचविले. त्याचा विचार करण्यासाठी म्हणून कलकत्त्यास काँग्रेसचे खास अधिवेशन करण्याचे ठरले. याच वेळेस लोकमान्य देवाघरी गेले. एक ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्यांनी देह ठेवला. जणू महात्माजींच्या हाती राष्ट्र देऊन ते गेले आणि पुढे ४ सप्टेंबरला लालाजींच्या अध्यक्षतेखाली कलकत्त्यास जादा अधिवेशन झाले. महात्माजींचा संपूर्ण बहिष्काराचा ठराव मंजूर झाला.

कोर्टावरील बहिष्कार व शाळा कॉलेजांवरील बहिष्कार याला चित्तरंजनांचा विरोध होता. सरकार धरपकडी करते. खटले भरते. कोर्टे मोकळी असावीत. तसेच हजारो लहानमोठ्या विद्यार्थ्यांचे काय करावयाचे ? परंतु सर्व राष्ट्राचा जेव्हा संप असतो तेव्हा या गोष्टीचा विचार करायचा नसतो. एक प्रचंड सामुदायिक प्रयोग होता. तो महान राष्ट्रीय प्रयत्न होता. त्यात सर्वांनी सामील होणे जरूर होते आणि अशा वेळेस तरुणांना नाही हाक मारायची तर कोणाला ?

नागपूरची काँग्रेस

कलकत्त्याच्या जादा अधिवेशनानंतर महात्माजी देशभर विजेसारखे हिंडू फिरू लागले. त्यांचे लेख रामबाणाप्रमाणे हृदयात घुसत होते. नव हिंदुस्थान निर्माण केला जात होता. नि:शस्त्र जनतेला महात्माजी असहकाराचे अहिंसक शस्त्र देऊ पाहात होते. राष्ट्राची मान उंच होणार होती. चित्तरंजन नागपूर येथे १९२० च्या डिसेंबरमध्ये भरणाऱ्या काँग्रेसला निघाले. महात्माजींच्या ठरावाला विरोध करण्यासाठी म्हणून ते आले. बरोबर शेकडो प्रतिनिधी ते घेऊन आले होते; परंतु काय चमत्कार! महात्माजींनी चित्तरंजनांना जिंकून घेतले. पंडित मोतीलाल नेहरू आधीच मिळाले होते आणि आता हा बंगालचा महान् नेताही मिळाला. विरोध करायला आलेल्या चित्तरंजनांनीच काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनात महात्माजींचा तो असहकाराचा ठराव मांडला. जीवनात क्रांतीची वेळ आली.

चित्तरंजन बोलतो तसा वागतो

आणि ठराव मांडून त्यावर चित्तरंजन बोलत होते. ती मेघगंभीर भावनोत्कट वाणी सुरू होती; परंतु सभेतील कोणी एकाने विचारले, 'कोर्टावर बहिष्कार, वकिलांनी वकिल्या सोडव्या, परंतु तुमचे काय ?' विजेप्रमाणे एकदम चित्तरंजन भीष्मवाणी बोलले, 'चित्तरंजन बोलतो तसा वागतो.' त्या उदात्त व निश्चित शब्दांचा जादूसारखा परिणाम झाला आणि दुसऱ्या दिवशीच चित्तरंजनांनी वकिली सोडल्याचे वर्तमानपत्रांनी सर्व जगाला कळविले. सारे जग चकित झाले.

बंगालभर प्रचार

पन्नास हजारांची महिन्याची मिळकत ! परंतु एका क्षणात चित्तरंजनांनी त्याचा त्याग केला. त्याग करणे त्यांना जड नसे जात. त्याग हा त्यांचा स्वभाव होता. त्या त्यागाने सारे दिपले. त्या त्यागाने राष्ट्राला स्फूर्ती दिली. भावनामय बंगालचे नवे

तरुण चित्तरंजनांचा शब्द झेलण्यासाठी उभे राहिले. महात्माजींनी याच्या आधी कलकत्त्याच्या एका विद्यार्थ्यांच्या सभेत म्हटले होते, 'तुम्ही चित्तरंजनांच्या नेतृत्वाची वाट पाहात आहात, त्यांचे नेतृत्व लवकरच तुम्हाला मिळेल. तो काळ दूर नाही. देशाची हाक येताच सर्वस्वाचा त्याग करण्यासाठी ते धावून येतील, अशी मला आशा आहे.' आणि ती आशा पुरी झाली.

'पाडा हे विद्यापीठ'

चित्तरंजन नागपुराहून आले आणि कलकत्त्यास विद्यार्थ्यांच्या प्रचंड सभा होऊ लागल्या. तेथील विद्यापीठासमोर चित्तरंजनांचे भाषण झाले.

'हे विद्यापीठ का तुम्हाला मोह पाडते ? मोह झुगारा. हे विद्यापीठ देशासाठी जाऊ नका असे म्हणत असेल तर या विद्यापीठाच्या इमारतीची एकेक वीट उखडून ती इमारत जमीनदोस्त करा. देशाचे स्वातंत्र्य हाक मारीत आहे. कधी असे क्षण येतात की, ज्या वेळेस सर्वांनी त्याग करावयाचा असतो. सरकारी नोकरशाहीचे आसुरी तंत्र बंद पाडायचे आहे. या सरकारला कोणीही सहकार देता कामा नये. असहकाराचा मार्ग हा त्यागाचा आहे, क्लेशाचा आहे. तुम्ही तुमच्या भविष्यकाळावर पाणी सोडा. या नोकरशाहीला नष्ट करण्यासाठी, स्वराज्य स्थापण्यासाठी हा त्याग करा. स्वत:चे कर्तव्य स्वत:लाच न कळले तर दुसऱ्याला आपण कशी जागृती देणार? म्हणून उठा. जागे व्हा, जागे व्हा, जागे व्हा ! कर्तव्याचे स्मरण करा आणि स्वातंत्र्याच्या मार्गावर हिमतीने, दृढ निश्चयाने व निर्भयतेने उभे राहा.'

असा सर्वत्र संदेश देत चित्तरंजन निघाले, परंतु मैमनसिंगच्या मॅजिस्ट्रेटने तेथे येण्यास बंदी केली. तेथील विद्यार्थ्यांची, जनतेची निराशा झाली. चित्तरंजनांनी पुढील तेजस्वी संदेश पाठविला.

'आपल्याच देशात आपणास पशूप्रमाणे समजण्यात येते. स्वराज्याशिवाय जीवन असह्य आहे.'

आणि दुसऱ्या एका गावी गेले. तेथे प्रचंड सभा. तेथे वजीद अली म्हणून मोठे जमीनदार होते. ते उदार होते. एक राष्ट्रीय शाळा त्यांनी सुरू केली होती. त्यांच्याच खटपटीने ती प्रचंड सभा भरली होती. चित्तरंजन गावे व शहरे घेत पुढे सिल्हटला गेले. तेथे खिलाफत परिषदेचे ते अध्यक्ष होते. ते म्हणाले,

'नव्या युगाचा हा आरंभ आहे. सर्वांचे ऐक्य होत आहे. सर्व जातिजमातींच्या ऐक्याचा उष:काल आहे. हे ऐक्य कायमचे राहिले पाहिजे. स्वराज्याच्या सिद्धीसाठी सारे एक व्हा. स्वराज्याशिवाय तरणोपाय नाही. आपल्या स्वत:च्या घरात आपणास कोल्ह्याकुत्र्याप्रमाणे वागवण्यात येत आहे. न्यायाचा पत्ता नाही. खायला अन्न नाही. अंगभर कपडा नाही. मुलाबाळांची आबाळ होत आहे. स्त्रियांचा अपमान होत आहे. किडामुंगीप्रमाणे खुशाल आपले प्राण घेण्यात येत आहेत. जालियनवाला बागा होत आहेत. ही सारी स्थिती बदलावयाची असेल तर स्वराज्य मिळविले पाहिजे. केवळ हिंदूंनाच नाही, केवळ मुसलमानांनाच नाही तर सर्वांना या स्वराज्याची जरूर आहे. ज्याला ज्याला म्हणून प्रामाणिकपणे जगायचे आहे, माणसाप्रमाणे जगायचे आहे. त्या सर्वांना जरूर आहे.

कोमिल्ल्याची मध्यरात्रीची सभा

आणि त्या दिवशी रात्री चित्तरंजन कोमिल्ल्यास येणार होते. पूर्व बंगालमध्ये कोमिल्ला म्हणजे देशभक्तीचे आगर. उल्हासकर दत्त हा थोर क्रांतिकारक कोमिल्ल्याचाच. कोमिल्ला शहराने जितके देशभक्त दिले तितके क्वचितच एखाद्या शहराने दिले असतील. दोन दिवसांनी इंटरमिजिएटची परीक्षा सुरू व्हायची होती. ती बंद पडावी म्हणून चित्तरंजन येणार होते. रात्री तुफान सभा भरली, परंतु चित्तरंजनांचा पत्ता नाही. नऊ वाजले, दहा वाजले, अकरा वाजले आणि बारा वाजायची वेळ आली. सभा वाट पाहात होती आणि इतक्यात चित्तरंजन आले. वंदे मातरमचा घोष शांत आकाशात दुमदुमला. सर्वांची तोंडे फुलली. चित्तरंजन थकले होते; परंतु तो उत्साह पाहून त्यांच्या भावना उचंबळून आल्या. ते उभे राहिले आणि तेच तेच शब्द पुन्हा पुन्हा उच्चारीत.

'एवढ्या मध्यरात्री मी का आलो ? बोला का आलो ? का आलो सांगा. मी का पागल आहे ? का आलो माहीत आहे ?'

ते का आलो, का आलो शब्द श्रोत्यांच्या हृदयाचा जास्त ठाव घेत. त्या व्याख्यानाचा अपार परिणाम झाला. बहुतेक विद्यार्थ्यांनी परीक्षेवर बहिष्कार घातला. बंगालमध्ये शेकडो विद्यार्थ्यांनी शाळा, कॉलेजे सोडली. एक प्रकारची स्फूर्ती सर्वत्र संचारली होती.

नवे महान संकल्प

काँग्रेस कार्यकारिणी समिती १९२१ च्या एप्रिलमध्ये बेझवाडा येथे भरली आणि एक कोटी टिळक फंड, एक कोटी काँग्रेसचे सभासद, वीस लाख चरखे सुरू करणे असा कार्यक्रम राष्ट्रास देण्यात आला. पुढारी आपापल्या प्रांतात रात्रंदिवस खटपट करू लागले. क्षणाची विश्रांती नाही. चित्तरंजनांची वाणी बंगालला चेतवणी देत होती.

कर्तव्यासाठी प्राण हाती घेऊन उभे

कामाची अशी धुमश्चक्री सुरू असतानाच आसाममधील चहाच्या मळ्यातील मजुरांची केविलवाणी हाक चित्तरंजनांच्या कानावर आली. मजूर त्रस्त झाले होते. त्यांना कोणीच दाद देईना. त्यांनी संप केला. परंतु उपयोग नाही. शेवटी हजारो मजूर आपल्या गावांना परत जाण्यासाठी निघाले. पोटात अन्न नाही, अंगावर वस्त्र नाही अशा कंगाल कामगारांचे ते प्रस्थान होते. हजारो कामगार करीमगंज येथे आले. तेथील लोकांनी त्यांना खायला प्यायला दिले, परंतु रेल्वेचे अधिकारी तिकिटेच देत ना. तिकीट दिले नाही म्हणजे हे कामगार पुन्हा मळ्यात कामावर जातील असे सरकारी अधिकाऱ्यांस वाटत होते. नागरिकांनी बॅ. सेनगुप्त यांना तार केली. सेनगुप्त रेल्वे अधिकाऱ्यास भेटले. तिकिटे मिळाली. हे कामगार चांदपूर येथे आले. परंतु तेथे त्यांची कोण व्यवस्था करणार ? तेथून बोटीने जावयाचे ! कसे एकदम सारे होणार ? सरकारने या भुके-कंगाल कामगारांची काही व्यवस्था केली पाहिजे होती. बोटीने सारे जाईपर्यंत त्यांच्या राहण्याची, खाण्याची तजवीज केली पाहिजे. परंतु या कामगारांना, त्यांच्या स्त्रियांना, मुलाबाळांना भाकर देण्याऐवजी गुरख्यांची पलटण त्यांच्या अंगावर सोडण्यात आली आणि या गुरख्यांनी गोळीबार केले ! निर्दोष रक्त सांडले गेले. सारा बंगाल हळहळला. संतापला. चित्तरंजन चांदपूरला जायला निघाले; परंतु जायचे कसे ? रेल्वेच्या कामगारांनी संप केला होता. रेल्वे चालू नव्हती. पद्मा नदीतून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. परंतु पद्मेला प्रचंड पूर आला होता. तिच्या प्रवाहात नाव कोण टाकणार? पद्मा म्हणजे सर्वनाशी. हत्तीसारख्या लाटा उठत होत्या. वारा घों करीत होता. मित्र म्हणाले, 'चित्तरंजन, जीव धोक्यात नका घालू.' चित्तरंजन म्हणाले, 'कर्तव्य करीत असता मरण येणे याहून धन्यतर काय ?' शेवटी ते निघाले. त्यांच्याबरोबर कोण होते ? कोणते मित्र होते ? फक्त वासंतीदेवी बरोबर होत्या.

पतीच्या पाठोपाठ सावित्रीप्रमाणे जाणारी ती थोर सती बरोबर होती. नाव निघाली. एकदा तर नाव गडप होणार असे वाटले, परंतु स्वत:च्या जगण्याचा विचार त्यांच्या मनात नव्हता. त्या गरीब कामगारांच्या लाचारीचा प्रश्न त्यांच्यासमोर होता. स्वत:ची चिंता नव्हती. दु:खितांची चिंता होती आणि शेवटी ते सुखरूप आले. कामगारांना भेटले. प्रांतिक काँग्रेसच्या वतीने पाच हजार रुपये त्यांनी आधीच पाठविले होते. आता समक्षच ते आले. बोटीची त्यांनी व्यवस्था केली. ते घरोघर नीट जातील अशी व्यवस्था करून चित्तरंजन कलकत्त्यास परत आले. कर्तव्याचा थोर आनंद त्या वेळेस त्यांच्या मुखावर झळकत होता.

राजपुत्राच्या स्वागतावर बहिष्कार

असहकाराच्या कार्यक्रमाचा धूमधडाका चालला होता. विदेशी कापडाच्या प्रचंड होळ्या सर्वत्र होत होत्या. स्वदेशी घरोघर जात होती. चरख्यांचे नवजीवन देणारे गुंगू सुरू होत होते. स्वयंसेवक दले सुरू होती. तिकडे मँचेस्टर ओरडू लागले. हिंदुस्थानला संतुष्ट करण्यासाठी राजपुत्र इकडे येणार असे घोषविण्यात आले. परंतु राजपुत्र येऊन काय करणार ? स्वराज्य देणार आहेत का ? हा अपमानित हिंदुस्थान राजपुत्राचे स्वागत कसे करणार ? काँग्रेसने स्वागतावर बहिष्कार घालण्याचे ठरविले. राजपुत्र जेथे जेथे जाईल तेथे हरताळ पाळला जावा, जनतेने स्वतंत्र अशी प्रचंड सभा त्या दिवशी घ्यावी अशा सूचना काँग्रेसने दिल्या. सरकारने स्वयंसेवकदले बेकायदा ठरविली. काँग्रेसने सर्वांना स्वयंसेवक म्हणून नावे नोंदवा अशी आज्ञा केली. परकीय सत्ता व काँग्रेस यांचा असा हा तेजस्वी सामना सुरू झाला.

घरच्यांची तुरुंगात रवानगी

चित्तरंजनांनी कलकत्त्यात स्वागतावरील बहिष्काराचा, तसेच परदेशी मालावरील बहिष्काराचा प्रचार धूमधडाक्याने सुरू केला होता; परंतु प्रत्यक्ष कायदेभंगास त्यांनी सुरुवात केली आणि ती आपल्या घरातून केली. स्वयंसेवक दले बहिष्कृत होती; परंतु काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून हातात झेंडा देऊन स्वत:चा एकुलता मुलगा चिररंजन याला त्यांनी बहिष्काराचा प्रचार करायला, 'स्वागतावर बहिष्कार घाला, परदेशी कापड जाळा' अशा घोषणा करायला पाठविले. चिररंजनास सहा महिन्यांची शिक्षा झाली. अनेक स्वयंसेवकांस सजा झाल्या. लाठीमारही झाले. चित्तरंजनांनी या सर्व तरुणांस उद्देशून पुढील पत्रक काढले.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
नगर वाचनालय, सातारा.

'जे सहन करीत आहेत, सहन करावे लागले, सहन करण्यासाठी जे तयार आहेत, त्यांना मी अधिक काय सांगू? स्वातंत्र्यासाठी असे करावे लागते, सहन करावे लागते, असे सांगण्याची काय जरूरी ? परंतु एका फारसी कवीने दिलेला संदेश मी तुम्हाला देतो :

'निराशेच्या वेळेस, कसोटीच्या प्रसंगी तुझी श्रध्दा, तुझे धैर्य टिकतील की खुंटतील ? का कसोटीच्या वेळेस अग्निदिव्यातून जाऊन तावून सुलाखून अधिकच उज्ज्वल, प्रबळ, उन्नत व तेजस्वी होऊन बाहेर पडशील?' कवीने विचारले.

'डोक्यावर आकाश कोसळले तरी मी हार जाणार नाही, हिंमत सोडणार नाही, श्रद्धा सोडणार नाही.' तरुणाने उत्तर दिले.

'शाबास! तुझा मार्ग प्रकाशाचा व विजयाचा आहे. जा पुढे. तुझा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. जनता तुझी ऋणी राहील. तुझ्या मस्तकावर शाश्वत विजय राहील. हे तरुणा, तुझी निर्भयता, तुझी दृढता सर्वांत येवो. सारे संजीव होवोत. चैतन्यमय होवोत. जे निर्भय असतात तेच जीवनसंग्रामात विजयी होतात. तेच आत्म्याचे स्वातंत्र्य मिळवितात आणि आत्मस्वातंत्र्याहून दुसरे अधिक मौल्यवान असे काय आहे ? आत्मस्वातंत्र्याहून अधिक किमतीचे असे बक्षीस कोणते? हे प्रभो, प्रेम आणि प्रकाश यांनी भरलेल्या या जगाला निर्भयतेची देणगी देण्याची कृपा कर.'

असा हा संदेश चित्तरंजनांनी दिला.

पुत्राच्या अटकेनंतर दुसऱ्या दिवशी वासंतीदेवी हातात झेंडा घेऊन निघाल्या. चित्तरंजनांची बहीण ऊर्मिलादेवी हीही निघाली. सुनितीदेवीही निघाल्या. घोषणा करीत त्या चालल्या. त्यांनाही अटक झाली. चित्तरंजन आनंदले होते. घरी एका खुर्चीत शांतपणे बसले होते. इतक्यात बॅरिस्टर विजयकुमार तेथे आले. ते म्हणाले, 'मी गव्हर्नरच्या सेक्रेटरीस भेटलो. हिंदी स्त्रियांचा अपमान कराल तर ब्रिटिश साम्राज्याचा सत्यानाश होईल असे त्याला सांगितले. त्याने लगेच पोलीस कमिशनरला चिठ्ठी दिली आहे. वासंतीदेवी लवकरच मुक्त होऊन येतील.'

चित्तरंजन म्हणाले, 'विजय, हे कशाला केलेस ? जाणूनबुजून वासंतीने तुरुंग पत्करला होता. हे पाऊल टाकले होते.'

'वासंती माझी बहीण. तिच्या डोक्यावर लाठी पडली तर? ते का मी सहन करू?'

‘विजय, वासंती तुझी बहीण म्हणून तू हे सारे केलेस. दुसऱ्या एखाद्या स्त्रीवर सरकारी हात पडता तर तू एवढी खटपट केली असतीस का?’

विजयने खाली मान घातली.

सतीचा संदेश

वीरपत्नी वासंतीदेवीने पुढील संदेश झेंडा घेऊन निघताना दिला होता :

‘आम्हाला पकडण्यात येईल या तयारीनेच आम्ही निघत आहोत. आपली मुले स्वातंत्र्यासाठी तुरुंगात जात असता आपण का घरी राहायचे? मुलांच्या पाठोपाठ माता. घरी राहणे सहन होत नाही. तरुण तुरुंगात गेल्यावर त्यांचे अपुरे राहिलेले काम पुरे करण्यासाठी मातांनी बाहेर पडले पाहिजे. हे बाहेरचे जीवन म्हणजे एक मोठा तुरुंगच आहे. गुलामीची घाणेरडी हवा खात बाहेर राहण्यापेक्षा तुरुंगात राहणे अधिक मानाचे आहे. सरकारी संस्थांतील विद्यार्थ्यांनी बाहेर पडावे. मरण येवो वा विजय मिळो. दोन्ही कीर्तीकरच आहेत ! परंतु मरण किंवा स्वतंत्र होऊन जगणे याहून तिसरा मार्ग कोणता ? ही गुलामी तर नाहीच राहता कामा.’

आपल्या आयाबहिणी झेंडा हाती घेऊन बाहेर पडतात आणि आपण का घरी बसायचे? शाळाकॉलेजात जावयाचे ? विद्यार्थी खडबडून जागे झाले. स्वयंसेवक होऊ लागले. तुरुंगात जाऊ लागले. चित्तरंजनांचे हृदय नाचू लागले. त्यांनी पुढील पत्रक प्रसिध्द केले.

‘स्वराज्य मिळवू पाहणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याने तीन प्रकारचे भय सोडले पाहिजे. जेलचे भय, लाठीमारीचे भय आणि छातीवर गोळ्या झेलण्याचे भय. जेलची भीती तर गेली. लाठीमारीचेही भय जात चालले आहे. आता गोळीबाराचे भय कधी जाईल ते सरकारवर अवलंबून आहे. परंतु आमच्या लोकांना मी आठवण देऊन ठेवतो की, आपला मार्ग अहिंसेचा आहे. आपण अहिंसा इतकी पाळूया की प्रत्येक पापभीरू व परमेश्वर मानणारी व्यक्ती आपल्याच बाजूला येईल.

बंगालच्या गव्हर्नरांनी चित्तरंजनांस भेटीसाठी बोलाविले. राजपुत्राचे स्वागत नीट व्हावे, त्या वेळेस गडबड नको अशी सरकारची इच्छा होती. चित्तरंजन भेटीसाठी गेले. परंतु वाटाघाटीत काहीही निष्पन्न झाले नाही. सरकारही दडपशाहीसाठी दुप्पट जोराने तयार झाले. देशभर पुढारी व स्वयंसेवक यांची धरपकड सुरू झाली. लाला लजपतराय, मोतीलाल नेहरू वगैरेंना अटक झाली. हिंदुस्थानभर जवळजवळ वीस हजार लोक तुरुंगात गेले आणि चित्तरंजन ?

एक वर्षाची शिक्षा

डिसेंबर १९२१ ची १० वी तारीख होती. अहमदाबाद येथे काँग्रेस भरणार होती. चित्तरंजन अध्यक्ष ठरले. राष्ट्राने महान् मान त्यांना देऊ केला. चित्तरंजन आपले अध्यक्षीय भाषण लिहीत होते. ते तयार झाले. परंतु सरकार निराळ्याच रीतीने त्यांचा सन्मान करण्याच्या तयारीत होते. २४ डिसेंबरला राजपुत्र कलकत्त्यास येणार होता. त्याच्या आधीच चित्तरंजनांस दूर करण्याची सरकारला जरूरी वाटली आणि १० डिसेंबरला सायंकाळी साडेचार वाजता चित्तरंजन यांना कैद करण्यात आले. चित्तरंजनांनी जाताना संदेश दिला :

'हिंदी बंधुभगिनींनो, आजचा हा माझा शेवटचा संदेश आहे. विजय दिसत आहे. कष्ट व हाल थोडे अधिक सहन कराल तर विजयाच्या जवळ जाल. अशा वेदनांतूनच राष्ट्राचा जन्म होत असतो. या वेदना पूर्ण शांतीने, धैर्याने व निर्भयतेने सहन करा. तुम्ही जोपर्यंत खरोखर अहिंसक राहाल तोपर्यंत सरकारचा पक्ष सदैव खोटाच राहणार. महात्माजींनी दाखविलेल्या मार्गापासून तूसभरही पदच्युत व्हाल तर नोकरशाहीचा विजय होईल. स्वराज्य हे आपले ध्येय आहे. स्वराज्याचे हप्ते नकोत. तुकडे नकोत. सारे संपूर्ण स्वराज्य आम्हाला पाहिजे आहे. आपले ध्येय आपण प्राप्त करून घेणार की नाही हे भारतीय नरनारींनो, तुम्हीच सांगू शकाल.

नेमस्त बंधूंनो, तुम्ही ज्या मार्गाने जाऊ पाहात आहात त्या मार्गाने कधीही कोणाला स्वातंत्र्य मिळाले नाही. साऱ्या जगाचा इतिहास पाहा. हा इतिहास तुम्हाला हेच सांगेल. तुम्ही नोकरशाहीच्या बाजूने उभे राहणार की देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांच्या बाजूने येणार ? लहानसहान गोष्टीत तडजोड होऊ शकते; परंतु जो प्रश्न आपल्याला व या नोकरशाहीला अलग राखीत आहे त्या प्रश्नाचे बाबतीत तडजोड कशी होणार ? तुम्ही हिंदुस्थानचे कैवारी नसाल तर तुम्ही लोकशाहीच्या बाजूचे आहात.

विद्यार्थ्यांनो, तुम्ही हिंदुस्थानची भावी आशा आहात. अंकगणित किंवा अक्षरज्ञान यात खरे शिक्षण नाही. आपली सर्वांची एकच माता, जी भारतमाता, तिची सेवा करण्यात खरे शिक्षण आहे. मातेचे काम करण्याची ही वेळ आहे. माता हाक मारीत आहे. तुमच्यापैकी कोण त्या हाकेला उत्तर देणार ?'

असा संदेश देऊन चित्तरंजन तुरुंगात गेले. त्यांचा खटला चालून एक वर्षाची त्यांना साधी सजा देण्यात आली.

तुरुंगात

चित्तरंजन तुरुंगात देशाचीच चिंता रात्रंदिवस करीत. काही ठिकाणी स्वयंसेवकांस फटके मारण्यात आले. चित्तरंजनांच्या हृदयाची तगमग होई; परंतु राजपुत्र आले त्या दिवशी कलकत्त्यास कडकडीत हरताळ होता. रस्त्यातून शुकशुकाट होता. ती वार्ता ऐकून चित्तरंजनांस समाधान झाले.

तिने हे सहन कसे केले ?

आणि बारिसाल येथे राजकीय परिषद होती. वासंतीदेवी तेथे अध्यक्ष होत्या. परंतु 'वंदे मातरम्' गाणे म्हणायला तेथील मॅजिस्ट्रेटने बंदी केली. चित्तरंजनांच्या कानावर ही गोष्ट आली. ते क्रोधाने थरथरत होते. 'वंदे मातरम्ला बंदी ? राष्ट्रीय गीताला बंदी ? आणि वासंतीने हे सहन कसे केले ? कसे केले तिने सहन ?' असे म्हणत वाघाप्रमाणे, सिंहाप्रमाणे ते फेऱ्या घालीत होते. अति प्रक्षुब्ध ते झाले होते आणि वासंतीदेवी भेटायला आल्या. ते गुरगुरले. परंतु वासंतीदेवी म्हणाल्या, 'ती बंदी मागून काढून घेण्यात आली होती. आम्ही तो अपमान सहन केला नसता. बंदी मोडून गाणे म्हटलेच असते. लाठीमार सहन केला असता. तुम्ही शांत व्हा.' चित्तरंजनांच्या आत्म्याला समाधान झाले.

बरोबरच्यास घरचे अन्न देत

चित्तरंजनांस घरच्या अन्नाचा डबा येई; परंतु तेथे अशक्त व आजारी असणाऱ्यास ते आपला डबा देत. आधी त्यांना खायला देऊन मग आपण खात. स्वत:पेक्षा इतरांची त्यांना काळजी. म्हणून तर त्यांचा शब्द झेलला जाई.

देशातील स्थिती

बरोबरचे सहकारी तुरुंगात गेले. गांधीजी अद्याप बाहेर होते. अहमदाबादच्या काँग्रेसला चित्तरंजन येऊ शकले नाहीत. त्यांचे अध्यक्षीय भाषण वाचून दाखविण्यात आले. अधिवेशन झाले. महात्माजी बार्डोली तालुक्यात करबंदीची चळवळ करणार होते. सरकारला न मानण्याची चळवळ तेथे होणार होती. बार्डोलीकडे साऱ्या देशाचे डोळे लागले. परंतु तिकडे संयुक्त प्रांतात हिंसेचे प्रकार झाले. महात्माजींनी बार्डोलीची चळवळ बंद ठेवली. महात्माजींवर पुष्कळजण रागावले. राष्ट्राचा हा तेजोभंग आहे असे कोणी म्हणाले. परंतु महात्माजी अविचल राहिले आणि सरकारने आता महात्माजींसही अटक केली.

सहा वर्षांची त्यांना शिक्षा देण्यात आली. चळवळ थांबली. उत्साह ओसरला. देशात एक प्रकारची निराशा पुन्हा पसरली.

स्वराज्य पक्षाची स्थापना

सत्याग्रहाचा एक प्रयोग झाला. स्वातंत्र्याची प्राप्ती होईपर्यंत असे अनेक झगडे करावे लागतात. एक वर्षात स्वराज्य अशी महात्माजींची घोषणा होती. त्यांच्या सांगण्याप्रमाणे सारे राष्ट्र वागते तर एका आठवड्यातही स्वराज्य मिळाले असते. सर्व राष्ट्रीय संपाचा तो प्रयोग होता. नि:शस्त्र राष्ट्राला तो पहिला धडा होता. महात्माजी मोठमोठ्या गोष्टी शिकवित होते. तुटपुंज्या गोष्टी नकोत. लाखो चरखे सुरू करा. कोट्यवधी सभासद करा. कामाचे डोंगर आहेत. काम करायला या. अशी त्यांनी हाक मारली. सत्याग्रहाची लाट ओसरली; परंतु बाहेर पडलेले विद्यार्थी, वकिल्या सोडलेले वकील हे नवीन कायमचे सेवक राष्ट्राला मिळतील अशी आशा होती. त्यांच्यापैकी काहीजण तरी मिळतील. प्रांताप्रांतातून, जिल्ह्याजिल्ह्यातून अशी माणसे पुढे आली होती. त्यांच्यामार्फत सेवेच्या साधनाने सर्वत्र प्रचंड संघटना महात्माजी करू इच्छित होते आणि पुन्हा चळवळ, पुन्हा लढाई योग्य वेळ येताच करणार होते. परंतु महात्माजी तुरुंगात. बाहेर नवीन कार्यक्रम द्यायला कोणी नाही. विधायक कामाचा अद्याप अनुभव नाही. देशात स्तिमितता पसरली. अशा वेळेस प्रांतिक विधिमंडळातून घुसावे, तेथे सरकारचे पुन:पुन्हा पराजय करावे, दिलेल्या सुधारणा कशा पै किमतीच्या आहेत ते जगाला दाखवावे असे चित्तरंजनांना वाटले. विधिमंडळावरील बहिष्कार उठवावा, निवडणुका लढवाव्या, असे चित्तरंजनांना वाटले. ते आता सुटून बाहेर आले होते. ते विचार करू लागले. मोतीलाल नेहरू, लजपतराय वगैरेंना ते भेटले. गया काँग्रेसमध्ये हा नवीन कार्यक्रम त्यांनी मांडला. परंतु तो नामंजूर झाला. चित्तरंजन कचरले नाहीत. त्यांनी स्वतंत्र स्वराज्य पक्षाची स्थापना केली. मद्रास प्रांतात मोठा दौरा काढला. परंतु महात्माजींच्यावर शस्त्रक्रिया होऊन ते सुटले. विश्रांतीसाठी महात्माजी मुंबईजवळ जुहू येथे राहिले. त्यांना भेटायला चित्तरंजन आले. नेहरू आले. शेवटी महात्माजींनी तडजोड केली. काँग्रेसने स्वराज्य पक्षाच्या कार्यक्रमास मंजुरी दिली. काँग्रेसचे मुख्य लक्ष विधिमंडळाकडे नव्हते. मुख्य कार्यक्रम विधायक कार्याचा. परंतु ज्यांना विधिमंडळात जाऊन झगडायचे होते त्यांना काँग्रेसने

परवानगी दिली. महात्माजींनी ऐक्य साधले. ते स्वत: विधाय कार्याकडे, ठायी ठायी आश्रमांची जाळी पसरून त्यांच्या द्वारा जनता जागृत व संघटित करण्याकडे वळले.

विधिमंडळातील तेजस्वी कार्य

मोतीलाल नेहरू, लालाजी, विठ्ठलभाई पटेल इत्यादी थोर मंडळी दिल्लीच्या वरिष्ठ विधिमंडळात गेली. चित्तरंजन बंगाल प्रांतिक विधिमंडळात गेले. सरकारचा हमखास पराजय करण्याइतकी त्यांची शक्ती नव्हती; परंतु मुसलमानांचा पाठिंबा मिळविला. हिंदू-मुस्लीम करार त्यांनी केला. बंगालने हिंदुस्थानला शिकविले की, परकीय सत्ता दूर करायची असेल तर मुसलमानांस जवळ करा. त्यांच्या ज्या मागण्या रास्त असतील, देशहितास व देशैक्यास विघातक नसतील त्या द्या. मागतील त्याहून थोडे अधिक द्या. केवळ तराजू घेऊन नका बसू. आज बॅ. जिना हिंदुस्थानचे तुकडे करू पाहतात, असल्या मागण्या चित्तरंजन पुरे करते ना. परंतु देशाचे अखंडत्व राखून जितके करता येईल तितके करायला हरकत नाही. चित्तरंजनांनी ही गोष्ट केली. देशाचे खरे हित करू पाहणारा कोणीही थोर दृष्टीचा देशभक्त हेच करील. म्हणून लोकमान्यही कधी म्हणत. 'आधी इंग्रज जाऊ दे. मुसलमानांच्या हाती सत्ता आली तरी चालेल.' स्वातंत्र्य आले की भांडणे बंद होतील. सर्वांना सहकार्याने नांदता येईल. म्हणून स्वातंत्र्यावर आधी लक्ष हवे. काँग्रेस अशा थोर मार्गाने जात आहे. मुसलमान बंधूंजवळ करार करून चित्तरंजनांनी सरकारचे पुन:पुन्हा पराजय केले. अंदाजपत्रके नामंजूर केली. दिवाणांचा पगार तीन रुपये असे ठराव बहुमताने पास केले. परंतु गव्हर्नर जनतेचे मत धुडकावून आपल्या लेखणीने सारे मंजूर करून घेई. या सुधारणा म्हणजे सारा फार्स आहे. जनतेच्या प्रतिनिधींना खरी सत्ता कशी नाही, जगाला दिसून आले.

एकच प्रतिभावान पुरुष

देशबंधूंचा हा स्वराज्य पक्ष पाहून श्री. अरविंद घोष म्हणाले, 'काळवेळ पाहून कसे वागावे, परिस्थितीनुरूप कसे धोरण आखावे, हे ओळखण्याची व तदनुरूप वागण्याची प्रतिभा व धीरता एका देशबंधूंतच आहे. बंगालमध्ये असा दुसरा कोण आहे?'

त्यांना कसेही करून पाठवा

आणि एकदा चित्तरंजन आजारी होते. विधिमंडळात हजर होणे फार आवश्यक होते. वासंतीदेवींना पतीचा स्वभाव माहीत होता. हे गेल्याशिवाय राहणार नाहीत अशी त्यांची खात्री होती. वासंतीदेवी डॉक्टरास म्हणाल्या. 'गाडी करा, डोली करा; काही करा. परंतु यांना विधिमंडळात पाठवण्याची लवकर काही व्यवस्था करा. पृथ्वीवरची कोणतीही शक्ती यांनी एकदा निश्चय केला म्हणजे त्याला फिरवू शकणार नाही. तुम्ही दुसरी काही व्यवस्था न कराल तर हे पायी चालत जातील आणि त्याचा परिणाम तुमच्या माथी बसेल.' आणि आजारी देशबंधू विधिमंडळात गेले. सरकारची फजिती करते झाले. मुसलमान बंधूंस फोडण्यासाठी सरकार कशी कारवाई करीत होते, त्याचे काही कागदपत्रे चित्तरंजनांस मिळाले होते. त्यामुळे चित्तरंजन यांनी सरकारला खाली पाहायला लावले. 'जरूर तर तो पत्रव्यवहार मी येथे हजर करीन.' असे म्हणताच सरकारी दिवाणांचे चेहरे खर्रकन उतरले.

दहा लक्ष रुपयांचा फंड

चित्तरंजन केवळ विधिमंडळातच रमले होते असे नाही. खेडेगावांची स्थिति कशी सुधारेल, शेती कशी सुधारेल, बेकारांना उद्योग कसा मिळेल याचा ते सारखा विचार करीत होते. चरख्याचे महत्त्व त्यांना पटले होते. ग्रामसुधारणा व ग्रामोद्योग यांची त्यांना चिंता होती. या विधायक कामासाठी बंगाल प्रांतापुरता दहा लाख रुपये गोळा करण्याचा त्यांनी संकल्प केला आणि त्या कामाला ते लागले. स्वयंसेवक हिंडतच होते; परंतु ते स्वतः क्षणाचीही विश्रांती घेत नव्हते. सकाळी बाहेर पडत ते दोन वाजता घरी येत. पुन्हा थोडे खाऊन बाहेर पडत ते रात्री घरी येत. व्यापारी कारखानदार, दुकानदार सर्वांच्या समोर हा महापुरुष जाई व हात पसरी.

त्यागाची परमावधी

त्यांनी आपली वकिली कधीच सोडली होती. एकदा एका महत्त्वाच्या खटल्यात गुंतलेले काही लोक चित्तरंजनांकडे आले व म्हणाले, 'दहा लाख रुपये आम्ही तुमच्या फंडाला देतो; परंतु आमचे वकील व्हा.' चित्तरंजनांनी नको म्हटले. जे सोडले ते सोडले. परंतु अद्याप त्यांचे मोठे घर होते. एके दिवशी ते घरही त्यांनी देशासाठी दिले. ते फकीर झाले. त्यागाच्या जणू लाटा त्यांच्या हृदयात उसळत होत्या. बंगाली जनता हा निस्सीम त्याग पाहून गहिवरली. चित्तरंजन यांना कोणत्या

विशेषणाने गौरवावे ते वर्तमानपत्रकारांना समजेना. शेवटी एका वर्तमानपत्राने 'देशबंधू' हे विशेषण त्यांना लावले. ते विशेषण सर्वांना आवडले. चित्तरंजन देशबंधू झाले.

प्रकृती बिघडली

अपरंपार श्रम पडत होते. स्वराज्य पक्षाचे ते प्राण होते. विधिमंडळातील काम पाहावयाचे. टीकाकारांना उत्तरे द्यायची. विधायक कार्याची योजना करायची. फंड जमवायचा. त्यांचे शरीर थकत चालले; परंतु अधिकाधिक काम येतच होते. कलकत्ता कार्पोरेशनचे ते मेयर झाले. म्युन्सिपालिटीच्या कामात लक्ष घालू लागले. शुद्ध दूध कसे मिळेल, गरिबांसाठी चाळी कशा बांधता येतील, शिक्षण मोफत व सक्तीचे करणे, कितीतरी प्रश्न त्यांच्या डोळ्यांसमोर होते. स्वतःच्या मतप्रचारासाठी 'फॉर्वर्ड' हे वर्तमानपत्रही त्यांनी सुरू केले. या कामाच्या बोजाखाली प्रकृती बिघडत चालली तरी ते काम करीतच राहिले.

सरकार

विधिमंडळात होणारे पराजय सरकारला झोंबले. देशबंधूंची शक्ती कशात होती ? देशबंधूंच्या भोवती शेकडो तरुण कार्यकर्ते होते. श्री. सुभाषचंद बोस आय. सी. एस. होऊन आलेले. परंतु असहकाराच्या त्या काळात कोणता ध्येयार्थी तरुण नोकरीकडे वळणार ? सुभाषचंद्र देशासाठी धावून आले. अलौकिक बुद्धी, संघटनापटुत्व, त्यागाची हौस, रुबाबदार व तेजस्वी मूर्ती असे ते तरुण सुभाषचंद्र होते. चित्तरंजनांचे ते उजवा हात बनले. कलकत्ता म्युन्सिपालिटीचे ते चीफ ऑफिसर नेमले गेले. देशबंधूंचा हा वाढता व्याप, ही वाढती शक्ती सरकारला पाहवेना. देशबंधूंचे पंख तोडून टाकायला सरकार तयार झाले. सुभाषचंद्रांना बेमुदत अटक करण्यात आली. आणखीही अनेक तरुणांना गिरफदार करण्यात आले. दडपशाहीचा वरवंटा पुन्हा फिरू लागला.

हुतात्मा गोपीनाथ शहा

आणि तरुण गोपीनाथाने बॉंब फेकला. कोणी साहेब मेला. गोपीनाथ फासावर गेला. चित्तरंजनांना वाईट वाटले. तरुणांनी हा दहशतवाद सोडावा असे त्यांना वाटे. परंतु या तरुणांचा मार्ग चुकला तरी त्यांची धीरोदात्तता, त्यांचा त्याग यांचे कोण कौतुक करणार नाही? देशबंधूंनी गोपीनाथाचा मार्ग चुकला तरी त्याची त्यागवृत्ती सर्वांनी पूजावी, आपलीशी करावी असे लिहिले. देशबंधू का अहिंसावादी नव्हते ?

ते अहिंसावादीच होते. या देशाला दुसरा मार्ग नाही ही गोष्ट त्यांना पटत होती; परंतु तरुणांच्या त्यागाचा गौरव केल्याशिवाय त्यांना राहवेना.

महात्माजींविषयी परमभक्ती

देशबंधूंचे व महात्माजींचे मतभेद असत; परंतु अहिंसेच्या बाबतीत त्यांचे एकमत होते. विधायक कार्य, हिंदू-मुस्लीम ऐक्य या प्रश्नांवर एकमत होते. चित्तरंजनांनी दिलदारी दाखवून जो हिंदू-मुस्लीम पॅक्ट केला होता त्याबद्दल महात्माजींनी त्यांना धन्यवाद दिले होते. एकदा देशबंधूंचे एक मित्र महात्माजींविषयी वाटेल ते कटू बोलू लागले. देशबंधू त्याला म्हणाले, 'तू हे काय बोलतोस? कोणाविषयी बोलतेस? कोणासमोर बोलतोस ? जा. पुन्हा तुझे मी तोंड पाहणार नाही.' महात्माजींची निंदा करणाऱ्या त्या मित्राचा देशबंधूंनी कायमचा त्याग केला. कितीही मतभेद महात्माजींजवळ असले तरी ते राष्ट्राचे निर्माते होते. या हतपतित राष्ट्रात केवढा प्राण त्यांनी ओतला ! त्यांची का निंदा करावी, नालस्ती करावी? महाराष्ट्रातील निंदकांनी देशबंधूंची ही उदात्तता थोडी घ्यावी.

हे असे नेहमी होते

काँग्रेसच्या कार्यकारिणीची सभा असावी. देशबंधू ठरवून ठेवीत की आज महात्माजींना असे अडवायचे, असा युक्तिवाद करायचा. परंतु सभेचे काम सुरू होई. महात्माजी आपला कार्यक्रम मांडीत. गोड व शांत विचारसरणीने सर्वांच्या शंका फेडीत. रागावणे, रुसणे नाही. मध्येंच हसतील व विनोद करतील. आणि शेवटी स्वतःचा कार्यक्रम ते सर्वांकडून मंजूर करून घेत. सभेचे काम संपल्यावर देशबंधू म्हणायचे, 'नेहमी हे असे होते. आम्ही मारे ठरवितो; परंतु शेवटी महात्माजी जिंकून घेतात.'

वज्राप्रमाणे इच्छाशक्ती

बंगाल प्रांतिक सभेत देशबंधूंना हिंदू-मुस्लीम करार मंजूर करून घ्यायचा होता. प्रथम पुष्कळ विरोध होता. देशबंधू सर्वांचे शंका-समाधान करीत होते. कधी ते बुद्धिवाद करीत, कधी ते भावना उचंबळीत. रात्री एक वाजला तरी परिषदेचे काम चालले होते. शेवटी त्या करारास मंजुरी मिळाली. देशबंधूंचा जय झाला. त्यांच्या एका मित्राने त्यांना विचारले, 'तुमचा विजय होईल असे वाटत नव्हते. कशाच्या जोरावर तुम्ही जिंकलेत?' देशबंधू म्हणाले, 'इच्छाशक्तीच्या जोरावर. करारास मंजुरी

घेतल्याशिवाय मी उठलो नसतो.' देशबंधूंची इच्छाशक्ती अजिंक्य होती. जे एकदा ठरवीत, निश्चित करीत ते पुरे केल्याशिवाय ते सोडीत नसत. सारी शक्ती त्या कामी ते लावीत.

सहकार्याचा हात

प्रांतिक विधिमंडळात सरकारी सुधारणांचा डोलारा त्यांनी मोडून फेकून दिला. परंतु देशबंधू केवळ विध्वंसक टीका करणारे नव्हते. नवीन बांधण्यासाठी जुने पाडावे लागते. त्या क्षुद्र सुधारणा उडवून खरे स्वराज्य देता का असे ब्रिटिश साम्राज्य सरकारला त्यांनी विचारले. १९२५ च्या मेच्या पहिल्या तारखेस बंगाल प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष या नात्याने फरीदपूर येथे त्यांनी भाषण केले. त्यात सहकार्याचा हात त्यांनी पुढे केला होता. ब्रिटिश साम्राज्यात स्वतंत्र भाग म्हणून हिंदुस्थान राहील असे ते म्हणाले. मुत्सद्देगिरीचे ते भाषण होते. कळकळीचे ते भाषण होते. आशियातील राष्ट्रांचा संघ बनवावा ही कल्पनाही त्यात होती. त्या वेळेस बर्कनहेड हे स्टेट सेक्रेटरी होते. ते देशबंधूंच्या भाषणास काय उत्तर देतात ते पाहायचे होते. परंतु साम्राज्य सरकार ताठरच राहिले. सहकार्याचा हात झिडकारला गेला. सहकार्य नको असेल तर पुन्हा असहकाराचा प्रचंड लढा राष्ट्र करील असेही आव्हान देशबंधूंनी दिले होते. परंतु देशबंधूंना मृत्यूशी लढा करण्याची वेळ आली. फरीदपूरनंतर ते पुन्हा आजारी पडले. महापुरुष अंथरुणाला खिळला. अध्यात्मविचारात व प्रभुचिंतनात पडल्या पडल्या रंगला.

वैराग्य

देशबंधू वैभवाच्या शिखरावर होते; परंतु एकदम त्यांनी दारिद्र्याला मिठी मारली. ते पूर्वी मद्य घेत; परंतु त्याचा त्यांनी त्याग केला. ते मांसाहार करीत. त्याचाही त्यांनी त्याग केला. फक्त धूम्रपान त्यांना सोडवेना. ते आपल्या एका मित्राला म्हणाले, 'तू वकिली सोडीत असशील तर मला न सोडवणारी ही सिगारेटही मी सोडीन.'

देशसेवकाला गादी शोभत नाही

सत्याग्रही झाल्यावर देशबंधू घोंगडीवर निजू लागले. एकदा एका मित्राकडे ते उतरले होते. ते आपली पाठ चेपीत होते. मित्राने विचारले. 'पाठ दुखते का?'

'हो.' ते म्हणाले.

'कशाने दुखते ? तेल चोळू ? आयोडाइन लावू ? डॉक्टर बोलावू ? नेहमी का दुखते ? सांगा ना ?'

'काय सांगू ? या पाठीला गादीवर निजण्याची सवय आहे. हल्ली घोंगडीच असते. म्हणून ती दुखत आहे.'

'मग गादी घालू का ?'

'देशसेवकाला गादी शोभत नाही.' ते रागाने म्हणाले.

आणखी दोन घास खा

त्यांचे जेवण्यातही लक्ष नसे. परंतु वासंतीदेवी नेहमी जवळ असत. देशबंधूंनी कमी खाल्ले तर त्या म्हणायच्या, 'आणखी दोन घास खा.' अधिक खाऊ लागले तर वासंती देवी म्हणायच्या, 'पुरे हो आता.'

औदार्य

देशबंधूंच्या औदार्याच्या किती गोष्टी सांगाव्या ? किती गुप्त दाने, मूक दाने. बहिणीचा आश्रम नीट चालावा म्हणून दोन लाख रुपये त्यांनी दिले. परंतु ते दान कोणासही माहीत नव्हते. कधी कोणी त्यांच्याकडे उसनवार रक्कम मागायला येई. ते लगेच देत. एकदा वसुमती पत्राचे चालक एकदम चाळीस हजार रुपये मागायला आले. देशबंधूंनी व्यवस्था केली. एका अक्षरानेही काही विचारले नाही. कोणी आप्त म्हणाले, 'चित्तरंजन, उद्या पैसे न मिळाले तर ?'

'परत मिळण्याच्या विचाराने मी कधी देत नसतो.' ते म्हणाले. एकदा एक गरीब विद्यार्थी अडचणीत होता. 'देशबंधूंकडे जा' त्याला कोणी म्हणाले. तो देशबंधूंकडे आला. त्याची कायमची व्यवस्था झाली. शेकडो विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली होती.

मतभेद तरीही मदत

बिपिनचंद्र पाल हे जुने देशभक्त. मोठे विद्वान. परंतु असहकार त्यांना मान्य नव्हता. महात्माजींना ते मिस्टर गांधी म्हणून संबोधायचे. तरीही देशबंधू पूर्वीप्रमाणेच त्यांचा सारा खर्च चालवीत.

महात्माजींना सारे पैसे दिले

१९०३ सालची गोष्ट. महात्माजी दक्षिण आफ्रिकेतून मदत गोळा करण्यासाठी आले होते. कलकत्त्यात ते चित्तरंजनांनाही भेटले. त्या वेळेस चित्तरंजन गरीब होते. परंतु स्वतःच्या बँकबुकात जेवढे पैसे होते, तेवढे सारे त्यांनी गांधीजींना दिले.

उपाशी होतास, मग आधी का नाही आलास ?

त्यांच्या फॉर्वर्ड पत्राच्या कचेरीत एक नोकर होता. तो वेळच्या वेळी काम करीत नसे. एकदा टपाल घेऊन त्याला पाठवण्यात आले; परंतु त्याने पोस्टात जायला उशीर केला. पत्रे गेली नाहीत. देशबंधू रागावले. असा मनुष्य आम्हाला नको असे ते म्हणाले. त्याला कामावरून कमी करण्यात आले; परंतु दोन दिवसांनी तो मनुष्य पुन्हा देशबंधूंकडे आला.

'मला पुन्हां कामावर घ्या. दोन दिवसांचा मी उपाशी आहे.' तो म्हणाला.

'दोन दिवस उपाशी होतास, मग आधी का नाही आलास? तुला कामावर नाही घेणार. कारण तू काम नीट करीत नाहीस. परंतु तुला कोठे उद्योग मिळेपर्यंत तू माझ्याकडे जेवत जा.' असे देशबंधू म्हणाले.

शंभराची नोट दिली

आणि ती जुहू येथील एक गोष्ट आहे. महात्माजींना भेटायला देशबंधू आले होते. तेथे दुसरेही पुढारी होते. देशबंधू व दुसरे काही पुढारी समुद्रात नौकाविहारास जात आणि त्यांची जायची वेळ आली. मुंबईचे एक पुढारी तेथे होते. त्यांना वाटले या नावाड्याला देशबंधू कितीसे बक्षीस देतील ? पाच रुपये देतील. आपण दहा द्यावे. असे मनात आणून त्या मुंबईच्या सद्गृहस्थाने दहा रुपयांची नोट काढून त्यांनी दिली. तो मुंबईचा थोर पुरुष ओशाळला व देशबंधूस म्हणाला, 'दानवृत्तीत, औदार्यात कोणीही तुमची बरोबरी करू शकणार नाही.'

मी आधी कसा जेवायला बसू ?

जुहूचीच ती दुसरी एक गोष्ट. एकदा तिथला एक मनुष्य काही कामासाठी मुंबईस गेला होता. जेवायला परत येईन असे सांगून तो गेला होता; परंतु बराच वेळ झाला तरी तो आला नाही. जेवण वाट पाहात होते.

'चला आपण बसू.' तेथे असलेले सारे पुढारी म्हणाले.

'आपण आधी कसे बसायचे? तुम्ही वाटले तर बसा. मी थांबतो. मी आधी कसा जेवू ?'

शेवटी बाकीचे जेवायला बसले. देशबंधू तो कामाला गेलेला मनुष्य आला तेव्हाच त्याच्याबरोबर जेवले.

स्वयंसेवकांना स्वत: वाढीत

ही सहृदयता, ही माणुसकी देशबंधूंजवळ होती. त्यांच्या प्रेमळपणाला सीमा नव्हती. कलकत्त्यास जेव्हा कधी स्वयंसेवकास खूप काम पडे, तेव्हा रात्री त्यांना ते आपल्या घरी बोलावीत. त्यांना स्वत: जेवायला वाढीत. त्यांच्याबरोबर बोलत बसत. त्यांचे कौतुक करीत. त्यामुळे ते तरुणांचे जीव की प्राण झाले.

हे तरुण हीच माझी शक्ती

एकदा देशबंधू बसले होते. त्यांच्याजवळ काही तरुण कार्यकर्ते बसले होते. आलेले एक परप्रांतीय पाहुणे म्हणाले, 'देशबंधू, तुम्ही जे जे काम हाती घेता ते यशस्वी करता. कोठून आणता ही शक्ती?' जवळच्या कार्यकर्त्यांकडे बोट करून देशबंधू म्हणाले, 'माझी शक्ती म्हणजे ही माझी कष्टाळू माणसे. जिवापाड काम करणारी त्यागी माणसे.' देशबंधू जणू सहस्रबाहू होते. हजारो माणसे त्यांचे काम करायला तयार असत. त्यांचा शब्द झेलायला तयार असत. ज्याने सांगितलेले काम करावयास अशी शेकडो माणसे जवळ आहेत, असा देशबंधूंशिवाय दुसरा कोण पुढारी होता ? परंतु ही कार्यकर्त्यांची शक्ती देशबंधूंनी कशी मिळविली ? आपल्या प्रेमाने; उदारपणाने, सहानुभूतीने.

त्यांच्या देशभक्तीस तुलना नाही

स्वामी विवेकानंद, ब्रह्मबांधव उपाध्याय व देशबंधू यांच्या देशभक्तीस तुलना नाही असे बंगालमध्ये म्हणतात. देशबंधूंची देशभक्ती म्हणजे एक महाकाव्य आहे. देशबंधूंनी पूर्वी काव्ये लिहिली. ती त्यांची प्रतिभा पुढे का मेली ? ते काव्य का लोपले ? ती बासरी का बंद पडली ? नाही. त्यांच्या त्या बासरीनेच त्यांना कर्मवीर बनविले. त्यांच्या कविवृत्तीने त्यांना वीरवृत्ती दिली. देशबंधूंच्या काव्यप्रतिभेला आलेले सुंदर फळ म्हणजे त्यांची देशभक्ती. देशबंधूंची देशभक्ती काव्यमय वाटते. तिच्यात मधुरता आहे, कोमलता आहे. तिच्यात स्फूर्ती आहे. त्यांच्या देशभक्तीत सागरसंगीत आहे. कवीच्या हृदयात भावनांच्या लाटा उसळतात तशा देशबंधूंच्या देशभक्तीत, त्यांच्या त्यागात मोठमोठ्या लाटा दिसतात. आज हे सोडले, उद्या ते सोडले, अशी देशभक्तीची प्रतिभा दिवसेंदिवस पल्लवीत होताना दिसते. देशाला त्यांना अक्षरश: तन-मन-धन दिले.

आशुतोष मेले ? खरे का हे ?

आशुतोष मुकर्जी हे कलकत्ता विद्यापीठाचे कुलपती. असहकाराच्या काळात देशबंधूंचे व त्यांचे खटके उडत; परंतु देशबंधूंच्या मनात आशुतोषांविषयी अत्यंत आदर होता.

'एक कोटी रुपये मला द्या. सारे कलकत्ता विद्यापीठ मी राष्ट्रीय करतो.' आशुतोष देशबंधूंना म्हणाले.

'मी देतो एक कोट रुपये आणून.' देशबंधू आव्हान स्वीकारून म्हणाले.

परंतु देशबंधूंना किती कामे ! आणि तो तुरुंगवास. ती गोष्ट तेवढीच राहिली. देशबंधू जेव्हा जुहूला होते, महात्माजींजवळ स्वराज्य पक्षाची चर्चा करीत होते, त्या वेळेस आशुतोष अकस्मात एकदम मरण पावले. आशुतोषांची मृत्युवार्ता वाचून देशबंधू स्तंभित झाले. ते कोणाशी बोलले नाहीत. एकटेच फेऱ्या घालीत होते आणि मध्येच म्हणत, 'आशुतोष खरेच का मेले ? असे एकदम गेले ?'

विद्यापीठात कीर्तन विषय ठेवा

देशबंधू आशुतोषांना एकदा म्हणाले, 'हरिकीर्तनाचा विषय तुम्ही विद्यापीठात का ठेवीत नाही? कीर्तनविद्या फार पुरातन आहे. जनता शिक्षणाचे हे प्रभावी साधन आहे. तुम्ही या विषयाला स्थान द्या. संगीत व कीर्तन असा विषय ठेवा.'

'तुम्ही म्हणता ते खरे आहे. कीर्तन, मेळे ही आपली ज्ञानप्रसाराची साधने होती. यांना विद्यापीठात वाव हवा. मी विचार करीन.' परंतु आशुतोष गेले आणि देशबंधूही लवकरच जावयाचे होते.

त्यांना सांग देशबंधू रडत आहेत.

देशबंधूंचा एक मित्र फार सुरापान करी. एके काळी देशबंधूही मद्यसेवन करीत. परंतु त्याला प्रमाण असे आणि आता तर त्यांनी संपूर्ण त्याग केला होता. आपल्या या मित्राला ते पुष्कळ वेळा दारू सोडण्यास सांगत. तो मित्र त्या वेळेपुरते होय म्हणे, निश्चय करी परंतु पुन्हा पूर्वस्थितीत येई.

एकदा देशबंधू दौऱ्याहून घरी परत आले. त्या दिवशी त्यांचा तो मद्यपी मित्र खूपच दारू प्याला होता. रस्त्यात पडला होता. त्याला कोणी घरी आणले. देशबंधूंना ही गोष्ट कळली. ते अति दु:खी झाले. आपला मित्र दारू पिऊन रस्त्यात लोळत पडावा ही गोष्ट त्यांच्या हृदयास झोंबली. ते गच्चीत फिरत राहिले. रात्र झाली. शेवटी त्यांनी आपल्या मुलाला हाक मारली.

'काय बाबा ?' चिररंजनाने विचारले.

'चिर, माझ्या त्या मित्राकडे जा व त्याला सांग की, देशबंधू तुझ्यासाठी सारखे रडत आहेत.'

तो मित्र आता सावध झाला होता. भानावर आला होता. इतक्यात चिररंजन आला.

'काय रे चिर, देशबंधू आले का ?'

'हो.'

'त्यांनी का काही निरोप पाठवला आहे ?'

'हो.'

'सांग लवकर कोणते काम ?'

'तुझ्यासाठी बाबा रडून राहिले आहेत. 'मी सारखा रडत आहे' असे जाऊन सांग म्हणाले.'

तो मित्र मुका झाला. त्याच्याही डोळ्यांतून पाणी आले. देशबंधू आपल्यासाठी रडत आहेत हें ऐकून त्याला जागृती आली. तो चित्तरंजनास म्हणाला, 'देशबंधूंना सांग की, त्यांच्या अश्रूंत माझी दारू कायमची वाहून गेली.'

शेकडो उपदेशांनी जे झाले नसते ते त्या अश्रूंनी केले.

मी भिकारी आहे. मी काय देऊ ?

मरणाआधी एक वर्षाची ती गोष्ट. वंदे मातरम् गीताचे जनक व बंगीय साहित्यसम्राट ऋषी बंकिमचंद्र यांच्या पुण्यस्मरणार्थ सभा भरली होती. देशबंधू अध्यक्ष होते. त्यांनी लहानसेच भाषण केले. परंतु किती भावनोत्कट भाषण ! डोळ्यांत मध्येच अश्रूबिंदू चमकत. श्रोते तटस्थ होते. श्वाससुद्धा हळुवारपणे जणू घेत होते. भाषणानंतर सभेत बंकिमचंद्रांची स्मृती साजरी करण्यासाठी फंड गोळा करण्याचे ठरले तेव्हा देशबंधू सद्गदित कंठाने म्हणाले, 'मी तर भिकारी आहे. मी आता काय देऊ ?'

ते शब्द श्रोत्यांच्या हृदयात गेले. जलधर नावाचा एक वृद्ध मनुष्य तेथे होता. तो एकदम उठून म्हणाला, 'तुम्ही भिकारी ? असे नका म्हणू. हे शब्द आपल्या हृदयाला काट्यांप्रमाणे बोचतात. तुम्ही भिकारी नाही. तुम्ही राजराजेश्वर आहात. आमच्या प्राणांची तुम्ही देवता.'

माझी देशभक्ती म्हणजे देवभक्ती; माझे राजकारण म्हणजे धर्म

असे हे देशबंधू होते. देशबंधू म्हणजे बंगालचे मूर्त स्वरूप. बंगाली लोकांमधील गुण वा अवगुण यांची ते मूर्ती होते. बंगालवर त्यांचे अपार प्रेम. बंगालची हवा, बंगालचे पाणी. त्यांच्या रोमरोमात बंगाल होता, परंतु त्यांच्याजवळ प्रांतीयता नव्हती. हृदयात शेवटी आत भारतमाताच होती. मारुतीच्या हृदयात श्रीराम, त्याप्रमाणे देशबंधूंच्या हृदयात भारतमाता. त्यांची देशभक्ती म्हणजे देवभक्ती होती. कलकत्त्यास विद्यार्थ्यांच्या एका सभेत ते म्हणाले होते :

'ज्याला देशभक्ती असे म्हणतात ती माझ्याजवळ नाही. मी स्वत: देशभक्त नाही. मी देवाला मानतो आणि माझ्या मते परमेश्वराची प्रकट दीप्ती म्हणजेच देश.'

ते आणखी एकदा म्हणाले, 'माझे राजकारण माझ्या धर्माचे एक अंग आहे.' बंगाल प्रांतिक परिषदेचे ते प्रथम अध्यक्ष झाले तेव्हा त्या भाषणात ते म्हणाले, 'ज्ञानाने, वयाने, सेवेने अध्यक्ष होण्यास मी पात्र नसेन; परंतु प्रेमाच्या बळावर मी येथे बसलो आहे. बंगालवर प्रेम करण्यात मी कधी कोणास हार जाणार नाही. बाळपणात हाच बंगाल माझ्या हृदयात होता. तारुण्यात तोच होता. आजही तोच बंगाल माझ्या हृदयात आहे.'

दार्जिलिंग

असे हे त्यागमूर्ती देशबंधू, प्रेमसिंधू देशबंधू सारखी अविश्रांत सेवा करून आजारी पडले आणि विश्रांती मिळावी, प्रकृती सुधारावी म्हणून ते दार्जिलिंगला जाऊन राहिले. हिमालयाची धवल शिखरे येथून दिसत. हिमालय पाहताच भारताची त्यागतपस्या आठवते. भारताचे आध्यात्मिक जीवन डोळ्यांसमोर येते आणि चित्तरंजन प्रभुप्रेमात डुंबू लागले. वैष्णवधर्माची गीते आळवू लागले. त्यांचे हृदय प्रभुमय होते. पुन:पुन्हा त्यांचे मन वृंदावनात जाऊ इच्छी. गंगातटाकी झोपडी बांधून राहू इच्छी.

झोपडीत मलाही जागा ठेवा

पुण्याच्या ससून हॉस्पिटलात शस्त्रक्रिया होऊन महात्माजी खाटेवर पडून होते. देशबंधू त्यांना भेटायला आले होते. बोलता बोलता देशबंधू म्हणाले, 'महात्माजी, नको हा खटाटोप असे वाटते. गंगातटाकी झोपडी बांधावी व प्रभूचे स्मरण करीत राहावे असे सारखे मनात येते.'

'त्या झोपडीत माझ्यासाठीही थोडी जागा ठेवा.' महात्माजी म्हणाले.

दार्जिलिंगला ही वृत्ती पुन्हा बळावली. तरी देशातील कामाकडे डोळे होतेच. बंगालची खेडी पुन्हा पूर्वीप्रमाणेच भरल्या गोकुळासारखी कशी होतील याची त्यांना हुरहूर लागली होती. ते योजना करीत होते आणि त्यांना भेटायला महात्माजी आले. स्वर्गीय महादेवभाईही होतेच. तो लहानसा बंगाल गजबजून गेला. महात्माजींची सारी नीट व्यवस्था राहावी म्हणून देशबंधूंची किती उत्कंठा ! बकरीचे दूध हवे म्हणून पलीकडच्या तिबेटी भागातून पाच बकऱ्या आणण्यात आल्या. केव्हा उजाडते व महात्माजी आपले प्रसन्न हास्य घेऊन येतात असे देशबंधूंस होई. देशबंधू आपल्या खाटेवर महात्माजींना बसवीत. तेथे लोड करीत. त्याला महात्माजी टेकत आणि मग विनोद चाले.

'सूत काढायला आता पुन्हा सुरुवात केली आहे. चरखाही शिकेन.' देशबंधू म्हणत.

'परंतु चरख्याची माळ कशी घालावी, त्राक कशी बसवावी हे समजत असेल तर शपथ. सारे मी करून देईन तेव्हा.' वासंतीदेवी हसून म्हणत.

'तुम्ही स्वत:चे महत्त्व वाढावे म्हणून देशबंधूंना परावलंबी करून ठेवले आहे' महात्माजी म्हणत.

'महात्माजी, खरोखरच यांना हे काही येत नाही. ट्रंकेचे कुलूप कसे काढावे, बॅग कशी उघडावी ते सुद्धा समजत नही ! विचारा मी खोटे बोलत असेन तर.'

'यावरून माझा आरोप अधिकच सिद्ध होत आहे. तुमची पदोपदी जरूर वाटावी म्हणून देशबंधूंना तुम्ही असे अज्ञानात ठेवले.' असे म्हणून महात्माजी हसत. सारी मंडळी हसू लागे. निर्मळ आनंदसागर तेथे उचंबळे.

'महात्माजी, चरख्याला आता मी सोडणार नाही. हा चरखा घरोघर गेला पाहिजे. चरख्याने पुन्हा खेडी सजीव होतील. मी सतीशबाबूंना बोलावून घेतो. आपण खादीची सर्व योजना आखू. बंगालभर खादी कशी फैलावेल ते ठरवू.'

'परंतु या बंगल्यात आता आणखी माणसे आली तर राहणार तरी कोठे ?' महात्माजी म्हणाले.

'राहतील येथेच.' देशबंधू म्हणाले.

आणि सतीशबाबू आले. खालच्या मजल्यावर खादीची चर्चा सुरू झाली.

सतीशबाबूंना थंडी वाजत होती. देशबंधू एकदम उठले व जिना चढून वर गेले. तेथला गरम कोट घेऊन ते निघाले.

'मी नेऊ का ?' महादेवभाईंनी विचारले.

'मीच नेतो.' देशबंधू म्हणाले.

आणि सतीशबाबूंना तो कोट त्यांनी दिला. रात्री स्वत: खाली निजून सतीशबाबूंना त्यांनी आपली खाट दिली कारण सतीशबाबूंना पडसे झाले होते. जरा ताप आला होता. देशबंधू स्वत: आजारी, परंतु दुसऱ्यासाठी त्यांना किती काळजी !

'देशबंधूंची आध्यात्मिकता पाहिली'

देशबंधूंना बरे वाटत आहे असे महात्माजींना वाटले. ते बंगालच्या दौऱ्यावर पुन्हा निघाले. महात्माजींनी या भेटीचे वर्णन करताना लिहिले, 'या दोन दिवसांत मी देशबंधूंच्या अधिक जवळ गेलो. त्यांची आध्यात्मिकता मी पाहिली. देशबंधूंना मी यथार्थपणे जाणले.'

रामनामाची किती सुंदर प्रथा

मरणापूर्वी चार दिवस ते एकदा म्हणाले, 'मरताना रामनाम म्हणत मरावे ही प्रथा किती सुंदर आहे! रोग, दु:ख, शोक, चिंता सारे दूर करण्याची, सर्वांचा विसर पाडण्याची शक्ती या रामनामात आहे. प्रभूच्या नामसंकीर्तनात जशी ही शक्ती आहे, तशी कशातही नाही.'

एके दिवशी म्हणाले, 'कित्येक वर्षांपूर्वी एक वृद्ध वैष्णव मी पाहिला होता. 'यादवाय माधवाय गोविंदाय नमो नम:' हे शब्द तो वृद्ध कसे पण उच्चारी ! ते शब्द माझ्या कानात घुमत आहेत. तसा मस्त करणारा ध्वनी मी पुन्हा कधी ऐकला नाही.'

तुझ्या दारात येऊ दे

देशबंधू आता मरणाच्याच गोष्टी बोलत. त्यांना का मरण दिसत होते ? त्यांचा सर्वात धाकटा भाऊ वसंतरंजन येथेच मरण पावला होता. त्या भावाची ते सारखी आठवण काढीत. तो मला दिसतो असे म्हणत. तो हाका मारीत आहे असे म्हणत. जसजसे मरण जवळ येत होते, तसतसा नामसंकीर्तनाचा नाद वाढला. चंदीदासांची गाणी ते गात. समोर हिमालयाकडे बघत. त्यांची दृष्टी अनंतात बघत आहे असे वाटे.

आणि एके दिवशी त्यांनी ते भक्तिप्रेममय गाणे केले. त्या गाण्यात कोणता भाव होता, कोणते विचार होते ?

'पुस्तकांचे ओझे डोक्यावरून उतरा आता. ज्ञान व अभिमान यांचे गाठोडे माझ्या डोक्यावरून उतरा आता. हा बोजा डोक्यावर घेऊन घेऊन माझे डोके दुखू लागले आहे. सारे शरीर जीर्णशीर्ण झाले आहे. धापा टाकून हृदय थकून गेले आहे. डोळ्यांसमोर अंधार आहे. मला आता एकच इच्छा आहे. डोक्यावर मोरमुकुट घातलेला, हातात बासरी असलेला असा तो राधेचा आत्माराम, तो गोपाळकृष्ण, त्याला पाहण्यासाठी माझे प्राण अधीर झाले आहेत, तहानले आहेत. वेद व वेदांत आता विसरून जाऊ दे. प्रभो, तुझे राज्य समोर दिसत आहे. तुझ्या त्या आवडत्या कुंजद्वारात मी येत आहे. माझा विझणारा दिवा पुन्हा पेटवण्यासाठी तुझ्या मंगल धामी मी येत आहे.

असे हे अंतिम गान देशबंधूंनी आळविले. ही त्यांची शेवटची कविता. जीवनाच्या महाकाव्यातील हे शेवटचे प्रभुसमर्पणाचे गीत. देवाचे राज्य त्यांना दिसू लागले.

परंतु जवळच्या मंडळींस वाटत होते की देशबंधूंची प्रकृती सुधारत आहे. दोन महिने बहिणी जवळ होत्या; परंतु प्रकृती बरी आहे असे पाहून त्या कलकत्त्यास गेल्या. देशबंधू थोडेथोडे चालत. एका रिक्षाला वर काढण्यासाठी त्यांनी मदतही केली. तोंडावर तजेला दिसू लागला; परंतु हे सारे फसवणारे होते आणि एके दिवशी तो ताप पुन्हा आला. प्राण घेणारा ताप ! २० वर्षांपूर्वी मेलेल्या बंधूंचे त्या दिवशी ते स्मरण करीत होते. स्वतःच्या आध्यात्मिक गुरूचे स्मरण करीत होते. गुरूने दिलेल्या मंत्रांचे स्मरण करीत होते. मध्येच चंडीदासाची गीते म्हणत. चंडीदास व विद्यापती या दोन कवींची त्यांनी तुलना केली. चंडीदासाच्या गीतातील प्रेम अतिमानुष आहे, अपार्थिव आहे असे ते म्हणाले.

१९२५ जूनची १७ तारीख

सोमवारी अशी स्थिती होती आणि मंगळवार उजाडला. १९२५ जूनची १६ वी तारीख. हळूहळू मंत्रोच्चारण, रामनाम बंद होत चालले. शरीर थंड होत चालले. वाणी बंद झाली. सारे घाबरले. कलकत्त्यास तारा गेल्या; परंतु त्या दिवशी सायंकाळी पाच वाजता सारे संपले. ते महान जीवन अनंतात बुडून गेले. हिमालयाच्या महान शांतीत देशबंधूंच्या जीवनाचे करुणगंभीर सागरसंगीत, मधुर उत्कट सागरसंगीत, विलीन झाले.

तपस्विनी वासंतीदेवी

दार्जिलिंगहून तो पवित्र देह कलकत्त्यास न्यावयाचा होता. वासंतीदेवी दुःख गिळून गंभीर झाल्या होत्या. दार्जिलिंग सोडताना मुलेबाळे जवळ घेऊन त्यांनी पुढील प्रार्थना म्हटली.

'तुमि बंधु, तुमि नाथ, निशिदिन तुमि अमार
तुमि सुख, तुमि शान्ति, तुमि हे अमृत पाथार
तुमि तो आनन्दलोक, जुडाओ प्राण, नाशो शोक
तापहरण तोमार चरण असीम शरण दीन जनार'

(हे प्रभो, तूच बंधू. तूच नाथ, रात्रंदिवस तू आमचा आहेस. तू सुख, तू शांती, तूच अमृतधारा, तू आनंदाचा ठेवा. माझा शोक दूर करा; नवजीवन दे; ताप हरण करणारे तुझेच चरण : गरीब जनांचा तूच एक थोर आधार.)

अशी प्रार्थना म्हणून नंतर शव उचलण्यात आले.

अपूर्व प्रेतयात्रा

आणि पवित्र देह कलकत्त्यात आला. लाखो लोकांची गर्दी होती. देशबंधूंच्या बंधूंनी भजनी मेळे बोलावले होते. 'हरि बोल हरि बोल' हे भजन गगनास जाऊन भिडले आणि महात्माजी कलकत्त्यास येऊन पोहोचले. शवाला त्यांनी खांदा दिला. कलकत्त्यास सकाळी साडेसात वाजता मिरवणूक सुरू झाली. ती स्मशानात पोहोचायला साडेतीन वाजले. स्मशानघाटावर माणसे मावत नव्हती. जनतासागर उसळला होता. लोकपुढे-मागे लाटांप्रमाणे हेलावत होते. आणि त्या पवित्र देहाला अग्निसंस्कार देण्यात आला. ज्वाळा दिसताच लोकांचा धीर सुटला. महात्माजींना खांद्यावर घेऊन उंच करण्यात आले. ते लोकांना म्हणाले, 'काम संपले. आता घरोघर जा.' आणि खांद्यावरूनच महात्माजी निघाले. माझ्या पाठोपाठ या, चला, असे महात्माजी शब्दांनी व खुणांनी सांगत होते. त्याचा परिणाम झाला. हजारो लोक माघारी वळले. महात्माजींनी लिहिले, 'मी जर क्षणभर उशीर केला असता तर शेकडो लोकांनी त्या चित्तेत उड्या घेतल्या असत्या.'

मूर्तिमंत यज्ञ

देशबंधूंची निधनवार्ता वाचून सारे राष्ट्र शोकसागरात बुडाले. अनेकांनी गुणवर्णनपर लेख लिहिले. सर्वत्र शोकसभा झाल्या; परंतु या भव्य-दिव्य जीवनाचे शब्दांनी थोडेच वर्णन करता येणार? कविसम्राट रवींद्रनाथ म्हणाले :

'देशबंधू मूर्तिमंत यज्ञ होते'

सेवा दलातील माझ्या मित्रांनो, हा महान आदर्श डोळ्यांसमोर ठेवा, किती त्याग, कशी धीरोदात्तता; किती औदार्य, किती प्रेमळपणा, कसा निश्चय, कशी इच्छाशक्ती; किती कष्ट करीत, कसे दुसऱ्यासाठी धावून येत ; अशी देशभक्ती कोठे पाहावी, कोठे शोधावी ? तुम्ही असे ध्येयवादी बनण्याची खटपट करा. देशाचे स्मरण ठेवा. सर्वांचे ऐक्य करा आणि स्वातंत्र्य मिळवून सर्व बंधूंचे संसार सुखाचे करण्यासाठी झटा.''

वंदे मातरम् !!

+++

लोकमान्य टिळक

लोकमान्य टिळक

मुलांनो, हिंदी स्वातंत्र्याच्या इतिहासात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नाव अमर आहे. लोकमान्य म्हणजे अगाध विद्वत्ता. लोकमान्य म्हणजे अपार त्याग. लोकमान्य म्हणजे अलोट धैर्य, निस्सीम देशभक्ती. लोकमान्य म्हणजे पावित्र्याची खाण, अनासक्तीचे माहेर. लोकमान्यांचे चरित्र म्हणजे उसळणारा समुद्र. दिव्य-भव्य असे जीवन या महापुरुषाचे आहे.

निश्चयी बाळ

सूर्याची उपासना करणाऱ्या मातेच्या पोटी बाळ जन्माला आला. सूर्याचे तेज जणू घेऊन आला. लहानपणापासून या बाळच्या अंगी प्रखर तेज होते. अभंग निश्चय होता. शाळेत एकदा पंतोजींनी शुद्धलेखन घेतले. त्या शुद्धलेखनात एकच शब्द पुन्हा पुन्हा तीन वेळा आला. त्या शब्दात एक जोडाक्षर होते. या बुद्धिमान बाळने ते जोडाक्षर एकाच तऱ्हेने लिहिले नाही. ते अक्षर त्याने तीन निरनिराळ्या रीतींनी लिहिले. पंतोजी चुका धरू लागले; परंतु बाळने मुख्य अध्यापकांपर्यंत तक्रार केली. शुद्धलेखन बरोबर आहे, असा शेरा मिळविला. भारताच्या स्वराज्यासाठी पुढे अहोरात्र झगडणारे लोकमान्य, न्यायासाठी झगडणारे लोकमान्य, लोकांच्या जन्मसिद्ध मागण्या मंजूर झाल्याच पाहिजेत असा हट्ट धरणारे व त्यासाठी आमरण कष्ट करणारे लोकमान्य बालपणापासून असे होते.

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
... वाचनालय, सातारा.

एकदा वर्गात एक गणित घातले होते. अंकगणितातील उत्तर चुकीचे होते. ते उत्तर बरोबर समजून शिक्षकांनी बाळचे उत्तर चूक ठरविले; परंतु गणित म्हणजे पुढे ज्याच्या हातचा मळ झाला तो बाळ का गप्प बसणार? माझेच उत्तर बरोबर आहे असा त्याने आग्रह धरला. शेवटी बाळला न्याय मिळाला.

एकदा वर्गात काही तरी खोडी झाली होती. त्यात या तेजस्वी बाळचे अंग नव्हते. शिक्षक सर्वांना छड्या देऊ लागले. छड्या मारता मारता ते बाळाजवळ आहे. हात पुढे कर म्हणाले; परंतु बाळ हात पुढे करीना.

'माझा अपराध नाही. मी या खोडीत सामील नाही. मी हात पुढं करणार नाही. मार खाणार नाही,' तेजस्वी कुमाराने उत्तर दिले.

'हात पुढं करणार नसशील तर चालता हो शाळेतून. घे पाटीदप्तर, नीघ.' असे ते शिक्षक म्हणाले.

बाळ कचरला नाही. तो निर्भयपणे शाळेतून निघून गेला.

एकदा घरी दुसऱ्या एका मुलाची मुंज झाली. त्याला लंगोटी लागली. त्याच्या गळ्यात जानवे पडले. बाळला वाटले की, आपल्यालाही लंगोटी असावी. जानवे असावे. तो हट्ट धरून बसला. जेवायला येईना. मोठ्या मुश्किलीने बाळची समजूत घालावी लागली.

हिंदुस्थानची मान उंच व्हावी म्हणून लढणारा हा नरसिंह बाळपणी स्वतःची मान खाली होऊ देत नसे. राष्ट्राची प्रतिष्ठा सांभाळण्यासाठी पुढे प्राण हाती घेऊन लढणारे लोकमान्य बाळपणी स्वतःची अप्रतिष्ठा, स्वतःचा कमीपणा सहन करीत नसत.

पोलादी शरीर

असा हा बाळ शिकता शिकता मॅट्रिक झाला. पुढे कॉलेजच्या शिक्षणासाठी बाळ पुण्यास आला; परंतु कॉलेजच्या शिक्षणाऐवजी शरीर सामर्थ्यवंत करण्याकडे त्याचे लक्ष लागले. पुस्तके बाजूस पडली. दंडबैठका सुरू झाल्या. कुस्ती खेळू लागला. तासन्तास पोहू लागला. शरीराला कळा चढू लागली. दंड पिळदार दिसू लागले. हजार हजार जोर सहज काढू लागला. मित्रांबरोबर स्पर्धा चालत. पैजा लागत. व्यायाम वाढला तसा आहार वाढला. ज्या खानावळीत हा बाळ जेवी तेथे पूर्वीच्या पैशात जेवण मिळणार नाही असे सांगण्यात आले. बाळची भूक वाढली. वाढते शरीर. झपाट्याने शरीर सदृढ होत चालले. या तरुण बाळच्या तोंडावर अधिकच

तेज फुलले. बुद्धिमत्तेचे, निश्चयाचे तेज होतेच. त्यात शारीरिक बळाचेही तेज मिळाले. बाळ बलभीम झाला.

पुढे आयुष्यात परकीय सत्तेशी या बाळला झगडायचे होते. अनेकदा तुरुंगात खितपत पडायचे होते. तुरुंगातील हाल भोगायचे होते, हिंदुस्थानभर चळवळी करायच्या होत्या. रात्रंदिवस श्रमायचे होते. कामाचे डोंगर उचलायचे होते. या बाळने तारुण्याच्या ऐन आरंभी जर व्यायाम करून शरीर पोलादी करून ठेवले नसते तर पुढे हा भार कसा सहन झाला असता?

शरीर ही मोलाची देणगी आहे. जीवन कृतार्थ करण्याचे शरीर हे महान साधन आहे. रोगट, दुबळे शरीर असणे म्हणजे पाप आहे. राष्ट्राची समाजाची सेवा नीट करायची असेल तर शरीराची हयगय नका करू.

महाराष्ट्रातील त्रिकालपंडित डॉ. भांडारकर लोकमान्य टिळकांविषयी एकदा म्हणाले, 'टिळकांना जितक्या हालअपेष्टा भोगाव्या लागल्या, तशा जर आमच्यावर येत्या तर आम्ही कधीच चिरडलो गेलो असतो. कधीच राम म्हटला असता.' लोकमान्यांनी ह्या आपत्ती इच्छाशक्तीच्या जोरावर, कर्मयोग्याच्या समतोल वृत्तीने सहन केल्या हे खरे, परंतु तरुणपणी कमावलेले शारीरिक बळही त्यांना उपयोगी पडले यात शंका नाही.

सेवा दलातील मुलांनो, तुमची शरीरे तेज:पुंज करा. तुम्हाला पाहताच दुसऱ्यांना प्रसन्न वाटले पाहिजे. शरीराचे चोचले नका पुरवू; परंतु शरीराची नीट निगा राखा. भरदार छाती, पिळदार दंड, मजबूत मांड्या, काटक तंगड्या पाहिजेत. खेळा-कसरत करा. व्यायाम घ्या. जपानी लोकांनी प्रयत्न करून आपली उंचीही वाढवली. प्रयत्नास काय असाध्य आहे ? लोकमान्य तुम्हाला सांगत आहेत की, तडफदार, तेजस्वी, सामर्थ्यसंपन्न शरीर असणे, असे शरीर कमाविणे हा पहिला धर्म.

शरीर संपन्न करून बाळ पुन्हा शिकू लागला. शिक्षण संपले. पुढे काय ? लोकसेवा सुरू झाली. ते शिक्षक बनले. विष्णुशास्त्री तरुणांच्या शोधात होते. टिळक नि आगरकर त्यांना मिळाले. पुढे फर्ग्युसन कॉलेज निघाले. त्यात ते प्राध्यापक झाले.

केसरी

शिक्षणाचे कार्य असे चालले असता मतभेद झाले. टिळक चौकटी शिक्षणक्षेत्रातून बाहेर पडले. ते तमाम महाराष्ट्रीय जनतेला शिकवू लागले. केसरी

पत्र त्यांनी हाती घेतले. वीराची तेजस्वी लेखणी चमकू लागली. महाराष्ट्रभर केसरीची गंभीर गर्जना सुरू झाली. लोकांत चैतन्य आले. निर्भयता येऊ लागली. स्वातंत्र्याची स्वप्ने पडू लागली. केसरी हे अत्यंत प्रभावी साधन ठरले. लोकमान्य केसरीसाठी किती खस्ता खात ! ते कधी कधी स्वतः खिळे जुळवीत. वाटेल ते काम करीत. मंगळवारी केसरी प्रसिद्ध झालाच पाहिजे. कधीही त्यांनी वेळ चुकू दिली नाही. किती अडचणी आल्या ! छापखाने बदलावे लागत; परंतु लोकमान्य साऱ्या अडचणींना तोंड देत व केसरीचा दिवस टळू देत नसत.

कर्तव्यनिष्ठा

आणि ते प्लेगचे दिवस होते. लोकमान्य बाहेर झोपडीत राहात होते. त्यांचा आवडता मोठा मुलगा प्लेगने अंथरुणात तडफडत होता. होतकरू व हुशार मुलगा; परंतु केसरी-कचेरीत जाणे अशक्य होते. अंक निघायचा होता. कर्मयोगी टिळक केसरी कचेरीत जायला निघाले.

नका आता जाऊ. मुलगा वातात आहे. जिवावरचं दुखणं. केव्हा काय होईल त्याचा नेम नाही. नाही गेलं तर नाही तर चालणार? कोणीतरी म्हणाले.

'न जाऊन कसं चालेल ? केसरीसाठी सारा महाराष्ट्र वाट पाहात असेल. आणि येथे बसून मी अधिक काय करणार आहे ? डॉक्टर आहेतच. ते काळजी घेतच आहेत. मी जातो. अग्रलेख द्यायचा आहे.' असे म्हणून ते गेले. शांतपणे अग्रलेख त्यांनी सांगितला. कर्तव्य कठोर असते म्हणतात ते का खोटे ?

मुलांनो, कर्तव्यातही तारतम्य पाहावे लागते. श्रेष्ठ कर्तव्य आधी उचलावे लागते. तानाजीला रायबाचे लग्न करायचे होते. मुलाचे लग्न करणे हे कर्तव्यच होते; परंतु कोंडाणा किल्ला घेणे जर अधिक महत्त्वाचे असेल तर त्यासाठी मुलाचे लग्न बाजूस ठेवून गेले पाहिजे. नरवीर तानाजी हा थोर धर्म जाणत होता. लोकमान्यही अशाच वृत्तीचे. पुत्राची आजारीपणात काळजी घेणे हा पित्याचा धर्मच आहे. त्यासाठी डॉक्टर वगैरे लोकमान्यांनी आणले; परंतु तिकडे केसरी हाक मारीत असता केवळ मोहाने मुलाच्या बिछान्याजवळ रडत बसणे हा धर्म नव्हता. पुत्राच्या शुश्रूषेची व्यवस्था करून लोकमान्य महाराष्ट्राच्या सेवेचे साधन जो केसरी त्याच्यासाठी धावून गेले. हा निरनिराळ्या कर्तव्यातील विवेक आपल्या जीवनात आला पाहिजे. अधिक श्रेष्ठ कर्तव्याकडे मोह सोडून गेले पाहिजे.

सत्याचे उपासक

लोकमान्य टिळकांचे आचरण धुतल्या तांदळासारखे होते. इथलाही मळ स्वत:च्या निर्मळ जीवनाला त्यांनी लागू दिला नाही. लोकमान्यांचे चारित्र्य कलंकित व्हावे म्हणून सरकारने कारवाया केल्या; परंतु भट्टीत घातलेले सोने अधिकच चमकते तसे लोकमान्य अधिकच झगझगीत चारित्र्याने शोभते झाले.

लोकमान्यांचे एक मित्र बाबा महाराज म्हणून होते. बाबा महाराजांनी मरताना मृत्यूपत्र केले. त्याच्या विश्वस्तांपैकी टिळक एक होते. स्नेह्याच्या मालमत्तेची मृत्युपत्राप्रमाणे व्यवस्था व्हावी म्हणून लोकमान्य किती झगडले! तो मोठा इतिहास आहे. ताईमहाराज प्रकरण म्हणून तो प्रसिद्ध आहे. मरेपर्यंत लोकमान्यांना हे खासगी कार्य पुरले. स्नेह्याला दिलेल्या शब्दासाठी संबंध आयुष्यभर टिळकांनी चिंता वाहिली. असे उदाहरण दुर्मिळ.

एकदा बाबा महाराजांच्या मळ्यातील भाजी कोणी तरी टिळकांच्या घरी पाठविली. टिळक आपल्या दिवंगत मित्राच्या घरची बारीकसारीकसुद्धा वस्तू आणीत नसत. कारण मृत मित्राच्या मालमत्तेचे ते विश्वस्त होते. मग सुतळीच्या तोड्याला तरी हात कसा लावायचा ? लोकमान्यांच्या न कळत ती भाजी आली होती; परंतु ते सहज घरात गेले तो ती भाजी तेथे त्यांना दिसली.

'ही कोठली भाजी ?' त्यांनी चौकशी केली.

'बाबा महाराजांच्या मळ्यातील.' उत्तर मिळाले.

'ती अशीच परत करा. पुन्हा असं कधी होता कामा नये.' ते म्हणाले.

मुलांनो, वेळीच जपावे लागते. लहानशी गोष्ट म्हणून उपेक्षा केली तर पुढे मोठ्या गोष्टी होऊ लागतात. लोकमान्यांनी ती भाजी राहू दिली असती तर पुढे आणखी काही कदाचित कोणी आणते. म्हणून टिळकांनी आरंभच पुसून टाकला. तुम्हाला माहीत आहे ना, नळराजाच्या अंगठ्यातून कली त्याच्या शरीरात शिरला ते? नळराजाने पाय धुतले. पण अंगठा जरा कोरडा राहिला, तेथून कली शिरला आत. पादप्रक्षालनाची गोष्ट; परंतु त्यातील त्या लहानशा चुकीचे केवढे प्रायश्चित्त नळाला भोगावे लागले ! म्हणून फार जपले पाहिजे. सैल सोडून भागत नसते. हे जीवन म्हणजे सर्कस आहे. तारेवरून चालणे आहे. तेथे तोल जाऊ देता कामा नये. सत्याची काठी हातात धरून तोल सांभाळून तारेवरचा नाच नीट केला पाहिजे. दादोजी

कोंडदेवांनी चुकून शहाजीराजांच्या मळ्यातील झाडावरचा आंबा तोडला म्हणून स्वतःचा हात तोडण्यासाठी तलवार उपसली. श्रीशिवाजीमहाराज म्हणाले, ' हात नका तोडू, एवढं शासन नका करू त्या हाताला.' शेवटी खूण म्हणून त्या हाताची बाही त्यांनी लांडी ठेवली.

ती जशी दादोजी कोंडदेवांची गोष्ट तशीच ही भाजी परत करण्याची लोकमान्यांची गोष्ट.

व्रती लोकमान्य

लोकमान्यांनी आपले सारे जीवन देशासाठी दिले. तन-मन-धन दिले. सारे सामर्थ्य जनताजनार्दनाला दिले. आपल्या शारीरिक व मानसिक बळाचा त्यांनी इकडेतिकडे एक कणही जाऊ दिला नाही. मनावर त्यांचा अंकुश होता. ते चित्ताचे स्वामी होते. वासना त्यांनी जिंकल्या होत्या. ते कसे जितेंद्रिय होते त्याची ही गोष्ट ऐका:

एकदा एक स्त्री काही कामासाठी त्यांच्याकडे आली होती. लोकमान्यांचे घर सदासर्वकाळ मोकळे असे. देशाची चिंता वाहणाऱ्या या महापुरुषाचा कितीतरी वेळ लोकांचे कोर्ट-कज्जे यांचे अर्ज लिहून देण्यात गेला आहे. आंघोळीला पाणी उपसलेले असावे इतक्यात कोणी सल्ला विचारायला यावे. कायद्याची माहिती विचारण्यास यावे. लोकमान्य त्याच्याजवळ बसत, बोलत, माहिती देत. मग आंघोळ-असे नेहमी चालायचे.

त्या स्त्रीलाही अर्ज लिहून हवा होता. लोकमान्य तिची सारी हकीकत ऐकत होते. नंतर त्यांनी सविस्तर अर्ज लिहून दिला. ती स्त्री गेली; परंतु लोकमान्यांनी चुकूनही त्या स्त्रीच्या मुखाकडे पाहिले नाही. जणू डोळ्यांवर तिसरा संयमाचा डोळा-वैराग्याचा डोळा लोकमान्यांजवळ होता. भगवान शंकराचा तिसरा डोळा !

सुग्रीवाने सीतेने खाली टाकलेले दागिने रामलक्ष्मणास दाखविले. लक्ष्मणाने कोणते दागिने फक्त ओळखले ? सीतादेवीच्या पायांतील. ब्रह्मचारी लक्ष्मण सीतेच्या चरणांकडे पाही. खाली पाही; वर मुखाकडे पाहात नसे. जसा तो व्रती लक्ष्मण, तसेच हे व्रती लोकमान्य. व्रती लक्ष्मणालाच इंद्रजित मारता आला. अशा व्रती बलवंत टिळकांनाच ब्रिटिश सिंहाच्या झिंज्या ओढता आल्या. साम्राज्यसत्तेशी निर्भयपणे लढण्याचे बळ मिळवता आले.

असे व्रती पुरुष जगाला हालवतात. तसे अजिंक्य असतात. असे व्रती पुरुष पहाडाला हालवतात. वज्राचा चुरा करतात. लोकमान्य वयातीत झाल्यावरसुद्धा गंगेच्या गंभीर व विशाल प्रवाहातून एका हातातील पुस्तक कोरडे ठेवून पोहत पैलतीरी गेले. लोकमान्यांच्या डोळ्यांत विजेचे तेज असे. त्या डोळ्यांकडे पाहवत नसे. एका प्रख्यात इंग्रजी वृत्तपत्रलेखक हिंदुस्थानात आला होता. लोकमान्यांना तो भेटला होता. तो लिहितो, 'मी जगभर हिंडलो; अनेक मोठमोठ्या व्यक्तींना भेटलो; परंतु टिळकांच्या डोळ्यांतील तेज मला कोठेही पाहायला मिळाले नाही.' असे हे तेजस्वी डोळे, अशी तेजस्वी निष्कपट शक्ती लोकमान्यांना कोणी दिली ? त्यांच्या संयमाने, त्यांच्या व्रती वर्तनाने.

एकराष्ट्रीयतेची मूर्ती

भारताच्या स्वातंत्र्यासाठी लोकमान्यांचे जीवन होते. त्यांच्या हृदयात आग पेटली होती. हे लोक कसे उठवावे, पेटवावे याचीच चिंता त्यांना सदैव होती आणि प्रचंड आंदोलनाचे दिवस आले. वंगभंगाचे दिवस वंगदेशाचे दोन तुकडे करण्यात आले. बंगाली जनता खवळली; उसळली. वंदे मातरम् गीत दुमदुमले. हजारो सभा होऊ लागल्या; परंतु सरकार लक्ष देईना.

अशा ह्या तेजस्वी वेळेस कलकत्त्यास राष्ट्रीय सभा भरली. मतभेद माजू नयेत म्हणून परमपूज्य महर्षी दादाभाई नौरोजी अध्यक्ष निवडले गेले. आणि या वृद्ध महर्षीनेच स्वराज्य हा मंगल शब्द उच्चारला. स्वराज्य हे साध्य. राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी व बहिष्कार ही साधने. अशा रीतीने साध्यसाधनांचा स्पष्ट साक्षात्कार दादाभाईंनी करून दिला.

स्वदेशी म्हणजे स्वतःच्याच देशातील वस्तू वापरण्याचा धर्म करणे. बहिष्कार म्हणजे परदेशी माल न घेणे. स्वदेशी व बहिष्कार मिळून संपूर्ण साधन होते. माल येऊ द्यायचा नाही. आला तरी वापरायचा नाही.

बंगालभर स्वदेशी व बहिष्कार याची लाट उसळली; परंतु इतर प्रांत काय करीत होते ? लोकमान्यांनी महाराष्ट्रभर स्वदेशी व बहिष्कार यांचा तेजस्वी धर्म फैलावला; परंतु देशातील काही पुढारी म्हणू लागले की, बंगालचे दोन तुकडे करण्यात आले आहेत. बंगालनेच बहिष्कार घालावा. इतर प्रांतांनी सहानुभूती दाखवावी; परंतु कर्मशून्य सहानुभूतीला अर्थ काय ? आणि बंगाल का अलग मानायचा ? आपण निरनिराळे

श्री. छ. प्रतापसिंह महाराज (थोरले)
ग्रंथालय, सातारा.

प्रांत इंग्रजांशी अलग अलग लढलो म्हणून तर गुलाम झालो. पुन्हा का तीच गोष्ट करायची.

सारा हिंदुस्थान एक आहे. एका देहात एकच मन, एकच आत्मा तसे हिंदुस्थानचे झाले पाहिजे. बंगालला दुःख असले तरी सर्व हिंदुस्थानने तळमळले पाहिजे. पायात काटा बोचला तर हात का धावून जात नाही ? डोळ्यांना का पाणी येत नाही ? कोठे सूज आली. गळू झाले तर सर्व अंगाला ताप येतो. हिंदुस्थानचे तसेच झाले पाहिजे. इंग्रज सरकार बंगालच्या बाबतीत अन्याय करीत असेल तर तो दूर व्हावा म्हणून साऱ्या देशाने चळवळ केली पाहिजे.

लोकमान्यांनी ही दृष्टी दिली. बंगालचे दुःख हे सर्वांचे आहे. अशी शिकवण या महापुरुषाने दिली. सारे राष्ट्र एक माना. हा संदेश ह्या थोर देशभक्ताने दिला. लोकमान्यांना महाराष्ट्राचा अभिमान होता; परंतु प्रांतापलीकडे जाऊन ते सर्व भारताची उपासना करणारे होते. त्यांनी दिलेली ही थोर देणगी आहे.

दारूबंदी

राष्ट्रीय चळवळ वाढत होती. स्वदेशीच्या बरोबरच दारूबंदीचीही चळवळ उठवली. निरोधने होऊ लागली. पुण्यात दारूचा एक थेंबही खपेनासा झाला. दारूबंदी नि स्वदेशी यांच्या गाण्यांनी महाराष्ट्र दुमदुमला. पुणे शहरात निरोध करणारांना दंड होऊ लागले; परंतु लोकमान्यांचा आधार होता. महापुरुषांचा पाठिंबा असल्यावर जनता का उठवणार नाही ?

परंतु बंगालची फाळणी तशीच राहिली. शेवटी वंगीय तरुण बाँबचे भक्त बनू लागले. हिंदुस्थानात बाँब आले. पिस्तुले आली. आवाज होऊ लागले.

हुतात्मा खुदीराम

पहिला बाँब १६ वर्षांच्या खुदीरामने फेकला. खुदीराम अमर हुतात्मा झाला. वंदे मातरम् गीत म्हणत व माझा जन्म सफल झाला असे म्हणत तो फासावर गेला. खुदीरामचे लाखो फोटो लाखोंच्या घरात शोभू लागले. लाखोंच्या हृदयांत तो जाऊन बसला.

एक प्रकारचे दिव्य राष्ट्रभक्तीचे वातावरण देशात निर्माण झाले. लोकमान्यांचा सूर चढू लागला. सरकारी दडपशाहीवर ते कोरडे ओढू लागले. केसरीतून जळजळीत लेख येऊ लागले. सरकार लोकमान्यांना उचलणार असे वाटू लागले. शेवटी त्यांना अटक करण्यात आली.

प्रशांत सिंह

खटला भरण्यात येणार होता. लोकमान्य तुरुंगात होते. त्यांना भेटण्यासाठी त्यांचे स्नेही दाजी आबाजी खरे आले. खटल्याचे पुढे काय करायचे वगैरे गोष्टींसंबंधी बोलणे करण्यासाठी ते आले होते; परंतु त्या वेळेस लोकमान्य काय करीत होते ? ते सचिंत होते का ? दु:खी कष्टी होते का ? ते काय करीत होते ? दाजी आबाजी त्यांच्या कोठडीजवळ आले तो हा महान देशभक्त शांत झोपला होता ? बाहेर त्यांना कोठली विश्रांती ? तुरुंग हीच विसाव्याची जागा. डोक्यावर आकाश कोसळो की वज्र पडो, महापुरुष शांत राहतात. 'शांताकारं-भुजगशयनं' हेच त्यांचे वर्णन. शेकडो फणांच्या सर्पावर निजूनही भगवान् विष्णू शांत राहतात. आपण बारीकसारीक गोष्टींनी त्रस्त-अस्वस्थ होतो; परंतु लोकमान्य शांतपणे झोपले होते. किती पवित्र-प्रसन्न झोप !

दाजी आबाजींनी हाका मारल्या. टिळक जागे झाले.

'बळवंतरावजी, आम्हाला बाहर झोप येत नाही आणि तुम्ही स्वस्थ झोपता आहात ?' दाजीसाहेब म्हणाले.

'अहो, तुम्ही आहात काळजी घ्यायला म्हणूनच मी झोपलो आहे. आता विश्रांती घेऊ दे जरा.' लोकमान्य हसून म्हणाले.

पुढे खटला सुरू झाला. लोकमान्यांनी वकील वगैरे दिला नाही. त्यांनी स्वत:च खटला चालविला. जणू स्वराज्याची कैफियत मांडीत होते. लोकमान्यांचे किती तरी दिवस भाषण चालले होते. जगातील स्वातंत्र्ययुद्धाच्या त्यात कथा होत्या. अनेक दाखले, अनेक प्रसंग. त्या खटल्याकडे हिंदुस्थानचे डोळे होते.

परमेश्वरावर श्रद्धा

परंतु शेवटी व्हायचे तेच झाले ! शिक्षा किती द्यायची वगैरे सारे जणू ठरलेलेच होते. उतारवयात लोकमान्यांना सहा वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली. सारा देश हादरला. गहिवरला. लोकमान्य शिक्षा ऐकून शांत होते. तुम्हाला काही बोलायचे आहे का? असे त्यांना विचारण्यात आले. लोकमान्य उभे राहिले. शेवटचे चार अमर शब्द त्यांनी उच्चारले. काय म्हणाले ते ?

'मला तुम्ही जरी अपराधी ठरवलं असलं तरी मी निर्दोष आहे. हे पुन्हा एकदा स्पष्ट सांगतो. वरती शेवटी परमेश्वरी न्यायासन आहेच. त्या जगतचालकाची अशीच

इच्छा असेल की, जे काम मी करीत आहे ते माझ्या हालअपेष्टांनी अधिकच वाढावं, फोफावावं.'

किती धीरोदात्त उद्गार !

कामगारांचे प्रेम

लोकमान्यांना सजा झाली म्हणून कोण संतापले ? कोण उठले? कोण उठणार? गरीब जनतेवाचून कोण उठणार ? प्रतिष्ठित पलंगपंडित पुढारी लोकमान्यांना 'तेल्यातांबोळ्यांचे पुढारी' असे म्हणत. होय, लोकमान्य बहुजन समाजाचे नेते होते. पडलेल्या जनतेला ते उठवणारे होते. टिळकांना शिक्षा देताना हायकोर्टाभोवती मिलिटरी होती. मिलिटरीच्या पहाऱ्यात लोकमान्यांना सरकारने नेले आणि मुंबईचे कामगार संपावर गेले. त्या वेळेस कामगारांची संघटना नव्हती. युनियन नव्हती. राष्ट्रीय जागृती नव्हती. तरीही कामगार टिळकांना ओळखीत होते. स्वराज्यासाठी झगडणाऱ्या या पुरुषसिंहाची पूजा ते करीत होते. कामगारांत असंतोषाचा वणवा पेटला. सरकारने गोळीबार केले. कामगारांनी आपल्या रक्ताने लोकमान्यांवरचे प्रेम व्यक्त केले!

दोन तुकडे तरी कोणाला मिळतात ?

लोकमान्यांना कोणी गोरा अंमलदार म्हणाला, 'टिळक, तुम्ही किती विद्वान, किती शिकलेले तुम्हाला आता तुरुंगात बसावं लागेल! भाकरीचे तुकडे मोडावे लागतील. कशाला भानगडीत पडलेत ? स्वस्थ आरामात, सुखात राहायचं सोडून हे तुकडे मोडायला कशाला आलेत?'

लोकमान्य म्हणाले, 'माझ्या देशातील कोट्यवधी लोकांना दोन तुकडे तरी कोठे मिळताहेत ? मला दोन भाकरी तरी इथं रोज़ मिळीलच. त्यांच्याहून मी सुखी आहे.'

असे हे लोकमान्य होते. कष्टांत आनंद मानणारे होते. आगीला शीतल मानणारे होते.

भारतीय संस्कृतीचे चिंतन

आणि तुरुंगात लोकमान्य काय करीत होते ? ब्रह्मदेशातील त्या तुरुंगात त्यांचा वेळ कसा जाई ? भारतमातेच्या चिंतनात ते रंगलेले असत. भारतातील भव्य संस्कृती हिमालयाच्या शिखराप्रमाणे, अनंत सिंधूप्रमाणे त्यांच्या डोळ्यांसमोर उभी असे. भारतीय विचारांची परमोच्चता एकत्र अशी कोठे पाहायची ? श्रीमद्भगवद्गीतेत. गीता म्हणजे भारतीय संस्कृतीचा, भारतातील आध्यात्मिक विचारांचा ज्ञानकोश.

त्या गीताज्ञानात लोकमान्यांनी खोल बुडी मारली. हिंदुस्थानचा उद्धार तेव्हाच होईल जेव्हा निरनिराळ्या राष्ट्रसेवेला वाहून घेतलेले शेकडो-हजारो कर्मयोगी उभे राहतील. अधीर व उतावीळ न होणारे, निराशेने न खचणारे, निंदेने, अपमानाने न रडणारे असे अदम्य कर्मयोगी मिळतील तेव्हाच देशाचा कायापालट होईल. अंधार जाऊन प्रकाश फुलेल. विवेकानंद म्हणत असत, 'मला एक हजार कार्यकर्ते द्या, मी देशाचे स्वरूप पालटून टाकतो; परंतु ते एक हजार कार्यकर्ते सिंहाच्या छातीचे हवेत.'

कोणते रसायन द्यावे, कोणता मंत्र द्यावा म्हणजे असे व्रती सेवेकरी निर्माण होतील, याची चिंता लोकमान्यांना लागली होती. गीतेचे तत्त्वज्ञानच राष्ट्राला तारील असे त्यांना वाटले. जगातील तत्त्वज्ञानाशी, नीतिशास्त्राशी भारतीय तत्त्वज्ञानाची व नीतिशास्त्राची त्यांनी तुलना करून दाखविली. आणि उदार व उत्कृष्ट विचारांची ही पुंजी लोकमान्यांनी भारतीयांस 'गीतारहस्य' या अमोल ग्रंथाच्या द्वारा दिली. गीतारहस्य म्हणजे राष्ट्र संजीवन आहे.

श्रीशाय जनतात्मने

लोकमान्यांनी हा गीतारहस्य ग्रंथ कोणाला अर्पण केला आहे? त्यांच्या डोळ्यांसमोर कोण होते ? कोणाची उपासना ते जन्मभर करीत होते ? लोकमान्यांचे दैवत कोणते ? त्यांच्या परमेश्वराचे स्वरूप काय? जनता हाच त्यांचा परमात्मा होता. जनतेच्या आत्म्याच्या रूपाने नटलेल्या ईश्वराला-श्रीशाला त्यांनी हा ग्रंथ अर्पिला आहे. जनता हेच लोकमान्यांचे दैवत. या जनतेच्या सेवेतच ते सदैव रमले.

व्यवस्थितपणा

लोकमान्य काही काही बाबतीत फार कठोर असत. काही बाबतीत गबाळेपणा त्यांना खपत नसे. मंडालेच्या तुरुंगात असताना त्यांना संदर्भासाठी पुस्तके लागत. त्यांच्या केसरी-कचेरीची मोठी ग्रंथशाळा होती. कोणते पुस्तक कोठे ते लोकमान्यांना माहिती. एकदा त्यांना घरून उत्तर आले की, पुस्तक सापडत नाही. ते उत्तर वाचून लोकमान्य संतापले. त्यांनी रागाने पत्र लिहिले, 'पुस्तकेही व्यवस्थित नाही का ठेवता येत ? पुस्तके नीट ठेवा. हलगर्जीपणा असता कामा नये' वगैरे त्यांनी लिहिले.

घरात साहेबी हॅट नको

लोकमान्य शिक्षा भोगल्यावर परत आले. रात्री गुपचूप आणून त्यांना सोडण्यात आले. दरवाजावरच्या भय्याने ओळखले नाही. तो दार उघडेना. लोकमान्य बोलले.

भय्याने ओळखले. गहिवरला. पुणे आनंदले. लोकमान्य परत ज़नतेत आले. सहा वर्षांनी महापुरुष घरी आला.

त्यांना घरी एक वस्तू दिसली. ती वस्तू पाहून त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांच्या मुलाने साहेबी हॅट विकत घेतली होती. ज्या साहेबाच्या जुलमी सत्तेविरुद्ध झगडण्यात लोकमान्यांचे सारे आयुष्य जात होते त्या साहेबाची ती साम्राज्यवादी टोपी होती. लोकमान्य क्रोधाने थरथरत होते. 'माझ्या घरात साहेबाची हॅट येता कामा नये.' ती हॅट जाळली गेली. आज साहेबी हॅटस् जरी भरपूर झाल्या असल्या तरी साम्राज्यशाहीबद्दलची लोकमान्यांची ती जळजळीत चीड आजही आहे. अधिकच पेटली आहे.

मस्तक तापायचीच वेळ आहे

लोकमान्य आले. परत देशसेवेला लागले. हिंडू फिरू लागले. दौरे निघू लागले. ती प्रभुवाणी ऐकायला लाखो जनता भुकेली होती आणि बेळगावची गोष्ट आहे. लोकमान्यांची का मिरवणूक होती ? का सभा होती ? काही तरी प्रसंग होता. लोकमान्य उभे होते. प्रखर ऊन पडले होते. कोणी तरी त्यांच्यावर छत्री धरली. लोकमान्य कोणत्या तरी विचारात होते. गोऱ्या सोजिरांनी कोठे तरी अत्याचार केला होता. लोकमान्य प्रक्षुब्ध झाले होते. अशा वेळेस ती छत्री उघडलेली पाहून ते संतापले.

'अहो, छत्री कशाला उघडता ? डोकी तापू देत जरा. डोकी थंड ठेवायची ही वेळ नाही, तापायलाच हवी आहेत.'

स्वातंत्र्याची तगमग

लोकमान्यांच्या हृदयाची होळी पेटलेली असे. हिंदी जनतेच्या हातात केव्हा सत्ता येईल असे त्यांना होई. एकदा कोणी क्रांतिकारक दहशतवादी त्यांना भेटले. चर्चा झाल्या. शेवटी लोकमान्य गंभीरपणे म्हणाले, 'चर्चा नकोत. मरायला तयार असलेले एक हजार लोक मला द्या. मी बंड पुकारतो.' प्रखर उद्गार ! बंड करायचे तर संघटना हवी. हजारोंची मरायला तयारी हवी. तोपर्यंत शांतपणे अविरत काम करता येईल. लोकमान्यांना आज हजारो तरुण मरायला उभे आहेत ते पाहून केवढी धन्यता वाटली असती !

त्यांना फाशी देण्याची सत्ता मला हवी

आणि अमृतसरला काँग्रेस भरली होती. पंजाबमधील राक्षसी लष्करी कायद्याच्या धिंगाण्यानंतरची ती राष्ट्रीय सभा. जालियनवाला बागेतील

कत्तलीनंतरची राष्ट्रीय सभा. अपरंपार हिंदी विटंबनेनंतरची सभा. ज्यांनी गोळ्या घातल्या, लोकांना सरपटवले, फटके मारले त्यांचे कोण काय करणार ? गोळ्या घालणाऱ्या डायर वगैरेस थैल्या अर्पण करण्यासाठी विलायतेत पैसे जाऊ लागले! दु:खावर ही डागणी होती. हिंदी माणसांना सरकार किती किंमत देते ते यावरून दिसत होते.

त्या राष्ट्रीय सभेच्या महान अधिवेशनात भावनांचा सागर उसळला होता. ज्या सरकारने कत्तली केल्या त्या सरकारने म्हणे काही तटबुंज्या सुधारणा जाहीर केल्या होत्या. त्या सुधारणांनी हुरळून जायचे का त्या फेटाळायच्या ? भाषणे होत होती, चर्चा चालल्या होत्या; परंतु लोकमान्य काय म्हणाले ? ते शब्द ज्यांनी ऐकले ते त्या शब्दांना कधी विसरणार नाहीत. लोकमान्यांनी लांबलचक भाषणे केली नाहीत. ते म्हणाले, 'या सुधारणांचं एवढं कौतुक ते काय करायचं; कितीशी सत्ता मिळाली ? त्यानं का कुणाचं समाधान होणार आहे ? मला अशी सत्ता पाहिजे की ज्यांनी नि:शस्त्र शांत जनतेवर गोळ्या घातल्या त्यांना मला फाशी देता येईल. एरव्ही माझं समाधान नाही. अशी सत्ता हाती येईपर्यंत कोण स्वस्थ बसेल ?'

सर्वांची भाषणे या तेजस्वी शब्दांपुढे फिकी पडली. टाळ्यांचा अविरत गजर झाला. लोकमान्यांच्या हृदयातील स्वातंत्र्याविषयीची तगमग ह्या अशा उद्गारांवरून दिसून येईल.

स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे

लोकमान्यांनी शेवटची वर्षे स्वराज्याचा मंत्र शिकविण्यात दवडली. त्या उतारवयात वऱ्हाड–खानदेशाचा मोठा दौरा काढला. ठायी ठायी जणू पंढरपूरची जत्रा जमे. लोकमान्य थकत. कधी कधी प्रवासाचा त्रास होई; परंतु जनतेची निराशा होऊ नये म्हणून सारे कष्ट मुकाट्याने ते सहन करीत. स्वराज्याचा दिव्य संदेश त्यांनी दिला. साधी सोपी भाषा. आत्मविश्वाने भरलेली. साधे साधे दृष्टान्त. ती वाणी हृदयावर अपार परिणाम करी.

सतीचे शृंगारणे

इंग्रजी राज्याचे कोणी गोडवे गाऊ लागले की टिळक संतापत. घी देखले पण बडगा देखला नाही असे म्हणायचे. इंग्रजांनी पोस्ट, तारायंत्र, रेल्वे, बोटी–किती सुधारणा केल्या असे कोणी म्हणू लागले की, लोकमान्य म्हणत, 'सतीच्या अंगावर

दागदागिने घालून तिला शेवटी सरणात लोटतात ! त्याप्रमाणं हिंदुस्थानच्या अंगावर तारा, रेल्वे हे अलंकार चढवून हिंदुस्थानचं भस्म सरकार करणार आहे ही गोष्ट विसरू नका.'

ब्रिटिश लोक फोडा व झोडा या नीतीचे भक्त. भांडणे व फुटी पाडून बेटे सत्ता गाजवीत. हिंदू-मुसलमानांची दुही आहे, तर सत्ता कशी द्यायची असे ढोंगीपणाने ब्रिटिश विचारीत. लोकमान्य म्हणत, 'सारी सत्ता मुसलमानांना द्या. मुसलमानांना सारी सत्ता मिळाली तरी चालेल; परंतु तुम्ही चालते व्हा.' हिंदी स्वातंत्र्यासाठी तहानलेला मनुष्य आणखी काय बोलणार ? महात्माजींनी हेच उद्गार काढले. ज्यांच्या हृदयात सर्व राष्ट्राच्या स्वातंत्र्याची उत्कट तहान आहे, ब्रिटिश आधी चालते झाले पाहिजेत असे ज्यांना वाटते, त्यांच्या तोंडून असेच उद्गार बाहेर पडणार. आपसातील भांडणे मिटत नाहीत म्हणून ब्रिटिशांच्या बागनेटाखाली राहूनच जे हिंदू-मुसलमान परस्परांवर गुरगुरत राहत, त्यांची मात्र कीव येते.

हीच आमची संध्या

लोकमान्यांचा प्रत्येक क्षणच देशसेवेत जात होता. देशसेवा हाच त्यांचा महान धर्म झाला होता. अन्याय नष्ट करण्यासाठी झुंजणे याहून खरा धर्म कोणता?

एकदा एका गृहस्थाला लोकमान्यांना भेटायचे होते. सायंकाळ झाली होती. लोकमान्य संध्या तर नसतील ना करीत ? असे त्याला वाटले; परंतु तो आला. लोकमान्यांचे काही तरी काम चालले होते. आलेल्या सद्गृहस्थाचे स्वागत झाले. कुशल प्रश्न झाले.

तो गृहस्थ म्हणाला, 'मला वाटलं होतं की आपण संध्या वगैरे करीत असाल. या वेळी यावं की न यावं असं करीत होतो; परंतु आलोच.'

लोकमान्य म्हणाले, 'असं हे चाललं आहे आमचं. तीच आता संध्या ! आता दुसरी कोठून आणू ? तिला वेळ कोठून काढू?'

असे किती जणांना म्हणता येईल ? ज्याचे प्रत्येक कर्म सेवामय आहे, ज्याचे प्रत्येक कर्म पवित्र आहे. ज्याचा प्रत्येक क्षण अशा निर्मळ व उदात्त ध्येयसेवेत जात आहे त्यालाच म्हणता येईल की ही सारी संध्याच आहे. त्याचे सारे जीवन म्हणजेच जणू प्रभूची महापूजा.

चांभार झालास तरी चालेल, परंतु चांगला हो !

लोकमान्य सेवामय कर्मालाच धर्म मानीत होते. गीतेने ईश्वराची कर्मपूजाच करायला सांगितले. समाजाच्या सेवेचे कोणतेही कर्म सारखेच पवित्र आहे. वेद देणारा ऋषी व स्वच्छ झाडणारा झाडूवाला दोघेही मोक्षाचे अधिकारी – जर दोघांनी कर्मे मनापासून केलेली असतील. हा दिव्य कर्मपथ पुन्हा लोकमान्यांनी उजाळला.

एकदा बोलता बोलता लोकमान्य आपल्या मुलाला म्हणाले, 'अरे, चांभार झालास तरी चालेल. त्यात वाईट नाही. समाजाला जोडे शिवून द्यायला हवेतच; परंतु चांभार झालास तर उत्कृष्ट चांभार हो. वेळ नको मारू. सर्वांनी तुझ्याकडे जोडे घ्यायला यावं असं कर. कोणतंही सेवाकर्म मनापासून करा. ते प्रभूला पोचेल.'

सर्वगामी बुद्धी

लोकमान्यांच्या बुद्धीला सीमा नव्हती... सर्व विषयांत त्यांची मती चाले. ज्योतिष, गणित, तत्त्वज्ञान, इतिहास, कायदा सर्वत्र त्यांचा संचार असे. परंतु विलायतेतील एक गोष्ट सांगू ? केसरी पत्र छापण्यासाठी एक यंत्र विकत घ्यायला ते एका कंपनीत गेले. लोकमान्य निरनिराळे नमुने पाहात होते. एका बाजूला एक निरुपयोगी ठेवलेले यंत्र होते. लोकमान्यांनी तेच पसंत केले. मालक चकित झाला. त्याने सांगितले, 'हे यंत्र काही तरी बिघडलेलं आहे. काही तरी त्यात चुकलेलं आहे. तुम्ही हे का घेता?' लोकमान्यांनी सारे सांगितले. तेव्हा तो मालक म्हणाला, 'तुम्ही का मोठे इंजिनिअर आहात ?'

हिंदीतून भाषण

एकदा कलकत्त्यास सभा होती. गांधीजीही तेथे होते. लोकमान्य इंग्रजीत बोलणार होते; परंतु गांधीजी म्हणाले, 'तुम्ही इंग्रजीत नका बोलू. हिंदीत बोला. ते पुष्कळांना समजेल.' आणि लोकमान्य हिंदीतून बोलले. लोकमान्यांचे ते पहिले हिंदी भाषण !

कठोर परंतु अंतरी भोळे

लोकमान्य कठोर वाटत, उग्र वाटत; परंतु त्यांचे अंतःकरण भोळे होते. हा धिप्पाड पहाड आतून झिरपत असे. आगरकर व टिळक हे एकमेकांवर हल्ले चढवीत; परंतु जेव्हा आगरकर अकाली वारले तेव्हा टिळकांना अपार दुःख झाले. तो मृत्युलेख त्यांनी रडत रडत सांगितला होता.

विनोद

आणि हा धीरगंभीर महापुरुष कधी विनोदही करी. एकदा त्याच्या मुली काही तरी गुंफीत होत्या. बाजूला बारीक शंख गुंफून मध्ये टिळकांचा फोटो – आपल्या पित्याचे चित्र त्या गुंफीत होत्या. लोकमान्यांनी ते पाहिल्यावर म्हणाले, 'बाजूला लहान शंख व मध्ये मी मोठा शंख वाटतं!' सर्वांना हसू आले.

पगडी

आणि डोक्यावर तीच पगडी किती तरी दिवस होती; परंतु एकदा मंडईपाठीमागच्या प्रचंड सभेत कोणी तरी पाठीमागून येऊन हळूच पगडी बदलून दुसरी ठेवली. गंमत झाली !

मी उड्या मारीत जाईन

महर्षी अण्णासाहेब पटवर्धनांच्या शवाला अग्नी देऊन लोकमान्य ॐकारेश्वराचा घाट चढून जात होते. बरोबर मंडळी होती. श्री. कवडेशास्त्री किंवा कोणी तरी म्हणाले, 'अंधार आहे, जरा जपून चढा पायऱ्या.' तेव्हा टिळक एकदम म्हणाले, ' मी वृद्ध झालो असलो तरी अद्याप उड्या मारीत जाईन !'

अमर प्रसंग

आणि पुणे शहरातील तो अमर प्रसंग. ते करुण–मधुर दृश्य, हृदयंगम दृश्य ! गायकवाड वाड्यात प्रचंड सभा होती. मुंबईच्या १९१८ मधील जादा अधिवेशनानंतर बंगालचे व मद्रासचे काही पुढारी पुण्यात आले होते. सारे गायकवाड वाड्यात उतरले होते आणि या सर्व पुढाऱ्यांची भाषणे व्हायची होती. त्यांची दर्शने घेण्यास व त्यांचे शब्द ऐकण्यास हजारो लोकांच्या झुंडी गायकवाड वाड्याकडे चालल्या.

व्यासपीठावर ते पाहा धीरगंभीर देशबंधू दास, ते पाहा बिपिनचंद्र पाल, ते पाहा मद्रासकडचे कस्तुरीरंग अय्यंगार. लोकमान्य तेथे शोभत होते; परंतु अमृतबझार पत्रिकेचे संपादक मतिलाल घोष कोठे आहेत? लोकमान्यांचे ते प्रेमळ मित्र. ते आले आहेत ना ? कोठे आहेत ते ? व्यासपीठावरील पुढाऱ्यांची भाषणे झाली. देशबंधू बोलले; परंतु इतक्यात हे कोण येत आहे ? कोणाला हात धरून आणण्यात येत आहे ? कोण हे? कोणाची ही मूर्ती ? हेच मतिलाल घोष. ते आले आणि लोकमान्य उठले. लोकमान्यांनी मतिलालांना क्षेमालिंगन दिले. बंगाली हृदय महाराष्ट्राला भेटले. जणू

आत्मा आत्म्याला भेटत होता. पूर्व सागर पश्चिम सागराला भेटत होता. दोन महात्म्यांची भेट म्हणजे अत्यंत पुण्यमय प्रसंग!

सतां सद्भि: संग: कथमपिहि पुण्येन भवति ।

शिशिरबाबूंबद्दलची कृतज्ञता

आणि कलकत्ता काँग्रेसनंतर ते अमृतबझार पत्रिकेचे पहिले संपादक, मतिलालांचे बंधू शिशिरकुमार घोष यांची पुण्यतिथी होती. लोकमान्य त्या वेळेस बोलले. ते म्हणाले, 'शिशिरबाबू माझे वृत्तपत्रीय गुरू आहेत. मतिलाल व मी आम्ही दोघांनी शिशिरबाबूंच्या पायांजवळ धडे घेतले आहेत.' अशी ही कृतज्ञ नम्र वृत्तीही लोकमान्यांच्या ठायी होती.

सिंहगड, रायगड वगैरेंचे अपार प्रेम

स्वातंत्र्यार्थ तडफडणाऱ्या लोकमान्यांना महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य काळातील किल्लेकोट स्फूर्तीची स्थाने वाटत. सिंहगड म्हणजे तर अमर बलिदानाचे स्थान ! लोकमान्य वर्षातून एक महिना तरी तेथे जाऊन राहायचे. ते म्हणत असत, 'सिंहगडावरची एक महिन्याची स्वतंत्र हवा खाऊन येतो. मग अकरा महिने मी खाली जगू शकतो.' स्वातंत्र्य हीच जणू लोकमान्यांची हवा होती. स्वातंत्र्य त्यांचा श्वासोच्छ्वास होता.

आणि रायगडावर श्रीशिवछत्रपतींचा उत्सव त्यांनी सुरू केला. पहिला उत्सव त्यांनी तेथे केला. कोण उत्साह, कोण आनंद ! आणि ज्या मावळ्यांनी शिवकाळात समर-चमत्कार केले, राष्ट्रीय गुणांची पराकाष्ठा दाखवली, त्यांना रायगडाखाली जेवण होते; आणि लोकमान्य त्यांना स्वत: वाढीत होते. त्यांच्या हृदयात त्या वेळेस किती विचार उसळले असतील – किती भावना उचंबळल्या असतील, नाही ?

महाभारत म्हणजे करमणूक

आणि कधी विरंगुळा हवा असला म्हणजे लोकमान्य काय करीत? महाभारत म्हणजे त्यांचा विरंगुळा. महाभारत ही त्यांची करमणूक. महाभारताच्या महासागरात बुड्या मारायला, पोहायला लोकमान्यांना फार आवडे. त्यांचा त्याने श्रमपरिहार होई. वेद, उपनिषदे, महाभारत, गीता यांवर लोकमान्यांचा आत्मा पुष्ट झाला होता.

यश येते तर आनंद झाला असता

लोकमान्य भारतीय संस्कृतीची मूर्ती होते. खरा कर्मयोग त्यांनी दाखविला. चिरोलवर त्यांनी तुरुंगातून सुटून आल्यावर विलायतेत खटला भरला. चिरोलवर

खटला म्हणजे एक प्रकारे सरकारचा अपमान होता. लोकमान्य तुरुंगात असताना 'हिंदी अशांती' या पुस्तकात टिळकांच्यावर काही आरोप केले होते. त्यासाठी हा खटला होता; परंतु निकाल टिळकांच्या विरुद्ध लागला. अपरंपार खर्च आला. महाराष्ट्राने राष्ट्रपित्याला रक्कम गोळा करून दिली. कोणी लोकमान्यांना विचारले, 'खटल्यात अपयश आलं म्हणून तुम्हाला वाईट वाटलं का ?' टिळक शांतपणे म्हणाले, 'अपयशाबद्दल वाईट नाही वाटलं; परंतु यश येतं तर त्याचाही आनंद न मानण्याइतका मी स्थितप्रज्ञ झालो नाही !' कसे सरळ सुंदर उत्तर !

आणि आता लोकमान्य थकत आले होते. देशाची चिंता त्यांना जाळीत होती. आजचे सर परशुरामभाऊ कॉलेज त्या काळी न्यू पूना कॉलेज नावाने प्रसिद्ध होते. त्याच्या संमेलनप्रसंगी लोकमान्य आले होते. ते विद्यार्थ्यांस शेवटी म्हणाले, 'माझी म्हाताऱ्याची काठी आता तुमच्या हाती देणार आहे. आमचं काम आता तुम्ही पुरं करा.' हिंदी तरुण देशाला मुक्त करतील अशी लोकमान्यांना आशा होती. ते त्या वेळचे उद्‌गार ऐकून अनेक विद्यार्थी सद्‌गदित झाले होते.

गीतेचे स्मरण करीत अंत

देशात नवयुग जन्मत होते. लोकमान्य विलायतेत असताना या देशात गांधीजींनी सत्याग्रह सुरू केला होता. हिंदुस्थानात नवविद्युत संचरली, जनता उचंबळली. गोळीबार झाले. पंजाब घायाळ झाला. लोकमान्य महात्माजींना म्हणाले, 'आम्ही तिकडे असता हे सारं झालं याचं वाईट वाटतं.' राष्ट्रातील जागृती पाहून लोकमान्यांना भरते आले असले. गांधीजी असहकारासाठी सारे राष्ट्र उठवू पाहात होते. कलकत्त्यास काँग्रेसचे जादा अधिवेशन भरायचे होते. एक ऑगस्ट हा सर्व हिंदुस्थानभर असहकार दिन म्हणून पाळण्यात येणार होता; परंतु त्या एक ऑगस्टलाच दुसरी योजना ईश्वर घडवीत होता. लोकमान्य मुंबईस मरणशय्येवर होते. महात्माजी मुंबईसच होते. लोकमान्यांजवळ शेवटचे बोलत होते.

'असहकाराला तुमचा आशीर्वाद द्या.' गांधीजी म्हणाले.

'जर मुसलमानही बरोबर येणार असतील तर करा असहकार. माझी संमती आहे.' लोकमान्य म्हणाले.

आणि हळूहळू ते गंभीर झाले आणि गीता स्मरू लागले.

गीतेतील कोणता बरे श्लोक ते म्हणत होते ?

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।

हा श्लोक ते म्हणत होते. चिरंजीव, आशा देणारा श्लोक ! अंधार नाहीसा होऊन, अन्याय नाहीसा होऊन पुन्हा प्रकाश येईल, न्याय येईल, याची ती भगवंतांनी दिलेली ग्वाही होती. भारताच्या उद्धाराविषयीची आपली अमर आशा त्या श्लोकाच्या द्वारा लोकमान्य प्रकट करीत होते.

आकाश रडले

लोकमान्य १ ऑगस्ट १९२० रोजी देवाघरी निघून गेले. त्या दिवशी सारे राष्ट्र हळहळले. मुंबईस ४ लाख लोक प्रेतयात्रेत सामील झाले. महात्मा गांधी, महंमद अली अशांनी खांदा दिला आणि त्या दिवशी मुंबईत अपरंपार पाऊस, जणू आकाश रडत होते ! हिंदी जनतेच्या अश्रूंना मिळण्यासाठी स्वर्गस्थ आत्म्यांची अश्रूधारा येत होती.

लोकमान्यांची देणगी

लोकमान्यांनी काय दिले ? त्यांनी असंतोष दिला. 'माणसं असून मेंढरं का बनता ? उठा, जागृत व्हा. पडून राहण्यात काय पुरुषार्थ ?' अशी ही हाक त्यांनी मारली. 'हिंदी असंतोषाचे जनक' हीच त्यांची खरी पदवी. त्यांचे हे क्रांतिकार्य, दुष्ट परकीय सत्तेविरुद्ध असंतोष व अप्रीती उत्पन्न करणे हा धर्म असतो. लोकमान्यांनी हा धर्म दिला. त्यांनी स्वदेशीचा संदेश दिला. पैसा फंड वगैरे संस्थांना उत्तेजन देऊन उद्योगधंदे वाढवा असे सांगितले. राष्ट्रीय शिक्षण, दारूबंदी, साऱ्या गोष्टींना त्यांनी चालना दिली. सर्व राष्ट्र एक माना, ही शिकवण त्यांनी दिली. 'स्वराज्य' हा मंत्र दिला. त्या स्वराज्यासाठी कष्ट कसे भोगावे ते त्यांनी सांगितले. गीतारहस्य देऊन जीवनाची नवीन दृष्टी दिली. वेदावर ग्रंथ लिहून हिंदुस्थान बुद्धीत मागे नाही, असे पाश्चिमात्यांस पटविले. अमेरिकेमध्ये लालाजी अडचणीत आहेत असे ऐकताच त्यांना हजारो रुपयांची मदत पाठवून परदेशात हिंदी स्वातंत्र्याची चळवळ चालविण्यास उत्तेजन दिले. लोकमान्यांनी काय काय केले असे विचारण्याऐवजी काय केले नाही,

असे विचारावे. चारित्र्याचे पावित्र्य, निर्भयता, कर्मयोग, ध्येयाचा ध्यास, कितीतरी देणग्या त्यांनी दिल्या. अंतर्बाह्य बलाचा संदेश त्यांनी दिला आहे. खरोखरच ते 'बलवंत' होते. राष्ट्र बलवंत व्हावे म्हणून ते तडफडत होते. आपण ध्येय पुढे नेऊ या. त्यांचे धगधगीत, पवित्र त्यागमय जीवन डोळ्यांसमोर ठेवू या.

सेवा दलातील सैनिक सेवकांनो, लोकमान्यांना भक्तिप्रेमाने शत प्रणाम करा.

वंदे मातरम्।

+++

साने गुरुजी लिखित अनमोल ग्रंथसंपदा

अध्यापन कार्य, समाजसेवा, स्वातंत्र्ययुध्द अशा बहुविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवणारे आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणजे 'साने गुरुजी!'मातृभूमीच्या सेवेसाठी नोकरीचा राजीनामा देऊन स्वातंत्र्यसमरात त्यांनी स्वत:ला झोकून दिले आणि अखेरच्या श्वासापर्यंत जनतेच्या सुखासाठी झटत राहिले. समाजातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, एकता निर्माण व्हावी, शेतकरी-कामकरी वर्गाचे दैन्य-दारिद्र्य दूर व्हावे व सर्वत्र समाजवादाची स्थापना व्हावी या हेतूने ते सर्वत्र जनजागृती करत राहिले. लहान मुले, स्त्रिया, तरुण, दीन-दलित यांना स्वत्त्वाची जाणीव व्हावी व उत्तमोत्तम विचारांची देणगी मिळावी यासाठी अत्यंत संस्कारक्षम असे साहित्य त्यांनी निर्माण केले.

आज साने गुरुजींसारखे उदात्त व्यक्तिमत्त्व आपल्यामध्ये नसले तरीही त्यांचा हा साहित्यरूपी अनमोल ठेवा आपल्याकडे आहे. अत्यंत सोप्या भाषेतील या बोधप्रद कथा, वैचारिक लेख, इतर भाषांमधील महान लेखकांचे अनुवादित साहित्य घरोघरी पोहोचावे या हेतूने साने गुरुजींची सर्व पुस्तके एकूण ५१ खंडामध्ये आम्ही आपणासमोर सादर करीत आहोत. महाराष्ट्रातील प्रत्येक घर गुरुजींच्या विचारांनी पावन व्हावे, हीच एकमेव इच्छा !

भगवान श्रीकृष्ण व इतर चरित्रे

₹ 240

200041

पब्लिकेशन्स रिया

e mail : riyapublications@gmail.com